म. ग्रं. सं. ठाणे
विषय - निबंध
सं. क्र. 323

REFBK-0006713

म. ग्रं. सं. ठाणे.
ग्रं०क्रां नं. २५६

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन : १

# दर्पण संग्रह

६७९३

REFBK-0006713

संपादक

विनायक कृष्ण जोशी

श्री. म. सहस्रबुद्धे

* या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचे सर्व प्रकारचे हक्क **मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय**, मुंबई २ यांच्या स्वाधीन आहेत.

* या पुढील आवृत्त्यांचे सर्व हक्क संपादकांकडे आहेत.

* या संग्रहांतील उतारे, माहिती वगैरे कोणताहि मजकूर संपादकांच्या परवानगीशिवाय वापरतां येणार नाहीं.

एकमेव विक्रेते :

**म हा रा ष्ट्र ग्रंथ भां डा र**

**गिरगांव, मुंबई ४**

मुद्रकः—शं. वा. कुळकर्णी, सागर साहित्य छापखाना, मुंबई ४

का. श्री. चौघुले, सी. एन् प्रेस, मुंबई ४ (चरित्र पृष्ठें १ ते ३२)

माझी प्रिय पत्नी

कै. सौ. कमला जोशी

हिच्या स्मृतीस

सादर समर्पण

वि. कृ. जोशी

# दर्पण संग्रहाचा 'प्रस्ताव'

मराठी नियतकालिकांचा इतिहास, इतर भाषेंतील वृत्तपत्रांच्या मानाने अगदींच अलिकडचा—जेमतेम शंभर वर्षांचा आहे. या अल्पकाळांतील घडामोडींची सविस्तर जंत्री अद्याप उपलब्ध नाहीं. पहिले मराठी पत्रकर्ते श्री. बाळशास्त्री जांभेकर व त्यांचें 'दर्पण' पत्र याविषयीं तर आपल्या समाजाला जवळ जवळ कांहींच माहिती नव्हती असें म्हटलें तरी चालेल. 'मराठींतील पहिलें नियत कालिक कोणतें' याबद्दल १९३३ मध्यें वाद चालू असतां 'विविधवृत्तांत' दर्पणमधील कांहीं लेख नमुन्या दाखल छापले गेले; परंतु तेवढ्याने हें प्रकरण निकालांत न निघतां अगदी अलीकडे सुद्धा याविषयीं सर्वत्र गैरसमज असल्याचें आढळून येतें. कै. बाळशास्त्री जांभेकर निवर्तल्याला ता. १७ मे १९४६ रोजीं शंभर वर्षें पुरीं होतात, तेव्हां त्यांची शंभरी मराठी पत्रकारांनी साजरी करावी असा श्री. अ. का. प्रियोळकर यांचा लेख येथील लोकमान्य दैनिकाच्या १७ मे १९४५ च्या अंकांत प्रसिद्ध झाला. तेव्हां कै. बाळशास्त्री जांभेकर यांचें चरित्र व दर्पण पत्राविषयीं माहिती जर सविस्तर प्रसिद्ध करितां आली तर बरें असा विचार आला व ह्या कामाला प्रारंभ झाला.

आतांपर्यंत मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचीं जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं त्यांत 'बाळशास्त्री' व त्यांचें 'दर्पण' पत्र यांचा त्रोटक उल्लेख आढळतो. परंतु सरकारी कागद पत्रांची छाननी या दृष्टीने झालेली नव्हती व त्या साधनांचा विशेष उपयोगहि केला गेलेला नव्हता असें आढळून आलें. तेव्हां सरकारी रेकॉर्डमध्यें कांहीं मिळतें का तें प्रत्यक्ष पाहिलें व त्याच बरोबर इतर जी साधन सामुग्री मिळाली—म्हणजे लेखी पुस्तक रूपाने किंवा व्यक्तीं-कडून तोंडी—तिचा उपयोग केला. अर्थात या विषयावरचा शेवटचा शब्द लिहून झाला अशी संपादकांची कल्पना नाहीं. कारण प्रस्तुत संग्रह संपादून

त्याचें मुद्रण चालू असतां अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत निरनिराळ्या व्यक्तीं-कडून नवी नवी माहिती हातीं येत गेली. तेव्हां अजूनही कांहीं अनुपलब्ध माहिती असण्याचा संभव आहे.

कै. बाळशास्त्री जांभेकर यांचें चरित्र शक्यतोवर सविस्तर व साधार लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. 'दर्पण' पत्रांतील लेख हे त्यांचे स्मृति अवशेष होत. त्या लेखांचा संग्रह हेंच त्यांचें स्मारक करण्याचा एक मार्ग. मात्र 'दर्पण' मधील मराठी लेखांचे लेखक श्री. बाळशास्त्री जांभेकर नव्हते, हें अवश्य लक्षांत ठेवणें जरूर आहे. ते इंग्रजी बाजू संपादित करीत व त्याचा मराठी तर्जुमा इतर कोणी व्यक्ती करीत असली पाहिजे. बारीक भेद करावयाचा तर 'दर्पण' हें पहिलें 'संपूर्ण' मराठी नियतकालिक नाहीं हें खरें. तो मान १८४० मध्यें निघालेल्या 'मुंबई अखबार' या नियतकालिकाकडे जातो हें मान्य केलें पाहिजे. 'दर्पण' मधील लेख संपादित करतांना त्यावेळची भाषा जशीच्या तशी ठेवली आहे. मराठीला व्याकरणाची 'वेसण' घालण्याचे प्रयत्न त्यावेळी कै. दादोबा पांडुरंग तर्खडकर, कै. बाळशास्त्री जांभेकर यांजकडून नुकतेच होऊं लागले होते. आजच्या व त्या वेळच्या मराठींत बरेंच अंतर आढळतें. तें या मुळेंच. या संग्रहांतील लेखांची शीर्षकें जी मुळांतून घेतलीं तीं * या खुणेने दाखविलीं आहेत. बाकीची मजकुराला योग्य अशी संपादकांनी निवडली आहेत.

'दर्पण' संग्रह संपादित करण्याचे कामीं अनेक व्यक्तींकडून नाना प्रकारची मदत झाली हें मुद्दाम सांगणें अवश्य आहे. असलीं कामें एकट्या दुकट्याची नव्हत. नामावलीच द्यावयाची तर ती फारच लांबलचक होईल. त्यांतल्यात्यांत कांहींचा उल्लेख करणें आवश्यक आहे. मात्र हें तौलनिक आहे. असें आमच्या इष्टमित्रांनी व सहकाऱ्यांनी समजूं नये. मुंबई सरकारच्या रेकॉर्ड ऑफिस मधील सध्यांचे 'कीपर ऑफ रेकॉर्डस' श्री. दिनकर गणेश भिडे यांनी श्री. बाळशास्त्री जांभेकर यांचें त्रोटक चरित्र लिहिलें आहे. तें अप्रसिद्ध आहे. तें लिहितांना त्यांनीं जमवलेली सर्व साधन सामुग्री आमच्या स्वाधीन केली, व तिचा उपयोग करण्याची परवानगी दिली याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत. तसेच आमचे मित्र पुण्याचे 'मराठी ग्रंथ

सूचिकार' श्री. शंकर गणेश दाते यांनी 'दर्पण संग्रहांतील' 'पुनर्विवाह प्रकरण' दिलें व अनेक उपयुक्त सूचना केल्या. मुंबई सरकारचे 'हिस्टॉरिकल आर्चिव्हिस्ट' डॉ. व्ही. जी. दिघे यांनीहि वेळोवेळीं मार्गदर्शन केलें याबद्दल आम्हीं त्यांचे कृतज्ञ आहों.

हा संग्रह मुं. म. ग्रंथ संग्रहालयाच्या विद्यमाने प्रसिद्ध होत आहे. मुं म. ग्रंथसंग्रहालयाने जर हें कार्य अंगिकारलें नसतें तर सध्यांच्या कागद नियंत्रणाच्या काळांत हें काम होणें अशक्यच होतें. अशा परिस्थितींत संग्रहालयासारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्य संस्थेचें सहकार्य आम्हांस मिळवून दिल्याबद्दल संस्थेच्या चालकांचे आम्ही आभारी आहों.

मुखपृष्ठावरील चित्र श्री. दलाल यांनी काढून दिलें. सागर साहित्याचे श्री. ज. द. सातोस्कर व सी. एन्. प्रेसचे श्री. का. श्री. चौघुले यांनी पुस्तकाची छपाई सुबक व वेळेवर करून दिली याबद्दल त्यांचेहि आभार मानणें अवश्य आहे.

आणखी एक महत्वाचा खुलासा : पुस्तक ठराविक दिनांकाला काढावयाचें ठरविल्यामुळें त्याची छपाई अगदीं घाईने करावी लागली, व त्यामुळें संग्रहांत कांहीं मुद्रण दोष राहून गेले आहेत. पृष्ठ दोन (चरित्र विभाग) यांतील 'राजाराम बाळकृष्ण भागवत' हें नांव राजाराम रामकृष्ण भागवत असें पाहिजे पृष्ठांक ५१ व ६४ या वरील मथळे चुकीचे व अनवश्यक आहेत. या महत्वाच्या दोषांखेरीज अन्य कांहीं किरकोळ चुकाहि राहिल्या असण्याचा संभव आहे. पुस्तकाची द्वितीयावृत्ति काढण्याची वेळ येईल त्यावेळीं त्यांची दुरुस्ती करण्यांत येईल.

**मुंबई**
दि. १० मे १९४६

**विनायक कृष्ण जोशी**
**श्री. म. सहस्रबुद्धे**
संपादक

# अनुक्रमणिका


| | पृष्ठांक |
|---|---|
| कै. बाळशास्त्री जांभेकर चरित्र | १-३२ |
| दर्पणसंग्रह | |
| प्रस्ताव | १ |
| नियतकालिक लेखांपासून स्वार्थ | ३ |
| छापण्याच्या रीतींत फेरफार | ६ |
| दर्पण नको रणशिंग पाहिजे | ७ |
| शास्त्रें व परलोक सिद्धि | ८ |
| हिंदू धर्म आणि सती | ९ |
| हिंदूंचा धर्म | १० |
| हिंदूंचा धर्म-दुसरी बाजू | १२ |
| धर्माचें मुख्य तात्पर्य | १६ |
| हिंदू व ख्रिस्ती धर्म | १९ |
| ख्रिश्चन धर्माचीं प्रमाणें | २३ |
| हिंदु धर्मावरील आक्षेप व त्यास उत्तर | २५ |
| दर्पणांतील प्रतिबिंबें | २९ |
| ईश्वर आहे या विषयीं प्रमाण | ३० |
| पुनर्विवाह प्रकरण | ३२ |
| मनुष्य जातीचे भेद | ५२ |
| असावें तें नाहीं आणि नसावें तें आहे | ५८ |
| विद्वान आणि मूर्ख या दोहोंमध्यें अंतर | ६० |
| गुडगुडी ओढणें | ६२ |
| जातिभेदाचा प्रश्न | ६५ |
| मनुष्याची जात | ६६ |
| जनावरांतील जाती | ६७ |
| जनावरांच्या जाती व मनुष्यांतील जाती | ६९ |
| ज्ञाति विभाग व रीति रिवाज | ७१ |

पृष्ठांक


हिंदुधर्म व ईश्वर ७६
स्त्रियांस विद्याभ्यास ७८
पारशी समाजांतील सामाजिक आंदोलन ८१
हिंदू लोकांस पत्र ८४
मुंज मुलींचीं कां नाहीं ? ८६
स्त्री पुरुषांना समान हक्क ८८
स्त्री शिक्षणाची दिशा ९३
रुक्मीणी व स्त्रीशिक्षण ८७
दुराग्रही चालीवर झोड ९९
स्त्रीशिक्षणाबद्दल दृष्टांत १००
पार्लमेंटांत सुधारणा कायदा १०१
गायकवाडांचा बंदोबस्त १०२
सुप्रीम कोडताचा निकाल १०३
सरकारी नोकऱ्यांचें हिंदीकरण १०५
राममोहन राय १०८
धंदेवाईक पत्र लेखक ११३
खर्च चालविण्याच्या रीतीवर टीका ११७
सरकारी नोकरींत जातीयता १२१
संकरजाति इंग्रेजांस १२४
इंग्रज सरकारचा सावकार १२६
सृष्टीची शोभा १२९
नाटकशाळेस प्रोत्साहन १३१
ग्रंथपरीक्षणाचा नमुना १३३
विद्येविषयीं आस्था १३५
महाराष्ट्र भाषेचें व्याकरण १३८
चिमाजीरावाचा मृत्यु १४०

ग्रंथालय
क्र. ६७९३

# कै. बाळशास्त्री जांभेकर

महाराष्ट्रांत इंग्रजी अमदानी सुरू झाल्यानंतरच्या पहिल्या दोनचार दशकांत अत्यंत नांवारूपास आलेल्या व्यक्तींमध्यें कै. बाळशास्त्री जांभेकर हे अग्रगण्य होते. त्यांची विद्वत्ता, सार्वजनिक कार्यांची हातोटी व परोपकारी वृत्ति या गोष्टी अजूनही घरोघर दंतकथेच्या रूपाने ऐकूं येतात. वाईट वाटतें तें इतकेंच कीं, या थोर पुरुषाचें चरित्र पद्धतशीर व विस्तारपूर्वक अजूनही लिहिलें गेलेलें नाहीं. आणि आतां जों जों कालावधि जास्त होतो तों तों तें काम कठीणही होईल. त्यांच्या चरित्राची साधनसामुग्री जरी तुटपुंजी असली तरी, त्यांच्या विषयींच्या ज्या दंतकथा प्रचलित आहेत, त्यांत अतिशयोक्ति बिलकूल नसावी असें निश्चितीने म्हणता येतें.

दादोबा पांडुरंग, भाऊ महाजन, नारायण कृष्ण लाड इत्यादि त्या काळांतील थोर पुरुषांच्या बरोबरीने कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वाङ्मयांत नाना तऱ्हेची भर घातली. पण दादोबा पांडुरंग यांच्याप्रमाणे त्यांनी आपल्या जीवनाविषयीं कांहीं टिपणें वा दैनंदिनी ठेवल्याचें अजून तरी उपलब्ध झालेलें नाहीं. हा त्यांचा दोष नाहीं. आपल्याकडे आत्मचरित्र लिहिण्याची आवड अजूनही विशेष प्रमाणांत उत्पन्न झालेली नाहीं. त्याकाळीं तर ग्रंथनिर्मितीचा नुसता उषःकालच होता. तेव्हां ही कल्पना न सुचणें हें साहजिकच होतें. दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रांत कै. बाळशास्त्री यांच्याविषयी उल्लेख आढळतात; पण तेवढ्यावरून बाळशास्त्रींचें कर्तृत्व समजणें वा अजमावणें शक्य होत नाहीं. रा. बाळकृष्ण नारायण देव यांनी कै. बाळशास्त्री जांभेकर यांचें एक छोटेसें सत्तावीस पानी (रॉयल अष्टपत्री) चरित्र लिहिलें आहे. पण त्यांनीही विषयोपक्रमांतच बाळशास्त्र्यांचें आयुर्वृत्त फारसें उपलब्ध

| | पृष्ठांक |
|---|---|
| हिंदुधर्म व ईश्वर | ७६ |
| **स्त्रियांस विद्याभ्यास** | ७८ |
| पारशी समाजांतील सामाजिक आंदोलन | ८१ |
| हिंदू लोकांस पत्र | ८४ |
| मुंज मुलींचीं कां नाहीं ? | ८६ |
| स्त्री पुरुषांना समान हक्क | ८८ |
| स्त्री शिक्षणाची दिशा | ९३ |
| रुक्मीणी व स्त्रीशिक्षण | ८७ |
| दुराग्रही चालीवर झोड | ९९ |
| स्त्रीशिक्षणाबद्दल दृष्टांत | १०० |
| पार्लमेंटांत सुधारणा कायदा | १०१ |
| गायकवाडांचा बंदोबस्त | १०२ |
| सुप्रीम कोडताचा निकाल | १०३ |
| सरकारी नोकऱ्यांचें हिंदीकरण | १०५ |
| राममोहन राय | १०८ |
| धंदेवाईक पत्र लेखक | ११३ |
| खर्च चालविण्याच्या रीतीवर टीका | ११७ |
| सरकारी नोकरींत जातीयता | १२१ |
| संकरजाति इंग्रेजांस | १२४ |
| इंग्रज सरकारचा सावकार | १२६ |
| **सृष्टीची शोभा** | १२९ |
| नाटकशाळेस प्रोत्साहन | १३१ |
| ग्रंथपरीक्षणाचा नमुना | १३३ |
| विद्येविषयीं आस्था | १३५ |
| महाराष्ट्र भाषेचें व्याकरण | १३८ |
| चिमाजीरावाचा मृत्यु | १४० |

क्र. ६७९३

# कै. बाळशास्त्री जांभेकर

महाराष्ट्रांत इंग्रजी अमदानी सुरू झाल्यानंतरच्या पहिल्या दोनचार दशकांत अत्यंत नांवारूपास आलेल्या व्यक्तींमध्यें कै. बाळशास्त्री जांभेकर हे अग्रगण्य होते. त्यांची विद्वत्ता, सार्वजनिक कार्याची हातोटी व परोपकारी वृत्ति या गोष्टी अजूनही घरोघर दंतकथेच्या रूपाने ऐकूं येतात. वाईट वाटतें तें इतकेंच कीं, या थोर पुरुषाचें चरित्र पद्धतशीर व विस्तारपूर्वक अजूनही लिहिलें गेलेलें नाहीं. आणि आतां जों जों कालावधि जास्त होतो तों तों तें काम कठीणही होईल. त्यांच्या चरित्राची साधनसामुग्री जरी तुटपुंजी असली तरी, त्यांच्या विषयींच्या ज्या दंतकथा प्रचलित आहेत, त्यांत अतिशयोक्ति बिलकूल नसावी असें निश्चि-तीने म्हणता येतें.

दादोबा पांडुरंग, भाऊ महाजन, नारायण कृष्ण लाड इत्यादि त्या काळांतील थोर पुरुषांच्या बरोबरीने कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वाङ्मयांत नाना तऱ्हेची भर घातली. पण दादोबा पांडुरंग यांच्याप्रमाणे त्यांनी आपल्या जीवना-विषयीं कांहीं टिपणें वा दैनंदिनी ठेवल्याचें अजून तरी उपलब्ध झालेलें नाहीं. हा त्यांचा दोष नाहीं. आपल्याकडे आत्मचरित्र लिहिण्याची आवड अजूनही विशेष प्रमाणांत उत्पन्न झालेली नाहीं. त्याकाळीं तर ग्रंथनिर्मितीचा नुसता उषःकालच होता. तेव्हां ही कल्पना न सुचणें हें साहजिकच होतें. दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रांत कै. बाळशास्त्री यांच्याविषयी उल्लेख आढळतात; पण तेवढ्यावरून बाळशास्त्रींचें कर्तृत्व समजणें वा अजमावणें शक्य होत नाहीं. रा. बाळकृष्ण नारायण देव यांनी कै. बाळ-शास्त्री जांभेकर यांचें एक छोटेसें सत्तावीस पानी (रॉयल अष्टपत्री) चरित्र लिहिलें आहे. पण त्यांनीही विषयोपक्रमांतच बाळशास्त्र्यांचें आयुर्वृत्त फारसें उपलब्ध

नाहीं, असें नमूद केलें आहे. हें चरित्र रा. राजाराम बाळकृष्ण भागवत यांच्या सहीने प्रसिद्ध झालें आहे; पण खरोखरी तें रा. बाळकृष्ण नारायण देव यांनीं लिहिलें असें आतां सिद्ध झालें आहे. साधनसामुग्रीचा अभाव त्यावेळींही होता, हें तो छोटा निबंध वाचतांना दर पृष्ठांवर अनुभवास येतें. त्यानंतर रा. वि. सी. सरवटे यांचें 'मराठी साहित्य समालोचन', रा. गं. बा. सरदार यांचें 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्व पीठिका,' कै. रा. गो. कानडे यांचें 'मराठी नियत कालिकाचा इतिहास' व रा. शं. ग. दाते यांची 'ग्रंथसूचि' इत्यादि ग्रंथांमध्यें कै. बाळशास्त्री यांच्यासंबंधी तसेंच त्यांच्या 'दर्पण' 'दिग्दर्शन' आदि नियतकालिकांविषयीं मोघम उल्लेख आढळतात. पण ते सर्व उपरिनिर्दिष्ट चरित्रावरूनच घेतले असावेत असें वाटतें.

## संशोधन व सामुग्री

रा. देव यांनी लिहिलेलें चरित्र अगदीं त्रोटक असून त्यावर किती विसंबावें हा प्रश्न आहे. कारण अलीकडे कांहीं सरकारी कागद पत्रें चाळतांना आणि त्या काळच्या वर्तमानपत्रांच्या फायली धुंडाळतांना, त्यांतील कांहीं माहिती वस्तुस्थितीला सोडून होती असें आढळून आलें. उदाहरणार्थ दोनच गोष्टींचा उल्लेख करतों. रा. देव यांच्या चरित्रांत म्हटलें आहे कीं, "सन १८२८ च्या अखेरीस त्यांचा विद्यालयांतील अभ्यास संपला......प्रथमतः एल्फिन्स्टन विद्यालयांत सन १८२९ त त्यांस गणित शास्त्राचे अध्यापक प्रोफेसर ऑलीवार यांच्या हाताखालीं उपाध्यापकाची जागा देण्यांत आली व पुढें थोड्याच वेळांत त्यांस त्याच ठिकाणीं अध्यापकही नेमण्यांत आलें." दुसरी गोष्ट म्हणजे "कै. भाऊ महाजन यांचें त्यांना 'दर्पण' पत्राचे बाबतींत सहकार्य होतें," ही होय. रा. देव यांनी 'भाऊ महाजन हे शास्त्रीबुवांचे तिसरे गुरुबंधु व स्नेही' असें म्हटलें आहे. "शास्त्रीबोवांच्या साह्याने इ. स. १८४० च्या प्रारंभी त्यांनी 'प्रभाकर' नांवाचें पत्र काढलें आहे," असाही पुढच्याच वाक्यांत उल्लेख आहे. शास्त्रीबुवांच्या 'दर्पण' पत्राशी त्यांचा संबंध होता असें त्यांनी म्हटलेलें नाहीं. परंतु श्री. वि. सी. सरवटे यांनी आपल्या 'मराठी साहित्य समालोचनां'त म्हटलें आहे कीं "महाराष्ट्रांतील दर्पणांत इंग्रजी बाजू बाळशास्त्री व मराठी बाजू भाऊ महा-

जन लिहीत." (पृष्ठ १७७) हचि कल्पना इतर संदर्भ ग्रंथांतूनहि वेळोवेळां सध्याची विद्वान् मंडळी गतेतिहासाबद्दल बोलतांना व्यक्त करतात.

कै. बाळशास्त्री यांचें शिक्षण सन १८२८ च्या अखेरीस संपलें हें म्हणणें मान्य करतां येत नाहीं. कारण बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३० मध्यें 'एल्फिन्स्टन नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'ची शाळा आपला शिक्षणक्रम संपवून सोडली असा उल्लेख मुंबई सरकारच्या दप्तरांत त्या सालच्या इतिवृत्तावरून आढळतो. (G. D. Vol. 24A/749A of 1843 page 186) या सरकारी पुस्तकांत सन १८३० मध्यें 'एल्फिन्स्टन नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या शाळेंतून बाहेर पडलेल्यांचीं नांवें सांपडतात. त्यांत बाळशास्त्र्यांचें नांव आहे. बाळ गंगाधर शास्त्री असें नांव व त्यापुढें अक्कलकोट युवराजांचे शिक्षक, गणितविषयाचे अध्यापक, सुपरिंटेंडेंट ऑफ स्कूल्स इत्यादि माहिती 'शेरा' या सदरांत नमूद केलेली आढळते. सन १८२८ मध्यें शाळेंतून बाहेर पडलेल्या मुलांच्या यादींत 'बाळ गंगाधर शास्त्री' किंवा 'बाळ गंगाधर जांभेकर' असें नांव आढळत नाहीं. यावरून कै. बाळशास्त्री जांभेकर यांचा शिक्षणक्रम १८३० च्या अखेरीस पुरा झाला हें अगदीं निर्विवादपणें म्हणता येतें.

शिवाय सन १८३० मध्यें उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या नामावळींत रा. भाऊ महाजन–म्हणजेच रा. गोविंद विठ्ठल कुंटे ऊर्फ भाऊ महाजन यांचें नांव सांपडत नाहीं. त्यांच्या पुढच्या एकदोन वर्षांच्या यादींतही त्यांचें नांव सांपडत नाहीं. आतांपर्यंतच्या सर्व ज्ञात माहितीप्रमाणें रा. बाळशास्त्री व भाऊ महाजन हे जर बरोबरचे, तर १८३० मध्यें जरी नाहीं तरी त्यानंतर एक दोन वर्षांच्या आंत तरी तें सांपडणें अवश्य होय. परंतु रा. भाऊ महाजन यांचें नांव १८४१ च्या यादींत सांपडतें. या वरून उभयता थोर व्यक्ती एकाच वर्गांत शिकत होत्या असें म्हणणें वस्तुस्थितीला सोडून होतें याबद्दल आतां शंका घेण्याचें कारण नाहीं. सन १८४१ च्या यादींत रा. भाऊ महाजन यांचें नांव आहे व त्यांच्या नांवासमोर 'प्रभाकर पत्राचे मालक व संपादक' असाही उल्लेख आहे. (G. D. Vol. 24A/749A of 1843 page 189)

यावरून हें लक्षांत येईल कीं, जी साधन सामुग्री उपलब्ध आहे ती अतिशय बारकाईने पारखून घेणें जरूर आहे. म्हणजे हे विपर्यास कोणी बुध्या केले असें सुचविण्याचा बिलकुल इरादा नाहीं. हे दोष नकळत घडूं शकतात. कसें तें पहा. रा. देव यांच्या विधानाला त्या वेळच्या 'दि बाँबे टाईम्स अँड जर्नल ऑफ कॉमर्स' या नियतकालिकाच्या ता. २० मे १८४६ च्या अंकांत बाळशास्त्री यांचा जो मृत्युलेख आला आहे त्यांत आधार सांपडतो. त्यांत म्हटलें आहे कीं 'वयाचे १९ वे वर्षी म्हणजे १८२९ मध्यें त्यांचा ज्या शिक्षण संस्थेशीं संबंध आला. त्याच शिक्षण संस्थेंत ते शेवटपर्यंत होते.' बाळशास्त्री यांचें शिक्षण संपतांच १८३० मध्यें नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून त्यांची नेमणूक झाली असा उल्लेख आढळतो. बाळशास्त्री व भाऊ महाजन यांचें 'प्रभाकर' पत्र आणि इतर सामाजिक आंदोलनें यांच्या बाबतींत सहकार्य होतें, व ते एकमेकांचे परमस्नेही होते हें निर्विवाद आहे. परंतु बाळशास्त्री यांच्या चरित्राची साधनसामुग्री निवडतांना कशी खबरदारी घेणें इष्ट आहे तें सांगण्यासाठीं जरा विस्तारानें हें स्पष्टीकरण केलें आहे.

## जन्म, बालपण व शिक्षण

कै. बाळ गंगाधर ऊर्फ बाळशास्त्री जांभेकर यांची जन्मभूमि रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूर तालुक्यांतील पोंभुर्ले हें गांव होय. तेथे जांभेकरांचें घराणें मोठें मान्य, संभावित व विद्याचारसंपन्न होतें. शास्त्रीबुवांचे वडील गंगाधर शास्त्री यांस मुंबईतील शंकरशेट या नामांकित घराण्याचा पाठिंबा होता असें म्हणतात. जांभेकरांच्या घराण्यांत कित्येक स्त्रियाही पुराण सांगणाऱ्या झाल्या असें ऐकिवांत आहे. शास्त्रीबुवांना नारायण शास्त्री नांवाचा भाऊ व चिमाबाई आणि लाडकीबाई अशा दोन बहिणी होत्या. चिमाबाई मालवणला योगी यांच्या घरीं व लाडकीबाई पुण्यांत जानवेकरांकडे दिली होती. शास्त्रीबुवांच्या कुळासंबंधाने यापेक्षां जास्त माहिती मिळूं शकत नाहीं.

बाळशास्त्र्यांचा जन्म १८१० मध्यें झाला, इतकीच माहिती मिळाली; महिना वा तिथी यांचा नामनिर्देश आढळत नाहीं. त्यांचें बालपण कसें गेलें,

त्यांनी कोणत्या गुरूच्या हाताखालीं शिक्षणाला आरंभ केला, इत्यादि बद्दलही कांहींच माहिती मिळत नाही. परंतु लहान वयांत त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे त्यांचें संस्कृत अध्ययन बरेंच झालें होतें, संस्कृत भाषेशी व तींतील प्रख्यात ग्रंथकारांच्या कृतींशी त्यांचा चांगला परिचय झाला होता, न्यायशास्त्र व व्याकरण शास्त्र यांत त्यांची पूर्व वयांत बरीच प्रगति झाली होती, इत्यादि माहिती ऐकून माहीत आहे. ते एकपाठी होते म्हणून त्यांचे गुरुजी व सहाध्यायी त्यांस 'बृहस्पति' म्हणत अशी दंतकथा आहे. त्या पैकीं एक अशी कीं, बाळशास्त्री १८२४ च्या सुमारास मुंबईत आले तेव्हां ते हमरस्त्यावर उभे असतां दोघा गोऱ्या शिपायांची बाचाबाची सुरू झाली, शेवटी गुद्यावरून गुद्यावर मजल गेली. हें प्रकरण कोर्टांत गेलें, व साक्षीदार म्हणून १४ वर्षे वयाच्या बाळशास्त्र्यांना बोलावण्यांत आलें. त्यांनीं न्यायाधिशास भांडणाचें वृत्त उत्तम प्रकारें सांगितलें; व त्यावेळीं त्यांचा इंग्रजी भाषेचा अभ्यास बिलकुल झाला नव्हता तरी ते दोघे शिपाई इंग्रजींत जे अद्वातद्वा बोलले तें त्यांनी स्पष्टपणे न्यायाधिशास बोलून दाखविलें. न्यायमूर्तीस त्याचें आश्चर्य वाटलें व त्यांनी विद्याखात्याकडे त्या बालकाबद्दल खास शिफारस केली.

इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर त्या वेळचे गव्हर्नर मौंट स्टुअर्ट एलिफन्स्टन यांनी १८२१ मध्यें शाळा काढण्याचा संकल्प केला, त्याप्रमाणे २१ ऑगस्ट १८२२ रोजी नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन करण्यांत आली. मराठी शाळांवर तपासनीस ( मुक्तसर ) म्हणून रा. सदाशिव काशीनाथ छत्रे व जगन्नाथ शास्त्री क्रमवंत हे प्रथम होते. त्यांनी आपल्या इष्टमित्रांना शिकविण्यासाठीं मुबईस आणलें. कांहींना आपल्या घरीं ठेवून घेतलें व इतरांची अन्य प्रकारें सोय लावून त्यांना शिक्षणाची संधि प्राप्त करून दिली. बाळशास्त्री मुंबईसहि येण्यास रा. स. का. छत्रे यांचे प्रयत्नच कारणीभूत झाले. त्यावेळीं मातृभाषेचा शिक्षणक्रम व नंतर लोअर आणि अपर डिव्हिजन असा इंग्रजी शिक्षणक्रम होता. या मुदतींत कॉलेजहें नामाभिधान निर्माण झालें नव्हतें. शास्त्रीबुवांचा इंग्रजी शिक्षणक्रम १८३० मध्यें पुरा झाला, त्यावेळीं ते २० वर्षे वयाचे होते. अलीकडच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे ते 'पदवीधर' झाले. भाषाज्ञान, इतिहास, पदार्थविज्ञानशास्त्र-

भूगर्भशास्त्र, रसायनशास्त्र, मानसशास्त्र इत्यादि ‘ प्रायोगिक व आध्यात्मिक शास्त्रांची ’ त्यांना विशेष आवड होती. पुढें सरकारी नोकरींत असतांना त्यांनी ‘ दर्पण ’, ‘ दिग्दर्शन ’ आदि जीं नियतकालिकें चालविली व त्यांत या विषयावर त्यांनीं जे लेख लिहिले, यावरून त्यांच्या गाढ विद्वत्तेची प्रचीति येते.

## सरकारी नोकरी व समाजकार्य

शिक्षणक्रम संपल्यावर त्यांची सरकारी नोकरी सुरू झाली. त्यांचा वृत्तपत्र-व्यवसाय व नोकरी असे दोन खंड करतां येत नाहींत. सरकारी नोकरींत असतांना, सर्व व्याप सांभाळून त्यांनी वेळोवेळीं नियतकालिकें चालविलीं व आधुनिक ज्ञान लोकांस समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. १८३० मध्ये त्यांची नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे ‘ डेप्युटी नेटिव्ह सेक्रेटरी ’ म्हणून नेमणुक झाली. १८३२ मध्यें ते याच संस्थेचे ‘ नेटिव्ह सेक्रेटरी ’ झाले. याच वर्षी ६ जानेवारी रोजीं त्यांनी ‘ दर्पण ’ ( Durpun ) साप्ताहिक सुरू केलें. ‘दर्पण’ इंग्रजी व मराठी अशा दोन भाषांत लिहिलें जात असे. १८३२ च्या नोव्हेंबर मध्यें त्यांची अक्कलकोटच्या युवराजांना शिक्षक म्हणून दरमहा रु. १२५ पगारावर साताऱ्याला नेमणूक झाली. मग १८३४ मध्यें एल्फिन्स्टन कॉलेजांत गणित विषयाचे उपाध्यापक ( असिस्टंट प्रोफेसर ) म्हणून नेमणूक झाली. १८४२ मध्यें एल्फिन्स्टन कॉलेजांतील गणित विषयाचे अध्यापक ऑर्लीबार ( Prof. Orlebar ) हे रजा घेऊन इंग्लंडला गेले असतां त्यांची अध्यापक म्हणून नेमणूक झाली. ही कामगिरी करीत असतांना त्यांनी खगोल शास्त्राची माहिती देण्याचेंही कार्य केलें. अध्यापक वा उपाध्यापक म्हणून काम करीत असतां त्यांची दक्षिण भागांतील मराठी शाळांचे सुपरिंटेंडेंट म्हणूनही नेमणूक झाली होती. या कामगिरीवर असतांना त्यांना दरमहा रु. ४५० चें वेतन मिळत असे. पुढें शिक्षक तयार करण्याची शाळा काढण्याचें त्यांच्याच शिफारशीवरून ठरलें, तेव्हां या ‘ नॉर्मल स्कूल’चे पहिले डायरेक्टर म्हणूनही त्यांचीच नेमणूक झाली. तसेंच सर्व इलाख्यांतील देशी भाषीय शाळांचे सुपरिंटेंडेंटही तेच होते.

कै. बाळशास्त्री यांचें सर्व आयुष्य लोकशिक्षणांतच खर्च झालें असें म्हणण्यांत बिलकुल अतिशयोक्ति होणार नाहीं. शिक्षण खात्यांत त्यांनी निरनिराळ्या प्रकारें जबाबदारीचीं कामें पार पाडलीं. विद्यालयांत ते गणित विषयाचे उत्तम अध्यापक म्हणून प्रसिद्ध होते, इतकेंच नव्हे तर ते अष्टपैलू शिक्षक होते. हर एक विषय सुगम करुन विद्यार्थ्यांना समजावून सांगण्याची हातोटी पाहून सगळीकडे त्यांची वाहवा झाली. रावबहादूर नाना मोरोजी यांनी त्यांच्या अध्यापनकौशल्याची नेहमी वाखाणणी केली. 'राजकारणी' यांनी आपल्या निबंधांत म्हटलें आहे कीं "भाषाज्ञान, इतिहास, तत्वज्ञान इत्यादि विषय शिकवितांना त्यांचें अफाट ज्ञान प्रकट होई, व शिकणारांच्या मनावर फार चांगला ठसा उमटे. या विषयामध्यें त्यांची योग्यता गणित विषयापेक्षां कांहीं कमी होती असें म्हणण्यास बिलकुल आधार नव्हता." बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या वार्षिक अहवालांतही या संबंधानें त्यांची अनेकवार तारीफ केलेली आढळून येते.

शिक्षणकार्याबरोबरच निरनिराळ्या विषयांवर ग्रंथ लिहिण्याचें कामही त्यांनी केलें. 'बालव्याकरण', 'भूगोलविद्या', 'नीतिकथा', व 'सारसंग्रह' हे चार ग्रंथ त्यांनी लिहिले. त्यांची भाषासरणी, व्यवस्था व विषयप्रतिपादन हीं फार सुबोध आणि सरळ आहेत. यांपैकीं बहुतेक ग्रंथ आतां दुर्मिळ आहेत. एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानच्या इतिहासाच्या आधारें त्यांनी इतिहास रचला, पण तो त्यांच्या मृत्यूनंतर १८५१ मध्यें प्रसिद्ध झाला. 'हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास' (मुसलमानी अंमल) शास्त्रीबुवांनी लिहिला होता व तो शाळांच्या अभ्यासांत दाखलही झाला होता. बाळशास्त्री व भाऊ महाजन या उभयतांनी मिळून 'शब्द सिद्धि निबंध' नांवाचें पुस्तक रचिलें होतें. मराठी भाषेंतील शब्दांच्या व्युत्पत्तीबद्दल यांत विचार केला आहे. त्यावरून उभयतांची शोधक बुद्धि व भाषाज्ञान हीं बरींच व्यापक होतीं हें दिसून येतें. शास्त्रीबुवांना मराठी, संस्कृत, इंग्रजी, लॅटिन या चार भाषा चांगल्या अवगत होत्या. त्याशिवाय हिंदुस्थानी, गुजराती, बंगाली, कानडी आणि फारशी यांचेंही त्यांस ज्ञान होतें." असें 'सरस्वती मंडळ' कर्त्यांनी लिहून ठेविलें आहे. विधवाविवाहाच्या सशास्त्रतेबद्दल

चर्चा करणारें छोटें पुस्तकही त्यांनी लिहिलें होतें. संध्येचें मराठी भाषांतर करण्यालाही त्यांनी प्रारंभ केला होता. शेवटीं शेवटीं ॲबरक्रोंबीकृत ग्रंथाच्या आधारें त्यांनी मानसशास्त्रावर ग्रंथरचना सुरू केली होती, पण ती अपुरीच राहिली.

'बॅांबे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी' व 'जिऑग्राफिकल सोसायटी' या दोन संस्था मुंबईंत बऱ्याच वर्षांपासून स्थापन झाल्या होत्या. ह्या दोन्ही संस्थांचे बाळशास्त्री सभासद होते. या संस्थांकरितां त्यांनी प्राचीन ताम्रपट, शिलालेख, भूगर्भशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र या विषयांवर जे निबंध लिहिले, ते वरील सभांच्या मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झालेले आहेत, व हे निबंध उत्तम आहेत असा तज्ञांचा अभिप्राय आहे. शाळांचे सुपरिंटेंडेंट या नात्यानें इलाख्यांत हिंडत असतांना त्यांनी हें ठिकठिकाणचें संशोधनकार्य केलें. यावरून निष्ठा व सततोद्योग हे त्यांचे गुण प्रकर्षानें कळून येतात. त्यांनी लिहिलेल्या निबंधांची यादीः—

(१) गिरनार मुक्कामीं सांपडलेल्या काळ्या दगडावरील शिलालेखाचें भाषांतर (इंग्रजी) पुस्तक १ पृष्ठ ९४. (२) खारेपाटण मुक्कामीं सांपडलेल्या ताम्रपटाची नक्कल व भाषांतर (इंग्रजी) पुस्तक १ पृष्ठ २०९. (३) नागपूर मुक्कामीं सांपडलेल्या शिलालेखाची नक्कल व भाषांतर (इंग्रजी) पुस्तक १ पृष्ठ २५९. (४) मालवणांत लोखंड सांपडणाऱ्या मातीची हकीकत. पुस्तक १ पृष्ठ ४३५. (५) सातारा व नांदगांव मुक्कामीं सांपडलेल्या दोन ताम्रपटांची नक्कल व भाषांतर (इंग्रजी) जेम्स बर्डने दिलेल्या टीपांसहित. पुस्तक २ पृष्ठ १. (६) कोल्हापूर मुक्कामीं देवनागरी लिपींत व हल्लीं कानडी लिपींत लिहिलेल्या ताम्रपटांचें भाषांतर (इंग्रजी) पुस्तक २ पृष्ठ २६३. (७) कोल्हापूर इलाख्यांत सामानगड मुक्कामीं सांपडलेल्या शके ६७५ मधील ताम्रपटांचें भाषांतर (इंग्रजीं) पुस्तक २ पृष्ठ ३७१.

शास्त्रीबुवांचा शिष्यवर्गहि फारच मोठा होता. थोड्याच शिक्षकांच्या हातांतून इतका मोठा व नामांकित शिष्यसमूह शिकून गेला असेल. कै. भाऊ दाजी, नारायण दाजी व रा. ब. केरो नाना छत्रे हे शास्त्री बुवांच्या शिष्य वर्गांपैकी

# कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्या हस्ताक्षराचा नमुना



To

H. R. Murray Esqr.
Secretary &c.

Sir,

I have the honor to acknowledge the receipt of your letter of the 8th Instant, intimating to me that the Honble the Governor in Council has been pleased to insert my name in the Commission of the Peace lately issued by Government.

In returning my thanks for the honor thus conferred upon me, I beg leave to request that you will have the goodness to assure His Excellency in Council that I shall endeavour to direct my best attention to every part of the duty devolving on me as one of Her Majesty's Justices of the Peace for the Town and Island of Bombay.

I have the honor to be,
Sir,
Your most obedt. Servant

Bal G. Shastree

Bombay [illegible]
October [illegible]

होत. पहिल्या भिषग्वर्यानें रक्तपित्तावर औषध शोधून काढलें. प्राचीन संस्कृत ग्रंथांचें प्रकाशन करणें ही कामगिरी त्यांनी केली. डॉ. नारायण दाजी यांना वनस्पति शास्त्राची आवड होती. रा. ब. केरो नाना छत्रे यांचें नांव गणित शास्त्रांतील प्राविण्य, बालबोध स्वभाव व छात्र वर्गावर दयार्द्र दृष्टि यास्तव, विद्यालयांतील मंडळीस विश्रुतच आहे. शेट दादाभाई नौरोजी यांचा अभ्यास शास्त्रीबुवांपाशी झाला. शास्त्रीबुवांचे मागें त्यांची गणितशास्त्राध्यापकाची जागा त्यांस मिळाली, तेव्हां त्यांचें वय अवघें २० वर्षांचें होतें. सर्व प्रकारच्या स्वार्थावर लाथ मारून देशकल्याणासाठीं आमरण झटल्यामुळें दादाभाईंचें नांव हिंदवी राजकारणांत अजरामर झाले आहे. अशा राजकारणी गुरूचेहि बाळशास्त्री विद्यालयीन गुरू होते. नंतरच्या सामाजिक सुधारणेचे प्रवर्तक डॉ. आत्माराम पांडुरंग, रघुनाथ नारायण खोटे, हायकोर्टाचे ट्रान्स्लेटर म्हणून प्रसिद्धी पावलेले नारायण दीनानाथ, स्त्रीशिक्षणाचें उदाहरण घालून देणारे व निर्भिड आणि निस्पृहतेबद्दल गाजलेले नाना मोरोजी, इत्यादि अनेक ख्यातनाम मंडळी शास्त्रीबुवांच्या शि वर्गापैकीं होत.

बाळशास्त्री जांभेकर यांच्या आणखी एका शैक्षणिक कामगिरीचा उल्लेख केला पाहिजे. आधुनिक पद्धतीच्या शाळा काढल्याला वीस पंचवीस वर्षें जेमतेम पुरीं होत होतीं. शाळांचे सुपरिंटेंडेंट या नात्यानें दौरा करीत असतांना त्यांना आढळून आलें, कीं विद्यार्थ्यांनी उत्तम नागरिक बनावयाचें म्हणजे त्यांचे शिक्षक प्रथम त्या गोष्टी जाणणारे असले पाहिजेत. मुलांना नागरिकत्वाचें शिक्षण दिलें पाहिजे: सत्य, नीति, सदाचार, उद्योगपरता इत्यादि सद्गुण त्यांच्या ठायीं वाढविणें, लोकहिताच्या कामीं सतत झटण्यास त्यांस उत्तेजन देणें, परदेशांतील लोकाचार, राज्यव्यवस्था इत्यादि गोष्टींची त्याना माहिती देणें, अशी शास्त्रीबुवांची शिक्षणासंबंधीं व्यापक कल्पना होती. परंतु शिक्षकांसच जर ह्या गोष्टी माहीत नाहीत तर त्यांच्या हातून योग्य शिक्षण व्हावें कसें? म्हणून शिक्षक-वर्ग तयार करण्याची शिफारस त्यांनी केली. शिक्षक तयार करण्याची शाळा काढण्याची कल्पना सरकारनें मान्य केली व १८४५च्या एप्रिल महिन्यांत पहिलें नॉर्मल स्कूल (सध्याच्या भाषेंत बोलावयाचे तर ट्रेनिंग कॉलेज) प्रथम तीन वर्षांसाठीं

होत. पहिल्या भिषग्वर्यानें रक्तपितीवर औषध शोधून काढलें. प्राचीन संस्कृत ग्रंथांचें प्रकाशन करणें ही कामगिरी त्यांनी केली. डॉ. नारायण दाजी यांना वनस्पति शास्त्राची आवड होती. रा. ब. केरो नाना छत्रे यांचें नांव गणित शास्त्रांतील प्राविण्य, बालबोध स्वभाव व छात्र वर्गावर दयार्द्र दृष्टि यास्तव, विद्यालयांतील मंडळीस विश्रुतच आहे. शेट दादाभाई नौरोजी यांचा अभ्यास शास्त्रीबुवांपाशी झाला. शास्त्रीबुवांचे मागें त्यांची गणितशास्त्राध्यापकाची जागा त्यांस मिळाली, तेव्हां त्यांचें वय अवघें २० वर्षांचें होतें. सर्व प्रकारच्या स्वार्थावर लाथ मारून देशकल्याणासाठीं आमरण झटल्यामुळें दादाभाईचें नांव हिंदवी राजकारणांत अजरामर झालें आहे. अशा राजकारणी गुरूचेहि बाळशास्त्री विद्या-लयीन गुरू होते. नंतरच्या सामाजिक सुधारणेचे प्रवर्तक डॉ. आत्माराम पांडुरंग, रघुनाथ नारायण खोटे, हायकोर्टाचे ट्रान्स्लेटर म्हणून प्रसिद्धी पावलेले नारायण दीनानाथ, स्त्रीशिक्षणाचें उदाहरण घालून देणारे व निर्भिड आणि निस्पृहतेबद्दल गाजलेले नाना मोरोजी, इत्यादि अनेक ख्यातनाम मंडळी शास्त्रीबुवांच्या शिष्य वर्गापैकीं होत.

बाळशास्त्री जांभेकर यांच्या आणखी एका शैक्षणिक कामगिरीचा उल्लेख केला पाहिजे. आधुनिक पद्धतीच्या शाळा काढल्याला वीस पंचवीस वर्षें जेमतेम पुरीं होत होतीं. शाळांचे सुपरिंटेंडंट या नात्यानें दौरा करीत असतांना त्यांना आढळून आलें, कीं विद्यार्थ्यांनी उत्तम नागरिक बनावयाचें म्हणजे त्यांचे शिक्षक प्रथम त्या गोष्टी जाणणारे असले पाहिजेत. मुलांना नागरिकत्वाचें शिक्षण दिलें पाहिजे; सत्य, नीति, सदाचार, उद्योगपरता इत्यादि सद्गुण त्यांच्या ठायीं वाढविणें, लोकहिताच्या कामीं सतत झटण्यास त्यांस उत्तेजन देणें, परदेशांतील लोकाचार, राज्यव्यवस्था इत्यादि गोष्टींची त्याना माहिती देणें, अशी शास्त्रीबुवांची शिक्षणासंबंधीं व्यापक कल्पना होती. परंतु शिक्षकांसच जर ह्या गोष्टी माहीत नाहीत तर त्यांच्या हातून योग्य शिक्षण व्हावें कसें? म्हणून शिक्षक-वर्ग तयार करण्याची शिफारस त्यांनी केली. शिक्षक तयार करण्याची शाळा काढण्याची कल्पना सरकारनें मान्य केली व १८४५च्या एप्रिल महिन्यांत पहिलें नॉर्मल स्कूल (सध्याच्या भाषेंत बोलावयाचे तर ट्रेनिंग कॉलेज) प्रथम तीन वर्षांसाठीं

म्हणून काढण्यांत आलें. या शाळेचे डायरेक्टर म्हणून त्यांचीच नेमणूक झाली होती. नॉर्मल स्कूलला कांहीं दिवसापूर्वी 'भोजन वस्तीची शिक्षण शाळा' असा प्रतिशब्द होता हें जातां जातां नमूद करतों.

रा. बाळशास्त्री यांना वैद्यकीय शिक्षणाचें माध्यम काय असावें याबद्दल सल्ला विचारण्यांत आला होता. त्यांनी त्यावेळीं असें मत व्यक्त केलें कीं, सध्या देशांत जे वैद्य आहेत त्यांना पाश्चात्य वैद्यकाचें तात्पुरतें जुजबी ज्ञान द्यावें अशी जर कल्पना असेल तर मराठी हें माध्यम असलें तरी चालेल, परंतु पाश्चात्य वैद्यकाचीं मूलभूत तत्वें पद्धतशीर व सखोल शिकवावयाची तर त्यासाठीं इंग्रजी हें माध्यम ठेवणें इष्ट होय. शास्त्रीबुवा मराठीचे अभिमानी नव्हते असें म्हणतां येत नाहीं. महाराष्ट्राची शैक्षणिक, सामाजिक व भाषिक बाबतींत त्यांनी आमरण सेवा केली असें असूनही त्यांनी जो सल्ला दिला त्यावरून ते स्वभाषेचे अंध अभिमानी नव्हते, आणि कोणत्याही प्रश्नाचा वास्तववादी दृष्टीनें विचार करणारे होते हें सहज दिसून येतें.

## समाज जागृति व सुधारणा

शिक्षणप्रसाराच्या कामीं त्यांनी सदैव देह झिजविला. कोकणांतील ओळखीच्या मंडळींना मुंबईला आणून त्यांच्या शिक्षणाची सोय करावी, कांहींना आपल्या घरीं ठेवून घ्यावें, अज्ञानाच्या डबक्यांत डुंबलेल्या समाजाला ज्ञानामृत पाजण्यासाठीं त्यांनीं व्यासपीठ व नियतकालिक या दोहोंचाहि उपयोग केला. त्यांनी चालविलेल्या नियतकालिकांतून जरा 'जड' विषय येत अशी तक्रार आहे. पण हा त्यांचा दोष नाहीं. त्यावेळीं आता जें सर्वसामान्य ज्ञान वाटतें, तें गहन समजलें जात असे. म्हणूनच त्यांना 'दर्पण' मध्यें एकदां 'वाफेचे यंत्र ( Steam Engine ) या विषयावर लेख लिहावा लागला. मागसलेपणाच्या खोल गर्तेत पडलेल्या समाजाला प्रगतीच्या शिखरावर नेण्याच्या कार्याचा तो प्राथमिक काल होता. त्या वेळच्या सामाजिक रूढी, रीतिरिवाज, विचारसरणी कशा होत्या हें समजणें कठीण आहे. १८८० पासून ज्या कांहीं सामाजिक सुधारणा सुरू झाल्या त्यांचीच आपल्याला अस्पष्ट माहिती मिळते.

पेशवाई नष्ट होऊन इंग्रजी अंमदानी सुरू झाल्यावर न्या. रानडे, डॉ. भांडारकर, चिपळूणकर शास्त्रीद्वय, लोकमान्य टिळक, गोपाळराव आगरकर, यांच्या राज-वटीला सुरवात होईपर्यंतच्या मधल्या काळांत समाजाची घडी कशी होती ते सहज कळणें शक्य नाहीं. जांभेकर-चरित्रांत रा. देव लिहितात कीं, " विद्या-लयांतून संध्याकाळीं विद्यार्थी घरीं गेला कीं त्यास वस्त्रांतर करण्याबद्दल घरच्या मंडळीचा आग्रह पडे. सकाळसंध्याकाळ एकनिष्ठपणाचा उच्छेद करूं पाहणारी आणि कर्मठांनीं वर पुष्कळ भर टाकल्यामुळें लठ्ठ झालेली आजची संध्या किंवा 'एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति' या सिद्धान्तवाक्याचा उघड विसर पाडणारे अनेक स्तोत्रपाठ, असलीं कृत्यें करण्याबद्दल वडील मनुष्यांनी त्यास घरीं त्रास द्यावा; शंकराचार्यांनीं पंचायतनाची प्रवृत्ति ज्या हेतूनें केली त्या थोर व स्तुत्य उद्देशावर पाणी घालणारी आजची घरची देवपूजा घरच्यांच्या मर्जीखातर त्यास करावी लागे व पुरुषसूक्त, सौर, पवमान, रुद्र वगैरे अनेक देवतांचा आभास कोंवळ्या अंत:करणांत उत्पन्न करणारे पाठ करावे लागत. सोंवळ्याओंवळ्यांत यत्किंचित् कमी जास्ती झालें कीं, चोहोंकडून त्याजवर काहूर उठे. पायांत जोडा असतां चुकून तोंडांत पाण्याचा घोंट घेतला कीं, प्रायश्चित् घेण्यापर्यंत मजल येई. नव्या मंडळीस या गोष्टी फारच दु:सह वाटावयास लागल्या. पवमानाच्या पाठापेक्षां बेकनच्या निबंध वाचनांत त्यांस आनंद वाटे. रोजच्या खुळ्या धर्मकर्मांत अळें-बळें जो वेळ खर्चावा तो निव्वळ व्यर्थ जातो असें त्यांस वाटूं लागलें. या कर्मा-पासून कोणत्याही प्रकारें आपली मानसोन्नति होत नसून उलट त्यापासून खुळे-पणाची संवय जडण्याचा संभव आहे, असा त्यांचा समज होत चालला."

उतारा जरा लांब आहे, पण तत्कालीन सामाजिक परिस्थिति कळण्याला त्याची मदत होते. यावरून ज्याला आपण पांढरपेशा समाज म्हणतो त्या समाजाची ही पद्धति होती हेंही त्यावरून सहज लक्षांत आलें पाहिजे. बहुजन समाज यापेक्षांही कितीतरी मागें असला पाहिजे. यांतील वर्णन अतिशयोक्तीचें असें वाटण्याचें कारण नाहीं कारण अगदी अलीकडच्या काळांतही, केवळ डोकीवर केस वाढ-विणें हें निषिद्ध मानलें जाई. कॉंग्रेस मंत्रिमंडळाचे माजी पंतप्रधान यांना

जांभेकर चरित्र

रत्नागिरी कॉलेजबाबत मुंबईत गेल्या १९४५ च्या एप्रिलमध्यें भरलेल्या सभेंत एक लहानपणची गोष्ट सांगितली होती. शिकण्यासाठीं मुंबई, पुणें यासारख्या शहरांत आलेलीं मुलें डोकीवर केस वाढवूं लागली होती. पण घरीं जातांना ते हजामत करून जात. श्री. बाळासाहेबांना हें ढोंग आवडलें नाहीं. बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते घरीं गेले तेव्हां त्यांनी वाढविलेले केस काढले नव्हते. आपला नातू बी. ए. होऊन आला याबद्दल त्यांच्या आजीला हर्ष झाला तर नवल नव्हे. तिनें नातवाला उदंड आयुष्य व यश चिंतिलें, पण विचारलें, "सगळें चखोट से रे, पण हें काय?" असें म्हणतांना तिनें बाळासाहेबांच्या डोक्याकडे बोट दाखविलें. सारांश त्यावेळचा समाज अंधश्रद्धा, कर्मठपणा व अज्ञान यांच्या गर्तेत होता असें म्हणावयाला हरकत नाहीं.

बाळशास्त्री जांभेकर यांच्या शैक्षणिक कार्याचें एक अंग म्हणजेच त्यांनी केलेली सामाजिक सुधारणेची चळवळ होय. नाना शंकरशेट हे शास्त्रीबुवांचे चहाते व पाठीराखे होते. नाना शंकरशेटनीच आपल्या स्वतःच्या घरांत मुलींची शाळा सुरू केली होती. विधवाविवाह व शुद्धि हीं दोन कार्यें शास्त्रीबुवांनीं केल्याचा उल्लेख आढळतो. विधवाविवाहाच्या सशास्त्रतेबद्दल त्यांनी एक निबंध लिहिला होता. तसेंच भोळ्या समजुतीवर प्रहार करण्यास त्यांनी सुरवात केली होती. त्यांना त्यांत यश आलें नाहीं—किंबहुना अजून तरी त्या दिशेने कितीशी प्रगति झाली आहे? 'चंद्र व सूर्य यांस ग्रहणें लागण्याचीं कारणें' या विषयावर शास्त्रीबुवांनी एकदा व्याख्यान दिलें होतें. ते उत्तम गणिती होते व खगोल शास्त्राचा त्यांचा अभ्यासही उत्तम होता. एल्फिन्स्टन कॉलेजांत त्यांनी खगोल निरीक्षणाचें काम केलें होतें, असा त्यावेळच्या एका नियतकालिकांत उल्लेख सांपडतो. तेव्हां त्यांनी ग्रहणाचें ज्योतिषशास्त्राधारें विवेचन केलें व ग्रहणाचे वेळीं सुतक पाळणें, दानधर्म करणें या गोष्टी खुळचट आहेत असें सांगितलें असलें तर नवल नव्हे! पण त्यावेळीं समाज खवळला. त्यांना बहिष्कृत करण्याचीहि भाषा सुरू झाली होती, पण तेथवर मजल गेली नाही.

शुद्धीच्या कार्यांतही त्यांनी धडाडीने भाग घेतला होता. ख्रिश्चन मिशन-

ऱ्यांनी आपलें जाळें पसरण्याला त्यावेळीं नुकतीच सुरवात केली होती. शास्त्रीबुवा व त्यांच्या सहकाऱ्यांनीं शुद्धि-चळवळ केली या योगें त्यांना बरें वाटणें शक्य नव्हतें. तेव्हां त्यांच्या कार्याची दखल ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या लिखाणांतच पाहावयाला सापडते. श्रीपाद शेषाद्री नांवाच्या एका इसमाला शुद्ध करून घेतलें हें प्रकरण त्या वेळीं फारच गाजलें. शास्त्रीबुवांना या कामीं ' प्रभाकर ' कर्ते भाऊ महाजन यांचेंही सर्व प्रकारें साहाय्य होतें. श्रीपाद शेषाद्रीला शुद्ध करून घेण्याचें ठरविलें, व त्याप्रमाणें त्याचा एक विधि मुंबईत झालाही. वैदिक व शास्त्री मंडळींत त्यायोगें हलकल्लोळ झाला. त्याबद्दल ता १६ डिसेंबर १८४४ रोजीं पुण्यांत नगरकरांच्या वाड्यांत शास्त्री मंडळींची बैठक झाली, पण तींत कांहींच ठरलें नाहीं. पुन्हा २३ डिसेंबर १८४४ रोजीं बैठक होऊन या शुद्धीच्या ' अमंगल ' कार्यांत भाग घेणारांना प्रायश्चित्त देण्याचें ठरलें. या कामीं बाबाजी दिवाणजी नांवाच्या गृहस्थाचें शास्त्रीबुवांना सहाय्य होतें. शास्त्री मंडळींनीं जे प्रायश्चित्त ठरविलें तें असें ( १ ) शुद्धीमध्यें भाग घेणारांनीं लघुरुद्र करावा. ( २ ) त्यांत पुढाकार घेणारे बाळशास्त्री यांना प्राजापत्य प्रायश्चित्त घेण्यास सांगावें. ( ३ ) शास्त्रीबुवांना मदत करणारे बाबाजी दिवाणजी यांना प्राजापत्य प्रायश्चित्त सांगितलें होते. ' ज्ञानोदय ' च्या ता. १५ जानेवारी १८४५ च्या अंकांत या बैठकीची माहिती आली, ती मुंबईतल्या ' दि बॉम्बे विटनेस ' या नांवाच्या साप्ताहिकानें आपल्या ता. १३ फेब्रुवारी १८४५ च्या अंकांत उधृत केली आहे. विशेष म्हणजे बाळशास्त्री वगैरे मंडळींनी श्रीपाद शेषाद्रीच्या इच्छेविरुद्ध त्याला शुद्ध करून घेण्याचा खटाटोप चालविला असल्याचें 'ज्ञानोदया'ने म्हटलें आहे ! पुण्यांतील शास्त्रीमंडळींनी जीं प्रायश्चित्तें सांगितलीं तीं इंग्रजी लोकांना कळावींत म्हणून त्या लेखाला पुढील टीपा जोडल्या होत्या. " गायत्री मंत्र म्हणजे ' वेदांतील ऋचा—जिला ब्राह्मणांची माता असें म्हणतात. ' Gayatri the Sacred verse of Vedas commonly called the mother of Brahmans.' प्राजापत्य प्रायश्चित्ताबद्दल विल्सनच्या संस्कृत शब्दकोशांत पुढील स्पष्टीकरण आहेः—' A sort of penance, eating

once a day for three days in the morning, once in the night for three days, subsisting for three days on food given as alms and fasting three days more."

शास्त्रीबुवांनी शुद्धीचें कार्य केल्यामुळें त्यांजवर वरील प्रकारचा प्रसंग ओढवला. ज्या गोष्टीवर आपला विश्वास आहे ती करितां समाजांतून बहिष्कृत झालें तरी परवडेल, पण त्यांनी प्राजापत्य प्रायश्चित कां घेतलें असा आक्षेप घेतला जाण्याचा संभव आहे. पण ही गोष्ट त्यांना कमीपणाची न ठरतां त्यांच्या थोर मनाची साक्ष पटविते. त्या नंतरच्या समाजसुधारकांनीही अगदी परवा परवापर्यंत याच धोरणाचा अवलंब केल्याचें आढळून येतें. लोकमान्य टिळकांचे 'पंचहौद प्रकरण' सर्वांच्या आठवणींतलें आहे. अगदी अलीकडचा दाखला म्हणजे स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकरांनीं रत्नागिरीला असतां रा. धाकस यांना शुद्ध करून घेतल्यावर त्यांच्या मुलीच्या विवाहप्रसंगीं कन्यादान केलें. शुद्धीकृत मुलीचा विवाह इतरांप्रमाणेंच करावा ही कल्पना रूढ करणें हा त्यांचा मुख्य विचार होता. त्यावेळीं वीर सावरकरांनी कद नेसून कन्यादान केलें. कारण समाज तेवढ्याने संतुष्ट राहतो ना—काय हरकत आहे? तेव्हां बाळ-शास्त्र्यांनी प्रायश्चित्त घेतलें यांत दोषार्ह कांहींच नव्हे. परिस्थिति पाहून, समाजाला एकदम न बिचकवितां, एक एक सुधारणा त्याच्या गळीं उतरावयाची हा त्यांचा विचार. बुद्धिवादानेंच कोणतीही गोष्ट साध्य करण्याचा त्यांचा मार्ग. ते असल्या गोष्टी करूं लागले म्हणून त्यांची लोकप्रियता कमी झाली असेल हें न सांगतांही कळून येईल. लक्ष्मी-सरस्वतींचें सख्य नाहीं, त्याचप्रमाणें लोक-प्रियता व सुधारणा बरोबरीनें राहूं शकत नाहींत.

तथापि त्यांनी सुरू केलेल्या कार्याचा तडाखा प्रतिपक्षाला किती जिव्हारी लागला होता तें कळून आलें म्हणजे त्या कार्याची महत्ता कळून येईल. श्रीपाद शेषाद्रीला शुद्ध करून घेतल्याचा उल्लेख वर आलाच आहे त्या शुद्धीचें पौरोहित्य करणारा एक तेलंगी ब्राह्मण होता. शुद्धीचें कार्य आरंभणारे व त्याचा पुरस्कार करणारे शास्त्रीबुवा आणि बावाजी दिवाणजी यांना शास्त्री मंडळींनी जर प्रायश्चित्त

घेण्यास भाग पाडलें तर मग या तेलंगी ब्राह्मणाला ते मोकळे सोडणें शक्यच नव्हतें. त्यालाही क्षौर प्रायश्चित्त घ्यावें लागलें. हा प्रायश्चित्तविधी मुंबईत मलबार हिलवरच्या बाणगंगेवर झाला. ( From ban an arrow. A spring flows into this thank which, it is said was miraculously caused by Ram, who discharged an arrow into the ground at this place, when the sacred waters of the Ganges immediately burst forth and have since continued to flow, up to the present time. Hence peculiar sacredness of walkeshwar.) ह्या प्रायश्चित्तविधीचें रसभरित वर्णन 'ज्ञानोदय' पत्राच्या १ फेब्रुवारी १८४५ च्या अंकांत एका बातमीदारानें केलें आहे. तेलंगी ब्राह्मणाच्या मिशा काढल्या, डोक्याचा गोटा केला, त्याला पांचवेळ पंचगव्य दिलें, अंगाला माती व शेण असें आळीपाळीनें लावून त्याला गंगेंत बुड्या मारण्यास आणि ओल्या धोतरानें पिंपळाच्या झाडाखालीं उभे राहण्यास लाविलें, इत्यादि गोष्टींचा उल्लेख त्यानें केला आहे. हें सारें वर्णन केल्यानंतर त्यानें म्हटलें आहे कीं, "शास्त्रीमंडळींनी 'प्रभाकर' व 'ज्ञानसिंधू' च्या द्वारा शास्त्रीमंडळींना जें गालिप्रदान केलें, तें त्यांच्यावरच उलटलें—इतकेंच नव्हें तर त्यांच्या मिशाही छाटल्या गेल्या असें म्हणावयाला हरकत नाहीं. कारण राजाच्या नोकराचा अपमान हा खुद्द राजाचाच अपमान नाहीं काय! अशा प्रकारचें विचार तें दृश्य पाहून माझे मनांत आले." ("Now the epithets which the Shastrees in the Prabhakar and Dnyansindhoo bestowed upon the Bhutts, have all returned upon themselves. And not only so, but they all may be said to have lost their moustaches, for if you inflict disgrace upon the servant of a King you bring disgrace upon the King himself. These and other unpleasont thoughts came into my mind." )

ज्ञानोदयमध्यें आलेला हा मजकूर इतक्या विस्तारानें देण्याचें कारण इतकेंच कीं, प्रतिपक्षानें ज्या हिरीरीनें सुधारकावर टीकास्त्र चालविलें होते त्यावरून त्यांच्या कार्याचें उग्र स्वरूप लक्षांत यावें.

ब्राह्मणाला प्रायश्चित्त दिलें त्याचें वर्णन करतांना ज्ञानोदयाच्या बातमीदाराला 'प्रभाकर' व 'ज्ञानसिंधू' पत्रांचा विसर तर पडला नाहींच, पण त्यानें अवश्य उल्लेख केला यावरून त्या वेळच्या मिशनऱ्यांना या सुधारक मंडळींचें कार्य किती खुपत होतें तें समजून येतें. शुद्धीच्या चळवळीचा पुरस्कार प्रभाकर व ज्ञानसिंधू या पत्रांनी केला पण प्रत्यक्ष चळवळ बाळशास्त्री जांभेकर यांच्या नेतृत्वाखालींच चालली होती. 'हिंदुधर्म प्रसिद्धीकरण' ह्या नांवाचा एक ग्रंथ जॉन विल्सन यांनी लिहून प्रसिद्ध केला, त्यांतील विधानांचें खंडन बाळशास्त्री यांनीं अत्यंत मार्मिकपणानें केलें.

## 'दर्पण' साप्ताहिकाची हकीकत

बाळशास्त्री जांभेकर यांनीं शिक्षण प्रसारार्थ नियतकालिकांचाही साधन म्हणून उपयोग करून घेतला. १८३२ मध्यें त्यांनीं दर्पण ( Durpun ) नांवाचें साप्ताहिक सुरू केलें, तें जवळ जवळ आठ वर्षे चाललें; नंतर त्यांनी 'दिग्दर्शन' नांवाचें मासिक काढलें होतें. श्री. भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' 'धूमकेतू' व 'ज्ञानसिंधू' या नियतकालिकांशींही त्यांचा संबंध होता. 'दर्पण' हें पत्र प्रथम पाक्षिक स्वरूपांत निघालें. परंतु ४ मे १८३२ रोजीं तें साप्ताहिक करण्यांत आलें. दर्पणचा पहिला अंक ता. ६ जानेवारी १८३२ रोजीं प्रसिद्ध झाला. तो 'मेसेंजर प्रेस नंबर १, काळबादेवी रोड, येथें कावसजी करसेटजी नांवाच्या पारशी गृहस्थांनीं रघुनाथ हरिश्चंद्रजी या नांवाच्या गृहस्थाकरिता छापून प्रसिद्ध केला.' नंतर 'दर्पण' पत्र श्रीकृष्ण जगन्नाथजी (Shreekrishna Jagannathjee) यांनीं कोरियर (Courier) प्रेस मध्यें नं. ७ बेल लेन येथे प्रसिद्ध केलें. हें नियतकालिक काढण्याचा संकल्प या तारखेचे बरेच दिवस अगोदर केलेला असावा असें दिसतें. कारण त्यांनी जो प्रस्ताव ( म्हणजे उद्देश पत्रिका ) पहिल्याच अंकांत छापला आहे, तो ता. १२ नोव्हेंबर १८३१ रोजींच

लिहून ठेवला होता. एखादें कार्य आरंभिलें म्हणजे तें किती पद्धतशीरपणे व दक्षतेने बाळशास्त्री करीत असावेत हेंही यावरून दिसून येते. त्याचें दुसरें एक उदाहरण म्हणजे त्यांनी ता. २ जानेवारी १८३२ रोजीं गव्हर्नरांकडे, सरकारने आपल्या 'दर्पण' पत्राच्या कांहीं प्रति घेऊन प्रोत्साहन द्यावें असें लिहिलेलें पत्र होय. त्यावेळी सरकार त्यांना पसंत पडणाऱ्या नियतकालिकांच्या कांहीं प्रति घेत असे. या प्रति तें आपल्या जिल्ह्यांतील व परप्रांतांतील अधिकाऱ्यांना वा प्रतिनिधींना आपल्या खर्चाने पाठवीत असे. या गोष्टीचा आपल्यालाही फायदा मिळावा अशी बुद्धि सुचणें साहजिक होतें. त्याप्रमाणें ता. २ जानेवारी १८३२ रोजीं त्यांनी गव्हर्नरांना पत्र धाडलें. त्या पत्रावर रघुनाथ हरिश्चंद्रजी (Raghunath Harishchandraji) जनार्दन वासुदेवजी (Janardan Vasudevjee) व बाळशास्त्री (Bal G. Shastree) यांच्या सह्या होत्या. या पत्राला ता. १३ जानेवारी १८३२ रोजीं प्रतिकूल उत्तर आलें. तथापि मुंबई सरकार 'दर्पण'ची एक प्रत घेत असे, व त्यासाठीं खर्चीं पडणाऱ्या पैशांची नोंदहि सरकार दप्तरीं आढळते. शेवटची नोंद १८४०ची आहे. यावरून 'दर्पण' हें पत्र त्या सुमारासच बंद पडलें असें अनुमान करतां येतें.

सन १८४० मध्यें 'मुंबई अखबार' नांवाचें शंभर टक्के मराठी साप्ताहिक निघालें. त्याच्या प्रस्तावांत म्हटलें होतें कीं, "दर्पण वर्तमानपत्र आजपर्यंत इंग्रजींत जो मजकूर तोच मराठींत छापत आला तसेंच पुढे चालविण्यास कांहीं अडचणी आल्यामुळें......आजपर्यंत दर्पणास जे आश्रय देत आले त्यांनी व एतद्देशीय थोर लोकांनी यथापूर्ण कृपा करून सहाय व्हावें."

'दर्पण' पत्राच्या कांहीं प्रति सरकारने घ्याव्या असा जो अर्ज करण्यांत आला त्यावर तिघांच्या सह्या आहेत, त्यावरून आणखी एका गोष्टीचा उलगडा होतो. बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दर्पण' पत्राची मराठी बाजू रा. भाऊ महाजन पाहात असत असा समज रा. देव यांचा मूळ निबंध व त्याचा अनुवाद करणारे आतांपर्यंतचे लेखक यांनी करून दिला आहे तो बरोबर नाहीं असें निखालसपणे म्हणतां येते. 'दर्पण' हें नियतकालिक इंग्रजींत व मराठींत अशा दोन भाषेंत

निघत असे. त्याच्याच 'प्रस्तावांत' लिहिलें आहे कीं,' ज्यास इंग्रेजी भाषा येत्ये त्यास मात्र याचा उपयोग असें न व्हावे, म्हणोन योजिलें आहे कीं, एका बाजूस इंग्रेजी व एका बाजूस मराठी असावे; म्हणजे जे मराठी मात्र जाणतात त्या सर्वांसही याचा उपयोग होईल.' दोन्ही भाषेंतील मजकूर एकत्र असे. म्हणजे विषय मूळ इंग्रजींत असेल तर त्याचें मराठींत भाषांतर होई; व विषय मूळ मराठींत असला तर त्याचें इंग्रजींत भाषांतर होई आणि तें समोरासमोर छापलें जाई.

'दर्पण'ची मराठी बाजू कोण सांभाळीत असे याचा स्पष्ट उल्लेख कोठेंही आढळत नाहीं; परंतु तें काम रा. भाऊ महाजन यांजकडे नव्हतें असें निश्चितीने म्हणतां येतें. त्याचें एक कारण या निबंधाचे सुरवातीलाच दिलें आहे. तें म्हणजे रा. भाऊ महाजन (गोविंद विठ्ठल कुंटे) यांचा शिक्षणक्रमच मुळीं १८४० मध्यें संपूर्ण झाला. 'दर्पण' पत्र सुरु झालें तेव्हां भाऊ महाजन यांच्या इंग्रजी शिक्षणाला प्रारंभ झाला असेल किंवा नसेल. रा. देव यांनी आपल्या निबंधांत रा. भाऊ महाजन यांचा उल्लेख बाळशास्त्री जांभेकर यांचे 'गुरुबंधु' असा केला आहे; दर्पणाशी त्यांचा संबंध होता असें निदान देव तरी म्हणत नाहींत. मग श्री. वि. सी. सरवटे, प्रा. गं. बा. सरदार आणि अगदीं अलीकडचे त्या विषयावर 'अधिकारी वाणीनें' बोलणारे रा. गं. दे. खानोलकर* हे भाऊ महाजन यांचा दर्पणाशी कोणत्या आधारावर संबंध जोडतात तें सांगतां येत नाहीं. बाळशास्त्री यांचें शिक्षण ज्या अध्यापकाचे हाताखालीं झालें असेल त्या अध्यापकाचे हाताखालींच नंतर भाऊ महाजन हे शिकले या अर्थानें कदाचित रा. देव यांनी त्यांना बाळशास्त्रींचे 'गुरुबंधु' असें संबोधिलें असेल.

त्यानंतरचा दाखला म्हणजे उपरिनिर्दिष्ट अर्जाचा. या अर्जावर बाळशास्त्रींच्या जोडीला रघुनाथ हरिश्चंद्रजी व जनार्दन वासुदेवजी यांच्या सह्या आहेत. भाऊ

*रा. गं. दे. खानोलकर यांनी ता. १ ऑक्टोबर १९४४ रोजीं गुंजीकर व्याख्यान मालेंत 'भाऊ महाजन व इतर वृत्तपत्रकार' असें एक पुष्प गुंफलें तेव्हां हें विधान केलें होतें.

महाजन जर मराठीची बाजू सांभाळणारे तर त्यांचें नांवहि त्यावर असणें अवश्य होतें. यावरून रघुनाथ हरिश्चंद्रजी वा जनार्दन वासुदेवजी यापैकींच कोणीतरी मराठीची बाजू सांभाळीत होते असे सुचविण्याचा बिलकुल उद्देश नाहीं. परंतु भाऊ महाजनांची जर एक सही असती, तर त्यांजबद्दल प्रसिद्ध झालेल्या दंत-कथांवर एकदम विश्वास टाकणें सुलभ झालें असतें. 'प्रभाकर', 'धूमकेतु' व 'दिग्दर्शन' या नियतकालिकांचे वेळीं बाळशास्त्री व भाऊ महाजन यांचे सहकार्य होतें. त्याप्रमाणें त्यांचें साहचर्य जर १८३२ मध्यें होतें असें मानलें, तर ता. १३ जानेवारी १८३२ रोजीं रात्रौ हरिश्चंद्रजी यांचे घरीं पुण्याहून आलेल्या शास्त्री मंडळींची एक सभा भरली होती; या सभेंत रा. भाऊ महाजन यांनी भाग घेतल्याचें आढळत नाहीं. या सभेंत न्याय, व्याकरण, वेदांत व इतर शास्त्रें या विषयावर वादविवाद झाला. प्रथम एका विद्यार्थ्यानें व्याकरण या विषयावर उहापोह केला. मोरशास्त्री व व्यासाचार्य आदिकरून शास्त्र्यांनी या विषयावर चांगलीच भाषणें केलीं. न्याय विषय निघाला असतां त्यावर फारसा उहापोह झाला नाहीं. व्यंकटाचार्य यांनी अद्वैत वेदांतावर आपलें भाषण करून पूर्वपक्ष केला. व ह्या पूर्वपक्षाचा उत्तरपक्ष मोरशास्त्र्यांनी करून व्यंकटाचार्य यांस उत्तर देऊन समाधान केलें. नंतर दक्षणा वगैरे वाटकाम झाल्यावर सभा बारा वाजतां समाप्त झाली. ज्या हॉलमध्यें ही सभा भरली होती तो हॉल फारच सुशोभित करण्यांत आला होता. ( दर्पण २०-१-१८३२ )

बाळशास्त्री जांभेकर यांचे 'दर्पणा'मधील सहकारी भाऊ महाजन हे नसून रघुनाथ हरिश्चंद्रजी हेच असावे असा पुरावाहि आढळतो. पूना ऑबझरवर आपल्या तारीख १० डिसेंबर १८५३ च्या अंकांत पान १९९ वर श्री. रघुनाथ हरिश्चंद्रजी यांचा मृत्यु लेख लिहितांना म्हणतो:—"The deceased had served Government upwards of thirty years and was greatly respected by his superiors being a man of considerable scholastic attainments and a perfect master of the English and Sanskrit languages, as well as of all the

dialects common to this part of India. At one time, we believe, he conducted the newspaper called the Bombay Durpun, which was printed in Mahratta and English."

या खेरीज आणखी एक आधार म्हणजे बाळशास्त्री यांच्या समकालीन ( १८४० अगोदर ) व्यक्तींमध्यें भाऊ महाजन यांचें नांव सांपडत नाहीं. या नांवांत पुढील नावें आहेत. नारायण कृष्ण लाड ( वूड आणि कंपनींत भागीदार ), गणेश विश्वनाथ, रामा विष्णु, वामन भास्कर, मोरोबा कान्होबा, हरिश्चंद्र हरिशंकर, सखाराम राघोबा, सखाराम मोरोजी, नाना नारायण, जनार्दन वासुदेवजी इत्यादि. या सर्वांनी बाळशास्त्र्यांच्या बरोबर १८३० सालीं 'एल्फिन्स्टन नेटिव्ह इन्स्टिटयूटची' शाळा सोडली. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां 'दर्पण' पत्राची मराठी बाजू सांभाळण्याशी रा. भाऊ महाजन यांचा कांहींही संबंध नव्हता असें निःसंदिग्धपणें म्हणता येतें. 'दर्पण'मधील मराठी भाषेचें वळण आणि भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर'मधील मराठीची धाटणी यामध्येंही फरक आहे हें बारकाईनें वाचणाराचे लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. इतकें झाल्यावर असे प्रश्न उपस्थित होतात कीं, कदाचित बाळशास्त्री हेच स्वतः मराठीची बाजू पाहात असावेत. पण संशय निवृत्तीसाटीं उत्पन्न केलेली शंका या पलीकडे या विधानाला महत्त्व नाहीं. बाळशास्त्रींना त्यावेळीं शिक्षण खात्याचे दौऱ्याचें काम पाहावें लागत असे, तेव्हां इंग्रजी बरोबर मराठी लिहिण्याचें कामही तेच करीत असतील असें वाटत नाहीं. केव्हां कधीं एखादा विषय मूळ मराठींतच लिहिला असेल तर गोष्ट वेगळी. यापुढें जाऊन असेंही विचारतां येईल कीं, बाळशास्त्री हेच 'दर्पण'चा इंग्रजी मजकूर लिहित होते कशावरून? या शंकेचें समाधान करणें विशेष कठीण नाहीं. संपादक म्हणून सर्व कागदोपत्रीं बाळशास्त्री यांचेंच नांव आढळतें. प्रत्येक अंकावर दर्शनी पृष्ठाच्या माथ्यावर उजव्या किंवा डाव्या हाताच्या कोपऱ्यांत बाळशास्त्री यांचीच सही आढळते. त्याकाळी प्रती कांहीं शेकड्यानेंच निघत असत. सध्याप्रमाणें हजारों प्रतींची छपाई त्या काळांत

माहीत नव्हती. प्रत्येक अंकावर संपादकाची सही घालण्याचा प्रघात होता. ( या सहीचा ठसा इतरत्र छापला आहे. ) दुसरें असें कीं ता. १६ मे १८३२ रोजीं बाळशास्त्री यांनीं आपल्या सहीनें गव्हर्नरांना एक पत्र लिहिलें आहे, त्याखालीं संपादक 'दर्पण' असा स्पष्ट उल्लेख केला आहे. सरकारी नोकरांच्या रजा व बदल्य.ची माहिती प्रसिद्ध करण्याला परवानगी मिळावी व ती माहिती पुरविण्याची सूचना तत्संबंधी खात्याच्या प्रमुखांना द्यावी असें तें पत्र होतें. त्या पत्राची भाषा आणि 'दर्पण' मधील इंग्रजी लेख यांजमध्यें भाषेच्या दृष्टीने सर्वस्वीं साम्य आढळतें.

ओघानेंच आलें म्हणून प्रा. गं. बा. सरदार यांच्या 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्व पीठिका' यांतील बाळशास्त्री जांभेकर यांच्याविषयीं लिहिलेल्या मजकुराबद्दल विस्ताराने लिहिलें पाहिजे. पृष्ठ १९४ वर रा. सरदार लिहितात कीं "**भाऊ महाजन यांच्या सहाय्यानें** बाळशास्त्री यांनी 'दर्पण' या नांवाचें वर्तमानपत्र व 'दिग्दर्शन' या नांवाचें एक मासिक चालविलें होतें." हें वाचल्यावर कोणाचाही असा ग्रह होईल कीं, बाळशास्त्री यांच्या 'दर्पण'शीं भाऊ महाजन यांचा संबंध होता. हें मत इतर कोणाला विशेष माहितीचे आधारें पटलें नाहीं तर नवल नव्हे, पण खुद्द रा. सरदार यांनाच तें मान्य नसावें. वर्तमान पत्रें या सदरांत पृष्ठ ३४० वर त्यांनी जी माहिती दिली आहे, तींत 'दर्पण' बाबत दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रांतील वाक्यें उद्धृत केलीं आहेत. त्यांत भाऊ महाजन यांचा उल्लेख नाहीं. विशेष म्हणजे पुढें 'प्रभाकर' बद्दलचा परिच्छेद लिहिला त्याची सुरवातच रा. सरदार यांनीं 'यानंतर गोविंद विठ्ठल उर्फ भाऊ महाजन यांनीं इ. स. १८४० च्या सुमारास 'प्रभाकर' पत्र काढलें अशी केली आहे. म्हणजे दर्पणाशीं भाऊ महाजन यांचा कांहींही संबंध नव्हता. वास्तविक दर्पणचें अवतार कार्य संपलें व भाऊ महाजन यांचें शिक्षण संपलें असा योग आला होता. प्रभाकर पत्र १८४० च्या सुमारास प्रसिद्ध झालें असें रा. सरदार यांनीं म्हटलें असल्याकारणाने त्यांना आणखी एक चूक माफ केली पाहिजे. वास्तविक 'प्रभाकर' १८४१ च्या सप्टेंबरमध्यें सुरू झालें. रा. सरदार यांनी संपादन करतांना जर अधिक दक्षता

बाळगली असती तर हे दोष टळूं शकते. विधवाविवाहाविषयीं बाळशास्त्री यांचे वेळीं जो छोटा निबंध लिहिला गेला त्याबाबतही रा. सरदार यांनी अशीच गल्लत केली आहे हें पृष्ठें ३०, १६५ व १६८ पाहिल्यास लक्षांत येईल. असल्या भोंगळ लिखाणाने अभ्यासू लोकांची फसगत होते व जनतेची दिशाभूल होते.

'दर्पण' पत्राचें नांव बाळशास्त्रींना त्याच नांवाच्या बंगाली व गुजराथी वृत्तपत्रांवरून सुचलें असणें संभाव्य आहे. कारण प्रस्तावांतच म्हटलें आहे कीं 'दर्पणांत जाहीर खबरी आणि विलायतचे व बंगालचे पत्रांचे कांहीं कांहीं अंश लिहिले जातील.' १८२३ मध्यें 'दर्पण' नांवाचें गुजराथी पत्र निघण्याचें घाटत होतें. तसेंच १८१८ मध्यें 'समाचार दर्पण' (Samachar Durpun) हे बंगाली नियतकालिक निघालें होते. दर्पण पत्राचा आकार सुरवातीला १९×११॥ इंच होता. ( डेमी प्रत्येकी ८ पानें दोन कॉलमी ) व नंतर तें जेव्हां साप्ताहिक केलें तेव्हां त्याचा आकार १३×११ इंच झाला. आकार बदलतांना वाचणाराचें कमी मजकूर मिळण्याचें नुकसान होणार नाहीं अशी खबरदारी घेतली होती. 'दर्पण' पत्र कशा पद्धतीनें छापलें जाई हा एक प्रश्न आहे. त्याबद्दल इतकें साधार म्हणतां येतें कीं 'दर्पण' पत्राचा पहिला अंक शिळा प्रेसवर छापलेला नाहीं, टाईपांत छापलेला आहे. परंतु दर्पणचे इतर अंक चाळत असतां त्यांतील कांहीं अंक शिळा प्रेसवर छापलेले आढळतात. यावरून हें पत्र शिळा प्रेसवर व टाईपांत अशा दोन्ही पद्धतीनें छापलें जाई; फक्त शिळा प्रेसवरच तें छापलें जात असे असें म्हणतां येत नाहीं. छापखान्याविषयी बोलतांना असें नमूद केलें पाहिजे कीं, १८३५ मध्यें दर्पणकरितां दोन लोखंडी प्रेस तयार करून घेतले व त्यावरील ५० रुपयांचा कर माफ करावा अशी विनंती करण्यांत आली असतां, मुंबई सरकारनें 'हें पत्र नेटिव्ह लोक सुधारण्याचे दृष्टीनें उत्तमप्रकारें चालविलें जात आहे' म्हणून ती सवलतही दिली होती. (G.D.Vol. ३२१ 1835) हे प्रेस मुंबईतल्याच जेम कॅरेज फॅक्टरींत तयार केलेले होते. त्रैमासिक वर्गणी रु. ६ होती. दर्पणाची एक प्रत सरकार घेत असे. त्याची वर्गणी खर्ची पडल्याची नोंद १८४० पर्यंत आढळते. त्यानंतर दर्पणचें नांव सरकार दप्तरीं

तरी आढळत नाहीं. (G. D. Vol. $\frac{21}{633}$ 1840). दर्पणचे जाहिरातीचे दर त्यांनीं ता. २–३–१८३२ च्या अंकांत जसे प्रसिद्ध केले तसेंच येथें उध्दृत करतों

## नोटीस.

## जाहीर खबर.

"सर्वप्रकारच्या जाहीर खबरा छापायाकरितां दर्पण हपिसांत पाठविल्यास यां कागदांत खाली दिलेल्या हलक्या दराप्रमाणें छापल्या जातील.

प्रथम वेळेस ... ... ७५ रेस दर ओळीस.

पुन्हा छापील तर ... ... ५० रेस दर ओळीस.

जर मराठी मात्र भाषांतर करावयाचें असेल तर वर लिहिल्यापेक्षें अधिक पैका पडणार नाहीं".

दर्पणाच्या 'अंकाला' 'कागद' असें म्हटलें जात असे. त्याप्रमाणें दर्शनी पृष्ठावर 'कागद १ वर्ष १ लें' असा उल्लेख आहे. 'अंक' या अर्थी त्याकाळीं 'कागद' हा शब्द वापरत असत व तीच प्रथा बरीच वर्षे म्हणजे १८४६ पर्यंत चालू होती. आम्हाला १८३२ ची व नंतर १८३४ मधील पाऊण, अशा पावणेदोन फायली पाहावयाला मिळाल्या आहेत.

दर्पणाच्या प्रस्तावावरून त्यांत कोणकोणते विषय येत असतील त्याची कल्पना करतां येते. चालू परिस्थिती आणि आधुनिक ज्ञान समाजाला माहीत करून देणें हें दर्पणचें उद्दिष्ट. कोणताही विषय वर्ज्य होता असें नाहीं. नेटिव्ह लोकांना ( म्हणजेच हिंदी ) सरकारी नोकरींत घेऊन त्यांचा विश्वास संपादन करावा असे लेख कधीं येत. तर जातिभेदाबद्दलचा पत्रव्यवहार विस्तारानें दर्पणमध्यें प्रसिद्ध झालेला आढळतो. राजा राममोहन रॉय यांच्या कामगिरीवर त्यांत लेख आले होते. हिंदुधर्मासंबंधानें त्यांत पत्रव्यवहार आहे. मुलकी व न्यायखात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या रजा, नेमणुका प्रसिद्ध करणें हें इष्ट वाटल्यावरून त्यांनीं गव्हर्नरांना पत्र लिहिलें व तो मजकूर प्रसिद्ध करण्याची त्यांना परवानगी देण्यांत आली. विलायतेंतून येणाऱ्या जाणाऱ्या इसमांची माहिती तसेच तिकडच्या वृत्तपत्रांतील बातम्याही उध्दृत केलेल्या आढळतात. त्याचबरोबर

पुण्याला एका सरकारी खात्यांत कांहीं अफरातफर झाल्याचें कळून येतांच त्यावर संपादकीय रीत्या प्रमुख लेख लिहिण्यांत आला होता. सर्वात कळस म्हणजे एका अंकांत 'वाफेचे यंत्र', पृथ्वी, धूमकेतू व ग्रहगोल व तारे हाही लेखांचा विषय आहे. काव्यासही त्यांत जागा आहे. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह इत्यादि विषयांवरही लेख आढळतात. मुंबई, कलकत्ता व मद्रास येथील न्यायालयांचे ( सुप्रीम कोडत–Supreme Court ) महत्वाचे निर्णयही दिले जात. सारांश त्या कालमानानुसार 'दर्पण'चें 'दिग्दर्शन' रा. बाळशास्त्री यांनी उत्तम प्रकारें केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

दर्पणाचा खप हजारानें नव्हता हें वर सांगितलेंच; पण त्याला स्वसमाजांत व परकी समाजांत प्रतिष्ठा प्राप्त झाली होती असें म्हणावयाला हरकत नाहीं. त्यावेळी बॉम्बे नेटिव्ह ऑबझर्वर नांवाचें नियतकालिक होतें. त्याच्या १४ मार्च १८३३ च्या अंकांत म्हटलें आहे कीं "दर्पण हें इंग्रजी व मराठी भाषांत प्रसिद्ध होणारें प्रतिष्ठित व उपयुक्त पत्र आहे. त्यांतले स्वतंत्र लेख व इतर पत्रांतून निवडून घेतलेला मजकूर, एतद्देशीय लोकांना माहिती देणें, त्यांना नवीन वळण लावणें, व जुन्या भ्रामक समजुती नष्ट करणें या दृष्टीनें योग्य आहेत. त्यांचा संपादकीय दृष्टिकोन आम्हाला नेहमीच पसंत असतो असें नाहीं; तथापि त्यांचें विषय प्रतिपादन समतोल बुद्धीनें केलेलें असतें, व सर्व मताच्या व्यक्तींना आपले विचार प्रदर्शित करण्याला सारखाच वाव दिला जातो. आणखी मजकूर देतां आला तर तो अवश्य आहे; आणि हीं गोष्ट लहान टाईप वापरल्यानें शक्य होईल. या पत्राचे २८० वर्गणीदार आहेत; त्यांत बहुसंख्या हिंदूंची आहे. कांहीं दिवसापूर्वी आम्हाला एक त्यांचा वर्गणीदार, या प्रांताच्या राजधानीपासून ( मुंबईपासून ) लांब अशा गांवीं भेटला. त्याचे बोलण्यावरून कळलें कीं, त्याला दर्पणची प्रत नियमितपणें मिळते व ती सर्वसाधारणपणें ५० इसम वाचतात." एका समकाली व परभाषीय मिशनरी लोकांच्या नियतकालिकानें हा अभिप्राय दिला असल्याकारणानें तो निःपक्षपाती व निस्पृह आहे यांत शंका नाहीं.

बॉम्बे नेटिव्ह ऑबझर्वरचें मत लोकमताच्या दृष्टीनें उपयुक्त, तसेंच सरकारदरबारीं हीं त्यांची प्रतिष्ठा उत्तमप्रकारें होती असें म्हणण्याला सबळ

कारण देतां येतें. त्यावेळचे गव्हर्नर मि. क्लेअर यांनी १८३२ च्या मे महिन्यांत असें मत व्यक्त केलें आहे कीं, "दर्पण हें नियतकालिक उद्बोधक व व्यवस्थित रीतीने चालविले जातें असें मला वाटतें. त्याला शक्य तें प्रोत्साहन मी आनंदाने देईन."

'दर्पण' पत्र जेमतेम आठ वर्षें चालू होतें. नंतर शास्त्रीबुवांनी 'दिग्दर्शन' नांवाचें शास्त्रीय विषयांना वाहिलेलें त्रैमासिक बरींच वर्षें चलविलें. त्यांचें सर्व आयुष्य नानाविध कामें करण्यांत वेचलें गेलें. सरकारच्या शिक्षण खात्यांतले वरिष्ठ अधिकारी या नात्याने त्यांचें सर्व आयुष्य दगदगीचें व गर्दीच्या हाल-चालींचें गेलें. त्याशिवाय त्यांनी अनेक लहान लहान कार्यें आरंभिलीं होतीं. ते ज्या शिक्षण संस्थेंत होते, तिथें त्यांनी 'वक्तृत्व मंडळ' (डिबेटिंग क्लब) सुरू केलें होतें. कॉलेजांतून वाङ्मय मंडळें काढण्याची लाट अगदीं अलीकडे ४०-५० वर्षांतली आहे. परंतु त्या काळांतहि शास्त्रीबुवांना वक्तृत्व मंडळाची आवश्यकता पटली होती व त्यासाठीं त्यांनीं परिश्रम केले. वक्तृत्व सभेंत ते प्रामुख्यानें भाग घेत असत असा उल्लेख आढळतो. "शास्त्री लोकांच्या व नवीन विद्वान लोकांच्या सभांत त्यांस अध्वर्युपणाचा मान मिळे" असें एका गृहस्थानें लिहून ठेवलें आहे. या वेळीं 'धर्म व राजकारण' हे विषय वर्ज्य असणें हें त्यावेळची परिस्थिति लक्षांत घेतां आश्चर्याचें नाहीं. राघोबा जनार्दन नांवाच्या गृहस्थानें 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' स्थापन केली. शास्त्रीबुवांचें या कामीं अंग होतें. पुण्याला कांहीं शास्त्री मंडळींनी १८२९ सालीं एक कोश रचला, त्यांतही शास्त्रीबुवांचे अंग होतें असें म्हणतात. रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी लिहिलेल्या सोप्या व्याकरणांतला ३७८ वा नियम शास्त्रीबुवांनी आपणास सुचविला असें रावबहादुरांनी रा. देव यांना कळविलें होतें. कँडी साहेबांनीं लिहिलेल्या 'इंग्रजी मराठी' शब्दकोशांत शास्त्रीबुवांनी कांहीं महत्वाच्या सूचना केल्या असें खुद्द कँडी साहेबांनी प्रस्तावनेंत टीप देऊन स्पष्ट केलें आहे. बॉंबे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी व जिऑग्रफीकल सोसायटी यासाठीं त्यांचें निबंध लिहिणें चालूच होतें. हे निबंध अजूनही पहावयाला मिळतात.

## जांभेकर चरित्र

# बाळशास्त्री व न्या. रानडे

या विवेचनावरून लक्षांत येईल कीं, बहुतेक सर्व सार्वजनिक चळवळींचें बीजारोपण त्यांनीं केलें. त्यांच्या कार्यकक्षेंत राजकारण हा विषय आला नाहीं. पण इंग्रजी अमदानी सुरू होऊन पंचवीस तीस वर्षेंच जेमतेम झालीं होती. स्वराज्य जाऊन जी सत्ता प्रस्थापित झाली तीमुळें समाजाचा पाश्चात्य संस्कृतीशीं परिचय होऊं लागला. तरुण व वर्धिष्णु अशा पाश्चात्य संस्कृतीपुढें आपल्या जवळ जवळ ग्लानी पावलेल्या संस्कृतीचा टिकाव लागणें शक्य नव्हतें. तेव्हां समाजांत लोकशिक्षणाचा फैलाव करणें, धार्मिक समजुतीविषयीं भ्रम निरसन करणें, या गोष्टी अगदीं अवश्यक होत्या. त्या त्यांनीं केल्या. बाळशास्त्री राजकारणी पुरुष नाहींत— पण अल्प अवधींत त्यांनी कार्याचा जो पसारा मांडला व बहुतेक सर्व विषयांकडे जनतेचें लक्ष वेधलें त्यावरून पाहातां मनांत आणतें तर ते राजकारणांतही चमकले असते असें म्हणण्याला कांहीं प्रत्यवाय असण्याचें कारण नाहीं. निबंधमालेंत शास्त्रीबुवांवर दोन आक्षेप घेण्यांत आले आहेत. (१) "त्यांच्या मासिक पुस्तकांत शास्त्रीय विषयाचें उपपादन विशेष होतें त्यावरून लोकाभिरुचीकडे त्यानें विशेष लक्ष दिलें नाहीं." (२) "इतिहास विषयांवर ग्रंथरचना करीत असतां त्याने इंग्रजी ग्रंथकारांचें विशेष अनुकरण केल्यामुळें हा दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा प्रकार झाला." निबंधमाला-कारांच्या वेळीं समाजाने हे आक्षेप मान्य केले असतील, परंतु ते आतां कोणी मानील असें वाटत नाहीं. शास्त्रीय विषयांची चर्चा करतांना त्यांनी समाजाकडे दुर्लक्ष केलें तेंच ठीक झालें असें आतां लोक म्हणतील. झोपलेल्याला जागें करणें त्यावेळी जरूरच होतें. इतिहास लेखनाचे बाबतीत इंग्रजांचें अनुकरण त्यांनी केलें कारण त्यावेळीं दुसरा आदर्श नव्हता. निदान आज तरी अशाप्रकारें त्यांना कोणी दोष देणार नाहीं.

बाळशास्त्री अल्पायुषी वारले. त्यांच्या मनांत अनेक बेत व संकल्प अमूर्त राहिले असतील. पण त्यांचें मन समतोल व शांत विचार करणारें होतें. दैनंदिन दगदगी कितीही असल्या तरी रात्रीचें भजन त्यांनी चुकविलें नाहीं. रात्रीं ११

वाजेपर्यंत भजन चालू असे. याचें ही एक कारण असूं शकेल. त्यांची सासुरवाडी पंढरपूरकडची—विठ्ठलभक्त होती. त्यायोगेही कदाचित् त्यांनी माळ उचलली असेल. अशा धीरोदात्तपणें त्यांनी आयुष्य घालविलें. त्यांचें कार्य अपुरें राहिलें असें म्हणावें, परंतु तें कार्यच असें होतें कीं, तें कधीं पुरें होणारें नाही. त्या कार्यांचें लेण एका पिढीनें दुसऱ्या पिढीपर्यंत पोचवावयाचें असतें. धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या बाबतींत त्यानी अत्यंत संयमाने कार्य केलें तरीही कर्मठ समाजाचा रोष त्यांजवर झाला होता. एरवी नवीन सुशिक्षित मंडळींत तसेंच सरकार दरबारीं ते पूर्णपणें मान्यतेस पोचले होते. सरकारनें त्यांना जे. पी. हीं केलें होतें. या मानाची खबर बाळशास्त्रींना त्यांच्या मूळ गांवीं पोंभुर्लें येथें असतां मिळाली असावी. कारण तेथून त्यांनी सरकारचे सेक्रेटरींना पत्र लिहून या कृपा-प्रसादाबद्दल सरकारचे आभार मानले आहेत. ता. १० ऑक्टोबर १८४० च्या पत्रांत शास्त्रीबुवा लिहितात, "मुंबई शहर व बेटांतला एक 'जस्तिस ऑफ दि पीस' या नात्यानें माझ्यावर जी जबाबदारी पडते ती मीं दक्षतेनें पार पाडण्याचें गव्हर्नर साहेबांना आश्वासन देतों."

बाळशास्त्री यांच्याविषयीं अनेक दंतकथा आहेत. परंतु त्यांवर सर्वस्वी अवलंबून न राहतां ज्या गोष्टी कांहीं योग्य खात्रीलायक पुराव्यानें सिद्ध करितां येतील त्यांचाच येथें उल्लेख केला आहे. त्यांचें छायाचित्र उपलब्ध नाहीं. रा. देव यांनीं शास्त्रीबुवांच्या सहवासांत बरीच वर्षें राहिलेल्या इसमानें त्यांचें जे शब्दचित्र रेखाटलें तेंच येथें उद्धृत करतों. "त्याचा चेहरा भव्य, इभ्रतदार आणि साधा होता. तो फार उंच नव्हता वा फार ठेंगणाही नव्हता. त्याची मुद्रा प्रसन्न दिसे. तो सदा हसतमुख होता. अंतर्गत नीतिमत्ता व सद्गुण यांचें तेज त्याच्या तोंडावरून दिसून येई. मनाचा मोकळेपणा, निर्मलता, विचारशीलता इत्यादि गुण त्यात आहेत असें त्याच्या मुद्रेवरून वाटे." "त्यांचा पोषाखही फारसा भपक्याचा नसे. नागपुरी रेशमिकाठी नेसायाचीं धोतरें, पुणेंशाही पांढरा अंगरखा, तांबडे–फार मोठें नाहीं व फार लहान नाहीं असें पुणेंशाही पागोटें आणि अंगावर स्वच्छ उपवस्त्र हा त्यांचा नेहमींचा पोशाख असे. त्यांची

वस्त्रेंप्रावरणें बऱ्याच किंमतीचीं असत, परंतु तीं अंगावर घेण्यांत फाजील थाटमाट, छानछुकी किंवा टापटीप बिलकुल नसे. ते नेहमीं दक्षिणी जोडा घालीत. पायमोजे किंवा इंग्रजी पोशाखाचें फाजील महत्त्व त्यांस कधींही वाटलें नाहीं."

शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक बाबतींत बुवांनी केलेलें कार्य बहुमोलाचें व अप्रतिम आहे. आजच्या हिंदी जागृतीचा तो पाया होता. त्यांच्या अकाली निधनामुळें आकाशांत अचानक ढग येऊन सूर्य लोपला जावा व लोकांना जीवन असह्य व्हावें त्यांतलाच हा प्रकार झाला. शास्त्रीबुवांविषयीं चांगले उद्गार सर्वांचेच तोंडून आले. इंग्रजी राजवटीनें निकट आणलेल्या पाश्चात्य संस्कृतीविषयीं आपलेपणा वाटणें शक्य नाहीं, स्वतःच्या वैभवाची आठवण प्रत्येक आबालवृद्धाचे मनांत ताजी असणार, अशा परिस्थितींतून वाट दाखविण्याचें कार्य बाळशास्त्र्यांनीं केलें. १८५७ सालानंतर दडपल्या गेलेल्या समाजाला नवी दिशा, नवे विचार सांगण्याचें कार्य न्यायमूर्ति रानडे यांनी आरंभिल्यामुळें ते महर्षी पदाला पोंचले; तद्वत त्यांच्याही अगोदर इंग्रजी अमदानीचे सुरवातीलाच ज्यांनी अशा प्रकारचें मार्गदर्शन केलें अशापैकीं बाळशास्त्री हे जेष्ठ व श्रेष्ठ होत. बाळशास्त्री यांचे नांव बाळ गंगाधर होतें व त्यानंतर लोकमान्यत्व पावलेले बाळ गंगाधर टिळक यांचेशीं त्यांची तुलना करण्याचा मोह होतो. संस्कृत, गणित, तत्वज्ञान या विषयांत लोकमान्यांप्रमाणेंच बाळशास्त्री प्रवीण होते.

सामाजिक सुधारणेची, प्रथमतः दिसावयाला अगदीं क्षुल्लक परंतु परिणामीं अत्यंत महत्वाचीं अशी अनेक दालनें खुलीं करण्याचे कार्य न्यायमूर्तींनी केलें, त्याचप्रमाणें बाळशास्त्री यांचें कार्य झालें. परिस्थितीची जाणीव असणें, लोकजागृतीस्तव अंगिकारलेली साधनें, स्वतःचीं मतें कितीही पुढें गेलीं असलीं तरी समाजापासून फार दूर पुढें जावयाचें नाहीं हे गुण उभयतांमध्यें समान आढळतात. तुलना ही सर्वांशानें घ्यावयाची नसते. पण बाळशास्त्रींचें वैशिष्टय मनांत चटकन मूर्त स्वरूपांत ठसावें एवढ्याचसाठीं तुलनेचा निकष हातीं घेतला. उभयतांचे वेळची परिस्थिति भिन्न होती, आजच्या व त्या महाभागांच्या वेळच्या परिस्थितींत जमीन अस्मानाचें अंतर आहे.

## ‘दर्पण संग्रह’

# देहावसान व योग्यता

बाळशास्त्री जांभेकर हें मुंबई मुक्कामींच १८४६ च्या १७ मे रोजीं निधन पावले. वयाला ३५ वर्षे जेमतेम पुरी होत होतीं. इतक्या अल्पावधींत त्यांचा जीवन झरा आटला. प्रथम पासून शेवटपर्यंत जी दगदग व कष्ट त्यांनीं सहन केले त्याचाच हा परिणाम. त्यांच्या या अकाली निधनामुळें त्यांनीं आरंभिलेल्या कार्यांची मोठी हानि झाली यांत शंका नाहीं त्यांच्या निधनाबद्दल त्या वेळच्या बोर्ड ऑफ एज्युकेशननें असें नमूद केले आहे कीं, "या थोर व प्रतिभावान व्यक्तीच्या निधनाने हिंदुस्थानांतील शिक्षणकार्याची कधीही भरून न येईल अशी हानि झाली आहे. हें कळवीत असतांना त्यांची विद्वत्ता, कौशल्य व कर्तृत्व याविषयीं बोर्डाला फार आदर वाटतो हें नमूद करणें जरूर आहे. या प्रांतांतच नव्हे तर इतर प्रांतांतही इतकी बुद्धिमत्ता व इतका कार्याचा व्याप केलेली एतद्देशीय व्यक्ती अजून झालेली नाहीं....महत्वाच्या कामगिरींत ते रत असतां त्यांच्या अकाली निधनामुळें त्यांच्या कार्याची फार हानि झाली आहे."

दि बॉंबे टाईम्स अँड जर्नल ऑफ कॉमर्सने ता. २० मे १८४६ च्या अंकांत त्यांच्यावर मृत्युलेख लिहिला तोही त्यांचें कार्य जाणून घेणारांना उद्बोधक आहे. त्या लेखांत म्हटलें होतें कीं, "एल्फिन्स्टन कॉलेजांतील माजी प्रोफेसर, नॉर्मल क्लासचे डायरेक्टर, व व्हरनॅक्युलर स्कूलसचे डायरेक्टर बाळ गंगाधरशास्त्री यांची निधन वार्ता नमूद करण्यास खेद होतो. बाळशास्त्री यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूर नजीक पोंभुर्लें येथें १८१० मध्यें झाला. वयाचे १९ वे वर्षीं, १८२९ मध्यें ते ज्या शिक्षण संस्थेंत व्यवसायपरत्वें आले, तेथेंच ते अखेरपर्यंत होते. ते कांहीं दिवस गणिताचे अध्यापक होते, आणि मि. ऑर्लेबार हे रजा घेऊन इंग्लंडला गेले असतां, मे १८४२ ते मार्च १८४३ पर्यंत मि. ऑर्लेबार यांच्याच खोलींत खगोल विद्येचेंही काम पहात असत. त्यांची बुद्धिमत्ता, कर्तृत्व व शिक्षक म्हणून विरळा आढळून येणारें प्राविण्य हीं लक्षांत घेऊन वेतन वाढ (प्रमोशन) देण्याचे नियम त्यांचे बाबतींत दूर सारले गेले, व अगदी अभूतपूर्व अशी बढती त्यांना मिळत गेली. मृत्यूपूर्वी थोडेच

दिवस अगोदर त्यांनीं मि. एलफिन्स्टन यांनी लिहिलेल्या इतिहासाचे धर्तीवर मराठींत हिंदुस्थानचा इतिहास लिहिला होता. तसेंच त्यांनी मानस शास्त्रावरही ग्रंथ रचना केली, तिला त्यांनीं मि. अंबर कोंबी यांच्या पुस्तकाची मदत घेतली होती. पहिलें पुस्तक छापून जवळ जवळ तयार आहे, दुसऱ्याचें हस्तलिखित अपुरेंच आहे. 'हायस्कुलांतील' विद्यार्थ्यांसाठीं क्रमिक पुस्तकें म्हणून तीं लिहिली होतीं."

"रॉयल एशियाटिक सोसायटी, मुंबई व जिऑग्रफीकल सोसायटी या संस्थांच्या कार्यातही त्यांनी बरेंच लक्ष घातलें होतें. जिऑग्रफीकल सोसायटीच्या कार्यकारी मंडळाचे ते सभासद होते. प्रत्येक समाजोपयोगी व शैक्षणिक कार्यांत बाळशास्त्री यांनी सक्रिय भाग घेतला. त्यांचा व्यासंग दांडगा होता, त्यांचे कर्तृत्व चतुरस्त्र होतें. व तसेंच ते साधे व निगर्वी होते. कोंकणांत तपासणीच्या दौऱ्यावर असतां त्यांना ताप येऊ लागला. तेथें त्यांना वैद्यकीय मदत वा औषधपाणी मिळूं शकलें नाहीं. ते मुंबईत मंगळवारीं आले तेव्हां त्यांची प्रकृती चिंताजनक होती, आणि रविवारीं त्यांचें देहावसान झालें. त्यांचें कुटुंब विपन्नावस्थेंत आहे असें आम्ही ऐकतों. एतद्देशीय लोकांत शिक्षणप्रसार व्हावा म्हणून गव्हर्नर जनरलनीं सरकारी नोकऱ्या लायक व विद्वान मंडळींना द्याव्यात असा दंडक घालून दिला आहे. सध्याची गोष्ट कायद्याच्या कक्षेंत येणार नाहीं. बाळशास्त्री हे विद्यासंपन्न होते व त्यांचे हाताखालीं शिकलेल्या अनेक व्यक्ती उच्च दर्जास पोंचलेल्या आहेत. बाळशास्त्रींना परलोकीं योग्य तें पारितोषिक मिळेलच. त्यांच्या कुटुंबियांना चरितार्थाला पुरेसें निवृत्ति वेतन (पेन्शन) दिल्यास, ज्या उद्देशाने मूळ नियम केला त्याचें उत्तमप्रकारें पालन केल्यासारखें होईल असें आम्हाला वाटतें."

ज्ञानोदय पत्रानेही मृत्युलेख लिहिला होता. त्यांत म्हटलें आहे कीं, "बाळ गंगाधरशास्त्री मोठा विद्वान होता आणि त्यास साहेब लोक व नेटिव्ह लोकहि मानीत होते. महाराष्ट्रांतील सर्व नेटिव्ह लोकांपेक्षां तो शिकलेला होता व आपल्या लोकांमध्यें विद्या वाढवावी अशी त्याची इच्छा होती. त्यानें आपल्या चांगल्या वर्तणुकीच्या योगानें व प्रोफेसरचें काम चांगलें चालविल्यानें कित्येक

विद्यार्थी बरे सुधारले. त्यांतील कित्येकांनी विद्येची मोठी आवड धरून त्यांसारखेंच विद्या वाढविण्याविषयीं उत्कंठित व्हावे अशी आमची इच्छा आहे."

"बाळ गंगाधरशास्त्री ऐन उमेदीमध्यें आणि पुढें कसें काय करायाचें या मसलती मनामध्यें करीत असतां मरण पावला आणि त्याचप्रमाणें अतिशय मनुष्याची गत आहे. लोक विद्या, द्रव्य, मान, इत्यादि संपादन करायास फार उत्सुक असतात. परंतु ज्या परलोकी आपले विशेष गुण व ऐहिक संपादलेलें एथच्यासारखें दिसणार नाहींत तेथें आम्ही लवकर जाणार हें मनांतही आणीत नसतात. तर आपण लवकर जाणार असें मानून जे नेहमीं ईश्वराची प्रार्थना करितात कीं मी आपले दिवस मौजीत राहावें व आपला जीव खऱ्या ज्ञान मार्गाकडे लावावा, त्यालाच ज्ञानी म्हणावे. जे द्रव्यवान, विद्वान, आणि सर्वमान्य ते मरणाला भीत नाहींत असें नाहीं आणि ते परलोकीं जाऊन सुख भोगतील असेंही नाहीं. परंतु जे पापाविषयीं मन:पूर्वक पश्चाताप करून ईश्वराच्या प्रीतीनें मनपूर्ण झाले तेच परलोक संबंधींचें सुख भोगतील." (ज्ञानोदय पु.५ पृ. १६५)

सरकारी दप्तरांतील व वृत्तपत्रांतील गौरवपूर्ण उद्गारांवरून बाळशास्त्री यांचा श्रेष्ठ दर्जा लक्षांत येईल. प्रसिद्ध डॉक्टर विल्सन यांनी आपल्या 'हिंदु लोकांच्या जाति' या नांवाच्या पुस्तकांत म्हटलें आहे कीं "पश्चिम हिंदुस्थानांत बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर नामें एक अति विख्यात व नामांकित विद्वान होऊन गेला. तो एल्फिन्स्टन विद्यालयांत अध्यापकाच्या कामावर होता." निबंधमालाकारांनी म्हटलें आहे कीं, "हा (मासिक पुस्तकाचा) प्रघात पहिल्यानें बाळ गंगाधरशास्त्री नामें करून जो प्रसिद्ध विद्वान आपणामध्यें होऊन गेला त्यानें घातला असें दिसतें. त्याची बुद्धी एवढी विशाळ होती कीं एकोणिसाव्या वर्षी विद्यालयांत विद्यागुरु होऊन तें काम वजनदारीनें चालविण्यास त्याच्या आंगीं सामर्थ्य आलें. त्यास 'एडिंबरो रिव्ह्यू' सारख्या त्रैमासिकांत देखील निबंध लिहिणें मोठेसें कठीण नव्हतें."

'सरस्वती मंडल' कर्ते श्री. रामचंद्र भिकाजी गुंजीकर लिहितात कीं, "बाळ गं ाधरशास्त्री मोठा विद्वान सज्जन पुरुष होऊन गेला. त्याची बुद्धि फारच विलक्षण होती, आणि त्याला मराठी, संस्कृत, इंग्रजी इत्यादिक

चार भाषा चांगल्या अवगत होत्या. याशिवाय, हिंदुस्थानी, गुजराथी, बंगाली, कानडी आणि फारशी यांचेंही त्यास ज्ञान होतें. मराठी भाषेमध्यें त्यांनी सरकारी काम संभाळून शालोपयोगी लहानमोठीं कित्येक पुस्तकें रचिलीं. अल्प वयामध्यें हा पुरुष मरण पावला ही गोष्ट फार वाईट झाली. महाराष्ट्र देशामध्यें पहिलें वर्तमानपत्र बाळ गंगाधरशास्त्री यानें आरंभिलें. त्याचें नांव 'दर्पण' होतें. त्यामध्यें इंग्रजी भाषेमध्यें लिहिलेले मजकूर येत असत. त्यानेंच 'दिग्दर्शन' नांवाचें शास्त्रीय विषयाचें मासिक पुस्तक प्रसिद्ध करण्यास आरंभ केला ''

दि बॉम्बे टाईम्स ॲन्ड जरनल ऑफ कॉमर्स या पत्रानें बाळ शास्त्रींवर लिहिलेल्या मृत्युलेखांत त्यांची कुटुंबीय मंडळी विपन्नावस्थेंत असल्याचा उल्लेख केला तो वस्तुस्थितीला धरूनच होता कारण बोर्ड ऑफ एज्युकेशननें गव्हर्नरांकडे पत्र लिहून बाळशास्त्रींची पत्नी व मुलगा यांना सरकारनें कांहींतरी 'निवृत्ति वेतन' द्यावें अशी शिफारस केली होती. (G. R. 15 July 1846) या पत्रांत कुटुंबाची आर्थिक दुस्थिति लक्षांत घेऊन कुटुंबास व मुलास मिळून दरमहा ५० रु. व मुलगा आईपाठीमागें राहिला तर तो सुजाण होईपर्यंत किंवा नोकरी लागेपर्यंत त्याला दरमहा २५ रु. चें पेन्शन द्यावें अशी शिफारस केली होती. बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या या पत्रांत शेवटीं बाळशास्त्री यांनी ज्या सरकारी कामगिऱ्या बजाविल्या त्यांची माहिती मिळते. त्यावरून ते अध्यापक केव्हां झाले, इत्यादि खुलासेवार व विश्वसनीय माहिती मिळते. बोर्ड ऑफ एज्युकेशननें केलेली शिफारस गव्हर्नरांनी मान्य केली. परंतु त्याचा उपभोग घेण्याला बाळशास्त्रींची पत्नी व मुलगा त्यांचे पश्चात् फार दिवस जगलीं नाहींत. त्यांची पत्नी त्यांच्या मृत्यूनंतर ११ महिने १६ दिवसांनी, ता. २ मे १८४७ रोजीं मुंबई मुक्कामीं वारली व मुलगा आईमागून १३ महिने ९ दिवसांनीं ता. ११ माहे मार्च १८४८ रोजीं पंढरपुरास आजोळीं वारला.

बाळशास्त्री जांभेकर यांचा त्रोटक परिचय करून देण्याचें कार्य संपलें. त्यांनीं शैक्षणिक व वृत्तपत्रीय व्यवसायाचें जें बीजारोपण केलें त्याचा आज मोठा वृक्ष झाला आहे. त्यांनीं प्रदीप्त केलेली ज्ञानज्योत अखंडपणें तितक्याच शुचितेनें व शांतपणें तेवत ठेवणें हें त्यांच्या पावलावर पाऊल टाकणाऱ्यांचे पवित्र कर्तव्य आहे.

—संपादक

# दर्पण संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र.
स्थळ प्रत

# दर्पण

## प्रस्ताव

[ तारीख ६ माहे जान्युआरी सन १८३२ ]

" स्वदेशीय लोकांमध्यें विलायतेंतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशची समृद्धि व एथील लोकांचें कल्याण याविषयीं स्वतंत्रतेनें व उघड रीतीनें विचार करावयास स्थल व्हावें या इच्छेनें कित्येक मुंबईत रहाणारे लोकांचे मनांत आहे कीं ' दर्पण ' या नांवाचें एक न्यूसपेपर म्हणजे वर्तमान पत्र छापून प्रसिद्ध करावें. त्याचा पहिला नंबर तारीख ६ शुक्रवार माहे जान्युआरी सन १८३२ ते दिवशीं छापला जाईल. या देशचे लोकांत विलायती विद्यांचा अभ्यास वाढावा आणि तेथील ज्ञान प्रसिद्ध व्हावें असे या वर्तमानपत्राचा उद्योग मुख्यत्वें आरंभिला आहे खरा. परंतु जांस इंग्रेजी भाषा येत्ये त्यांस मात्र याचा उपयोग असें न व्हावें म्हणोन योजिलें आहे कीं, एकबाजूस इंग्रेजी व एक बाजूस मराठी असावें; म्हणजे जे मराठी मात्र जाणतात त्यां सर्वांसही याचा उपयोग होईल. इंग्रेजींत कोणी कांहीं विषय लिहून पाठविला तर त्याचें मराठींत भाषांतर केलें जाईल, आणि मराठी भाषेंत पाठविलेले विषयांचें इंग्रेजी केलें जाईल; व मूळविषय आणि भाषांतर हीं समोरासमोर छापलीं जातील. दर्पणांत जाहीर खबरा आणि विलायतचें व बंगालचे पत्रांचे कांहीं कांहीं अंश लिहिले जातील. तसेंच या देशांतील, विलायतेंतील व दुसरे देशांतील मोठमोठीं वर्तमानेंही लिहिलीं जातील. कोणी साहेबलोकांनीं व या देशचे लोकांनीं हिंदुस्थानांतील लोक, धर्म आणि विद्या यां संबंधी कांहीं लिहून पाठविलें असतां तेंही दर्पणांत छापलें जाईल. तसेंच

विलायतेंतील विद्या, कळा, कौशल्यें, यांविषयींचे व त्यांतील जा भागांचा उपयोग या देशांत झाल्यास फार हित आहे, त्यांविषयींचे लहान लहान ग्रंथ लिहिले जातील. अशे गोष्टींपासून जिज्ञासु पुरुषांस शोध करायास, आणि विद्येंत परिश्रम करणारांस विचार करायास विषय मिळतील; परंतु जे शुद्ध मनोरंजन मात्र इच्छितात, त्यांचींही हृदयें दर्पणामध्यें लहान लहान चमत्कारीक जा गोष्टी असतील त्यांपासून संतुष्ट होतील. मनोरंजन करणें, चालते काळाचीं वर्तमानें कळविणें, आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणें या गोष्टींची दर्पण छापणारांस मोटी उत्कंठा आहे; म्हणोन या गोष्टी साध्य होण्याविषयीं जितका प्रयत्न करवेल तितका ते करितील. कोणा एकाचा पक्षपात किंवा नीचपणा या दोषाचा मळ दर्पणास लागणार नाहीं; कारण कीं दर्पण छापणारांचें लक्ष निष्कृत्रिम आहे. म्हणोन हें वर्तमानपत्र जा रीतीनें भले आणि गुणी पुरुषांस मान्य होईल त्या रीतीनें करण्यास ते दृढ निश्चयानें उद्योग करितील."

अशा उद्योगास या देशचे लोकांची सहायता योग्य असें जाणून आशा धरिली आहे कीं, खचित त्यांपासून हें वर्तमानपत्र घेणें, आणि त्याचे पूर्णते करितां विषय लिहून पाठविणें, या दोनही रीतीनीं मदतगारी होईल; तसाच भरवंसा वाटतो कीं इंग्रेज लोकांची सर्व मनुष्यमाची दया आहेच. म्हणोन तेही यास आश्रय देतील.

प्रथम कांहीं दिवस दर्पण महिन्यांतून दोनवेळ छापलें जाईल. परंतु अशी आशा वाटत्ये कीं जेव्हां घेणारे लोकांची संख्या वाढेल, आणि या कामाची विशेष माहितगारी होईल, तेव्हां महिन्यांतून वर लिहिल्यापेक्षें अधिक वेळ छापलें जाईल.

दर्पणाची किंमत तीन महिन्यांस रुपये ६ साहा, ती पुढल्या तीन महिन्याची अगोदर घेतली जाईल.

तारीख १२ माहे नवंबर सन १८३१ मु॥ मुंबई.

## ‘ नियतकालिक लेखांपासून स्वार्थ ’

[ तारीख ६ माहे जान्युआरी सन १८३२ ]

जा उद्योग आम्ही योजिला आहे त्याचा प्रारंभ करतेवेळेस नियत कालिक लेखांपासून जे स्वार्थ होतात त्यांविषयींचा कांहीं गोष्टी या स्थळीं लिहिणें हें अयोग्य नव्हे. या नियत कालिक लेखांची पद्धति आणि उपयोग, हें वर्तमानपत्र वाचणाऱ्या एतद्देशीय लोकांतून वहूतांचे समजण्यांत बहूधा आलें नसतील; आणि मुंबई बाहेरचे मुलुखांत तर ही गोष्ट विचारांत आलीच नसेल. हिंदुस्थानचे विद्यांत या लेखांस दृष्टांत द्याया जोगें सांप्रत कांही नाहीं, आणि– सांप्रतचे राजांचा अमल व्हायाचे पूर्वीं या देशांत या जातीचे लेख होते, असें कोठें प्राचीन बखरांतही आढळत नाहीं. जा देशांतून आपले सांप्रतचे शककर्ते एथें आले त्या देशांत ते एथें आल्याचे पूर्वी फार दिवसांपासून या आश्चर्य-कारक छापयंत्राचीं कृत्यें चालू होतीं. त्यांपासून मनुष्यांचे मनांतील अज्ञानरूप अंधकार जाऊन त्यांवर ज्ञानरूप प्रकाश पडला. या संज्ञानदशेस येण्याचे साधनामध्यें इतर सर्व देशांपेक्षें युरोपदेश वरचढ आहे. नियत कालिक लेखांपासून जे स्वार्थ होतात, ते आम्हांस सांप्रतचे राजांचे द्वारे माहित झाले. जा जा देशामध्यें अशे खेडांचा प्रचार झाला आहे, तेथे तेथे लोकांचे आंतर व्यवहारांमध्यें तसेंच व्यवहामध्यें शाश्वत हित झालें आहे. यांपासून वहूतवेळ विद्यांची वृद्धि झाली आहे. लोकांमध्यें नीति रुपास आली आहे. केव्हां केव्हां प्रजानीं राजाचे आज्ञेंन वर्तावें आणि राजानींही त्यांवर जुलुम करूं नये अशा गोष्टी यांपासून घडल्या आहेत. आलीकडे कितेक देशांत धर्मरीति आणि राज्यरीति यांत जे चांगले आणि उपयोगी फेर फार झाले आहेत त्यांसही थोडे बहूत हे लेख उपयोगी पडत आहेत.

यद्यपि या लेखांचीं फळें संसारांतील सामान्य व्यवहारांत उपयोगी नव्हत. आणि लाभ नसतांही केवळ सुरूपतेस येण्याचे साधनाचा विचार करणारे जे विद्वान त्यांस मात्र संतोष कारक होत. म्हणोन अशा फळांपासूनच या लेखांचा थोरपणा वर्णावा असें नाहीं. तथापि लोकांस लाभ देण्याच्या गोष्टीही या पासून

घडतात. तें असें. त्यांपासून अतिशय दूरचे देशांतील वर्तमानें कळतात. बुद्धिमानाची बुद्धिमत्ता त्यांचेद्वारें सर्व लोकांत प्रसिद्ध होत्ये. उपयोगी बातमी समजण्यांत येत्ये: आणि श्रमसाध्य विद्यादिकांचे विचारांकडे जे चित्त देत नाहीं, त्याचें मनोरंजनही होतें. अशा लेखांचा प्रचार ज्या देशांत निर्विघ्नपणें होऊन लोकांचे मनांत त्यांतील गोष्टी ठसतात ते देश धन्य होत! अशा चांगले कामाविषयीं लोकांस स्वतंत्रता पृथ्वीचे इतर भागांपेक्षां युरोपखंडांत फार आहे. आणि तेथे असें आहे म्हणोनच सज्ञानता सर्व लोकांमध्यें विद्यांची प्रवृत्ति, आणि अनेक विद्यांचा शोध, या गोष्टी तेथे झाल्या.

या विस्तृत देशांत इंग्रेजांचें राज्य झाल्या पासून, लोकांची नीति आणि ज्ञान वाढायाविषयीं प्रयत्न होत गेले, आणि या सुज्ञ राजांचे लोकोपकारक उद्योग इतक्या थोड्या काळांत असे सफल होतील असें वाटत नव्हतें. बंगाल प्रांत इंग्रेजांचे हातीं येऊन साठसत्तर वर्षे झालीं; परंतु इतक्यांतच त्या देशाचे स्थितींत जे अंतर पडलें तें पाहिलें असतां विस्मय होतो. जो देश सुमारें शंभरवर्षांपूर्वीं बळात्कार, जुलुम आणि कुनीति यांचे केवळ घर होता, तो आतां निर्भयपण आणि स्वतंत्रता भोगतो, आणि तेथील लोकांस युरोपखंडांतील विद्या आणि कळांचें विशेष ज्ञान होत आहे हें पाहून चांगला राजा आज्ञेंत वागणाऱ्या प्रजांचे कल्याण करायास इच्छितो तर त्याचे हातून काय काय घडेल यास योग्य दृष्टांत सांपडतो.

ह्या हिंदुस्थानचा प्रदेश इंग्रेजी अमलाखालीं येऊन जरी थोडकींच वर्षे झालीं आहेत, तरी जो अज्ञानांधकार फार दिवस पर्यंत या देशास व्यापून होता तो जाण्यास प्रारंभ झाला आहे. आणि बंगाल देशाचे लोक सांप्रत आमचे पेक्षें ज्या गुणामध्यें विशेष आहेत त्यांमध्यें आम्ही त्याचे सारिखे होऊं असा दिवस लवकरच येईल, अशी आम्ही आशा करीत आहों. विद्येपासून आणि सरळ बुद्धीपासून जीं फळें होतात त्यांचे यथार्थ ज्ञान युरोपियन लोकांशीं बहूत दिवस सलगीचें संघटन पडल्यामुळें बंगालचे लोकांस झालें आहे. या गोष्टी त्यांचे मनांत पक्केपणीं ठसून त्यांणीं स्वदेशीय लोकांचे विद्याभ्यासाकरितां प्रयत्न केले;

आणि ते त्यांचें यत्न सफळ झाले. तेथे विद्या वाढण्यास आणि सरळ बुद्धि होण्यास कारणें मुख्यत्वें करून दोन; एक सर्व विद्यालय म्हणजे सर्व विद्यांची शाळा, आणि दुसरें तेथें जीं बहूत तद्देशीय वर्तमानपत्रें छापून प्रसिद्ध होतात तीं. बरें असेच उपाय एथे केले तर अशीं फळें न होतील कीं काय? आमचे लोकांचे मुलांस विद्या शिकवायास एक फार चांगली मंडळी मुंबईंत झाली आहे. आणि अल्पिष्टन शाळा गुरू जेव्हां येतील तेव्हां तर तिचा विशेषच उपयोग होईल. आतां विद्या व्यवहाराचें द्वार असें एक वर्तमान पत्र पाहिजे, कीं जांत मुख्यत्वें करून एतद्देशीय लोकांचा स्वार्थ होईल, जापासून त्यांची इच्छा आणि मनोगतें कळतील, जवळचे प्रदेशांत आणि परकीय मुलुखांत जीं वर्तमानें होतात तीं समजतील, आणि जे विचार विद्यांपासून उत्पन्न होतात आणि जे लोकांची नीति, बुद्धि, आणि राज्यरीति यांचे सुरूपतेस कारण होत, ते विचार करण्यास उद्योगी, आणि जिज्ञासुमनांस जापासून मदत होईल.

आम्ही आशा करीत आहो कीं, या गोष्टी कांहीं थोड्या बहूत दर्पणापासून घडतील. हे सर्व वर सांगितलेलें आमचाच उद्योगापासून घडेल असा आम्हांस अभिमान नाहीं; परंतु भरंवसा आहे कीं, आमचे इष्ट इंग्रेज लोक व सुज्ञ स्वदेशीय लोक या उद्योगास सहाय होऊन तो सफल होई असें करतील. म्हणोन आम्ही प्रार्थना करितों कीं, सर्व लोकांनीं कृपा करून आम्हांस मदत करावी.

---

## छापण्याच्या रीतींत फेरफार

[ तारीख २७ माहे आप्रील सन १८३२ ]

आम्हीं हा कागद वाचणारांस कळवितों कीं, आमचे मनांत दर्पण छापण्याचे रीतींत कांहीं फेरफार करायाचा आहे. त्या फेरफारा पासून हें पत्र घेणारांस संतोष होऊन त्यांणी यथापूर्व आम्हास आश्रय द्यावा अशी आम्ही आशा धरित आहों. दर पंधरा दिवसांस एकवेळ छापायाचे सांप्रतचे रीतीमुळें

आजपर्यंत फार गैरसोई झाली. असें बहुत वेळ घडलें कीं जी एकादी बातमी आम्हास केवळ टांकिता येईना, ती गावांत प्रसिद्ध होऊन जुनी होई पर्यंत आम्हांस छापायास अवकाश सांपडूं नये, किंवा कांहीं एक लिहाया जोगा विषय आमचे मनांत लिहायाचा असतां त्याचा रस गेल्यामुळे तो आम्हांस टांकून द्यावा लागावा; तसेंच केव्हां केव्हां छापायाचे विषय इतके जमावे कीं, त्यांतून कांहीं तसेंच न छापितां महिना महिना राहावे. हा कागद घेणारांतून कित्येकांनीं तो दर अठवड्यास छापावा म्हणोन आम्हास विनंती केली आहे; आणि आम्हास वाटतें कीं असेंच सर्वांचे मनांत आहे. या करितां आम्ही शेवटीं दर आठवड्यास छापण्याचा बेत केला. पुढले शुक्रवारापासून हा कागद दर आठवड्यास छापिला जाईल. कागद घेणारांस पैका अधिक न पडतां ही गोष्ट व्हावी, म्हणोन कागदाचा सांचा बदलण्याचें जरूर पडेल; परंतु आशा धरितों कीं जो फेरफार योजिला आहे तो—वाचणारांचे सोईस पडेल. आमचे मनांत आहे कीं पुढें दर्पण इंग्रेजी न्यूसपेपर छापतात तसे मोठे चिनई कागदावर छापावें; आणि तो कागद दुहेरी मोडाचा असा की त्यांची आठ पृष्ठें होतील. तशी पृष्ठें पंध्रा दिवसांचे कागदाची बारा छापली जातील, व पुरवणी सारिखा जो पुढले आठवड्यांत छापला जाईल, त्यांची आठ होतील. म्हणोन आतां हें पत्र घेणारांस या कागदांची आठ पृष्ठें मिळतात, ती पुढें वीस मिळतील. ती या कागदापेक्षें किंचित् लहान होतील खरी; परंतु आमचे छापणाराचे आदमासावरून त्यांत सांप्रतचे १३ पृष्ठांइतका विषय छापला जाईल.

डांकेचे पैक्यामुळें कोणाचे मनांत असेल कीं दोन कागद मिळोन पूर्वी सारिखे पंध्रा दिवसांतून एकदां पाठवावे. दर आठवड्यास पाठवूं नये, तर त्यांणी तें आम्हास समयी कळे असें करावें.

# ‘ दर्पण ’ नको ‘ रणशिंग ’ पाहिजे

[ तारीख २९ माहे जून सन १८३२ ]

दर्पणकर्ते यांस.

विनंती विशेष. मी तुमचा पत्र वाचणारा लिहितों ऐसें जे तुम्ही पत्राचें नाव **दर्पण** असें ठेविलें आहे; परंतु या तुमच्या पत्राचें नाव **रणशिंग** असें ठेविलें असतां फार चांगलें शोभेल; कांकीं तें शिंग वाजलें म्हणजे दोहों सैन्यांत जसी लढाई होऊं लागत्ये, तसें तुमचें पत्र होतांच वाद चालू झाले. असो हि थट्टा. परंतु सांप्रत तुमचे पत्रांत धर्मांचे वादांची पराकाष्टा झाली. ती इतकी किं, वाचणारांतून बहुतांचे चित्तांत त्याचा त्रास उत्पन्न झाला असेल असें मला खचित वाटतें.

तुम्हास जर पत्राची जागा भरायास दुसरा विषय सांपडत नसला तर तुम्हीं ते वाद इतके छापितां हें ठीकच आहे; तसें जर नसलें तर तुम्हीं ते इतके कोणत्या नफ्यानें छापितां, हें समजायास मी ईछितों. मताभीमान्यांची समाधानें व्हावीं हें जर तुमचे लक्ष्य असलें तर तें परम अशक्य आहे. ती गोष्ट कशी होईल ? कांकीं त्यांचें नावच मताभीमानी, तेव्हां ते अभिमान कसा मोडतील ? आणि अभिमानानें लोक काय बोलतील याचा विश्वास नाहीं. यास एक दृष्टांत सांगतों. तूमचे गेले पत्रांत एकानें लीहीलें आहे कीं, दारूबाज जे लोक ते वास्तवीक क्रिस्तियन नव्हत; परंतु त्याचे लक्षांत आले नाही कीं तो जें नित्यकर्म म्हणतो तें जे करितात ते वास्तविक हिंदु नव्हत असें त्याचा वादी लागलेंच उत्तर देईल. माझा अभिप्राय हा किं काहीं वाद छापावे, परंतु पत्रांचीं पत्रें जीं वादानें भरतां, त्यांत दुसरे उपायोगी व मनोरंजक विषय लिहायास बहुत मिळतील. या लिहिण्याची क्षमा असावी.

ज्येष्ठ वद्य १० शनिवार | एक मनुष्य

# शास्त्रें व परलोकसिद्धि

[ तारीख १३ माहे आप्रील सन १८३२ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस,

मागील फेब्रवारी महिन्याचे १७ वे तारिखेचे दर्पणामध्यें सत्यशोधक यांणी लिहिलें तें चांगलें नाहीं. याचें कारण तर, " विद्वान लोकही बहुधा इहलोकीं कामकाजें करायास अनुपयोगी, आणि परलोक साधन म्हणावें तर तशीं पुण्यकारक नव्हत, अशा शास्त्रांचा अभ्यासामध्यें आयुष्यें नेतात " म्हणोन लिहिलें त्यास हिंदूंचीं शास्त्रें इहलोकोपयोगी थोडींच आहेत, व परलोकोपयोगीच बहुधा आहेत. परलोकोपयोग जा शास्त्रापासून नाहीं असें शास्त्रच नाहीं व तशीं शास्त्रें विद्वान पढतही नाहींत. इहलोकोपयोगी शास्त्रें नव्हत हा दोष नव्हे. इहलोकाचा निर्वाह लोकांचा चाली पाहून होतच आहे: व इहलोकोपयोग तुछ आहे, म्हणोन शास्त्रें बहुधा परलोकार्थच आहेत.

" तशीं पुण्यकारक नव्हत, " म्हणोन लिहिलें तर तें " तसें पुण्य " म्हणजे कसें; व " तशीं पुण्यकारक " तीं कशीं; हें लिहावें म्हणजे याचें उत्तर देतां येईल. " शास्त्राचे उपयोगी जे मूळग्रंथ ते एकीकडेच राहिले, आणि केवळ वादाचाच उपयोगी असे ग्रंथ आहेत त्यांकडेसच सर्वांनी श्रम करावे असा प्रवाह पडला आहे. " म्हणोन लिहिलें हें असें नाहीं. शास्त्राचे मूळग्रंथांतील अर्थ फार विस्तारें करून समजण्याकरितां जा ग्रंथामध्यें लिहिलें आहे त्या ग्रंथाचा श्रम केल्यानें शास्त्राचे मूळग्रंथ फार स्पष्ट होतात असें असतां शास्त्राचे मूळग्रंथ एकीकडे राहिले हें लिहिणें चांगलें नाहीं.

वाख्याग्रंथ व मोटेग्रंथ केवळ वादाचाच उपयोगी हें ही न समजोन लिहिले आहे; कां म्हणाल तर, संस्कृत भाषेकरूनच परलोक सिद्धि आहे. शास्त्रांत गोष्टी व कांही जे पदार्थ असतील त्यांचें स्मरण चिंतन कसेंहि करावें. त्यापासून परलोकसिद्धि आहेच. असें बहुतग्रंथी उघड आहे; व जा विषयाचा विशेष अभ्यास अतिघर्षणें करून पडतो तो विषय चित्तांत दृढ होतो, आणि

बुद्धींत चांगला येतां असें आहे. याकरितां शास्त्रांचा मूळग्रंथावर व्याख्यांवरून विशेष घर्षण केलें, आणि सूक्ष्मसूक्ष्म विशेष रूपगुण स्वभाव शोधून काढिले, म्हणजे शास्त्रांचे विषय बुद्धींत दृढ झाल्यानें परलोक सिद्धि आहेच.

---

## हिंदु धर्म आणि सती

[ तारीख ४ माहे मे सन १८३२ ]

आप्रिल महिन्याचे ८ वे तारिखेचे कलकत्यांतील रिफार्मर वर्तमान पत्रांमध्यें जातीसंबंधि ई. न. र. याचे प्रश्नाचे उत्तर आमचे दृष्टीस पडलें. कलकत्याचा लिहिणारानें खोटे धर्माचा शत्रु अशी सही करून, आमचे कागदामध्यें ई. न. र. याचे पत्रांची उत्तरें जी छापलीं होतीं त्यांतले सारिख्या कांही युक्ति लिहिल्या आहेत; व शेवटीं ई. न. र. यास हे दोन प्रश्न पुसले आहेत.

पहिला सांप्रत कालचे हिंदू जा रीतीची जाति मानितात त्या रीतीचे जातीस ईश्वरानें उत्पन्न केलेला प्राणी मनुष्य याचा स्वभावाचा आधार आहे कीं काय ?

दुसरा मत किंवा धर्म यांचा आणि कित्येक पदार्थ खाण्यापिण्याचा कांहीं संबंध आहे कीं काय जा खाण्यापिण्यापासून मनुष्याचे शरीरावर किंवा मनावर कांहीं जड किंवा चेतन विकार होत नसतो ?

दुसरें तेथील नेटिव वर्तमान पत्र एनक्कयरर् यात लिहिलें आहे कीं, आम्ही या जाति प्रकरणीं आमचे मत लिहावें. परंतु त्या पत्राचे लिहिणाराची ही इच्छा पूर्ण करण्याचें आम्हांस अवश्य दिसत नाहीं; आम्ही इच्छितों कीं त्यानें आम्हास याविषयीं क्षमा करावी; कारण कीं वर्तमानपत्र लिहिणारे जे आम्ही, त्या आम्ही आमचे पत्र लिहिणारांचे मनांत जा हिंदु धर्म संबंधि किंवा दुसऱ्या कोणत्ये धर्मासंबंधि विषयाचा विचार करायाचा असेल, त्याचे उभय

पक्षीचीं पत्रें आमचे कागदांत छापत असतां, या विषयीं आपलें मत लिहावें हा आमचा धर्म नव्हे. आतां या जाति विषयीं आम्ही कांहीं आपलें मत लिहिल्यानें त्या वादास विशेष उपयोग होईल, असें आम्हास वाटत नाहीं; आणि जर आम्ही दोहोंतून कोणता एक पक्ष धरिला, तर अभिनान किंवा पक्षपात या दोहोंतून एक दोष आमचे पदरीं येईल, तो न यावा, असें आमचे मनांतून आहे. तसेंच आम्ही या वादांत पडल्यानें सत्याचा शोध होणार नाहीं.

---

## हिंदूंचा धर्म

[ तारीख ४ माहे मे सन १८३२ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस,

हिंदूंचे धर्माची निंदा करणारे असे आलीकडे बहुत लाहान ग्रंथ पाहून, हिंदूंचा पुरस्कर्ता न होतां किंवा त्यांचे मत स्थापायास न लागतां, किंवा त्या पुस्तकांत लिहिलेल्या गोष्टींतून बहुत केवळ खऱ्या नव्हत असें न म्हणतां लिहितों कीं त्या उघड पक्षपातानें लिहिल्या आहेत. दुसरें पृथ्वीमध्यें हिंदुलोक फार भले या विषयीं बहूत ग्रंथांचे आधार मिळतात.

हिंदु धर्माची निंदा केल्यानें ख्रिस्ती धर्माचा पक्ष सिद्ध होतो असें नाहीं; आणि मी विचारितों कीं ते प्रसिद्धी करणाराचे कर्ते जें ईश्वरानें सांगीतलें असें मानितात, त्याचें प्रसिद्धी करण, या नावाचा एक ग्रंथ त्यांचे दृष्टीस पडल्यास त्यांस कसें वाटेल बरें ?

मी विचारितों या हिंदु धर्माचे प्रसिद्धि कर्त्यांनीं आजपर्यंत जे लाहान लाहान ग्रंथ केले त्यांपासून फळ काय झालें ? आणि या लोकांनीं असें केल्यानें त्यांचे मनांत जें होतें त्याचे विपरीत नाहीं झालें काय ? अशी केवळ हिंदूंचे धर्माची व ते जें ईश्वर संबंधि मानितात त्याची निंदा करणारीं हीं पुस्तकें

मुलांचे हातीं देतात, म्हणोन किती प्रतिष्ठीत गृहस्थ साहेब लोकांचे शाळेंत मुलें पाठवीत नाहीं बरें ?

या रीतीनें विद्येची द्वारें बंद होतात, आणि ज्ञानाचा वाटा उजाड होतात; परंतु जर मुलांचे हातांत सोप्या आणि मनोरंजक अशा गोष्टी दिल्या किं जा पासून त्यांस विशेष ज्ञान होईल, व जांत त्यांचे धर्माची निंदा नसेल, तर शाळांत मुळें अधिक येतील, विद्या आणि ज्ञान अधिक होईल, आणि या रीतीनें मनांस विद्येचा संस्कार झाला म्हणजे मन सहजच जीवाचा कांहीं शोध करायास लागेल.

विलायतेंतील सरकारानें जुन्या चालीस हात लावायास जपावें हें त्यांस योग्य आहे. कारण कीं त्या चाली त्यांस पक्षपाती लोकांचे लिहिण्यावरुन मात्र कळतात.

आबि डुपाई हिंदुमध्यें तीस वर्षें होता, आणि तो स्वतः मिशनरी होता, त्याणें म्हटलें आहे, कीं हिंदु विषयींचा अतिशयोक्ति आणि असत्य लेख पाहून मला राग येतो, व या माझे मतास सर विलियम जोन्स, वारन हेस्तिंग्स, विलकीन व दुसरे बहुत विद्वान आणि अनुभव घेतलेले साहेब लोक अनुकूळ आहेत.

म्हणोन हें पत्र सामाप्त करते वेळेस हिंदु धर्माचे प्रसिद्धि कर्ते जे आहेत, व जांस हिंदु असला म्हणजे त्या पुरूपाचें कांहीं चांगलें वाटत नाहीं, त्यांस सांगतो कीं आबी डुपाई याणें जें हिंदुंचे गुण वर्णन लिहिलें आहे, ते त्याणीं वाचावें. मी कबुल करितां कीं आबी यास जां लोकांमध्यें तो इतके दिवस होता त्यांचा पक्ष कांहीं होता असेल खरा; परंतु त्याणें चांगले रीतीनें स्थापिलें आहे कीं हिंदु मध्यें बहुत योग्य आणि संभावित अशीं कुटुंबें पाहाण्यांत येतात.

मुकाम पुणे. द. र.

# हिंदूंचा धर्म-दुसरी बाजू

[ तारीख १८ माहे मे सन १८३२ ]

दर्पणाचे कर्ते यांस,

तुमचा पत्र लिहिणारा ड. र. याणें हिंदूंचे धर्माची निंदा करणारे असे बहुत लाहान ग्रंथ आलीकडे पाहिले; आणि ते कधीं छापायाचे नव्हते असें वाटून त्यास राग आला असें वाटतें. परंतु जर हिंदुधर्मास निंदा योग्य असली, तर त्यास राग येण्यास कारण नाहीं; आणि निंदा हिंदु धर्मास योग्य आहे या विषयीं प्रमाण त्यांचेच शब्द आहेत, त्याचे म्हणण्याप्रमाणें, हिंदु धर्माची निंदा करणारे पुस्तकांतिल बहुत गोष्टी केवळ खऱ्या आहेत. त्यांचा दोष काय तो त्याचे मते इतकाच दिसतो कीं त्या गोष्टी पक्षपातानें लिहिल्या आहेत; म्हणजे त्या हिंदुशास्त्रांचें आधारानें लिहिल्या आहेत खऱ्या, परंतु त्यांपासून हिंदु धर्माची अप्रतिष्ठा होत्ये. तुमचा पत्र लिहिणारा म्हणतो कीं त्याच ग्रंथापासून हिंदुंस व त्यांचे धर्मास योग्यता देणाऱ्या अशा युक्ति त्याच आधारावर आपण लिहीन तो लिहील याविषयीं मला संशय नाहीं; आणि त्याणें सांगीतलेले धाकटे ग्रंथांचे गरणारेही लिहितील-परंतु इनसाफाचे अदालतींत कोणी मनुष्याचे खरेपणाची चौकशी होत्ये, तेव्हां तो प्रमाणिक पणानें कितीवेळ चालेल याची चौकशी करीत नाहींत, परंतु एक वेळतरी लबाडीनें चालला कीं नाहीं याचा शोध करितात; तसाच तो कितीवेळ खरें बोलला हें तपासीत नाहींत, परंतु एकेवळ लबाडी बोलला कीं नाहीं हे पाहातात. याच रीतीनें हिंदूचे शास्त्रांत कांहीं चांगल्या गोष्टी असतील; परंतु जर त्यामध्यें एक वाईट गोष्ट असेल तर ती इश्वरापासून उत्पन्न झालेली असणार नाहींत, किंवा आम्ही त्यांस मान द्यायास ती योग्य होणार नाहींत. जसा लबाड माणुस एके चोरीवरून धरिला जातो, तसें ईश्वरापासून वास्तविक जो धर्म उत्पन्न झाला नाहीं त्याचें एके खोटे गोष्टीकरून किंवा वाईट मतावरून पृथ्वीवरील मूळ सांपडतें. तुमचे पत्र लिहिणारानें दाखवायाचें होतें कीं हिंदु धर्मास अप्रतिष्ठा करणारें असें हिंदुशास्त्रांत कांहीं नाहीं. म्हणजे त्यांतून वास्तवीक घेतलेले कित्येक भागा-

वरून हिंदु धर्मास अप्रतिष्ठा प्राप्त होत्ये खरी; परंतु त्यांत याहून केवळ विपरीत असे दुसरे आहेत, हें लिहायाची त्यास कांहीं गरज नव्हती.

मला संशय नाहीं कीं, सारे पृथ्वीत हिंदु फार पुण्यवान लोक आहेत, असें तुमचा पत्र लिहिणारा हिंदूंचे पुस्तकांतून सिद्ध करील. तसेंच तो हें ही सिद्ध करील कीं ब्राह्मण पृथ्वीवरील ईश्वर ( भूदेव ) आहेत, सर्व सृष्टी त्यांचे सामर्थ्या खालीं आहे; त्यांचे शापाची शक्ति फार भयंकर आहे, आणि तेणें करून देवही पदच्युत झाले आहेत. वास्तविक पाहिलें असतां सत्य किंवा कल्पित गोष्ट एकही अशी नाहीं कीं जीस हिंदूंचे शास्त्रांतून कोणते एके वाक्याचा आधार सांपडणार नाहीं. साधारण हिंदूंचे गुणाविषयीं व विशेषें करून ब्राह्मणाचा अमानुष पराक्रम व श्रेष्ठपणा यांविषयीं जा त्यांमध्यें गोष्टी आहेत, त्यांवरून ती शास्त्रें ईश्वरानें केली नाहींत असें सिद्ध होतें. क्रिस्तियन शास्त्र युरोपियन लोक ईश्वरापासून आलेलें असें मानितात, त्यांत त्यांचे गुण शक्ति व चांगले पणा, यांविषयीं एक शब्द ही नाहीं तें ईश्वरानें सांगितलें; म्हणोन जो तें वाचील त्यास तें, ही उघड परंतु कठोर, अशी खरी गोष्ट सांगतें कीं " तुझें हृदय सर्वांपेक्षें कपटी व फार पापी आहे.

जर हिंदू क्रिस्ति शास्त्राची परीक्षा करितील, त्याचें बरें वाईट लक्ष्यांत आणितील; त्यांची मतें शिकतील, आणि त्यांस जा गोष्टी वाईट वाटतील त्या खऱ्या किंवा खोट्या याचा शोध करण्या करितां हिंदु धर्माचे प्रसिद्धी कर्त्यांस कळवितील, तर त्यांस मोठा संतोष होईल. जांस हिंदु धर्माचें अगत्य असेल, त्यांणी त्याचे प्रसिद्धि करणारांचे मनांतील गोष्टींची भीड धरूं नयें; परंतु सत्य आणि जा लोकांचें धर्माची उघडीक करणार त्यांचें बरें, या गोष्टी मात्र लक्ष्यांत धराव्या.

खरे आणि जीवंत ईश्वरानें आपलें तत्व उघड करायास आपले लोकांस आज्ञा दिली आहे, आणि त्यांस निश्चय सांगीतलें आहे कीं तें सर्वांचा जय करीलच करील. या वचनावर ते विश्वास ठेवितात, आणि ही आज्ञा ते मानितात जरी सर्व गोष्टी इच्छिलेल्ये फळाचे उलट्या घडूं लागल्या, तरी ते

आज्ञा केलेलें काम आग्रह धरून चालवितात; आणि फळाविषयीं ईश्वरावर पूर्ण विश्वास ठेवितात. जर ईश्वराचे आज्ञेकडे पाहावें, तें सोडून ते पदार्थांकडे पाहून त्यांप्रमाणें चालतील, तर त्यांस धिक्कार असो! ईश्वराचे वचनावरून आपले हृदयांत उमेद धरावी; तें सोडून ते जर मनास चांगल्या वाटतील त्या युक्तीवरून व मनुष्यांचे गोड बोलण्यांवरून आशा धरितील तर त्यांस धिक्कार असो! जर ते आपल धर्मांत सांगीतलेल्या ईश्वर संबंधि मोठ्या गोष्टी, इंग्रेजी शाळांत मुलें पुष्कळ यावी या लहानशे स्वार्थासाठीं टाकतील, तर त्यांस धिक्कार असो! परंतु ही वास्तविक गोष्ट लिहिली पाहिजे कीं, जा इंग्रजांचे शाळेंत क्रिस्तियन धर्मच खरा असें शिकवितात; त्या शाळांचे चौकशी वाल्यांची जितकी इच्छा होती तितकी मुलें आजपर्यंत त्यांत येत गेली—शाळा घालण्यास आणि त्यांत या देशचे लोकांची मुलें येण्यास कठीण नाहीं; परंतु त्या शाळांची चौकशी करण्याकरितां, व त्यांचे काम चालविण्या करितां, इंग्रेज शिकविणारे मिळायाचें संकट आहे. देश भाषांबरोबर क्रिस्तियन धर्म शिकणारे लोक हिंदुस्थानांत हजारों आहेत. कलकत्यांत इंग्रेजी बरोबर तो धर्म साहाशें लोक शिकत आहेत. नुसता क्रिस्तियन धर्मच जांत शिकवितात, अशी एक आलीकडे मुंबईत शाळा घालून तिचा अधिकार पाद्री विल्सन साहेबांस सांगीतला. तेव्हां मोठे प्रतिष्ठित लोकांकडून लागल्याच शाळेंत येण्याविषयीं अर्ज्या येऊं लागल्या, व आतां ही येत आहेत. आतां त्या शाळेंत तीस मुलें आहेत; आणि त्यांचे आईबाप त्यांचे विद्येसाठीं मोठे संतोषानें पैका देतात.

हिंदूंचे धर्मांत पडण्याविषयीं विलायती सरकारास सावध करण्याचें प्रयोजन नाहीं. त्यानी दृढ निश्चय केला आहे कीं, आपले सर्व प्रजांस आपापले धर्मांत चालायास मोकळीक द्यावी. त्यांतून कोणत्या एकाचा नाश करायासाठीं आपला अंमल चालवूं नये; आणि एक किंवा बहुत पुरुषांचे हातून तो टाकून देवविण्याचा उद्योग करूं नये.

आबि डुबाई याचे ग्रंथाची प्रत सांप्रत माझे जवळ नाहीं; म्हणोन त्यांतून कांहीं वाक्यें मला लिहितां येत नाहींत. परंतु मी तुमचे पत्र लिहिणारास

क्वचित सांगतों कीं त्या आबी पेक्षे हिंदू विषयी अधिक निर्दय असा कोणी पुरुष नाहीं. त्याचे ग्रंथाचा शारांश हा कीं हिंदूंचे पापीपणास उपाय नाहीं; ते ईश्वराचे शत्रु आहेत; ते खऱ्यास अजिंक आहेत; आणि त्यांस शिकविणें हें केवळ व्यर्थ. सर विलियम जोन्स, वारन हेस्टिंग्स, आणि विल्किन्स, याणीं हिंदूंस मनुष्य असे समजून त्यांची स्तुति केली आहे खरी; परंतु त्यांचा धर्म वास्तविक असें त्याणीं कोठे म्हटले आहे ? हेस्टिंग्स साहेबानें लिहिलें आहे कीं "या ग्रंथाचे (गीतेचे) गुणाचा विचार कर्तेवेळेस आमचे संसाराचे चालीं प्रमाणें जा कल्पनांचा, आणि आचारांचा चांगले पणा पडून गेला आहे त्या कल्पनांची गोष्ट मी बोलणार नाहीं. व ईश्वरा पासून उत्पन्न झालेले आमचे धर्माची व नीतीची गोष्ट सांगणार नाहीं. या ग्रंथाचे वाचणाराकडे संशयितपणा, असत्य, अज्ञानरीती, आणि विपरीत नीति इतक्या गोष्टींसाठीं मी माफ मागतों."

तुमचा पत्र लिहिणारास वाटलें आहे, कीं हिंदुधर्माचे प्रसिद्धी कर्त्यांस हिंदु असला म्हणजे तो वाईट वाटतो. ही गोष्ट अशी नव्हे. तो मनुष्य पापी आणि पापापासून मुक्त होण्याची वाट धरीत नाहीं, म्हणोन त्यांस वाईट वाटतो. त्यांस या करितांच मुसलमान वाईट वाटतो; आणि नुसत्ये नावांचा मात्र जो क्रिस्तियन तोही याकरितांच वाईट वाटतो. नावाचे क्रिस्तिअन लोकांमध्येंही पुण्यवान व प्रतिष्ठित कुटुंबें आहेत; परंतू तेही त्यांस वाईट वाटतात, आणि ते मरतील तेव्हां त्यांचे बरे होईल अशी आशा त्यांस असत नाहीं. दुसरे पापी लोकांपेक्षें हिंदु धर्माचे प्रसिद्धिकरते हिंदूंजवळ अधिक निर्दयपणा करितात असें नाहीं. त्यांचा तो निर्दयपणा प्रीतीचा; व तो अवश्य केला पाहिजे आणि केला असतां फळ होईल असें समजून ते तो करितात.

हिंदूंचा मित्र.

# धर्माचें मुख्य तात्पर्य

[ तारीख १६ माहे जून सन १८३२ ]

दर्पणाचे कर्ते यांस,

तुमचा पत्र लिहिणारा ई. न. र. म्हणतो "धर्मावरचे विश्वासाचें फळ हें कीं, मनुष्याचे मनांत आपलें उत्पन्न करणारे परमेश्वराची भक्ती व्हावी, आपण पापी आहें हा निश्चय व्हावा, आणि सर्वभूतीं दया व कृपाळुता इत्यादि नीति आचरण करावी." या गोष्टी खरे धर्माची फळें आहेत या विषयीं मी 'ई. न. र.' यांचें मत मानतों; आणि जरी तितकेंच केवळ खरे धर्मांचे मुख्य विषय नव्हत, तरी ते पृथ्वीवरील एकवाचून सर्व धर्म खोटे करायास समर्थ आहेत.

मुसलमान लोकांची प्रीति इश्वरावर असत नाहीं, कारण, त्यांचा धर्म त्यांस सांगतो कीं ईश्वर त्यांस फुकट क्षमा करणार नाहीं. तो त्यांशीं "काम कर आणि मिळव." या करारावर चालेल, आणि जितकें तो त्यांस देईल तितकें त्यांकडून घेईल. प्रीति आणि उपकारिपणा हीं फुकट देण्यानेंच उत्पन्न होतात. कांहीं मोठ्या प्रयासानें आणि दुःखानें प्राप्त झालें तर त्यापासून प्रीति इत्यादिक उत्पन्न होत नाहीं, परंतु त्यांचे विपरीत भावना मनांत उत्पन्न होतात. कुराण इश्वरास वास्तवीक दया माया आहे असें वर्णन करीत नाहीं; त्यांत असें वर्णन आहे कीं इश्वर कांहीं काम सांगतो, आणि कांहीं द्यायांचे कबुल करितो. वास्तवीक दयेनें मनुष्यावर क्षमा होत्ये, आणि कृपेनें स्वतंत्र-दान घडतें. यासाठीं मुसलमान लोक असें मानितात कीं, इश्वरांशी व मनुष्याशीं दुसरें कोणत्याही रीतीनें संबंध नाहीं, परंतु एक न्यायाचे रीतीनें मात्र आहे. तो असा, "तूं पुण्य आणि फळ दे, स्तुतिकर, दान दे, उपासकर, आणि क्षमा, स्वर्ग, दारू, आणि स्त्रिया, घे"

मुसलमान "आपण पापी आहें असें मानीत नाहीं," कारण कुराण त्यांस शिकवतें कीं त्याचे पातक इतकें थोडें आहे, कीं तें त्याचे श्रमान जाईल,

आणि जीं सत्कर्में करायास त्याचे आयुष्याचा शंभरावा वाटाही लागत नाहीं. त्यापासून त्याचे सर्व आयुष्यांतले असंख्य पातकांचा नाश होतो. असें मात्र वाटेल कीं आपण पुण्यवान् आहे आणि आपले पुण्यापासून जेव्हां इतके पाप-दूर होतें, तेव्हां तें फार मोठें आहे, असें तो मनांत आणील.

कुराणा पासून त्यावर विश्वास ठेवणारांचे मनांत " सर्व भूतीं दया कृपा " इत्यादि उत्पन्न होत नाहीं हें मी सांगू काय? मुसलमान लोकांचे मनांत आपणा-हून दुसरीं सर्व मनुष्यें कुत्र्या सारखी आहेत हें मी सांगू काय ? कुराण सांगतें कीं जे मनुष्य मुसलमान होत नाहींत, त्यांस ठार मारावें, आणि अति पीडा करावी हें तुमचे ध्यानात मी आणून देऊं काय ?

या वरून ई. न. र. यांची खरे धर्माची चिन्हें महमदाचे धर्मांत नाहींत असें कळतें.

मला वाटतें कीं हिंदू धर्मांत कृपेचा मार्ग मुसलमानांचे धर्मांत आहे त्या पेक्षां कांहीं अधिक नाहीं. मनुष्याचा जन्म आयुष्य, मरण, आणि त्यांसंबंधि सर्व गोष्टी; तशाच अंतःकरणाचा सर्वशक्ति आणि स्वभाव, त्याचे शरीराचा आकार आणि गुण दुर्गुण, कल्पना, शब्द आणि कर्में ही सर्व मागील जन्मा-तील कर्मा प्रमाणें होतात, असें हिंदुशास्त्रांत आहे. याच प्रमाणें आणि याच रीतीनें पुढले जन्माची स्थिती असें त्यांत सांगीतलें आहे. आम्ही असा कोणी एक ही हिंदू ऐकला नाहीं कीं जो, मनुष्यानें सर्व पातकांचा नाश भोगेंकरूनच केला पाहिजे, आणि पुण्यही भोगेंकरून सारिलें पाहिजे या मतांवर विश्वास ठेवीत नाहीं. हिंदु दुसरें कांहीं मानीत नाहीं, परंतु ईश्वर त्याचा बराबर व्यवहार न्यायानें करितो असें मानितो. यावरून प्रीति करण्याची गोष्ट अगदीं राहिली नाहीं. त्याचे मनांत ईश्वराची प्रीति उत्पन्न करणारें कांहीं नाहीं. आणि जर कारणावांचून कार्य उत्पन्न होत नाहीं, हें खरें आहे तर, " ईश्वरावर प्रीति असें बोलणें मात्र राहील, परंतु खरे हिंदुमध्यें तो पदार्थ राहाणार नाहीं.

हिंदु मी पापी आहें असें कसें मानील ? कारण त्यास समजते आहे कीं कीर्तनें, प्रायश्चित्तें, उपवास, धर्म, व स्नानें इत्यादिक कर्में त्याचें सर्व पातक

घालवायास समर्थ आहेत, इतकेंच नाहीं; परंतु त्यापासून ईश्वराची शक्ति आणि त्रिभुवनाचें स्वामित्व यण्याइतकें पुण्य बाकी राहील. तो आपण पातकीं आहें असें कसें मानील ? कारण त्यास समजलें आहे कीं स्वतः आपण कांहीं करीत नाहीं, परंतु सर्व स्वभावानें उत्पन्न होतें, असें जाणण्यानेंच सर्व आयुष्याचें पातक नाश पावतें. तो आपण पातकी आहें असें कसे मानील ? कारण त्याणें ऐकलें आहे कीं पातक म्हणजे संबंधानें असतें. जर आपण देव अथवा ऋषि झालों असतों, तर मला खोटें बोलल्याचा, चोरी करण्याचा आणि व्यभिचार करण्याचा कांहीं दोष न लागता. मनुष्य कदाचित् असा शक्तिमान् होतो कीं त्यास पातक लागतच नाहीं, आणि आपणास पातक लागतें हें आपले अयोग्य पणानें लागतें असें हिंदूंस वाटतें.

हिंदू एकामेकावर कशी प्रीती करतील ? कारण त्यांच्या जाती निरनिराळ्या आहेत, व त्या त्यांस परम मित्रधर्म एकमेकावर करूं देत नाहींत, आणि प्रीति व्हायाजोगें संबंध घडूं देत नाहींत. त्या जाती परस्परामध्यें मर्यादा करून ठेवितात: कीं ज्या मर्यादा हिंदु लोक पाप बुद्धीनें मात्र मोडतात. गर्व, मत्सर, क्रोध, काम, इत्यादिके वरून लोक त्या मर्यादा मोडतात; परंतु प्रीती आणि ममता दोहोंकडे राहातात. ब्राह्मण माहारावर कसा प्रीति करील ? हिंदु म्लेंछावर कशी प्रीति करील ? जर हिंदु परस्परांवर प्रीति करीत नाहींत, तर ते परकी लोकांवर प्रीति करतील ही गोष्ट अशक्य आहे. ज्या मर्यादा त्यांणी परस्परांमध्यें केल्या आहेत त्या सर्व मिळोन त्यांस पृथ्वीवरील सर्व लोकांपासून निराळे करणारे भिंतीचें स्वरूप पावल्या आहेत.

तेव्हां ई. न. र. याणें सांगितलेली खऱ्या धर्माची चिन्हें कोठें आहेत ?

बहुत युरोपियनलोकांचा व नावांचे क्रिस्तियन लोकांचा धर्म फार करून हिंदु व मुसलमान यांचे धर्मांशी मिळतो. ते ईश्वराची दया स्वतंत्र आहे असें मानीत नाहींत; आणि याचमुळें ते ईश्वरावर प्रीति करीत नाहींत; त्यांचे प्रयत्न एकही पातक घालवायास समर्थ नाहींत; व पातकापासून मुक्त व्हायास बहुत उपाय केले पाहिजेत हें ते मानित नाहींत. वास्तव ते आपण पातकी आहों

असे मानीत नाहींत; यामुळें त्यांस गर्व कोप कामहीं असतात. त्याचानें नीतीचें आचरण होत नाहीं; ते शत्रूंवर प्रीती करीत नाहींत, आणि सर्व मनुष्यांवर उदार, कृपावंत होत नाहींत. जे ह्या सांगीतल्या धर्माविषयीं क्रिस्ति धर्म पुस्तक मानितात, ते ईश्वरावर व त्याचे प्रजांवर प्रीति करतात, सर्वांवर दया व कृपाळुता ठेवतात, आणि सर्व मनुष्य स्वभावानें पातकी आहेत असें समजून जा रीतीपासून पातकी स्वतंत्र पणानें तरले जातात ती रीति पाहून आश्चर्य करितात.

माझानें हा विषय, धर्माचें मुख्य तात्पर्य सांगीतल्या वांचून संपवत नाहीं. तें तात्पर्य हें कीं इश्वराचे थोरपणाचे उघड करणें. म्हणोन जरी सर्व धर्म, अश्रुत कांहीं आश्चर्याचे युक्ती करून मनुष्यांचे मनांत एकसारिखीं फळें उत्पन्न करितील, तरी, जर त्याणीं ईश्वराचे गुणाचें, व मनुष्याशीं त्याचे संबंधाचे वर्णन एक सारिखें केलें नाहीं तर ते खरे नव्हत.

मनुष्याचा मित्र

---

## हिंदू व ख्रिस्ती धर्म

[ तारीख २२ माहे जून सन १८३२ ]

दर्पणाचे कर्ते यांस,

तुमचा पत्र लिहिणारा ई.न.र. याचें मनांत आहे कीं, ईश्वरानें मनुष्यांस वेगवेगळे धर्म सांगीतले आहेत असें म्हटल्यानें जाति ईश्वरापासून उत्पन्न झाली असें सिद्ध होतें परंतु त्याणे मनांत धरावें कीं ईश्वरानें अनेक धर्म सांगीतले आहेत हें जरी कबूल केलें, तरी असें सिद्ध होत नाहीं कीं जा हिंदुधर्माचा त्याचे युक्तींस आधार आहे तो हिंदुधर्म, ईश्वरानें सांगीतले धर्मांतला आहे. त्या धर्माचा कर्ता वास्तवीक ईश्वर आहे, असें दाखवायास प्रमाण पाहिजे.

मी विचारतो कीं वेद, पुराणें, आणि शास्त्रे परमेश्वरापासून उत्पन्न झालीं हें कशावरून सिद्ध होतें.

मनुष्यांस ईश्वरानें एकच धर्म सांगितला आहे असा ज्यांचा निश्चय आहे त्यांतील मी आहे. माझे मताचे स्थापनार्थ मी पूर्वी विल्सन साहेबाचे हिंदुधर्म प्रसिद्धीकरणांतील कांहीं अंशाचें प्रमाण सांगितलें. तुमचे पत्र लिहिणारानें मी त्याणें लिहिलेल्ये कित्येक थोड्या गोष्टींकडे लक्ष्य द्यावें असें सांगितलें; जांचे नाव धर्माची फळें असें त्याणें ठेविलें आहे; आणि जांत वर सांगितलेले ग्रंथाचें मला उघड उत्तर मिळेल असें त्याचे मनांत आहे. या विषयीं मला म्हटलें पाहिजे कीं माझें मन त्याचे मताहून अगदीं वेगळें आहे. प्रसिद्धीकरण पुस्तकांत ही मला निर्विवाद युक्ति दिसल्ये कीं, "ईश्वरानें सर्व खरे आपले वाक्यांत आपले गुण, क्रिया, ईच्छा आणि राज्य यांचा वृत्तांत एक सारिखा सांगितला पाहिजे." मला वास्तवीक गोष्टी आढळतात, त्यांवरून उघड कळतें की पृथ्वींत संप्रत चाललेले धर्म, ईश्वराचे गुण, मनुष्याचा स्वभाव, नीतीचीं तत्वें, मोक्षाचे मार्ग, मोक्षाचें स्वरूप, सृष्टीची उत्पत्ति, यांविषयीं परस्परांशीं केवळ विरुद्ध आहेत. दर्पण वाचणारांनीं तो ग्रंथ वाचावा, आणि आपला विचार करावा.

ई. न. र. याणें धर्मावर विश्वास ठेवण्याचे कित्येक लक्ष्याचें खरें वर्णन केलें आहे; परंतु सर्व धर्मांचीं लक्ष्यें हींच आहेत असें त्या त्या धर्मांत आहे किंवा नाहीं, या विषयीं वाद नाहीं; परंतु वस्तूंचे स्वभावाप्रमाणें तीं लक्ष्यें त्यांपासून सिद्धीस जातात किंवा नाहीं याविषयीं वाद आहे. भिन्न भिन्न धर्मांत इछिलेल्ये फळांविषयीं कांहीं विरुद्धपणा नसेल, (असें आहे हें माझें मत नव्हे) परंतु कित्येक सांगितलेल्या उपायें करून तीं फळें प्राप्त होतील किंवा नाहीं या विषयीं उघड विरुद्धपणा असेल आणि आहेच.

या मताचे प्रमाणार्थ मी लिहितों कीं, जर हिंदु धर्माचे एक लक्ष्य "ईश्वरावर प्रीति व्हावी" हें आहे असें म्हटलें, तर मी उत्तर देईन कीं तें लक्ष्य हिंदु धर्मापासून सिद्धीस जाणार नाहीं असें मला दिसतें; कारण हिंदु धर्म प्रसिद्धी

करणांत सांगितल्याप्रमाणें "तो परमेश्वराचा सर्व चांगलेपणा हरण करितो, ईश्वर आहे या विषयींचा आपल्या कल्पना संशयित करितो, त्याचे सर्व गुणाची निंदा करितो, व त्याणें मोठमोठीं पापें आणि फार वाईट कर्में केलीं असें सांगतो." दुसरीं फळें ई. न. र. याणें लिहिलीं तीं प्राप्त होण्यास हिंदु धर्म योग्य नव्हे या विषयीं मी अशाच युक्ति सांगेन. (धर्म प्रसिद्धी करण पृ. १२५ ई. बु.)

क्रिस्ती धर्मांत उगीच नांवासाठीं वागला असतां मोक्ष होत नाहीं; कारण हा धर्म मनापासून प्रीतीनें घेतला पाहिजे, आणि त्याप्रमाणें विश्वासानें आचरण केलें पाहिजे. ज्या पुरुषांस "ईश्वराचें वास्तविक आणि गौरवयुक्त ज्ञान आहे, ज्यांचा आपण पातकी आहों असा निश्चय आहे," जे त्याचे कृपेवर संपूर्ण भरंवसा ठेवितात, आणि ईश्वराचें सत्य आणि पवित्रता यांची योग्यता मानितात, (ही गोष्ट ई. न. र. याणें लिहिली नाहीं) ते कोणी क्रिस्तियन धर्म टाकतील असें नाहीं. वास्तवीक पाहिलें असतां क्रिस्तियन धर्मापासूनच अशा कल्पना होतात; आणि हे विकार उठतात. पातकाचे अपराधाचा नाश, आणि पुण्याची उत्पत्ति यांचा, सर्व वास्तविक क्रिस्तियनांचे मतें धर्माचे खोटे मतांशीं कांहीं संबंध नाहीं. ईश्वर आपली इच्छा आपले शब्दानें आणि आपले कृत्यांनीं उघड करितो; आणि त्याचे शब्दांत विरोध नसतो. तुमचे पत्र लिहिणारानें जड सृष्टीचा दृष्टांत दिला त्यावरून त्याचें मत चांगलें स्पष्ट झालें; परंतु त्यावरून त्याचा खरेपणा सिद्ध होत नाहीं. माझें मत स्पष्ट होण्यासाठीं मी लिहितों कीं जड सृष्टींत कोणतें ही कार्य योग्य चांगले कारणावांचून होत नाहीं; तसें मनावर ही कार्य होणें तें योग्य आणि चांगले कारणावांचून होत नाहीं. म्हणोन मनास विकार करणारीं आणि ईश्वरानें आज्ञा केलेलीं धर्म संबंधि फळें उत्पन्न करणारीं जीं अनेक कारणें आहेत, तीं सर्व ईश्वराचे इच्छेस अनुसरून असलीं पाहिजेत. त्यांची खूण ईश्वरानें सांगितलेलीं वाक्यें आहेत; आणि तीं विरुद्ध धर्मेंकरून कधीं दाखविलीं जाणार नाहींत.

ई. न. र. याणें पूर्वीं लिहिलें कीं पुराणांतले चंद्र सूर्य, आणि

ज्योतिषांतील चंद्र सूर्य हे दोनही एक नव्हत: असें पुराणांत आहे. या बोलण्यास प्रमाण त्याणें पुराणांतील श्लोक दाखविले असतां दर श्लोकास मी एक मोहोर देण्याची कबूल केली. परंतु त्यास हा माझा उदार करार लक्षांत न आणावा हें योग्य वाटलें; म्हणोन त्याचें बोलणे सिद्ध झालें नाहीं. सिद्धांतांचें टीकांचे प्रमाण त्याणें लिहिलें, त्याचा त्यास कांहीं उपयोग नाहीं. त्या टीकाकाराचाने पुराणें आणि ज्योतिष याचे विरोधाचे संकटाचा परिहार होत नाहीं, आणि त्याणीं जा कल्पना लिहिल्या आहेत, त्या वास्तवीक शास्त्राचे उजेडापुढें नाश पावतील असें माझे दृष्टीस येतें. मी पाहिलें कीं भास्कराचार्यानें असें लिहिलें आहे, सूर्य सिद्धांतांतील योजन, पुराणांतील १००००० योजनाचे बरोबर आहे. ही गोष्ट मुळचीच निर्युक्तिक आहे हें असो, परंतु, ती सांप्रत चाललेले विचारांत उपयोगी नाहीं; आणि तिचा चंद्र पृथ्वीपासून सूर्यापेक्षें दूर आहे या पुराणांतील मताशीं कांहीं संबंध नाहीं.

ई. न. र. याणें विचारलें कीं ज्योतिष ग्रंथ पुराणांपेक्षें आलीकडील आहेत हें मी कोठून शोधून काढलें? परंतु जर त्याणें माझें पूर्वीचें पत्र पाहिलें तर त्यास कळेल की, मी माझा शोध म्हणोन लिहिलें नाहीं, परंतु हिंदूचें बहुतकरून असें मत आहे म्हणोन लिहिलें. मला पाहून आश्चर्य वाटलें कीं ब्रह्मसिद्धांत आणि सूर्यसिद्धांत या नावांवरून ते ग्रंथ केव्हां केले होते त्या काळाचा शोध लागतो असें त्याचे मनांत आहे. त्यांचे कर्ते इतकें मात्र लिहितात कीं ग्रंथ करण्यांत त्या त्या नावांचे देवांचा त्यास आश्रय होता. या गोष्टीसही प्रमाण पाहिजे. बेंतली साहेबानें कित्येक युक्तींचे आधारानें सिद्ध केलें कीं ब्रह्मसिद्धांत लिहोन १२९४ वर्षे झालीं, आणि सूर्य सिद्धांतास ९०४ झालीं; आणि या त्याच्या युक्ति डाक्तर मास्कलीन पूर्वीचें आस्त्रानामर गयल (म्हणजे विलायतेंतील सरकारी ज्योतिषी) यांस, आणि युरोपांतील दुसरे विद्वानांस आपाप मान्य झाल्या. जर ई. न. र. याचे मनांत त्यांचा विचार करायाचा असला, तर मी त्यास त्यांचा सारांश करून पाठवीन. नंतर पुराणाचे प्राचीनपणाविषयीं मी त्यास आपलें मत कदाचित् लिहीन.

हा कागद छापण्याविषयीं माझा तुमचे भले पणावर भरवंसा आहे.

मी तुमचा मित्र.

मुंबई ता. ३० मे १८३२ हिंदु धर्म ध्वंसक.

म. ग्रं. सं. ठाणे

## खिश्चन धर्माचीं प्रमाणें

[ तारीख ६ माहे जुलै सन १८३२ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस,

आजपर्यंत तुमचे कागदांत जे उपयोगी आणि चांगले वाद प्रतिवाद दृष्टीस पडले, त्यांत मी कोणताहि पक्ष घेतला नाहीं; परंतु तुमचे आजचे कागदांत एका लिहिणाराचें मत कीं " धर्मविषयींचा वाद जरी कामाचा आहे तरी त्या पासून उभय पक्षांस कांहीं नफा नाहीं; हें माझे मनास अगदीं येत नाहीं म्हणून मी तुम्हास कांहीं गोष्टींचा श्रम देतों.

तुमचा पत्र लिहिणारा न. ग. ही गोष्ट मान्य करतो कीं, जीं दोन मतें परस्परांशीं विरुद्ध तीं दोनही खरीं नसतात; असें पाहून मला फार संतोष झाला. तेव्हां मला वाटतें तो सत्य शोधून काढायास फार सिद्ध आहे. तो म्हणतो कीं " आतां इतकें मात्र दाखवायाचें राहिलें कीं क्रिस्तियन धर्म खरा, " आणि मला वाटतें, त्याचे मनांत लिहायाचें होतें कीं " मग मी अंतःकरणापासून तो घेईन. "

मी आतां क्रिस्तियन धर्माचे खरेपणा विषयीं जा युक्ति आहेत त्या सर्व सांगायास लागत नाहीं; परंतु इतकें मात्र साधारण लिहितों कीं क्रिस्तियनाचें धर्म पुस्तक इश्वरापासून झालें आहे असें ह्या पुढील गोष्टीं वरून सिद्ध होतें. त्याचे लिहिण्याचा आणि त्यांतले विषयांचा प्रौढपणा आणि चांगलेपणा; त्याचा निर्दोषपणा, जो सर्व वाईट कल्पनाचा, शब्दाचा, आणि कर्माचा तिरस्कार करितो; त्याचे सर्व भागांत एक वाक्यता आहे, आणि त्यांतला कोणता ही

भाग दुसरे भागाशीं विरुद्ध नाहीं, अथवा जे एके भागांत खंडिलें आहे तें दुसरें भागांत सांगितले नाहीं; सर्व ग्रंथाचें मोठें लक्ष्य हें आहे कीं मनुष्यांचा कमीपणा, आणि ईश्वराचा मोटेपणा यांचि प्रतिष्ठा वाढवावी; आणि त्याजवर विश्वास ठेवून त्या प्रमाणें चालल्रीं असतां मनुष्यें पातका पासून पुण्याकडे लागतात, व सैतानापासून खरे ईश्वराकडे येतात, एकमेकावर प्रीति करतात, व सर्व मनुष्यांकडे उदार होतात, अशीं त्यापासून फळें घडतात. हीं ईश्वरानें सांगीतलेली धर्माचीं काहीं प्रमाणें आहेत. आणि हीं सर्व क्रिस्तियनाचे धर्म पुस्तकांत आहेत ही गोष्ट जो कोणी द्वेष न धरितां आणि सत्याचा शोध लावावा ह्या इच्छेनें तें वाचितो, तो कोणीही नाहीं म्हणणार नाहीं.

तुमचा पत्र लिहिणारानें सत्याचा शोध करण्याविषयीं व भक्तीनें धर्म पुस्तक वाचण्याविषयीं पेली चालमर आणि समर याचे " क्रिस्तियन धर्माची प्रमाणें " या नांवाचे ग्रंथ पाहावे; म्हणजे त्या पासून त्यास मदत होईल. तीं पुस्तकें मुंबईमध्यें मिळण्यास बहुत श्रम पडणार नाहींत: आणि त्यांत क्रिस्तियन धर्माचे खरेपणाविषयीं वर सांगितलेलीं अनेक प्रमाणें फार विस्तारानें आणि उघड रीतीनें सांगीतली आहेत. बिशाप वाटसन याणें केलेला आपालोजी (क्षमा) या नांवाचा ग्रंथ, आणि पाद्री स्काट साहेबानीं टामपेन यांस दिलेलीं उत्तरें हे दोन ग्रंथ ही त्याणें पाहावे, त्यांत बैबलावर नास्तिकानीं दिल्लेले दोष, आणि वास्तवीक अथवा कल्पित विरोध हे दूर केले आहेत, ते त्यास दिसतील.

न. ग. याणें प्रश्न केला कीं बैबलां मधील सर्व शद्ब खरे आहेत कीं काय ? त्याचें उत्तर मी हें देतों कीं त्याचे शुद्ध प्रतींत सांगीतलेलीं सर्व मतें खरीं आहेत, लिहिणारांचा अशुद्धां मुळें प्रतींमध्यें शद्बांचे फेरफार दिसत असतील; परंतु जें पुस्तक वारंवार लिहिलें आहे, त्यांत असें असतेंच, तथापि त्या मध्यें कांहीं विरूद्ध गोष्टी असतील हें मी कबूल करीत नाहीं; आणि त्यांस सांगतों कीं त्याणें सांगीतलेलीं वाक्यें, आणि दुसरीं जीं त्यास विरूद्ध दिसतील तीं सर्व त्याणें काढून दाखवावीं. मी त्यांची एक वाक्यता करायास निःसंशय समर्थ होईन.

तुमचा पत्र लिहिणारा म्हणतो कीं "कोणता धर्म खरा आहे, किंवा खरा असेल, किंवा खरा असला पाहिजे, हा सिद्धांत करण्याचें कोणी पुरुषास सामर्थ्य नाहीं," म्हणजे कोणासही खरें कोणतें व खोटें कोणतें हें समजत नाहीं; सर्व मनुष्यांची बुद्धि गेली, आणि ते वेडे झाले. जे मनुष्याचे स्वभावास ईश्वराची योग्यता देतात, त्यांतला जरी मी नव्हें, आणि तो फार पातकी आहे असें जरी मी जाणतों, तरी न. ग. याचें मत माझानें मानवत नाहीं. मला खचित वाटतें कीं मनुष्याचे मन त्याचे स्वाधीन आहे; आणि जर तें त्याणें त्या विषयाकडे लावलें, तर कोणत्या वाटेनें जावें हें त्यास कळेल. मला ठाऊक आहे कीं ईश्वर त्याचे खरे कर्मांचा आणि मुख्यत्वे करून धर्माचे विचारांचा हिसाब मागेल. तेव्हां मनुष्यांस मूर्खपणाकडे आणि अज्ञानाकडे राखणारें धर्म संबंधि वादांत मुळचें कांहीं नाहीं.

वर मी लिहिलें आहे त्यावरून तुमचे पत्र लिहिणारास कळेल कीं, त्यास क्रिस्तियन धर्म समजण्याचें सामर्थ्य नाहीं असें म्हणणारांतला मी नव्हें—जर त्याणें चांगले उपाय केले तर त्यास तो विषय निःसंशय समजेल. हिंदुधर्म समजण्याचें सामर्थ्य मला आहे, असें मी खचित म्हणत आहेच.

वाटसरू.

---

# हिंदु धर्मावरील आक्षेप व त्यास उत्तर

[ तारीख २० जुलै सन १८३२ ]

**दर्पणाचे कर्ते यांस,**

आतां मी "रेस्पांडेन्स" याचे गेले पत्राचें उत्तर देतों. माझी आशा आहे कीं, हिंदु धर्माचे दुसरे वादी यांस मी असें केलें म्हणोन वाईट वाटणार नाहीं; आणि त्यांस व तुमचे वाचणारांस अडचण होऊं नये अशी वाद चालविण्याची जी युक्ति मी योजियली आहे ते चालवितील.

मी उघड सांगतों कीं " रेस्पांडेन्स " याणें पूर्वींचे पत्रांत जें लिहिलें होतें तेंच पुन्हां लिहिलें आहे असें मला वाटतें. त्याचें म्हणणें कीं " क्रिस्तियन धर्मांत ईश्वर एक आणि तो पवित्र सत्य आणि चांगला असें असतां, आणि हिंदु धर्मांत ईश्वर अनेक व त्याणीं बहुधा सर्व जातींची पातकें आचरण केली असें असतां, हिंदु धर्म आणि क्रिस्तियन धर्म यांचीं लक्ष्यें आणि स्वभाव हीं एकच आहेत काय ? "

मला ठाऊक आहे कीं हिंदु व क्रिस्तियन धर्मांत उघड विरोध दाखविण्याकरितां क्रिस्तियन लोक या गोष्टी वारंवार सांगत असतात, परंतु माझी विनंती कीं " रेसपांडेन्स " याणें या विषयी माझें पूर्वींचे पत्र पाहावें. त्यांत लिहिलें आहे कीं, परमेश्वर अनेक आहेत असें हिंदु धर्मांत नाही. हें खरें कीं पुराणांतील अमानुष प्राण्यास देव असे म्हणत असतात, परंतु मी पूर्वीं लिहिल्याप्रमाणें त्यांस जन्म मृत्यु आहेत, म्हणोन क्रिस्तियन, देव या शब्दापासून जसे समजतात तसे ते नव्हत.

पाप व पुण्य यांविषयीं दोन पुरुषांचें एक मत मिळणार नाहीं; म्हणोन ईश्वराचे अवतार आणि पुराणांत जांचा कथा आहेत, " त्यांणी सर्व जातींची पातकें आचरण केली, " असें रेसपांडेन्स म्हणतो, आणि तसाच कोणी हिंदु क्रिस्तानें " पाखंडासाठीं घोर मृत्यु भोगिला " असें म्हणतो यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आम्हीं म्हणतो कीं ईश्वर सर्वशक्ति आहे आणि या करितां त्याचे अवतार त्यानें उत्पन्न केलेल्ये प्राण्याचे निंदेचें भय न धरितां काय पाहिजे ते करितात. मला ठाऊक आहे कीं, पवित्रपणा हा दुसरा ईश्वराचा गुण आहे, म्हणोन मनुष्य जी पापकर्मे म्हणतात तीं तो करीत नाहीं, असे म्हणत असतात; परंतु हें उघड आहे कीं, ईश्वरानें मनुष्यास जे नियम दिले आहेत त्यांप्रमाणें त्याणें चालावें असे म्हणतां येत नाहीं. बरें आतां आपण पाहूं कीं क्रिस्तानें जें मरण भोगलें ते ईश्वराचे सर्व शक्तित्वास विरुद्ध आहे की नाहीं. केवळ ईश्वर किंवा ईश्वराचा पुत्र असा जो क्रिस्त: आणि जास " लंगडे लोकांस चालते करावयास, आंगें जांची गेली त्यांस संपूर्ण करायास, आणि मुक्यांस बोलते

करायास " सामर्थ्य, तो फार नीच रीतीनें फांशीं गेला अशी गोष्ट पाहून, ईश्वर सर्वशक्ति असें म्हणतां तरी कसें येईल ?

ब्राह्मणाचे मनांत इतर लोकांपेक्षें बुद्धीनें आपण थोर असें कसें येईल व कोणत्ये शास्त्राचे आधारावरून येईल हें मला कळत नाहीं. ते विद्वान आणि धार्मिक म्हणोन साधारण मूर्ख व पापी लोकांपेक्षें श्रेष्ठ खरे; परंतु स्मरणांत ठेवलें पाहिजे की, शास्त्रप्रमाणें ब्राह्मणांनी जें कर्तव्य त्यांत ते जेव्हां कोणती एक गोष्ट चुकतात, किंवा जेव्हां इतर लोक (नीच जाती सुद्धां) बुद्धींत आणि नीतींत श्रेष्ठता पावतात, तेव्हां हा त्या दोघांचा भेद, (म्हणजे बुद्धीचे श्रेष्ठपणाचा, परस्पर व्यवहाराचा नव्हे) नाहीसा होतो. म्हणोन रेसपांडेन्स याणे जा गोष्टी लिहिल्या त्यांवरून हिंदुधर्माचे लक्ष्यांचा निर्दोषपणा अधिक उणा होत नाहीं.

मी माझे पूर्वीचे पत्रांत लिहिलें कीं, बाहेरून भिन्न आणि परस्परांशी विरुद्ध अशा क्रिया रोग्याची शक्ति आणि प्रकृति पाहून योजिल्या असतां त्यांपासून मनाचे किंवा शरीराचे रोग बरे होणें हें फळ सारिखेंच होतें. आतां या युक्तीप्रमाणें मनुष्याचे मनाचा दुर्वासना दूर होणें हें फळ भिन्नभिन्न धर्मापासून त्या त्या लोकांचे ज्ञानाप्रमाणें सारिखें घडेल असें संभवतें, असें माझें म्हणणें होतें. या युक्तीचे सत्यतेवर दोष देण्याचे सोडून रेसपांडेन्स् याणें गणितांतील एक उदाहरण दिलें; परंतु प्रकृत विचाराशी त्यांशी कांहीं सारिखेपणा नाहीं. तथापि त्या पत्रांचे भागाचे उत्तर मी असे देतो कीं वेगवेगळे गणितांचें उत्तर किंवा फळ हें माझे म्हणण्याप्रमाणें एक असलेंच पाहिजे. माझा वाद करण्याचा विषय हा की, एक फळ उत्पन्न होण्याचे अनेक मार्ग आहेत आणि ते गणित शास्त्रासारिखे दुसरे कोणत्या विद्येंत नाहीं हें दाखवायास कठीण नाही. यास दृष्टांत. गुणाकारासारिखे सोपे हिसाबाचा ही पांच साहा रीति आहेत.

अहो, भिन्नभिन्न धर्म मनुष्यांस पवित्रतेचे आणि मोक्षाचे मार्गास नेतात, याविषयीं अशी उघड प्रमाणें आहेत. म्हणोन जाति विषयींचे प्रश्नाचा आतां स्पष्ट विचार झाला असें समजावें.

तथापि तुमचे क्रिस्तियन पत्र लिहिणारांचे म्हणणें यापुढें आहे. तें हें कीं जा जा धर्मांत विरूद्ध गोष्टी आहेत ते सर्व खोटे. या विषयीं हिंदुशास्त्रांत जीं विरूद्ध वाक्यें असतील त्या सर्वांची टीकाकारांस अनुसरून एकवाक्यता करायास मी सिद्ध आहें; आणि त्या टीकाकारांचे प्रमाणावर निश्चय ठेवला पाहिजे. परंतु हिंदु धर्मांतील विरोध बहुत वेळ काढले आहेत, आणि त्याचे मताभिमान्यांनी दूर केले ही आहेत; म्हणोन आतां क्रिस्ति धर्माचें पुस्तकांमध्यें परस्परांशी एकवाक्यता किती हें आतां दाखविलें पाहिजे. सांप्रत मी क्रिस्ताचे अगदी जवळचे कित्येक पूर्वज यांचीं नावें तुम्हास लिहोन पाठवून तुमचा निरोप घेतो; आणि तुमचे पत्र लिहिणारांस विनंती करितो कीं ती क्रिस्ताचे दोन शिष्य सेंटमाथ्यु, व सेंटलुक यांणी सांगितली आहेत; त्यांत कांहीं तरीं सारखेपणा आहे कीं, काय हें दाखवावें.

( सेंटलुक प्रक. ३ )

२३ आणि एशूचे वय सुमारें तीस वर्षांचें झालें, तो एशू ( असें म्हणत असत कीं ) जोसेफाचा मुलगा, जो मुलगा हेलियाचा,

२४ जो मुलगा माथाथ्याचा, जो मुलगा लेवीयाचा, जो मुलगा मेलचीयाचा, जो मुलगा जोसेफयाचा.

( सेंटमाथ्यु प्रक. १ )

१४ आणि एझरा पासून सादक झाला, सादका पासून एचिम, आणि एचिमा पासून एलियद.

१५ आणि एलियदा पासून एलिझर, आणि एलिझरा पासून माथन, आणि माथना पासून जेकुब,

१६ आणि जेकुब यापासून जोझेफ, मेरीचा नवरा, जी पासून एशू उत्पन्न झाला, ज्याचें नाव क्रिस्त.

ई. न. र.

# दर्पणांतील प्रतिबिंबें

[ तारीख २० माहे जुलै सन १८३२ ]

दर्पणाचे कर्ते यांस,

तुमचा पत्र लिहिणारा "एक मनुष्य याणें, 'जे दारुबाज ते खरे क्रिस्तियन नव्हत," या माझे म्हणण्याची थट्टा केली; आणि लिहिलें कीं हिंदूंवर जरी कोणता दोष आणिला, तरी असे उत्तर देतां येईल कीं, "जा लोकांत तो आहे ते खरे हिंदु नव्हत." आम्हीं उत्तर देतो कीं, जर हिंदु शास्त्राचें प्रमाण याचे विरुद्ध असलें तर हें होणार नाहीं. यास उदाहरण, जर असे म्हटलें कीं जो खोटें बोलणारा, तो हिंदु नव्हे, तर मी शास्त्राचे प्रमाणांवरून सिद्ध करितों कीं, हिंदूनें दुसऱ्यावर उपकार करण्यासाठीं खोटी शपथ घ्यावी; तसेंच आपला जीव किंवा संपत्ति रक्षण होण्यासाठी, आपले मुलाचें लग्न होत नसलेंच तर ते होण्यासाठी, गाई वांचविण्यासाठी, बायको शांत करण्यासाठी, किंवा नायिकेचें मनोरंजन होण्यासाठीं खोटें बोलावें. जर असें म्हटलें की जो चोर तो हिंदु नव्हे, तर मी शास्त्राचे आधारावरून सांगतो की धर्मकृत्यासाठी हिंदूनें चोरी करावी असें आहे. जर असे म्हटलें कीं जो व्यभिचारी तो हिंदु नव्हे, तर मी शास्त्राचे आधारावरुन सांगतो कीं, जर बायको कबूल झाली तर हिंदूनें व्यभिचार करावा असें आहे. जर असें म्हटलें की, जो हिंदूतील नीच जातीचा किंवा म्लेंछांचा चाकर तो खरा हिंदु नव्हे, तर मी उत्तर करितों की, मला ही बातमी ऐकून वाईट वाटलें; आणि मी ही खरी गोष्ट सांगतों की, वर सांगीतलेली चाकरी करणारे लोकांस, हिंदूतील फार पवित्र जाति ही कबूल करितात, आणि धर्मसंबंधि सर्व अधिकार त्यांस ते देतात. जर ते खरे हिंदु नव्हत, तर हिंदूतील फार पवित्र जातिही, त्यांस आपले धर्मांतील फार पवित्र कर्मांत कां घेतात ?

तुमचे पत्राचे नाव दर्पण हें वास्तविक आहे. कारण कीं कोणत्ये गोष्टीचे तोंडावर पांढरें, काळें किंवा तपकिरी रंगाचें जे काय असेल ते,

त्यापासून कळते. कदाचित् तुमचे दर्पणानें "एक मनुष्य" याचे तोंडावर एकादा काळा डाग दाखविल्यामुळें त्यास राग आला असेल; परंतु एथें तुमचा उपाय नाहीं; तुम्हास आपलें दर्पण मळिवतां येणार नाहीं; आणि जंवर्यंत तें चांगले आहे तंव पर्यंत सर्व पदार्थ जसे आहेत तसींच त्यांची प्रतिबिंबे त्यांत पडतील. माझी खातर आहे कीं, तुम्ही तें सभोंवताले सर्व पदार्थांकडे धराल; आणि आम्हि व दुसरें जसे वास्तविक आहो तसे आमचा दृष्टीस येऊं.

तारिख २ जुलै १८३२ म्लेंछ.

---

## ※ ईश्वर आहे याविषयीं प्रमाण

[ तारीख १७ माहे आगष्ट सन १८३२ ]

सर्वदा कांहीं तरी होते असेल, या गोष्टीची सत्यता सिद्ध करितां येत्ये, आणि ही सर्व जगास मान्य आहे. जर कांहीं आहे तर ते अनादि अनंत आहे, कारण कीं, अभावापासून कांहीं उत्पन्न होत नाहीं. अनादि काळापासून कांहीं तरी आहे असे मनांत येण्यास कदाचित् कठीण पडेल; परंतु जेव्हां कांहीं नव्हतें तेव्हां काळ होता असें मनांत आणणें हे केवळ युक्ति विरुद्धच नव्हे, परंतु केवळ अशक्य आहे.

जर अनादिकाळापासून कांहीं आहे, तर तें कोणी तरी मोठा सृष्टिकर्ता प्राणी होता असेल, किंवा बहुत प्राणि मुळचे एके कारणावांचून एकमेकापासून उत्पन्न झाले असतील. या शेवटचे कल्पनेंत एक विरोध आहे; कारण कीं कारणावांचून कांहीं उत्पन्न होत नाहीं. म्हणोन असें सिद्ध होतें कीं, एक स्वतंत्र असृष्ट प्राणि अनादि काळापासून आहे.

हा नित्य पदार्थ, सर्व जगावर आपली सत्ता जाणें ठेविली आहे तो डोळ्यानीं दिसाया जोगे आकाराने आमचे अनुभवास येण्यास अशक्य आहे:

परंतु त्याचे सत्तेचीं प्रमाणें आम्ही पाहातों, त्यांस बुद्धि आणि साधारण विचार हीं तत्क्षणी मान्य होतात. वायु सभोंवतीं जीं अभ्रें आहेत त्यांमुळें जरी सूर्य आपले दृष्टी पासून आच्छादित झाला, तरी त्याची उष्णता, आणि प्रकाश यांचा अनुभव येतो आहे तर, त्याचे स्वभावाचा पुरता निश्चय नसला तरी, आमचे मनांत तो आहे याविषयीं संशय उत्पन्न होणार नाहीं. यारीतीनें जरी ईश्वर स्वतः आमचे दृष्टीपासून आछादित आहे, तरी त्याचे कृत्यांचे आणि गुणांचे अनुभवावरून तो आहे असें आपणास मान्य केलें पाहिजे. जर घड्याळाचा कांटा दिवसाचा तास दाखवितो, आणि बरोबर नियमानें आपले मार्गानें जातो असें आपण पाहिलें, तर आपण निश्चय करितों कीं त्या कांट्याचा नियम करणारी जी कळा ती उत्पन्न करणार कोणी कुशल प्राणी होता असेल. यारीतीनें सूर्य, चंद्र, आणि दुसरे अंतरिक्षांतील जडपदार्थ नियमित काळी भ्रमण करितात, ऋतूंचे भेद नियमानें उत्पन्न करितात, आणि जड विश्वास आयुष्य आणि एकरूपता देतात, असें जेव्हां आपण पाहातों, तेव्हां ते सूर्यादिक, एके मोठे कारणा पासून, अनंत बुद्धी पासून अनंत शक्तीपासून उत्पन्न झाले याविषयीं आपले मनांत संशय राहात नाहीं. जसे साफ न केलेल्ये धातूचे कित्येक खरबरीत तुकडे मिळून आपाप चाकें आणि कमाणी होतील, आणि आपाप असें नियमित चमत्कारिक यंत्र घडलें जाईल, हें मानणें जसें असंभाव्य आहे, तसेंच अंतरिक्षांतील जडांमध्यें, आणि दिवस महिने व वर्षे हीं पुनः पुनः येतात यांमध्यें जो चमत्कारीक बंदोबस्त अनुक्रम, आणि एकरूपता दिसू येतात हीं कोणीतरी त्या प्रमाणें योजिल्या-वांचून होतात, असें मानणेंही असंभाव्य आहे. ईश्वराचे शक्तीवांचून विश्व आपाप उत्पन्न झालें, हीं कल्पना केवळ निर्युक्तिक आहे; जशी दगडाचा खाणी, मातीचे गंज, आणी लांकडाचे रान यांचे मनुष्याचे कौशल्यावांचून चांगले दगड, विटा, आणि नीट केलेलीं लांकडें होऊन उपयोगी आणि सुशोभित इमारत होऊं शकेल ही कल्पना; अथवा लांकुड लोखंड, आणि ताग यांची आपाप फळीं, कड्या आणि शिडें होऊन तीं एकीकडे गलबताप्रमाणें जमून समुद्रांत चालतील ही कल्पना; किंवा धातूचे खरबरीत तुकडे दुसऱ्या

पदार्थांशीं मिळून छापाचे अक्षरांचा एक जोड तयार होईल, आणि आपलेच शक्तीनें एकत्र जुळून ग्रंथ तयार होतील ही कल्पना; अथवा जीं आमचीं शरीरें अशीं भय वाटाया जोगीं आणि चमत्कारीक केलीं आहेत त्यांची बांधावळ, मुळचीच ईश्वराचें अनंत सामर्थ्य, युक्ति, आणि चातुर्य यावांचून गति, इंद्रियें विषय घेण्याच्या शक्ति, आणि असे दुसरे प्राणी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य, यांसुद्धां उत्पन्न झाली असेल ही कल्पना; या सर्व कल्पना जशा निर्युक्तिक तशी ईश्वराचे सामर्थ्यावांचून जग निर्माण झालें ही आहे. जा तुम्हापुढें हें सृष्टि पुस्तक नित्य उघड आहे; जा तुम्हांस शेतांतून जाते वेळेस अंकुरादिक पाहून आश्चर्य होतें; जे तुम्ही प्रकाशदायक सूर्य, आणि शुभदायक व जो पृथ्वीस परिपूर्ण करून अवश्य आणि ख्यालीखुशालीचा वस्तु देतो तो पर्जन्य पाहतां; ते अनंत चातुर्याचीं प्रमाणें आणि अनंत शक्तीचा उघड खुणा दृष्टीस येतात त्या सहज मान्य कराल; आणि तुम्ही या पुढील क्रिस्त शिष्याचे वाक्यांस मान्य व्हाल. " या सृष्टीचे उत्पत्तीपासून ईश्वराचा अदृश्य गोष्टी स्पष्ट दिसतात; त्या निर्माण केलेले पदार्थावरून समजतात; त्यांचीं अनंत शक्ति ईश्वरत्व हीं ही कळतात.

डाक्तर वाल्पी.

---

## * 'पुनर्विवाह प्रकरण'

[ तारीख १५ ऑगस्ट १८३७ ]

॥ श्री गोवर्धन धरोजयति ॥

**दर्पणाचे कर्ते** यांस विनंती विशेष.

मागील शुक्रवार ७ आगष्टाचे दर्पणामध्यें एक हिंदुस्थानांतला रहाणार तुमचा मित्र यांणें विषय लिहिला म्हणजे हिंदुस्थानांतील बालविधवांचे दुराचरणाचीं कारणें स्पष्ट करून या दुष्कर्माचें मूळ खणून टाकावें असें लिहिलें, हें पाहून आम्हास फार संतोष झाला, कारण कीं हें दुराचरण सर्वव्यापी पाहून

आमचें मन बहुत दिवस व्याकुल आहे. त्यास स्वाभिप्राय प्रकट करावा तरि समुदायशक्ती वांचोन एक साक्षाने कोणतें ही काम सिद्धीस जात नाहीं, सिद्ध होवो किंवा न होवो परंतु चांगली गोष्ट सांगावयास अनमान करूं नये, म्हणावे तरी त्या सांगण्यांत विपरीत ही प्राप्त होते. कसें म्हणाल तर सांगतो. विसां वर्षांमागे व्यंकटराम शास्त्री तैलंग गोदावरी समीपस्थ याणी ही सर्वत्र हें दुराचरण पाहून प्राचीनशास्त्राप्रमार्गें पुनर्विवाहाची आज्ञा व्हावी म्हणून तो कोणा कोणाजवळ विचार करून यत्न करूं लागला, तेव्हां सारे लोकांनी मिळून त्यालाच वेडा केला; याचा बुद्धि भ्रंश झाला म्हणून कोणी त्याशीं बोलेना, त्याची गोष्ट सत्य मानीना, तेव्हां त्याणे ती गोष्ट बिलकुल सोडली. ही पाहिलेली गोष्ट आहे. ऐकींव ही अशी कीं बहुतां दिवसां मागें जयसिंग राजा याणें पुनर्विवाहाचा यत्न केला तेव्हां सारे लोकानीं राजाचे आईजवळ अर्ज केला कीं हें कसें तरी मोडून टाकावें. मग तिणें पुत्राला बोलाऊन म्हटलें कीं ही तजवीज त्वां चांगली केलीस. मला संतोष झाला. आतां मला ही एक नवरा करून दे असें बोलली. त्या गोष्टीवरून कायल होऊन त्याणें ती गोष्ट सोडली, असें पाहून ऐकून कायल होऊन जीर्णमंगे सुभाषितं म्हणून आम्ही ही गोष्ट विसरूनच बसलों होतों, परंतु सांप्रत या 'दर्पणांत लिहिलें पाहून आणि दक्षिणेंतील बाळाजीपंत नातू यांचे नाव ऐकून आणि येथें एक कायस्थ ही आमचाच मताचा मिळाला हें सर्व लक्ष्यांत आणून आमची मित्र मंडळी जमली जाणून आम्हास ही धैर्य आले.

तुमचे लिहिणाराने दोन कारणें लिहिलीं, तीं हीं कीं स्त्रियांस विद्येचा अगदी अभाव हें एक व त्यांस दुसरें लग्न करण्याची मनाई हें दुसरें कारण, ऐसें लिहिलें हें सत्य आहे. त्यांत प्रथम कारण विद्येचा अभाव हा सर्व जातिव्यापी आहे. एखादी बायको क्वचित् अक्षरमात्र कांहीं शिकली तरी शुकपांडित्याप्रमाणें; परंतु विवेकोत्पादक विद्याभ्यास बहुधा कोठेंच दिसत नाहीं, याचाने त्या केवळ अंधप्राय होऊन कांहीं न समजतां कुत्सित होतात म्हणजे कुलच निंदित होतें.

यथाहुः

इत्थं स्वजिव्हये वान्नं सुरये वो क्षितं पयः ॥
तृपं कुष्टरुजे वेश्यं कुलं निंदंति कु स्त्रियः ॥

आता दुसरे कारण दुसरे लग्न करण्याची मनाई ही ब्राम्हण वनियां ( यातच कोमटी ही आले ) कायस्थ खत्री ( क्षत्रियांतच क्षत्रिय जे सांप्रत रजपूत लोक ते ही आले ) या जातींतच आहे परंतु वरकड जातींत नाहीं. त्या जातींत **नात्रा** म्हणजे पुनर्विवाह चालतच आहे. वरील उत्तम जातींत या मनाईने बालविधवा जा होतात त्या, बलवानिंद्रय ग्रामो विद्वांसमपकर्षति म्हणून कामोपहत होतात.

यथाहुः

स्त्रियः कामेन नश्यंति ब्राम्हणा नृपसेवया ॥
राजानो ब्रम्ह दंडेन यत यो भोग संग्रहात् ॥

अहो असें तुम्ही शास्त्रच सागून निंदिता कीं कोठें तरी चाल ही पाहिली म्हणाल तर सर्वत्र चाल आहे त्यांत दृष्टिमार्गें सृष्टि, म्हणून कोणी प्रसिद्ध करींत नाहींत आपणच डोळे झांकून रहातात. मागें पुण्यांत बहुतच दुराचार झाला व विधवा केशराखून व्यभिचार करूं लागल्या तेव्हां श्रीमंतानी एक दिवस नाक झरीचा कांठीं नेऊन भादरविल्या. अशीं हीं वाईट कारणें आहेत त्यास त्यांचे मूळ एकदांच खणून टाकावें तें कसें. बायकांस विद्याशिकविण्या करितां शाळा घालाव्या. विद्या शिकविण्यास निषेध शास्त्रांत कोठे नाहीं. परंतु पूर्वील लोकानीं विद्या शिकविल्यास त्या असच्छास्त्र पाहून खराब होतील म्हणून सुतरां निषेध केला याचाने अधिकच खराबी झाली याज करितां आतां विद्या पढवांवी हें चांगलें, परंतु सच्छास्त्र पतिसेवादिक धर्म नीति शास्त्रादिक शिकवावें. असद्ग्रंथ कोकशास्त्रादि न पढवावे. अहो असच्छास्त्र न पढवावें म्हणतां परंतु जेव्हां ग्रंथ लावायाचें सामर्थ्य येतें तेव्हां तें पढवावें लागत नाहीं आपणच पाहून समजून घेतील म्हणाल तर, प्रथम लहान पणा पासून सच्छास्त्राने हृदय भनून गेल्यावर मग असच्छास्त्र पाहिले तरी निषेधास कारण होतें, त्याला राहाण्यास हृदयांत स्थळ मिळत नाहीं, याचानें चांगला शीलवतीच होतात.

यथाहः

गता गत कुतू हलं नयनयोरपांगा वाधिस्मितं कुलन तश्रुवाम धर एव निश्राम्यति ॥ वचः प्रियतम श्रुतेरति थिरव कोमकमः कदाचिद दंपिचेत्त दामनसि केवलं मज्जति ॥

या प्रकारें स्तवन योग्य होतात. आतां दुसऱ्या लग्नाची आज्ञा द्यावी परंतु प्राचीन शास्त्रांत जसें लिहिलें तसेंच करावें तें कसें

यथामार्तंडे

देयान्यत्र विवाहिता पित्र बलाद्याविद्धयो निर्तचेत ॥ असेंच आणिक पुरुषार्थ चिंता मण्यादि स्मृतींत ही लिहिलें आहे, या प्रमाणें नवऱ्याशीं सोबत घडली नाहीं तितुक्यांत जर नवरा मेला तर दुसरें लग्न निःशंक करावें, अशीच आज्ञा असावी परंतु नात्रा चालवावा अशी आज्ञा नसावी, या अर्थाच पूर्वील पंडितानीं थोडी आज्ञा दिल्यास नात्राच लावतील म्हणोन शास्त्र असोन ही सुतरां तो वर्जवेला त्याचाने बहुतच अनर्थापात झाला त्यास आतां पुरुष संगर हितांचीच आज्ञा असावी. स्त्री जी आहे ती जथें जाती नियम आहे तेथें मातीचे घागरी सारिखी आहे, म्हणून विटाळिली म्हणजे कामास येत नाहीं तर इतर जातींत नात्रा कसा होतो म्हणाल तर त्या जातींत यज्ञ देवार्चनादिक कर्म नाहीं म्हनोन बनतें, तरी ही लेंकुरवाली असोन नात्रा केला तर जशी पुरुषांनीं पहिली मेली असतां दुसरी बायको केली तर प्रथम संबंधाचे पोरांची तारांबळ होते. कारण, आपल्या पोटचीं नाहींत म्हणून तेथें सापत्न मातेची दया राहात नाहीं, एथें बापाची राहात नाहीं अतएव नात्रा तरी लेंकुरवाळीने करणें हा अन्यायच दिसतो. एथें ब्राह्मणाविषयीं तर प्रत्युर्नो यज्ञ संबंधे म्हणून सूत्र आहे आणि पत्नी पाणि गृहीती स्यात् द्वितीया सहधर्मिणी असें आहे. क्षत्रिया विषयीं ही कृताभिषेकामहिषी भोगिन्यो न्यानृप स्त्रियः म्हणोन कोठेही प्रथम परिणीतेलाच मुख्यत्व आहे द्वीतीया दिकांस गौणत्व यांतच पुरुष संगर हिताही झाली. परंतु पुरुष संगरहिता जी आहे ती सुतरां निषेध असावा हेंच नीट दिसतें.

तुमचे लिहिणाराने आणीक एक लिहिलें असें कीं लहानपणीं मुलींचें लग्न करण्याची चाल या देशांत आहे ती मोडून टाकण्याकरितां या देशचे मोठ-मोठले लोकांस मीं विनंती करितों त्यास ही चाल एक दक्षणी ब्राह्मणात आणि वनिये तैलंग कोमटी म्हणवितात त्यांत आहे परंतु वरकड जातींत मोठ्या कन्यांचेंच लग्न करितात ब्राह्मण कोमटी या जातींत कन्या विवाहात् पूर्वी रजस्वला झाल्यास दोष सांगीतले.

यथा

यावत्यु कन्या मृतवः स्पृशंति तुल्यैः सकामा मपि याच्य मानां ॥
तावंति भूतानि हतानि हतानि ताभ्यां माता पितृभ्यामिति धर्मवादः ॥

अष्टवर्षा भवेत्कन्या नव वर्षाच रोहिणी ॥
दशवर्षा भवेत्गौरी अतरुर्ध्वं रजस्वला ॥

असें आहे म्हणोनच ब्राह्मणास ब्राह्मादि विवाहच विहित सांगीतले गांधर्वादिक क्षत्रियाला सांगीतले ब्राह्म विवाहाचें लक्षण ही सांगीतलें.

यथाह मनुः

आछाद्यचार्य यित्वाच श्रुतशील वतःस्वयं ॥
आहूयदानं कंन्याया ब्राह्मो धर्मः प्रकीर्तितः ॥ १ ॥

याचें फळही दश पूर्वान परान् वंश्यानात्मानं चैक विंशकं ॥ ब्राह्मी पुत्रः सुकृत कृन्मोचय त्येनसः पितृन ॥ म्हणूनच पिता दत्ता कन्या, राजादत्ता पृथ्वी, अशी म्हणगत ही आहे. हें खरें परंतु अज्ञान पणीं लग्न होण्यानें प्रबुद्ध जाल्यावर आवड दुसरीच होती म्हणजे बिघडतात म्हणाल तर, थाज करितांच सद्विद्या पति सेवादि धर्म शिकवावे म्हणोन पहिलेंच सांगीतलें, त्याचाने स्त्री धर्म समजतात.

यथा

दुः शीलः शुभवृत्तोवा वदान्यः कृपणो पिता ॥
सुरूपोवा कुरूपोवा पतिर्दैवं हि योषिता मिति ॥ १ ॥

असे धर्म ही समजतात आणि आपला उत्पन्न कर्ता तो भगवान् तो ही

समजतो म्हणजे त्याचे इछेने जसा पति मिळाला त्या पतीनेच जिंदगी काढावी म्हणोन भक्तियुक्त राहातात. वरकड गुण कसे ही असोत परंतु नपुंसक निघाल्यास जन्मच विफल होईल म्हणाला तर, क्षेत्रजः क्षेत्र जातस्त स्वगोत्रेणे तरणवा ॥ या प्रकारें क्षेत्रजादि शास्त्र युक्त व्यवहार होईल. परंतु स्त्रीपु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्ण संकरः ॥ अशा दुष्टत्वें करोन अशास्त्रीय वर्ण संकर व्यवहार होणार नाहीं. स्वयंवर पक्षीं ही पहिला चांगलाअसोन स्वयवरा नंतर रोगादिकें करोन पुंस्त्व गेल्यास मग काय करावें. अत एव ईश्वरेच्छा अशीच आहे असें समण्यानेंच नीट आहे. परंतु आपल्या आवडीनें पाहोन आपण जी स्त्री स्वयंवर करती ती बहुधा चांगलाच पाहून घेती म्हणाल तर, सहवासी विजानाति चेष्टितं सहवासिनः ॥ म्हणोन जेव्हां लग्न झाल्यावर बहुत सहवास होईल तेव्हांच गुण बाहेर पडतील. प्रथम चांगले पणाच सारे दाखवितात त्यांत सोंगे जे असतात ते बहुत चमत्कार दाखवून भुलवितात तेव्हां परिणामीं दुष्ट निघाल्यास भगवंताचीच मर्जी जाणावावी लागेल. भगवंताची मर्जी नसल्यास कन्येंने चांगला वर पाहून घेतला तरी त्या वरची मर्जी इजवर नसली तर मग मनोरथ विफळच होईल. लग्न होऊन मेला तरी दुसरा तसाच मिळणार नाहीं तेव्हां ही विफलच आहे. तरी या पक्षीं आपणच केल्यामुळें अन्यथा करण्यास शरम होईल म्हणाल तर, हें ही विवेकच तीसच होईल. विवेकवती असल्यास पितृ कृत असलें तरी हजारो लोकांमध्यें अग्नि संनिध पाणिग्रहण जालें तें अन्यथा कदापि कर्तूं सकत नाहीं.

यथाह दोहा.

गुरुजन दीनी ब्याहके निशिदिनरहत रिसाया ।
पतिकीपत राखे बधू अपहि बांझ कहाय ॥

आतां विद्या पढून ही विनय विवेक नसल्यास काय करावें.

विद्या विनय दानित्यं सच्चेद विनया वहा ॥ किं कुर्मः केप्रति ब्रुमो शरदायां स्वमातदि ॥ १ ॥ यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा तस्य शास्त्रं करोति किं ॥ लोचनाभ्यां विहीनस्य दर्पणः किं करिल्याति ॥ २ ॥ या प्रकारें अविनय वती

कुलटा पुंश्चली जाल्यास मग स्वकुल्य सारें एकच आहे तिला भर्ता कसाही गुणवान् रूपवान् असो तीचें चित्र चंचल होईल या पक्षीं नात्रा लावायाची आज्ञा असली तरी व्यर्थच आहे.

यथाहुः

भर्ता यद्यपि कामशास्त्र निपुणो विद्वान कुलीनो युवा ।
दाता कर्ण समः प्रसिद्ध विभवः स्त्री संग दीक्षा गुरु ॥
स्वप्राणाधिक कल्पिता स्वव'नता स्नेहात्सदा पालिता ।
तं कांतं पशुवद्विहाय तरुणी जारं पतिं वांछति ॥ १ ॥

आकारेग शशी गिरा परभृतः पारावतश्चुंबने ।
हंसश्चंक्रमणे समंदियतयारत्यांचि मर्देगजः ॥
इत्थं मर्तादिमे समस्त युवति श्लाघ्यो स्तिमे वल्लभो ।
मद्भाग्ये न विवाहितः परिरिति स्यान्नैक दोषो यदि ॥ २ ॥

अत एव भागवते १० स्कंधे रुक्मिणी ऊढाया श्रापि पुंश्चल्या मनोम्ये तिनवंनवं ॥ बुधो सतीनं विभृयात्तां बिभ्र दुभयात्र्युतः ॥ १ ॥ उभय च्युत म्हणजे इहलोक परलोक दोहों पासोन भ्रष्ट होतो, ऐसा कीं इह लोकीं कीर्ति अपकीर्ति सुख दुःख परलोकीं सद्गति दुर्गति ऐसे दोन प्रकार आहेत त्यांत भार्या चांगली मिळाल्यास कीर्ति सुख सद्गति आहेत.

यथाहु महा भारते.

नच भार्या समं किंचिद्विद्यते भिषजांमतं ॥
औषधं सर्व दुःखेषु सत्य मेत द्रवी मिते ॥ १ ॥

बृहस्पतिः

आम्नाये स्मृति तंत्रेच लोकाचारेच सूरिभिः
शरीरार्धं स्मृता जाया पुण्या पुण्य फले समा ॥ १ ॥

भार्या समंनास्ति शरीर तोषणं । म्हणून इह सौख्य ही पुन्नाम नरका त्रायत इति पुत्रः म्हणोन सत्पुत्र संतती जाल्यास पितृऋण विमुक्ति आहे कीर्ति

ही आहे कंन्या झाली तरी कंन्या दानें करोन दशपूर्वान्परन् वंश्यान् म्हणोन महाफल आहे ऐसें नसल्यास फारच वाईट.

जी व्यभिचारी स्त्री आहे ती परित्यागासच योग्य आहे. इला विद्या-नसल्यास दुश्चरित्र पाहून धिक्कार केल्यास लज्जित होऊन चूक कबूल तरी करिती विद्या आल्यास युक्ति आणोन वादकरिती.

यथा

ब्रह्मैव सत्य मखिलं नहि किंचि दस्ति तस्मांन्नमेसखि परापर भेद बुद्धिः।
जारेतथा निजवरे सदृशोनुरागो व्यर्थं किमर्थं मसती तिकदर्थं यंति ॥ १ ॥

अशी जी दुष्टा इला विद्या शिकविणे ही सर्पास दूध पाजल्या प्रमाणें आहे आणि कोणी सुधारूं ही सकत नाहीं. परित्याग योग्यच आहे. जी जात्याच उत्तमा ती आपल्या विवेकें करोन मन आवरोन नीट चालती आतां जी मध्यमा आहे तिला बोध गुरू चांगला चतुर मिळाल्यास चांगली उत्तमाच होईल.

या विषयी कथा सांगतात. कोणी एक सावकार आपल्या प्राचीन एका वृद्ध चाकराच्या स्वाधीन आपली स्त्री करून प्रवासास गेला. ती स्त्री तरुण होती या मुळें कामानें तिचें मन चंचल होऊं लागलें. असें पाहून त्या चाकरानें एके दिवशीं ही युक्ति केली. आपण मातीचा गाडगा घेऊन पाण्यानें मिश्रकरून तो दगडावर आपटून फोडला, आणि आपणच फार आक्रोश करून तो मेणानें सांधूं लागला तेव्हां त्याचे धनीनीनें येऊन त्याचें समाधान आरंभिलें म्हणाली कीं तूं वेड्या सारिखा कां शोक करितोस मी तुला पाहिजे तर सोन्याचें भांडे देईन. त्यावर त्याणें उत्तर केलें कीं या साठीं रडत नाहीं, परंतु लहान पणापासून माझें गौप्यांग याणें मात्र पाहिलें तें आतां दुसऱ्यास दाखवावें लागेल म्हणून रडतों. हें ऐकतांच त्या स्त्रीस विचार झाला कीं हा पुरुष असोन अचेतन पदार्थास आपलें गुह्यस्थान दाखविण्यास इतका आक्रोश करितो आणि मी निर्लज्ज होऊन पर पुरुषांशीं व्यवहार करण्यास इच्छित्ये, तस्मात्

धिक् माझें जन्म. असें वैराग्य होऊन ती सदाचार संपन्न झाली. ऐसें आहे म्हणोन सिद्धांत ऐसाच करावा कीं स्त्रियांस सद्विद्या शिकवावी. बालविधवा पुरुष संगरहिता असल्यास पुनर्विवाह करावा ब्राह्मण कोमटी या जातींत लहान्या मुलीचें लग्न करावें हेंच चांगलें.

तुमचा दुसरा दर्पण तारीख १४ माहे आगष्ट यांत सुमार्गानुसारी हिंदु याणी लिहिलें कीं बाळविधवा बायकांची विपत्ति स्वदृष्टीने स्पष्ट पाहतों परंतु काय करावें आम्ही जात्या हिंदु तस्मात् मनुशास्त्र हें ईश्वर प्रणित होय तें कसें ही विलक्षण अन्याय असलें तथापि त्याचें मतांतर करितां कामानये ऐसें लिहिलें हें एक देशिय दृष्टानें लिहिलें ऐसें गमतें कारण कीं आम्ही ही जात्या-हिंदूच आहो हिंदुधर्म बुडवावा ऐसें आमचा ही चित्तांत नाहीं परंतु

श्लोक.

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्यां कार्या व स्थितौ ॥
ज्ञात्वा शास्त्र विधानोक्तं कर्म कर्तु मिहार्हसि ॥ १ ॥

ऐसे भगवद्वाक्य आहे, त्यास शास्त्र मनुस्मृति एकच नाहीं, अष्टादश-स्मृती आहेत, त्यांत कृत्वेतुमानवा धर्मा म्हणोन युगव्यवस्थाही आहे. स्मृतीनंतर कृतक आहेत, परंतु कृतकेतर श्रुती आहे तेथे ही विधि सांगीतला त्यास मागून युगपरत्वें करोन निषेध ही लिहिला.

यथाश्लोक:

अश्वालंभं गवालंभं संन्यासं पलपैतृक ॥
देवराश्च सुतोत्पत्तिं कलौपंच विवर्जयेत ॥ १ ॥

ऐसा निषेध सांगून मागती निर्दोष समजून संन्यास प्रति प्रसव विधी करोन सिद्ध केला. अत एव पुरुष संग रहित स्त्रीचा पुनर्विवाह ही ऋष्युक्तच आहे. तेव्हां कां न घ्यावा मध्यंतरीं बंद करण्याची सबब पहिलीच दाखविली वास्तव पुरुषसंग रहितेचा पुनर्विवाह कांहीं अशास्त्रीय नव्हे.

कोणी म्हणतात कीं तुम्ही प्रकरण दुराचरण निवारण करण्या कारणें

आरंभिलें परंतु पुरुष संग रहितेचा विवाह होत नाहीं म्हणता त्यास नवऱ्याशीं सोबत झाल्यावर आठाच व रोजांतच नवरा मेल्यास ती ही दुराचरण करीलच कारण जी पुरुष संग रहित आहे तिला पुरुष संग सौख्य समजतच नाहीं म्हणोन ती एखादी राहूं सकेल परंतु इला स्वाद समजतो म्हणोन सुतरां नियत राहूं सकत नाहीं. जरूर दुराचार करीलच तेव्हां दुराचार तदवस्थच राहून इतुका यत्न केला विफलच होईल त्यांस ऐसें करावें कीं गर्भोत्पत्ती होई तंवर पुनर्विवाहाची आज्ञा असावी मग मनाई असावी. कशा करीतां कीं धर्म शास्त्रांत सुवासिना स्त्री जारकर्म प्रायश्चित्त प्रकरणी रजसा शुध्यते नारी म्हणोन गर्भोत्पत्ती पर्यंत रजोदर्शनच शुध्धी सांगीतली गर्भोत्पत्ति जाल्यावर उत्तम वर्ण स्ववर्णान्य नीच वर्णक्रमें करोन प्रायश्चित्त व परित्याग इत्यादि लिहिले आणि प्रसूतां तंचयौवनं म्हणोन मग नियमे करोन राहूं सकेल. ऐसें म्हणतात तरी हें युक्ति युक्तच दिसतें परंतु या पक्षीं एक देशीय तरी शास्त्राचा आधार दिसत नाहीं त्यासश्लोक

य: शास्त्रविधि मुत्सृज्य वर्तते काम कारत: ।
नससिद्धिम वाप्नोति नसुखंन परांगतिं ॥ १ ॥

म्हणोन भगवद्वाक्य आहे याज करितां या पक्षीं आम्ही ही निश्चय करूं सकत नाहीं. अहो शास्त्र नाहीं म्हणतातंरी शास्त्र म्हणजे काय शास्तिति शास्त्रं म्हणोन विधिरूप आहे. तो विधिसाधक बाधक सजोन महंतानी जेणें करून पाप न होय ऐसा मार्ग निश्चित केला म्हणजे तेंच शास्त्र आहे

यथाहु:

श्रुतिश्च भिन्ना स्मृतयश्च भिन्ना ।
स्तथा मुनीनाम तयश्च भिन्ना: ॥
धमस्य तत्वं विहितं गुहायां ।
महाजनो येन गत: सपथा ॥ १ ॥

ऐसें आहे म्हणाल तर त्यापक्षीं ही प्रसूतां तंच यौवनं म्हणोन सामान्य वचन परंतु विशेष असा आहे कीं

श्लोक.

बालास्यात्षोडशाद्वात दुपरितरुणी त्रिंशतीयावदूर्ध्वं ।
प्रौढास्यात्पंच पंचा शरवधि परतो वृद्धतामेति नारी ॥

ऐसें पंचावन वर्षे पर्यंत प्रौढत्व सांगीतलें मग वृद्धत्व सांगीतले वृद्धनारी पतिव्रता म्हणोन मग काम दूर होईल ५५ वर्षे वरी सकामच राहती. तेव्हां गर्भोत्पत्तीनेंच कामदूर होत नाहीं तरी मग विधवा जाली तरी इंद्रिय निग्रह केल्यावाचोन दुराचार निवारण होतच नाहीं.

यथामनुः

इंद्रियाणां प्रसंगेन दोष मृच्छत्यसंशयं ॥
संनियम्यतुतान्येव सिद्धिं समधि गच्छति ॥ १ ॥

याज करितां अशास्त्र पक्ष स्विकारून गर्भोत्पत्तीपर्यंत आज्ञा दिल्या पेक्षां पुरुष संगरहितेस आज्ञापक्षच शास्त्रीय उत्तम आहे अशास्त्र पक्ष स्वीकारणाचा पक्षीं यत्रतु प्रीत्युपलब्धिर्न तत्र शास्त्रमस्ति म्हणोन मग येथेच्छ नात्राचं कां होईना ? परंतु त्याची फलश्रुती तर तद्नुतिष्ट मानो नरकायभवति ऐसें आहे याज करितां अशास्त्र पक्ष अमुच्यानें सांगवत नाहीं. कोणी म्हणतात कीं नवऱ्याची सोवत झाल्यावर ही पुनर्विवाह आज्ञा असल्यास नवऱ्याशीं खटखट झाली किंवा तो आपल्या चित्तास न आल्यास जहर पाजून त्याला मारून दुसऱ्यास करील या अर्थी आज्ञा नसली तर भिऊन त्यालाच रक्षील सोबतीचे पूर्वी खटखट ही होत नाहीं तो आवडतो किंवा नाहीं हें ही समजत नाहीं त्याचें खाणें पिणें ही इच्या स्वाधीन रहात नाहीं म्हणून बुद्धिमंतानी विचारून सोबतींचे पूर्वी विवाहाज्ञा दिल्ही ऐसी युक्ति सांगतात. परंतु हे थोड्या नजरेने सांगतेत ऐसें वाटतें. कारण दुष्टाजी आहे ती पुनर्विवाहाज्ञा नसली तरी नरुचला म्हणजे मारीलच मग व्यभिचारिणी होईल, तें काम नवनल्यास सर्व व्यवहार करील. सती जी आहे ती आज्ञा असली तरी जो प्रथम जाला तोच वरा म्हणोन त्यालाच सेवील, मारणार नाहीं. असें अन्वय व्यतिरेकाने हेनूस सत्व नाहीं दिसत, म्हणोन थोडी नजर म्हटलें आहें. दुष्ट स्त्रीची वित्तादि निमित्तोपाधिक

प्रीत व्यर्थच आहे. धनलोभे करोन मायबापानीं म्हातान्यास दिल्ही तर ती दुसन्याचाच उपयोगी.

यथाश्लोक.

पाणौ गृहीतापि पुस्कृतापि स्नेहेननित्यं परिवर्धि तापि ॥ परोपकाराय भवे दजस्त्रं वृद्धस्य भार्या कर दीपिकेव ॥ १ ॥

एसें आहे म्हणोन कन्येनेच वरणें चांगले. तैसे असल्यास केवळ धनावरच होणार नाहीं.

यथा.

कन्या वर यते रूपं मातावित्तं पिताश्रुतं ॥ बांध वाः कुलमिच्छंति मिष्टान्न मितरंजनाः ॥ १ ॥

केवळ अज्ञान असली तरि सुंदर रूप पाहील, विद्या विवेक व ती असल्यास गुणिर्निगुण ज्ञारमते म्हणोन सुगुणही पाहील अतएव वित्तोपाधि नसावाच.

श्लोक.

मित्र मापत्ति कोलेषु भार्यांच विभवक्षये ॥ जानी यादिति. ऐश्वर्य गेल्यावर ही नलावर दमयंतीचें प्रेम जसें राहिलें तसें असल्यास औषधं सर्व दुःखे षु । म्हणोन दारिद्र्यादि विंपत्ती ही बहुत बाधत नाहीं अत एव अर्थोपाधिक व्यर्थ हाच सिद्धांत उत्तम दिसतो म्हणोन दुसरे जे म्हणतेत तेही चांगलें विचारून म्हणत नस्तील असें वाटतें. अहो इंद्रिय निग्रह प्रशंसापक्षीं पुरुषसंग रहितेनें ही निग्रहच करावा.

यथाह याज्ञवल्क्यः

कामंतु क्षपये देहं पुष्पमूल फलैः श्रुभैः ॥
नतुजामापि गृण्हीयान्मृतेपत्यौ परस्यतु ॥ १ ॥

असें जाल्यास मग इतुकी खटपटच नलगे. यथास्थितच राहील म्हणाल तर नाहीं.

यथामनुः

नत पैतानि शक्यंते संनियंतुम सेवया ॥ जिव्हे पस्थ परित्यागे पृथिव्यां किं प्रयोजनं ॥ १ ॥

म्हणोन सुतरां त्याग जे कांहीं नैष्टिक ब्रह्मचारी ज्ञानी पुरुष आहेत ते आणि जा जातींत कन्या रजस्वला जाल्यास दोष नाहीं त्या जातींत स्त्रिया ही कोणी कोणी पुरुषेच्छा रहितच राहातात. त्या करतील त्यानां चिंता नाहीं आसुनिवृत्ति रिष्टा असें आहेच परंतु मनांत काम असोन लौकिकार्थ निग्रह केल्यास होत नाहीं. यथा कर्मे द्रियाणि संयम्य य आस्ते मनसास्मरन् । इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्या चारःस उच्यते ॥ १ ॥ या प्रकारें आहे म्हणोन सकामास संस्कारा वेगळेंच राहाणें कठीण ही आहे आणि जन्म विफल मानितेत म्हणोन पुरुष संगरहितेचा विवाह पुनः करावा म्हणोन यथामति निश्चय केला आहे. सांप्रत इतुकेंच झाल्यास पुढें यांतही कसर दिसल्यास आचार्य स्वामी सारखा कोणी उत्पन्न होऊन गर्भोत्पत्ती पर्यंतही नियग करील ऐसें जाणोन लिहिलें आहे.

—***—

भूपालाहून एक तैलंग ब्राह्मणाचा हा लेख आला त्यांत सारांश असा आहे कीं स्त्रियांस विद्याशिकवावी व पुरुष संबंध न झाला अशा विधवा स्त्रियांचा रजो दर्शनात्प्राक् पुनर्विवाह करावा व ब्राह्मणादि कित्येक ज्ञातींत फार लहान मुलींचीं लग्नें करितात ही गोष्ट ठीकच आहे अशा तीन गोष्टी लिहिल्या त्या पाहून जें आमचें मत आहे तें लिहितों.

(१) स्त्रियांस विद्या शिकवावी ही गोष्ट आम्हास मान्य आहे. पूर्वी रुक्मिणी, पार्वती, दमयंती, इत्यादिकांस लेखन पाठन यांचा अभ्यास होता. प्रपेदिरे प्राक्तन जन्म विद्या हिमालय पर्वताची कन्या पार्वती जिजप्रत पूर्व जन्मांत अभ्यास केलेल्या सर्व । विद्या येत्या झाल्या.

इत्यादि वचनें ही सर्वत्र आहेत. भामलीचा ग्रंथ वेदांतोत आहे, शीला, विजा, इत्यादिकांचीं काव्यें आहेत. सांप्रत ही बहुत स्त्रिया विद्वान आहेत, कोणी कथा करितात कोणी पुराण सांगतात, पुस्तकें आणि जमा खर्च लिहि-

गान्यातर बहुत आहेत. या अशा स्त्रिया सर्वांस मान्य होतात, त्यांणीं वाईट केलें असें कोणी म्हणत नाहीं, त्यांचा सूज्ञ पणें करून त्यांस व त्यांचा पतीस व कुटुंबास सुख होतें आणि विद्येचा व्यासंगे करून त्यांचा मनास तें व्यसन लागून सत्काल क्षेपकरितात, आणि नीतिमंत होतात. तस्मात् स्त्रियांनीं विद्याभ्यास न करावा हे शुद्ध अज्ञान आहे यास शास्त्रिय किंवा लौकिक आधार कांहीं नाहीं यास्तव सर्वांनीं आपआपल्या मुलीं करवीं विद्याभ्यास करवावा ह. आमचा मनोरथ आहे.

१ पुरुष संबंध रहित विधवा स्त्रियांचा विवाह रजो दर्शना पूर्वी पुनः करावा ही गोष्ट आम्हास मान्य आहे. या विषयी साधक बाधकें तैलंग ब्राह्मणाने लिहिलीं आहेत, परंतु त्या पेक्षां साधकें आम्हास विशेष आढळलीं आहेत तीं लिहितों. पूर्वी युगत्रयीं अक्षता विधवा स्त्रियांचा विवाह चालत होता, परंतु या कलियुगाचा आरंभीं चार विद्वानाणीं कलिवर्ज्यें म्हणून ठराऊन लिहिलीं. यथा हानिर्णय सिंधुकारः एताति लोक गुस्यर्थं कलेश दौम हात्मभिः ! निवर्तितानि विद्वद्भि व्यवस्था पूर्वकं बुधैः ॥ कलियुगाचा प्रारंभीं दीर्घदर्शी आणि ज्ञानी अशा पंडितानीं लोकांचा धर्म संबंधि बंदोबस्त राहण्याकरितां व्यवस्थापूर्वक पुरुष संबंध रहित अशा विधवांचा विवाह इत्यादि बंद केला. असें आहे त्यामध्यें अक्षता विवाहाची ही बंदी केली आहे परंतु काय ही ईश्वरेछा म्हणून केलीं किंवा आधुनिक संकेताने केली एतद्विषयीं विचार पहातां ही ईश्वरेछा म्हणतां येत नाहीं, कारण जर अशी ईश्वरेछा असती तर ईश्वरें अशा स्त्रियांस कामच ठेविला नसता–पाहा बरें पशुपक्ष्यादिकांचा ठायीं ईश्वरें नियत काम ठेविला आहे त्या योगाने ऋतुकालीं एकवार पुरुष संबंध होऊन गर्भधारणा झालें म्हणजे तीं स्त्री पुरुषें सर्वदा एकत्र राहिलीं तथापि पुनः गडबड होत नाहीं. मनुष्य स्त्रियांस तर प्रसूत्यंत काम दिला. यथाहुः श्रीमद्भागवते । शश्वत्काम वरेणाथ चतुर्थं जगृहूः स्त्रियः षडगुणो व्यवसायश्च कामश्चाष्ट गुणः स्मृतः ॥ १ ॥

विश्वरूप या नामें एक ब्राह्मण होता त्याचा शिरच्छेद इंद्राने केला ती ब्रह्महत्या इंद्रास लागली तेव्हां ब्रह्मादिदेव एकत्र होऊन ब्रह्म हत्येचे चार

भाग करून चौघांस दिल्हे त्यांत एक विभाग स्त्रियांस दिला ते समयीं स्त्रियांस देवानी वर दिला कीं तुम्ही गर्भवती जाहलां तरी प्रसूत व्हाल तोंपर्यंत विषय सेवन केला असतां गर्भास पीडा होणार नाहीं असा स्त्रियांस वर प्राप्त झाल्यावर ब्रह्म हत्येचा चतुर्थांश स्त्रिया ग्रहण करत्या झाल्या. पुरुषापेक्षां स्त्रियांस व्यापार करण्याची बुद्धि साहापट अधिक आहे, तसाच पुरुषापेक्षां स्त्रियांस काम आठपट अधिक आहे. तस्मात् असा काम दिला असतां त्याणी एक वार वैधव्य प्राप्त झालें म्हणजे पुरुषांतर संबंध करूनये आणि पुरुषांनी यथेच्छ स्त्रिया कराव्या याप्रमाणें ईश्वरेच्छा म्हणवत नाहीं. हा केवळ स्त्रीस्वभावाचे न जाणणारे किंवा त्यांचे शत्रु असे जे आधुनिक त्याणी स्वते जो रक्षणार्थच निषेध केला असें वाटतें. पूर्वीं युगत्रयीं स्त्रियां विषयीं बराच बंदोबस्त होता तो असा कीं, जी पुरुष संबंध पूर्वीं विधवा होई तिचा तर पुनर्वीवाह होत होता. यथाहुः पुरापुरुष संयोगादते देये तिकेचन ॥ त्रेता युगाचे ठायीं विधवा स्त्रियांस पुरुष संबंध नसला तर दुसऱ्यास द्यावी असें कोणी विद्वान् म्हणतात ॥ आणखी ही ऊढायां पुनरुद्वाहः कामौ निषिद्धः या निषेध विधीनेंच पूर्व युगत्रयी तद्विधायक श्रुतिस्मृतींचें अनुमानही होतें.

आतां पुरुष संगविशिष्ट जा अनपत्य स्त्रिया त्याणी देवरापिका पासून उत्पत्ति करून घेऊन मगत्या पुत्राचा लालनादिकें करून काल क्षेप करावा. यथा याज्ञवल्क्यः अपुत्रां गुर्वनुज्ञातो देवरः पुत्रकाम्ययति ॥ वडिलांची आज्ञा झाल्यावर दिराने पुत्राचे इच्छे करून जी भावाची बायको तिजप्रत गमन करावें.

आणि कदाचित् विधवा स्त्रियांस सजातीय व्यभिचार करून संततिझाली असतां, तिचा सन्निवेश कुंडगोलकादि जातींत होत होता त्या मुळें बालत्यादि पातकें होत नव्हतीं. तस्मात् त्या तीन युगांत कांहीं तरी स्त्रियांचा बंदोबस्त होता. कली मध्यें तर सर्व मनुष्य मात्र दुःस्वभाव होऊन संकर होईल या प्रमाणें श्रीमद्भागवतादि ग्रंथीं सांगीतलें तें असें कीं स्वैरणजश्च स्त्रियोसतीः ॥ दांपत्ये हा दंभेधतु ॥ स्त्रियसु श्रुलिन्यो भविष्यत्ति कलौयुगे ॥ स्त्रीषु दुष्टासुवार्ष्णेय जायते वर्ण संकरः ॥ इति भगवद्वाक्यं.

कलियुगामध्यें स्त्रिया मनास येईल त्या पुरुषा जवळ गमन करतील अशा प्रकारें दुष्ट होतील ॥ कलियुगांत दापंत्यास म्हणजे ही माझी पत्नी व मी इचा पति असें परस्परें दांपत्यपणा मानण्यास स्नेह कारण होईल। शास्त्र नियम राहाणार नाहीं ॥ कलिमध्यें स्त्रिया भगाचा विक्रय म्हणजे व्यभिचार करितील ॥ हे कृष्णा स्त्रिया दुष्ट झाल्या असतां वर्णसंकर.होईल.

याज करितां कलिवर्ज्यांमध्यें अक्षता विवाह व नियोग हे दोन ही वर्ज करणारे हे केवळ दीर्घ दर्शी असें वाटत नाहीं; कारण ईश्वरेच्छा संवलित जो संकेत तो ठीकच आहे व तो सर्वत्र चालतो, परंतु केवळ आधुनिक संकेतास धक्का बसतो.

यथाहु:

अघटित घटना कुठिलं पंकजयो निं चिराय परिभूय ॥ करुणा शाली मदन: काता नां कांता नां कांत मनुगुणं कुरुते ॥ आई बाप आपल्या विचारें करून मुलीस एकादे पुरुषास देतात ते समयीं तिला चांगले वाईट पुरुषाचें ज्ञान नसतें नंतर तारुण्य प्राप्त झाल्यावर आई बापानीं शास्त्र विधीनें करून दिलेला नवरा आवडेनासा होतो मग त्या स्त्रिया आवडत्या पुरुषाप्रत गमन गमन करून मनाचा संतोष करून घेतात. तेव्हां जो पुरुष तारुण्य प्राप्त झाल्यावर आवडेनासा होतो त्या पुरुषांसह वर्तमान त्या स्त्रीची विवाहाची योजना ब्रह्मदेव कर्तो, यास्तव अघटित जी घटना म्हणजे संबंध करण्याविषयीं कुटिल स्वभाव अशा ब्रह्मदेवाचा पराभव करून स्त्रियांविषयीं दयालु काम त्या स्त्रियांस योग्य पुरुष अनुकूल करून देतो ॥ याज करितां स्त्रियांनीं पुरुषांतर संबंध करूं नये असा जो संकेत तो एका कडेस राहून लक्षावधि बाल हत्या व भ्रूण हत्या मात्र संकेत करणांच्या पदरांत पडताहेत व तशा स्त्रियांचे तळतळाट ही याच रीतीने मिळताहेत, व दु:सह कामाचा योगाने उघड व्यभिचार प्रवृत्त होऊन उभय कुळांसहित नरकास जातात. हेंही पातक त्यांचाच पदरीं पडतें, यावरून वाटतें कीं कलि वर्ज म्हणून धर्म रक्षणार्थ केलें तें उलटें वर्ण संकराविषयीं कलिधर्मास अनुकूल झालें आहे. बरें कलि वर्ज्यें तरी सर्व लिहिल्याप्रमाणें चालतात असेंही नाहीं तीं येणें प्रमाणें समुद्रयातु:

स्वीकरः कलौ वर्ज्यः नावेंत बसून जो पुरुष समुद्रांत जाईल त्याला जातींत घेऊं नये ॥ हें चालत नाहीं हाल्लीं द्वारका, कछभु, इत्यादि स्थळीं महिना दोन महिने गलबतांत बसून शेंकडो ब्राह्मण जातात त्यांत स्नान संध्यादि लोप होऊन विटाळांत भक्षणादि विषय घडतात तथापि त्यांस कोणी प्रायश्चित्त देखील देत नाहीं. गोत्रान्मातृसपिंडाश्च विवाहः कलौ वर्ज्यः ॥ कलिमध्यें मातृसा पिंडयाशीं विवाह वर्ज करावा ॥ म्हणजे मातुल कंन्या परिणयन कलिवर्जीत आहे असें असतां तेंही या युगांत बहुत करून चाल आहे.

दीर्घकालं ब्रह्मचर्यं कलौ निषिद्धं ॥ कलिमध्यें बहुत दिवसपर्यंत ब्रह्मचर्यं करूंनये निषिद्ध आहे ॥ असें असतां या युगांत बहुत ब्राह्मण जन्मपर्यंत ब्राह्मचारी आहेत, परंतु त्यांस कोणी निषेध करीत नाहीं, व ते सर्वमान्य आहेत.

दत्तौ रसे तरेपांतु पुत्रत्वेन पदिग्रहः कलौवर्ज्यः ॥ दत्तपुत्र व आपले स्त्रीचा ठायीं आपल्यापासून झालेला जो पुत्र तौ औरस अशा दोन पुत्रां वांचून स्वयंदत्तादिपुत्र कलिमध्यें निषिद्ध ॥ असें असतां स्वयंदत्त कृत्रिमादि हें पुत्र हलीं या युगांत चालत आहेत. आततायि द्विजानांनो धर्मयुद्धा मध्यें आततायि म्हणजे घातुक अशा ब्रह्मणाची हिंसा करूं नये. असें असतां युद्धांत सहस्त्रावधि आजपर्यंत मरण पावले व पावताहेत परंतु त्या मारणारांस कधींही कोणी प्रायश्चित्त दिलेंनाहीं आपदिक्षत्रवैश्यादि वृत्तिं विप्रः कलौत्यजेत् ॥ दरिद्र जरी प्रात-झालें तरी कलिमध्यें ब्राह्मणाने क्षत्रियाची वृत्ति म्हणजे हत्यारधरणें व वैश्यवृत्ति वाणी पणा करणें हें वर्ज करावें आदिशद्वें करून शूद्र वृत्तिही करूं नये. ॥ असें असतां हालीं प्रायः ब्राह्मणः क्षत्र वैश्यादि वृत्तीनेंच उपजीजिविका करि-तात, परंतु त्यांस कोणी निषेध करित नाहीं व प्रायश्चित्त ही देत नाहीं. घृतदुग्धादिभिः पक्कमन्नं शूद्रात्क्त लौत्यगेत् ॥ तूप व दूध येणें करून शिजवि-लेलें अन्न शूद्रापासून ब्राह्मणानीं कलीमध्यें घेऊं नये. असें आहे परंतु काशी प्रांती याचाही प्रचार आहे असें ऐकतों. वृद्धरुग्णादि मरणं जलाग्निपतनादिभिः ॥ म्हातारे व रोगी इत्यादिकानी पाण्यांत व अग्नींत उडी घालून मरणें हें कली-मध्यें निषिद्ध. असें असतां शेंकडों ब्राह्मण सन्यास घेऊन समुद्रादिकांत बुडविले हें आम्ही प्रत्यक्ष पाहिलें आहे.

या प्रमाणें कलिवर्ज्यें म्हणून जीं आहेत त्यांतून बहुत चालू आहेत, तेव्हां अविद्ध स्त्रियांचा पुनर्विवाहा विषयींचा हा अनर्थ कारी निषेध कशाकरितां चालवावा. हें आम्हींच म्हणतों असें नव्हे, या विषयीं जयशिंगाचे वेळेस झालेला विचार तैलंग ब्राह्मण याणें लिहिलाच आहे. आणखी या देशीं परशुराम भाऊ पटवर्धन यांची कन्या चारवर्षांची विधवा झाली त्या काळीं पुण्यांत काशी पासून रामेश्वरापर्यंत पंडितांचीं संमतें आणवून रामशास्त्री प्रभृति सर्वांचा विचारें ठरविलें त्या वरून पुनर्विवाह करण्याचा निश्चय झाला परंतु तो कांहीं कारण वशात् राहिला. तस्मात् या विषयीं आतां सर्वांनी विचार करून पुरुष संबंधा पूर्वी रजो दर्शनात्प्राक् स्त्रियांचा पुनर्विवाह करण्याचा सांप्रदाय घातला असतां कांहीं बाध तर नाहीं, प्रत्युत लोकोपकार व पुण्य आहे. तैलंग ब्राह्मण म्हणतो कीं ब्राह्मणादि कित्येक ज्ञातींत लहान मुलींचीं लग्नें करितात ही गोष्ट ठीकच आहे त्यास या विशीं आमचें म्हणणें असें कीं, स्त्रीपुरुष संबंध योग्य होईल तेव्हांच विवाह करावा. त्या पासून पुण्य नसलें तर नसो, परंतु पाप नाहीं, कारण कन्या लग्न करण्याचा पूर्वी रजस्वला झाली असतां तिचा पित्यास प्रति ऋतूस गोप्रदान पायश्चित्त सांगीतलें आहे. याज वरून असें सिद्ध होतें कीं, रजो दर्शनासन्न पूर्व कालींच कन्या विवाह केल्यास चिंता नाहीं दाहा वर्षांपासून बारा वर्षांपर्यंत मुलींचें लग्न करावें हें आम्हास सम्मत आहे. येणें करून कन्यादान प्रयुक्त पुण्य जरी न लागलें तथापि कन्येचा हितें करून जें पुण्य तें होईल. तस्मात् हा पक्ष उत्तम व शास्त्र संमत होय. रजो दर्शनोत्तर पुरुषसंग होऊन जा विधवा होत त्यानीं आपलें संरक्षण करून रहावें व त्यांचे स्वकीय व सर्कार या सर्वांनीं त्यांचा बंदोबस्त करावा हा धर्म मार्ग, परंतु कदाचित् गडबड होऊन गर्भधारण झाल्यास त्याची हत्या होऊं नये. तशा संततीचा समावेश कुंड अथवा गोलकांत यथा मार्ग व्हावा. इतकें असून नवरा असतां स्त्रियानी व्यभिचार केला तर दहशत सरकारची असावी ती आतां नाहीं यामुळें मोठ मोठे कुलीन कुलीन लोकांचा स्त्रिया नवरा व उभय कुळांचा त्याग करून भर रस्त्यावर

बसून वाईटकाम करितात याज करितां पूर्वील पेशव्यांच्या कारकीर्दी प्रमाणें कोंतवाल ठेऊन बंदोवस्त केलातर कांहीं प्रतिबंध होईल.

१ सारांश पुरुष संबंधा पूर्वी रजोदर्शनात्प्राक् बाल विधवांचा पुनर्विवाह करावा या पक्षाचें प्रतिपादन वर केलें एवंच हा पहिला पक्ष.

२ दुसरा पक्ष असा, कीं कन्या, पुरुषसंबंध योग्य होई पर्यंत विवाहच करूंनये हा पक्ष वरचा पक्षां उत्तम या पक्षाचें ही प्रतिपादन वरतें केलें आहे.

३ तिसरा पक्ष असा कीं, मुलगी लहान असतां वाग्दान करून ठेवावें नंतर ती पुरुष संबंध योग्यझाल्यावर पाणिग्रहण संस्कार करावा. हा पक्ष शास्त्र प्रतिपादित आहे, अत एव वाग्दत्त विषयींचा शास्त्रार्थ सूतक प्रकरणांत निराळा लिहिला आहे, यास्तव हा पक्ष चांगला व हालीं गुर्जर ब्राह्मणादि बहुत हिंदु-ज्ञातींत चालतो आहे यास मागणी म्हणतात. याजकरितां हा पक्ष ब्राह्मणादि सर्व ज्ञाती स्वीकारितील अशी माझी पूर्ण आशा आहे या युक्तिनें पुरुष सुखा-नुभव शून्यस्त्री राहाणारनाहीं. या पक्षा विषयीं जाजा प्रांताचीं जीं जीं सरकारें तीं ही सहाय होऊन जर प्रजावर हुकूम चालवितील तर त्या प्रजा परम संतोषानें हा पक्ष स्वीकारून त्या प्रमाणें चालतील, कारण हें स्त्रियांचें दुख सर्वांचा मनांत आहे. सारांश वरचा प्रथम पक्षापेक्षां दुसरा पक्ष चांगला, त्या पेक्षांही तिसरा फारच चांगला, असें माझा बुद्धीस येऊन लिहिलें आहे याचा विद्वानानी विचार करावा. या विचारास सर्कार निखालस मदत करील अशी आमची पूर्ण खात्री आहें.

परशुराम क्षेत्रस्थ ब्राह्मण.

म. ग्रं. सं. ठाणें.

# समाज शास्त्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६०९३

## * मनुष्य जातीचे भेद

[ असल पत्रें तारीख २२ माहे जून सन १८३२ ]

चिनई व जपानी लोक यांचा रीति आणि धर्मसंबंधि आचार तार्तर लोकांहून किती वेगळा दिसला, तरी त्यांची गगना त्यांत केली पाहिजे. आम्हीं संप्रत शरीराचे आकाराचा विचार मुख्यत्वें करित आहों; आणि वर सांगीतल्या देशांत त्याविषयीं सारिखेपणा चमत्कारीक आहे. बहुतकरून सर्व लोक कबूल करतात कीं चिनई लोकांचीं तोंडें रुंद, डोळे लहान, नाकें चपटीं, आणि दाढी बहुतकरून कांहीं नसते. ते रुंद असतात, त्यांचे खांद चोकोन, आणि युरोपियन लोकांपेक्षें उंची थोडी हीं चिन्हे तार्तरांची आणि त्यांचीं सारिखीं आहेत; म्हणोन ते दोनही एके मुळापसून उत्पन्न झाले असतील असा तर्क होतो. चार्डिन साहेबानें लिहिलें आहे कीं "क्यास्पियन समुद्राचे पूर्वे-पासून व उत्तरे पासून मलाका देशापर्यंत सर्व लोकांचे तोंडावरच्या रेषा, आणि चेहेऱ्याचा आकार हीं सारिखीं असतात. यावरून या सर्व लोकांची रूपें आणि रीति किती वेगळ्या जरी दिसल्या तरी ते सर्व प्रथम एके बीजापसून उत्पन्न झाले असा माझा निश्चय झाला. कारण कीं रूप पाहिलें असतां हवें वरून आणि खाण्यावरून होतें; आणि त्यांचा रीती तर त्यांचे मातबरी प्रमाणें व सामर्थ्यां प्रमाणें झाल्या आहेत. ते एके बीजापासून उत्पन्न झाले हें याही गोष्टीवरून सिद्ध होतें, कीं, जे तार्तर लोक चिनांत राहातात ते लवकर चिनई-लोकां सारिखे होतात; आणि तसेच जे चिनई लोक तार्तरीत राहातात, ते लवकर त्यांचीं रूपें आणि रीती घेतात.

जपानी लोकांचा आणि चिनई लोकांचा सारिखेपणा इतका आहे कीं, त्या दोघांची जाति एक असें म्हणण्यास कोणास संशय वाटणार नाहीं. जेपानीं लोक चिनई लोकां पेक्षें फार फिकट मात्र असतात, कां कीं ते दक्षिणेस राहा-तात. बहुतकरून त्यांचा रंग फिकट, आकृति ठेंगणी, तोंड रुंद व चपटें, दाढी फार थोडी, आणि केंश काळे असें त्यांचें वर्णन आहे. त्यांचा चाली व

आचार हीं बहुत करुन सारिखी; आणि सुंदरपणाच्या कल्पना जवळ जवळच असतात दांत काळे करणें, पाय आखुडणें इत्यादि शरीरावर केलेला करुप पणा दोनही देशांत अगदीं सारिखा आढळतो. म्हणून ते दोनही एके बीजापासून उत्पन्न झाले असें म्हटलें पाहिजे. त्यामध्यें आणि त्यांचे पशुतुल्य पूर्वजांमध्यें फार भेद आहे खरा; परंतु त्यांचे सज्ञान पणास कारणे दोन झालीं आहेत. एक तर राहातात तेथील हवेचा माफकपणा; दुसरें तेथील जमिनीपासून अमदानी चांगली होत्ये या लोकांचें जातांतच कोचिन, चिनई, सयामी, तांकिसेंनी लोक, व तसेच आराकान, लेआस, आणि पेगू या देशांत राहाणारांची गणना केली पाहिजे. हे लोक परस्परां पासून आणि चिनई-लोकांसून जरी भेद पावले आहेत, तरी आपलें मूळ जाणावया जोगा त्यामध्यें सारिखे पणा आहे.

---

## * मनुष्य जातीचे भेद ( २ )

[ असल पत्रें ता. २९ माहे जून सन १८३२ ]

मनुष्यांचे जातीचा तिसरा भेद दक्षिण एशियांतील ( हिंदुस्थानांतील ) राहणारे लोकांत आढळतो. त्यांचा चेहेरा व शरीर यांचा आकार तार्तर लोकांचे आकारापेक्षें वेगळा हें सहज कळतें, जे लोक हिंदुस्थान देशांत राहतात, हे मूळ; आणि यांतून लोक जाउन हिंदुस्थानचें समुद्रांत जीं बेटें आहेत त्यांत वस्ती झाली असा तर्क होतो. त्यांची आकृति पातळ, केश लांब, सरळ, व काळे, आणि नाकें बहुतांचीं रोमनांसारिखीं असतात. असा उंची-मध्यें त्यांचा युरोपियन लोकांशीं सारिखेपणा असतो; परंतु रंगांत आणि शरीराचें स्थितींत फार अंतर असतें. हिंदुस्थानचे लोकांचा रंग तपकिरी असतो; आणि फार दक्षिणेकडेस अगदीं काळा असतो. बायका फार नाजूक असतात आणि

त्या वारंवार स्नानें करितात; त्यांचा रंग पुरुषांसारिखाच तपकिरी, त्यांचा पोटऱ्या आणि मांड्या लांब; आणि त्यांचीं शरीरें ठेंगू असतात; युरोप देशांतील बायकांप्रमाणें नसतात बायकांस मुलें लवकर होऊं लागतात. आणि तीस वर्षें होण्याचे पूर्वी बंद होतात; आणि त्या वयांत त्यांचे आंगावर सुरकुत्या पडून सगळीं म्हातारपणाचीं चिन्हें दिसूं लागतात. फार दिवसांपासून हिंदुस्थानचे लोकांचा भ्याडपणा आणि बायक्केपणा प्रसिद्ध झाला आहे; कारण कीं जा जा राजानें त्यांचे देशावर हल्ला केला, त्याचा त्याचा उद्योग सिद्धीस गेला. त्या हवेचे गरमीनें त्यांचा रीति तशा झाल्या आहेत. ते आळशी, परतंत्र होणारे आणि विषयी आहेत. ते विषय सुखानें संतुष्ट असतात. म्हणोन कोणत्येही धन्याचे आशेंत वागतात. त्यांमध्यें बहुत जाती जास जीव आहे तो पदार्थ खात नाहींत; अगदीं लहान प्राण्यासही मारायास ते भितात; आणि जीव जंतूचे पोषणाकरितां कारखानेही बांधले आहेत. एशियांतील लोकांचा पोषाक एक लांब लोंबत वस्त्र असतें. तो स्वस्थता आणि आळस यांचे उपयोगी; उद्योगास किंवा लढाईस योग्य नव्हे त्या लोकांचें शौर्य त्यांचे पोषाकाप्रमाणें, आणि अन्नाप्रमाणें झालें आहे तांदूळ खाणारे आणि बायकासारिखीं रेशमी वस्त्रें नेसणारे त्या लोकांचे शिपायांस युरोपियन फौजेचा हल्ला हटवायास सामर्थ्य होत नाहीं. आणि शिकंदर बादशाहापासून आज दिवस पर्यंत त्यांणी लढाई जिंकली असें एकही उदाहरण आढळणें कठिण सारांश त्यांस विषयी लोकांची एक अशक्त जाति असें म्हटलें तर होईल; त्यांचें चित्त कोणते सुखांत रमत नाहीं आणि ते शहाणे होण्यास फार आळस करितात. या लोकांचे जातींत इराणी, आरब, आणि हिंदुस्थानचे समुद्रांतील बेटांत जे लोक राहतात त्यांची गणना केली पाहिजे.

## * मनुष्य जातीचे भेद ( २ )

[ शुक्रवार ता. ३१ माहे आगष्ट सन १८३२ ]

अमेरिका खंडांतील लोकांची जाति पांचवी. जशी त्यांची वस्ती इतर सर्व मनुष्यांहून वेगळी, तसा त्यांचा रंगही सर्वां पेक्षे वेगळा. अमेरिकेंतील लोक ( उत्तरेचे शेवटाकडचे मात्र लापलांड देशातील लोकांसारखे आहेत ते खेरीज करून बाकीचे ) तांबडे किंवा तांब्या सारिखे आहेत, ते पृथ्वीचे बाकीचे तीन खंडांत वेगवेगळे हवे पासून स्वरूपें आणि चाली यांत भेद पडतो: परंतु अमेरिकेंतील सर्व ठिकाणचे लोक बहुधा सर्व प्रकारें एकमेकां सारिखे आहेत त्या सर्वांचा रंग फार करून एकच आहे. त्या सर्वांचे केश काळे जाड सरळ असतात, आणि पातळ काळी दाढी असल्ये ते दाढीचे केस मुळासकट उपटून टाकितात. फार करून त्यांचीं नाकें चपटीं, गालांचीं हाडे ऊंच आणि डोळे लहान असतात. आणि हा स्वभाविक कुरूपपणा अधिक वाढविण्याविषयीं यत्न करितात ते असें कीं, मुलांची हाडे लहानपणीं जशी केलीं तशीं होतात, त्या वेळेस ते त्यांचे नाक चपटें करितात; आणि बहुत करून सर्व डोकेंही तसेंच करितात. ते शरीर आणि तोंड अनेक प्रकारचीं रंगवितात; आणि डोक्या वाचून दुसरे सर्व ठिकाणीं केश असल्यास तो कुरुपपणा असें मानून ते काढून टाकितात. त्यांचे शरीराचे अवयव बहुधा युरोपिन लोकांपेक्षें किर्कोळ असतात; आणि ते त्या सारिखे बळकटही असत नाहींत. असें मला खचित ठाऊक आहे. हे सर्व अज्ञान लोक भ्याड आहेत. ते कधीं शत्रूशीं समोर लढाई करीत नाहींत. परंतु त्यांजवर येऊन अकस्मात् पडून काम साधितात; आणि त्यांस भय फार, म्हणोनच ते लोकांवर क्रूरपणा फार करितात, असा तर्क होतो. त्यांस नेहेमीं पदार्थांचा तोटा असतो म्हणोन विपत्तींत त्यांची सहनशीलता चमत्कारिक दिसल्ये; दुःखाचा त्यांस अभ्यास असतो म्हणोन त्यांस त्याचे फार भय वाटत नाहीं; म्हणोन त्यांचे सोशिकपणास कारण धीर नव्हे, परंतु अभ्यास होय. त्या सर्वांचा स्वर गंभीर असतो; ते विचार करीत नाहींत; आणि शत्रूजवळ फार क्रूर जरी असले, तरी परस्परांवर फार मायाळू

आणि खरं असतात. सारांश अज्ञान लोकांचा चाली सर्व देशांत बहुतकरून सारिख्या असतात; रानांत स्वतंत्ररीतीनें आणि जसें चालेल तसें आयुष्य घालविण्यापासून गुण दुर्गुण एके विलक्षण रीतीचे उत्पन्न होतात. पृथ्वीवरील सर्व अज्ञान लोकांत जसी सोशीकपणा, उदारता, आळस, लोभ, तृप्ति आणि निष्कृत्रिम हीं आहेत तशींच अमेरिकेचे लोकांत आहेत.

---

## मनुष्य जातींचे भेद (४)

[ ता. ७ सप्टेंबर सन १८३९ ]

मनुष्य जातीचा साहावा आणि शेवटचा भेद युरोपीयन लोक व त्यांचे जवळचे देशांतील लोक यांमध्यें आहे. या विभागांत जार्जिया, सर्काशिया मिंगेल, एशिया मैनर, आफ्रिका देशाचा उत्तरेकडील प्रांत, आणि कास्पियन समुद्राचे नैर्ऋत्य दिशेस जे देश आहेत, त्यांतील राहाणारे लोकांची गणना केल्यास चिंता नाहीं. यावर सांगीतलेले लोकांत परस्परांमध्यें भेद फार असतो, परंतु शरीरांचा रंग, रुपाचा सुंदरपणा, अवयवांचा मोठेपणा, आणि बुद्धीची चपळता, हीं त्या सर्वांमध्यें फार करून सारिखीं असतात. जा विद्या मनुष्यांचे दुसरे जातीमध्यें उत्पन्न झाल्या असतील, त्या एथें पूर्णतेस आल्या. अज्ञान देशांमध्यें लोक केवळ नागवे असतात, किंवा लोकर किंवा पिसें हीं विशोभित रीतीनें नेसतात; अर्ध शाहाणे मुलखांत पोषाख लांब आणि लोंबत असतो; परंतु एथें पोषाख दाखवायासाठीं करीत नाहींत, उद्योगासाठीं करितात; आणि शोभा व उद्योग या दोहोंचे उपयोगी पडण्या जोगा तो असतो.

सर्व देशचे लोकांची गणना यावर सांगीतलेले जातींतून कोणते तरी एकींत करावी; आणि प्रतिदेशाचे लोकांमध्यें परदेशचे लोकांचें येणें किंवा व्यापार हीं जसजसीं थोडीं असतात, तसतसी त्यांचीं शरीरें आणि त्यांच्या

रीतींही वर सांगीतलेल्या जातींतून कोणत्ये तरी एके जातीशीं फार सारिखीं असतात. परंतु जा ठिकाणीं फार दिवस व्यापार चालला आहे, किंवा जेथें शत्रूंनीं फार हल्ले केले आहेत. तेथें लोकांच्या जाती मिश्रित झालेल्या आहेत; त्यांचा आणि कोणत्ये एके जातीचा अगदीं सारिखेपणा नाहीं असें असत नाहीं. म्हणोन हिंदुस्थान समुद्रांतील बेटांत फार दिवसांपासून व्यापार चालला आहे, तेथील राहणारे पृथ्वीवरील सर्व लोक मिश्रित होऊन झालेले आहेत; एकेच शहरांत, पांढरे, तिरिंगी, तपकिरी, आणि काळे रंगाचे लोक राहतात असें दिसूं येतें; आणि त्यांपासून एक मिश्र संतति उत्पन्न होत्ये; तिची गणना शास्त्रज्ञांनीं मनुष्य मात्राचे जे विभाग केले आहेत, त्यांतून कोणत्या एकामध्यें होत नाहीं.

---

## * मनुष्य जातीचे भेद (५)

[ ता. १४ सप्तेंबर १८३२ ]

मनुष्य मात्रांचे जे भिन्न भिन्न रंग आहेत त्यांत आमचा (युरोपियन लोकांचा) रंग नेत्रांस फार सुंदर दिसतो व त्यापासून फार स्वार्थ आहेत. गोरा रंग जीवाचें पारदर्शी पांघरूणच काय असा दिसतो; मनाचे सर्व विकार, आणि संतोष किंवा दुःख यांची खुण गालांवर उमटत्ये; आणि बोलण्यावाचून मन कळतें. तसेंच शरीर प्रकृति फार थोडी जरी बदलली, तरी ती युरोपियन लोकांचे तोंडाचा रंगावरून बरोबर कळत्ये; आणि जे विकार दृष्टी पडूं लागले नाहींत, ते पूर्वींच बंद करितां येतात. आफ्रिका खंडांतील लोकांचा काळा रंग, आणि एशियांतील लोकांचा तपकिरी रंग हेही बदलतात. परंतु जसा आमचा (युरोपियन लोकांचा) रंग स्पष्ट व दिसण्या जोंगा बदलतो, तसे ते बदलत नाहींत. कित्येक देशांत मुखाचा रंग कधीं बदललेला दिसत नाहीं. आणि लज्जा, राग, क्रोध, आणि दुःख यांमध्यें चेहरा एक सारिखाच असतो.

म्हणोन मनुष्यास जो रंग फार शोभतो, तो त्याचा मुळचा असावा. असें दृष्टीस येतें कीं, सर्व देशांत मुलें उत्पन्न होतात तेव्हां गोरी किंवा तांबडीं असतात. आणि तीं जशीं जशीं वयानें वाढतात तसतशीं काळीं किंवा पिंवळट होत जातात. यावरून असें वाटतें कीं, मनुष्याचा मुळचा रंग पांढरा; कां कीं लाहान मुलांचा रंग जाकारणानीं काळा होतो, त्या कारणानींच देशांतील सर्व लोकांचा रंग हळूहळू काळा झाला असेल असें संभवतें.

---

## *'असावें तें नाहीं, आणि नसावें तें आहे'

[**असल पत्रें** तारीख १७ फेब्रवारी सन १८३२]

संसारामध्यें मनुष्यास शाहाणपण असावें, तें अनेक देशांच्या चाली, लोकांचे ते ते व्यवहार व त्या त्या व्यवहारांपासून झालेलीं फळें; जांस लोकांमध्यें प्रतिष्ठा करितात त्यांच्या संभाषणादिकाचा पद्धति; आणि दृष्टांतादिक सांगून सविस्तर गुण दुर्गुणाचे परिणाम जांमध्यें प्रतिपादिले आहेत अशा ग्रंथाचा अभ्यास; इत्यादिकांकडे सर्व काळ आपलें लक्ष्य देणें या साधनानें येतें. यद्यपि हा गुण आंगचा असतो, म्हणोन जामध्यें तो नसतो त्यांची तीं साधनें तसें फळ देंत नाहींत हें खरें, तथापि जो चांगला गुण असतो तोच साधनानें वाढतो.

ज्यास आंगचा चातुर्य गुण आहे तो जर वर लिहिल्या साधनें करून त्यास न वाढवितां राहील, तर त्याच्या शहाणपणाचा परिणाम वाईट होईल, मग जा पासून वाईट निपजतें तें शहाणपण कसचें ? लोकांमध्यें लबाड म्हणोन जास म्हणतात त्याच्या आंचरणाकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां त्यांत त्याचें शहाणपण दृष्टीस येतें, परंतु त्याणें उत्तम साधनाचा अनभ्यास, आणि वाईट साधनाचा अभ्यास केल्यामुळें जा भागाकडे लावावें तिकडे नाहीं, आणि टांकायाचा भागाकडे लावावें असा त्यास अभ्यास पडला असतो.

हिंदु लोकांमध्यें बहुत करून विपरीत झालें आहे; ग्रात्व भागाकडे

चातुर्याची अवृद्धि, आणि त्याज्य भागाकडे वृद्धि, याचीं कारणें अनेक सांगतात. कोणी म्हणतात कीं, हा समयाचा महिमा, कां किं प्राचीन काळीं असें नव्हतें, आणि या काळींच असें आहे. कोणी म्हणतात किं लोक भिकेस लागले म्हणोन कोणी कसें तरी करून दिवस काढितो. दुसरे सांगतात, लोकांमध्यें मर्यादा म्हणोन जा होत्या त्या बुडाल्या म्हणोन हें असें झालें. अशीं कारणें लोक बहुत सांगत असतात; परंतु मला वाटतें किं, हें कांहीं नव्हे यास एक राजाच कारण होय.

राजा प्रजांस जा रीती लावीन म्हणेल त्या रीति लावुं शकतो, म्हणोन त्याचे इछेमुळें किंवा अनास्थे मुळेंच प्रजांमध्यें रीति वाईट पडतात. हिंदु राज्याचा संप्रदाय असा आहे कीं राज्य संबंधी कामें ग्रहस्थांस सांगतात, त्या ग्रहस्थामध्यें बहुधा मोडीची लिपी, जमा खर्चाचा हिसाब कोणास कागद कसा लिहावा ते माने, यांचें मात्र सामान्यतः ज्ञान असतें, परंतु धनीं जें म्हणेल तें हां म्हणावें याचें मात्र पुरतेपणीं कसब असतें. ते लोकांस कामाचा नाद लावून आणि सरकार कामाची खराबी करून आपलें हित साधितात.

विद्वान कोकहि बहुधा इहलोकीं काम काजें करायास अनुप योगी, आणि परलोक साधन म्हणावें तर केवळ तशी पुण्यकारक नव्हत अशा शास्त्रांचा अभ्यासामध्यें आयुष्यें नेतात. शास्त्रांचे उपयोगी जे मूळग्रंथ ते एकीकडेच राहिले, आणि केवळ वादाचाच उपयोगी असे ग्रंथ आहेत त्याकडेसच सर्वांनीं श्रम करावे असा प्रवाह पडला आहे. त्या श्रमाचे फळ हें कीं, दुसऱ्या विद्वाना संगती शुष्क वादविवाद करून त्यास जिंकावें; आणि त्यांत ज्याचें जसें वक्तृत्व असेल तसें त्याणें खऱ्याचें खोटें, आणि खोट्याचें खरें करावें; असें करील तरच तो मोठा विद्वान म्हणोन मोजिला जातो; आणि राजे त्याचा स्वरूपाप्रमाणें सत्कार करितात. असे होत होत आलिकडे हें काम फारच शिखरास पोचलें आहे, तें इतकें कीं शास्त्र्यांनी सभेत बसून एकामेकांस लौककि दुरुत्तरें ही बोलावीं आणि तीं जो पुष्कळ बोलेल त्याची लोकांनीं वाव्हा करावी.

विद्वान व्हायास शास्त्रें पढूं नयेत असें माझें म्हणणें नव्हे; परंतु पुरातन जे मूळग्रंथ आहेत त्यांचा अभ्यासानें त्या शास्त्रांचें ज्ञान होत असतां, केवळ वाद ग्रंथांत श्रम करावें तें, आणि त्यांपासून जें फळ सभा जिंकणे, याचा उपयोग काय ? या गोष्टीचा जर चांगले पणीं पक्षपात सोडून विचार केला, तर जसें हत्ती किंवा जेठी यांची लढाई लावून दोन घडींची मौज पाहात बसावें, तशीच ही वादाची मौज, यांत इहलोकीं विशेष उपयोग, किंवा परलोकीं तरी, हें कांहीं दृष्टीस पडत नाहीं.

जा राजानीं अशा चाली पाडिल्या होत्या ते राजे गेले, परंतु त्यांचा चाली मात्र आजून राहिल्या आहेत. आतां तर त्यांचा कांहींच उपयोग नाहीं; म्हणोन सांप्रतचे राजानीं इह लोकोप योगी कळा कौशल्य विद्यांची वृद्धी होण्याचे मार्ग चालविलेच आहेत त्यांचा अभ्यासाकडे लोकांनीं झटावें हें बरें. परलोक साधना साठीं तर जाचा धर्म त्याला आहे तो त्याणें पाहावा.

माघ शुद्ध ८ सत्य शोधक

---

## * विद्वान आणि मूर्ख, या दोहोंमध्यें अंतर

[ तारीख २ माहे मार्च सन १८३२ ]

विद्वान आणि मूर्ख, या दोहोंमध्यें अंतर, प्रकाश, अंधकार, सत्य, असत्य, मनुष्याची बुद्धि आणि पशूंचें ज्ञान यांमध्यें जितकें आहे तितकेंच आहे. मूर्ख आपले आयुष्याचा एकरूप प्रवाहें करून संतुष्ट असतो; तो आपले सभोंवते सृष्टींतील पदार्थ असतात तितके मात्र पाहातो; त्याचा इच्छा संसारांतील अवश्य पदार्थांचे बाहेर जात नाहींत, आणि त्यास आपला देश व आपण जांमध्यें राहातों ते लोक यांचें मात्र ज्ञान असतें. इकडे

मनुष्याचानें जितके श्रम होतात तितके करून विद्वान ईश्वराचे कृत्यांचे गुप्तांचा शोध करायास यत्न करतो; अंतरिक्षांतील जडांचा गति जा नियमां-प्रमाणें चालतात ते नियम शोधून काढितो; विचार करून आणि अनुभव घेऊन तो सभोंवताले सृष्टींतील पदार्थांचीं कारणें आणि गुण समजतो, ते समजले म्हणजे तो आपलें ज्ञान मनुष्याचें कल्याण करण्याचे उपयोगास लावितो, आणि सृष्टींतील मूळभूतें ही त्या कामांत आणितो. आमचे गेले कागदांत कागदांत वाफयंत्राचा वृत्तांत लिहिला होता त्या वरून या गोष्टी आमचे मनांत आल्या. तो वृत्तांत नण्यानेंच जा आमचे लोकांनीं पाहिला असेल त्यांस बहुत आश्चर्य झालें असेल. तसेंच ऊन पाण्यासारिखे लहान कारणापासून वाफयत्रांत इतकी शक्ति येत्ये हें पाहून चमत्कार वाटायास राहिला नसेल. परंतु जा अनेक युक्तीनी ती शक्ति उपयोगी कामाकडे लावितां येत्ये त्या युक्ति जर त्यांस कळल्या तर त्यांस केवढें मोटें आश्चर्य होईल बरें, त्यांचीं मनें आश्चर्यांत निमग्न होतील आणि अशी कामें जाणी शोधून काढली त्या पश्चिम देशाचे लोकांचे बुद्धीत, व जांस ती उघडून सांगीतली असतां समजायसाही कठीण पडतात त्या पूर्वेकडील लोकांचे बुद्धींत इतकें अंतर आहे, कारण काय हें त्यांस न जमजून ते रासेला राजानें जसें म्हटलें, तसें कदाचित् म्हणतील " यांचें ज्ञान आमचे पेक्षें अधिक याचें कारण काय तें मला समजत नाहीं; परंतु अज्ञेयईश्वराची इच्छा." परंतु त्याणी स्मरणांत ठेवावें कीं विद्या कोणते एके देशांतच असत्ये असें नाहीं, आणि मनुष्य तेथून सर्वत्र सारिखेच बखरे वरून त्यांस कळेल कीं विलायतेंतील लोक हजार वर्षांचे आलिकडेच आतां जितके एथील लोक कळा कौशल्यांत माहितगार आहेत, त्यांपेक्षें कमी होते.

जें सरकार विद्येचे वृधीस आश्रय देतें आणि प्रजांत उपयोगी ज्ञानाचा प्रसार होण्यास उमेद देतें, तेथे मनास विद्येचा संस्कार करण्यास लोकांस विशेष उत्साह होतो, आणि जुलुमगारांचे अंमला पेक्षें तशे राज्यांत हे उद्योग अधिक सफळ होतात. अशे उद्योगांपासून विद्या सुरूपास येत्ये, आणि लोकांचा ज्ञान संग्रह वाढतो एके पिढीचे लोक नवे शोध करितात, त्यांपासून दुसरे शोध

पुढली पिढी करित्ये. यारीतीनें विद्या आणि कळा वाढतातत आणि ज्ञानाचा लवकर प्रसार होतो. परंतु आपलीं मनें चांगले मार्गास लावणें हें जितकें लोकांचे स्वाधीन आहे तितकें राजाचे नाहीं, हें आमचे लोकांनीं ध्यानांत धरावें; आणि हें दुसरें लक्ष्यांत ठेवावें कीं जांस विश्वास संपादन करायाचा आहे, त्याणीं जर आपले मनांतील द्वेषबुद्धि वालविली न'ही तर त्यांचा उद्योग फुकट जाईल.

असें होईपर्यंत युरोपियन लोकांनीं कळांमध्यें व सृष्टि संबंधि विद्यांमध्यें जे नवे शोध केले आहेत त्यांचें त्यांस चांगलेपणीं ज्ञान व्हायाचें नाहीं. जरी त्या चांगल्या आहेत असी थोडासा विचार केला असतां त्यांची खातर होईल, तरी पुष्कळ असे आहेत कीं ते सर्व नव्या गोष्टींचा तिरस्कार करितात; बहुत लोक चांगले जांचेपरिणाम असे फेरफारांवर ही दोष ठेवितात; कारण कीं ते आळशी असतात. आणि मुळापासून आपण व आपले पूर्वी वडील जसें करीत व मानीत आले आहेत तसें करण्याची त्यांस मोठी आवड असत्ये. तेव्हां अशा कल्पना मनांतून काढून टांकाव्या तेव्हा मन सत्य ग्रहण करण्यास योग्य होतें. जें सत्य सर्व ज्ञानाचें मूळ आहे जसें ज्ञान सर्व शक्तीचें आहे. तेव्हां शोध व विचार यांपासून उपयोगि फळें होतात; वस्तु आपापले वास्तविकरूपानें दिसतात, त्यांचे गुण समजतात; प्रतिदिवस आणि प्रतिघटका नवें ज्ञान कांहींतरी माहीतगारी करून देत्ये, आणि ती पासून नवीं सुखें आणि शुद्ध आनंद प्राप्त होतात.

---

## गुडगुडी ओढणें.

[ तारीख २ माहे मार्च सन १२३२ ]

जर शुद्ध आणि प्रौढ अभिरूचीचा पुरूष सकाळीं सहा वाजतां हिंदुलोकांचे निजून उठायाचे वेळेस कलकत्याचे गल्यांतून जाऊं लागला, तर

सर्व लोक मोठ्या आनंदानें हुक्का ओढीत आहेत असें त्याचे दृष्टीस पडेल. लोक या अभ्यासाचे इतके स्वाधीन झाले आहेत कीं, मनास सुख करणाऱ्या जा गोष्टी आहेत त्यासर्वांत ही त्यांस उत्कृष्ट वाटत्ये; आणि जवळ जोकोणी येईल त्यास तें आपले सारिखेंकरण्याचा उपदेश करितात; तो लहान मुलगा असला तरी सोडीत नाहीं. जर त्यांना मंडळींत येउन कोणी गुडगुडी ओढली नाहीं, तर ते त्याची निंदा करितात, आणि म्हणतात कीं हा आमचामध्यें बसायास योग्य नव्हे. लोक आपला अमूल्य काळ अशे निरूपयोगी आणि व्यर्थ उद्योगांत घालवितात, आणि त्या घाणेरडेपदार्थांपासून शरीरांत माद आणितात, कीं जणें करून कांहीं वेळपर्यंत त्यांचानें कांहीं उद्योग करवत नाहीं, अशा गोष्टी पेक्षेंबुध्दीस आधिक वाईट वाटाया जोगें दुसरें काय आहे? चारपांचें वर्षांचे धाकटे मुलांस ही हीसवय सुटत नाहीं; तीं आपल्या मंडळ्या करितात, तेथे हा अभ्यास चालिवतात, आणि त्यामुळें त्यांस दुसऱ्या चांगल्या गोष्टी साध्य करण्याची योग्यता राहात नाहीं. हिंदुलोकांचे एके कुटुंबांत गुडगुडी ओढीत नाहीं असाम्हतारा पुरूष एक मिळाला तर मोठें आश्चर्य. गुडगुडी ओढणारे पुरूषांचे तोंडाची फार वाईट दुर्गंधियत्ये, आणि ही वाईट चाल सोडणें मनुष्यास केवळ अशक्य नाहीं, त्या पेक्षें पौढपणा येण्याचे पूर्वींच मुलांनीं गुडगुडी ओढण्याचेसर्व प्रकार सोडून देण्याविषयीं यत्न करावा, कारण कीं लहान पणीं जो वेळ उपयोगी कामाकडे आणि पुढील शाश्वत सुखेंसंपादन करण्यांत लावायाचा, तो याकामांत फुकट जातो.

# सामाजिक

( मानव शास्त्र )

# जातिभेदाचा प्रश्न

[ **असल पत्रें** तारीख १६ माहे मार्च सन १९३२ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस,

विनंती विशेष क्रिस्तियन आणि कलकत्यांतील कितेक नवे हिंदु लोक यांचे मत आहे कीं वास्तवीक, शास्त्राप्रमाणें मनुष्यांमध्यें जातीचा आणि धर्मांचे रीतींचा भेद नसावा; म्हणोन मी विनंती करितों कीं तुमचा पत्राचे द्वारें त्यांस हे पुढील दोन प्रश्न पुसायाची आज्ञा मला असावीं. माझी इच्छा आहे कीं त्या लोकांतून कोणीतरी या प्रश्नाचीं तुमचे वाचणारांची खातर व्हावयाजागीं देतील.

इंग्रेजीमध्यें "क्यास्त" प्राकृतामध्यें "जात" संस्कृतामध्यें "ज्ञात" आणि मला वाटतें कीं पृथ्वींतील साऱ्या भाषांत असे या अर्थांचे वाचक शब्द आहेत हे कां उत्पन्न झाले, जर क्रिस्तियन आणि नवीन मताचे हिंदू यांचे म्हणण्या प्रमाणें त्या शब्दाचा वाच्य पदार्थच कोठे नाहीं ?

पशु, पक्षी, झाडें, वेली, मृत्तिका, आणि विश्वांत जितके पदार्थ आहेत तितक्यांत जेव्हां जाती आहेत तेव्हां मनुष्यांतच कां नसाव्या ?

मुंबई तारीख १२ मार्च सन १८३२ **ई. न. र.**

---

# मनुष्याची जात

[ **असल पत्रें** तारीख ३० माहे मार्च सत १८३२ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस,

या महिन्याचे १६ वे तारिखेचा तुमचा कागद पाहातां माझे दृष्टीस पडलेंकीं तुमचे पत्र लिहिणारांतून कोणी एकानें जाती विषयीं विचार करायास

आरंभकेला आहे; आणि तो स्क्रिस्तियन किंवा कोणी नवे मताचा हिंदु या पासून जाणायास इच्छितो कीं, जर सृष्टींत जाति हा पदार्थच नाहीं, तर सर्व भाषांत त्या अर्थांचा वाचक शद्ब कां असावा; आणिपशुपक्षी इत्यादिकांत जाती असतां मनुष्यांतच कां नसाव्या ?

या दोन प्रश्नांतून पहिला प्रश्न केवळ अप्रयोजक आहे आणि इंग्रेजी भाषेचा शुद्ध अज्ञानामुळें तो केला आहे. "क्यास्त" हा शद्ब इंग्रेजी शद्ब नव्हे. पोर्टुगी ( फिरंगी ) भाषेंपासून घेतलेला आहे. तो आणि त्या भाषेंतील "क्यास्ता" हे दोनहिएकच. तो फिरंगी भाषेंत कोणत्यातरी या देशंचे भाषांतून बहुधा आला असेल. युरोपियन भाषांतून कोणत्या भाषेंत संस्कृत ज्ञात या अर्थांचा शद्बच नाहीं. जेव्हां हिंदुस्थानांतील याविषयींचा गोष्टी लिहाव्या लागतात तेव्हां फिरंगी शद्ब क्यास्ता हा नेहमी घेतात. लाटिन भाषेंमध्यें "स्पीसीस" असा शद्ब आहे आणि तो पहिल्यानें पाहिला असतां "क्यास्त" या शद्बाचे अर्थाचाच दिसतो खरा; आअि जर तुमचा पत्र लिहिणाराचे मनांत या शब्दाचें शुद्ध लक्षण करून वाद चालविण्याचें असलें तर आम्ही त्यांस पुढें लवकरच सिद्ध करून दाखवूं कीं मनुष्यांत ज तीच भेद नाहीं.

दुसरा प्रश्न त्याचा असा कीं, पशुपक्षि इत्यादिकांत जाती आहेत तेव्हां मनुष्यांत कां नसाव्या ? या विषयीं आम्ही म्हणतो कीं ईश्वराची इच्छाच अशी. तुमचा पत्र लिहिणारानें पाहावें कीं जातीचा विभागास कोठेतरी समापतीचें स्थळ पाहिजे-जसें त्याणें मला विचारिलें कीं मनुष्यांत कां जाती नसाव्या, तसें मी त्यास विचारितों कीं म्हशी गाढव यांत कां नसाव्या.

परंतु प्रस्तुत विचाराविषयीं लिहितों. सृष्टि विज्ञानी याणीं जातीचा मूळ भेद समजण्याकरितां लक्षण केलें आहे कीं, जांची जाती मुळची भिन्न, त्या पशूंना परस्पर योग होऊन जी संतति होत्ये तीपासून पुढें जातीची वृद्धि होत नाहीं, त्या नव्या जातीचीं जनावरें असतात तीं मेलीं म्हणजे ती संपली. या गोष्टीचें प्रसिद्ध उदाहरण खेचरावरून कळतें. त्यापासून पुढें जातीची

वृद्धि होत नाहीं, परंतु तें घोडें आणि गाढव यांपासून झालेले असतें आता मनुष्यांचा जा जाति म्हणतात त्यांमध्यें असी गोष्ट नाही. ब्राह्मण जाई हे ब्राह्मण आणि शुद्र यांपासून उत्पन्न झालेले असतात; परंतु इतर माणसासारिखींच त्यांचीं लग्नें होतात, आणि त्यांपासून पुढें वृद्धि होते. असेंच युरोपिअन आणि एशिया देशचे लोक, युरोपिअन आणि अमेरिका देशचे लोक, एशिआ आणि आफ्रिका या दोन देशचे लोक यांपासून जा मिश्र जाती होतात त्यांचें हि होतें-असा विचार केल्यावरून शास्त्ररीतीनें सिद्धांत होतो कीं मनुष्याची जाती एकच आणि सगळीं मनुष्यें मुळी एका बीजापासून उत्पन्न झाली.

तारीख २० मार्च मुकाम पुणें. **एक मनुष्य**

---

## जनावरांतील जाती

[ तारीख ३० माहे मार्च सन १८३२ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस,

तुमचा कागद सर्व स्थितींचे आणि सर्व मताचे लोकांची उत्तरप्रत्युत्तरें होण्याचें द्वार आहे. आणि त्यांत कलकत्त्याचे "इन्कूयरर" पत्रासारिखे सर्व धर्मसंबंधि आणि नीतिसंबंधि प्रश्नाचा विचार पुरतेपणीं होतो; याकरितां तुमचा १६ वे तारिखेचे कागदांतील ई. न. र. याचें पत्रांचे उत्तर देण्यास मला मोठा संतोस झाला आहे. ई. न. र. याणें हिंदु संबंधि जातीचा पक्ष धरिला आहे. तुमचा कागदाचा करणारा हिंदु आहे परंतु तो सत्याचा शोध करितो म्हणोन दोनही पक्ष-ऐकायास तो नाहीं म्हणणार नाहीं, असें मला निःसंशय वाटतें. ई. न. र. याचें म्हणणें कीं इंग्रेजींत "क्यास्त" प्राकृतात "जात" संस्कृतांत "ज्ञात" हे शब्द व्यवहारांत कां असावे, आणि, जर जात ही

चांगली नाहीं तर ती सर्व प्राण्यांमध्यें आणि निर्जीव पदार्थांमध्यें कां दिसत्ये ? यांचे उत्तर देण्यासाठीं मी प्रश्न करितों कीं जांस नांवें आहेत ते सर्व पदार्थ असले पाहिजेतच कीं काय ? जांस नांव आहे त्या सर्व गोष्टी चांगल्या आहेत कीं काय ? बरें असें आहे काय तें पाहूं. इंग्रेजींत "हेल" व प्राकृत आणि संस्कृत यांत नरक, पाताळ, आणि दुसऱ्या भाषांत या अर्थांचे दुसरे शब्द आहेत म्हणून ई. न. र. नरक चांगला असा पक्ष धरील कीं काय ! हा दृष्टांत दिला याणें जाती इच्छिणारे लोकांस वाईट वाटावें असें माझें मनांत नाहीं; परंतु अशी मजबुद गोष्ट सांगून, मी ई. न. र. यांची प्रथमची गोष्ट कशी वाद करण्यास योग्य नव्हे हें त्यांस दाखविणार. आतां दुसरा भाग. त्याचे म्हणण्याचा अर्थ असा कीं सर्व प्राण्यांत आणि निर्जीव पदार्थांत जाति दिसतात, असें परमेश्वरानें जें उघड निर्मिलें आहे तें तुम्ही नाहीं असें करितां कीं काय ? अशे त्याचें म्हणण्यावर प्रश्न करून उत्तर देतो कीं हिंदुचा देश हिंदुस्थान याचे बाहेर जात कोठें आढळत्ये कीं काय, आणि तेथेही हिंदूंचे बाहेर ती आहे कीं काय ? "क्यास्त" या शब्दाचा प्रयोग धर्म संबंधावाचून इतर ठिकाणी होतो असें जर ई. न. र. यांचे मनांत असलें, तर त्या शब्दाचा वास्तवीक अर्थ त्यास समजला नाहीं. साधारण भाषणांत एथील इंग्रेज लोक चांगले जातीचा घोडा असे म्हणतात, पण त्याचा अर्थ काय असतो ? घोडा गायत्री म्हणतो, किंवा षट् कर्में करितो असें त्यांचें मनांत असतें कीं काय ? नाहीं; परंतु चांगले प्रकारचा घोडा असा त्याचा भाव असतो. जर चांगले जातीचा घोडा असें कोणी विलायतेंत म्हटलें, तर हिंदुस्थानचे शब्द जांस माहीत आहेत त्या वांचून कोणास समजणार नाहीं. जात हा शब्द सर्व हिंदुस्थानी भाषांत आहे; कारण कीं ही चाल हिंदुस्थानांतच मात्र आहे. त्या अर्थाचा शब्द दुसरे कोणत्ये देशांत सांपडेल असें मला वाटत नाहीं. जात जनावरांत आहे या गोष्टीचें कांहीं प्रमाण ऐकल्यावांचून मी ती खरी म्हणणार नाहीं. एक कोंबडा दुसऱ्याशीं खात नाहीं असें मी कधीं पाहिलें नाहीं. किंवा जा भांड्यांतील पाणी कोंकणातील कुत्रा प्याला आहे त्यांत देशांतील कुत्रे पीत

नाहीं असें ही पाहिलें नाहीं. ब्राह्मणाच्या गाईही विलायतेहून आणिलेले म्लेंछ गाई बरोबर एकेच जाग्यांत खातात; आणि त्या अशा बाटल्या म्हणोन दुसऱ्या गाई त्यांची सोबत सोडीत नाहीं. म्हणोन मी इछितों कीं माझा स्नेही इ. न. र. याणें जनावरांत जाति आहेत या विषयीं कांहीं प्रमाण दाखवावें. तंव पर्यंत मी त्याचा आणि तुमचा आज्ञा धारक सेवक आहे.

आवि दीस.

---

## जनावरांच्या जाती व मनुष्यांतील जाती

[ तारीख ३० माहे मार्च सन १८३२ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस

तुमचा गेले कागदांत ई. न. र. अशी सही केलेलें पत्र होतें ते मी वाचलें, आणि त्याचे उत्तर आतां द्यायास बसलों आहे, परंतु उत्तर लिहिण्याचे पूर्वी मला बोलण्यास आज्ञा असावी कीं अशीं पत्रें तुमचे कागदांत छापल्यानें तुमचे लोकांचें फार बरें होईल. त्यांणें करून जा अनेक मतांची त्यांस माहितगारी आहे त्यांचे खरेपणाचा ते शोध करितील; आणि खोटें दिसेल तें टाकून खरें असेल तें घेतील

तुमचा पत्र लिहिणाराचा भाव असा दिसतो कीं क्रिस्तियन आणि कलकत्यांतील कित्येक नवे लोक जाति भेद नसावा असें म्हणतात हें खोटें; आणि त्यांचें म्हणणें खोटें असें दाखवायाकरितां त्याणें दोन प्रश्न विचारिलें आहेत.

त्याचे प्रथमचे प्रश्नांतील अर्थ हाकीं "क्यास्त" इत्यादि शब्द व्यवहारांत आहेत यावरून सिद्ध होतें कीं जाति भेद आहे. परंतु जातिभेद आहे ही गोष्ट सिद्ध करण्याविषयीं इतके श्रम करण्याचें त्यास अगदीं प्रयोजन

नव्हतें; कारण जातिभेद आहे ही प्रसिद्ध गोष्ट जांस हिंदुस्थानचे लोकांची कांहीं माहितगारी आहे, त्या सर्वांस ठाऊक आहे. या गोष्टीपासून जातिभेदाचे वाईट बरेपणा विषयी कांहींच सिद्ध होत नाहीं; म्हणोन तुमचे पत्र लिहिणारास इचा कांहीं उपयोग नाहीं.

दुसऱ्या प्रश्नांतील वादाचें तात्पर्य हें कीं जनावरांचा वेगवेगळ्या जाति आहेत. झाडांचा अनेक तऱ्हा आहेत, आणि मातीचे बहुत प्रकार आहेत, म्हणोन मनुष्याचा भिन्न भिन्न जाति असाव्या. आतां जर तुमचे पत्र लिहिणारानें दाखविलें असतें कीं हिंदूंचा जाति, आणि जनावरें झाडें व मृत्तिका यांचा जाति, या एकच प्रकारचा आहेत, तर त्याचे बोलण्यास कांहीं वजन आलें असतें. परंतु असा सारिखेपणा त्यांमध्यें कांहीं नाहीं, कारण जर सारिखेपणा असता, तर जनावरांचा जाती सारिख्या मनुष्यांचाही जाति शाश्वत असत्या; आणि कांहीं कारणामुळें त्यांचा बदल न होता घोडा घोडाच राहतो, आणि हत्ती हत्तीच राहातो, आणि ते जीवंत आहेत तंव पर्यंत ते दुसरे कोणी व्हायाचे नाहीं. परंतु मनुष्यांचा जाति अशा नव्हत. ब्राह्मण ब्राह्मण नव्हे असा होतो, आणि त्याचे मागें त्यांची मुलें ब्राह्मण असत नाहीं. जरी तो जातीतून भ्रष्ट होण्याचे पूर्वी जसा होता तसाच असतो, आणि तो ब्राह्मण असताना जशी मुलें झाली असती तशीच असतात, तरी त्याची जाति बदलत्ये. यावरून स्पष्ट दिसतें कीं तुमचे पत्र लिहिणारानें मनुष्यांचा जाती आणि जनावरांचा जाति सारिख्या आहेत असें जें लिहिलें त्यामध्यें कांहीं सारिखेपणा नाहीं; या करितां जनावरांचा जाति सृष्टि स्वभावापासून उत्पन्न झाल्या, या वरून मनुष्यांचाही तशाच झाल्या असें म्हणतां येत नाहीं.

या रीतीनें मला वाटते मी दाखविलें कीं जाति चांगल्या याविषयींचा तुमचे पत्र लिहिणार चे युक्तीपासून कांहीं सिद्ध होत नाहीं परंतु जाति चांगल्या हें दाखविणें इतकेंच तुमचे पत्र लिहिणाराचें लक्ष्य दिसत नाहीं, धर्मांचा रीतींतभेद ही स्थापावा असें त्याचे मनांतून दिसतें. जरी त्याणें या विषयीं कांहीं युक्ति लिहिली नाहीं, तथापि क्रिस्तियन लोक जे धर्मांचे भेद मानीत

नाहीं, ते वास्तवीक मताप्रमाणें खरे आहेत, असें जें तुमचे पत्र लिहिणाराचें म्हणणें तें खोटें आहे हें दाखवावयास कठीण नाहीं. कारण कीं मनुष्यांचे धर्म परस्परांचें खंडन करितात; आणि जेव्हां दोन गोष्टी एकमेकाचे विरुद्ध आहेत, तेव्हां दोन ही खऱ्या होणार नाहीं हें उघड आहे. यांस उदाहरण एक मनुष्य म्हणतो कीं सूर्यापेक्षें पृथ्वीस चंद्र जवळ आहे. ( असें मला वाटतें ज्योतिष शास्त्रांत आहे. ) दुसऱ्याचें बोलणें कीं पृथ्वीपासून सूर्यापेक्षें चंद्र फार अंतरावर आहे. ( असें मी ऐकतों कीं पुराणांत आहे. ) एकाचें मत कीं ईश्वर एकच. दुसऱ्याचें असें कीं लाखो देव आहेत. एक म्हणतो कीं मनुष्याचा जीव अमर आहे, आणि या जन्मानंतर तो सुखाचे किंवा दुःखाचे अवस्थेंत पडून निरंतर तसाच राहातो; दुसरा बोलतो कीं तो शरीराबरोबर नाश पावतो आणि तिसऱ्याचें मत असें कीं मेल्या नंतर तो दुसऱ्या प्राण्याचे देहांत शिरतो. ही सर्व खरी असणार नाहींत. असे मतांत भेद जेव्हां आहेत, तेव्हां उघड आहे कीं कोणत्या तरी मनुष्यांचा धर्म खोटा आहे. यावरून सिद्धांत होतों कीं असे भेद आहेत. हें वास्तवीक मताप्रमाणें आहेत असें म्हणणें, आणि खोटी गोष्ट वास्तवीक मताप्रमाणें आहे हें म्हणणें बरोबर म्हणजे हें केवळ अप्रयोजक.

मुंबई ता. २१ मार्च १८३२ **रेस् पांडेन्स.**

---

# ज्ञाति विभाग व रीति रिवाज

( **असल पत्रें** तारीख २७ माहे आप्रील सन १८३२ )

**दर्पणाचे कर्ते** यांस,

मी दर्पणाचे ६ कागदांत प्रश्न विचारिले, ते इतके ग्रहस्थांचे लक्ष्यांत घेऊन त्यांणी तुमचे गेले कागदांत त्यांची उत्तरें दिली, असें पाहून मला

संतोष झाला. या जातीचे वाद तुमचे कागदांत छापिले जातील, अशी जेव्हां तुमची प्रतिज्ञा आहे, तेव्हां ज्ञातीचे विरूद्ध तुमचे पत्र लिहिणारांनीं जा युक्ति लिहिल्या आहेत, त्यांचें उत्तर मी पाठवितों हें तुम्हास छापणें अवश्य आहे. कांहीं भ्रांत न राहतां सर्व माझें लिहिणें स्पष्ट ध्यानांत यावें, म्हणून तुमचे पत्र लिहिणारांचीं पत्रें जा अनुक्रमानें छापलीं होती, त्या प्रमाणें मी उत्तर द्यायास प्रारंभ करितों.

प्रथमचे पत्र लिहिणारानें प्रारंभीं म्हणलें आहे कीं "क्यास्त, हा शुद्ध इंग्रेजी शब्द नव्हे." परंतु त्याणें पाहावें कीं इंग्रेजीही मूळ भाषा नव्हे; परंतु डाक्तर ब्लेयर साहेबांनी लिहिल्या प्रमाणें, "ती दुसऱ्या भाषांपासून उत्पन्न झाली आहे, जुनी साक्सन भाषा व नार्मन फरेंच भाषा यांची मिश्रित आहे. तसेंच तीत दुसरेंही बाहेरचे शब्द आहेत कीं जे समयानुसार व्यापारानें आणि विद्येनें आंत आले आहेत. म्हणोन इंग्रेजी भाषेंत क्यास्त हा शब्द नाहीं. हें आश्चर्य नव्हे," "परंतु असो, त्याणें होय म्हटलें आहे, कीं "स्पीसीस" असा एक शब्द आहे, आणि त्याणें माझी चुक काढली हा त्याचा मजवर मोठा उपकार झाला. परंतु लाटिन भाषेपर्यंत जायाचें तुमचे पत्र लिहिणारास प्रयोजन नव्हतें. इंग्रेजींत क्लास, डिविझन सार्ट कैंट वगैरे बहुत शब्द आहेत त्याचा अर्थ व योजना संस्कृत ज्ञात आणि जात यांचे सारिखीच आहे. त्याची पुढली प्रतिज्ञा ही कीं "मनुष्यांत जातिभेद नाहीं; कारण कीं ईश्वराची इच्छाच अशी; जातीचा भेदास कोठें तरी समातीचें स्थळ पाहिजे; आणि मनुष्यांत जाती असाव्या तर म्हशी गाढव यांत कां नसाव्या ?" मी कबूल करितों कीं म्हशी गाढव यांत जाति म्हणजे धर्माचे विभाग नाहींत; परंतु हें सर्वांस टाऊक आहे, कीं त्याचें स्वभावामध्यें व गुणांमध्यें जो भेद असतो, त्याप्रमाणें त्यामध्यें जाति म्हणजे प्रकार असतात. हे प्रकार आणि मनुष्याचा जाति, ही दोन ही एक प्रकारची असें पुढें लवकरच दाखविलें जाईल. जर जातिभेद घोडा, कुत्रा इत्यादिक प्राण्यांचे पहिले मुख्य विभागा जवळच समात व्हावा, तर एक जातीचें जनावर जो घोडा त्यास आरबी, पेगु इंग्रेजी अशी नावें कां असावी, किंवा स्पानियल, एस्किमाक्स, ग्रेहैंड, टेरियर इत्यादिक नावें

कुत्यास कां असावी, याचे कारण काय तें मला समजत नाहीं; कारण कीं घोडा कुत्रा या जनावरांचे जाती जवळ तुमचा पत्र लिहिणारा एक मनुष्य याचे युक्तीप्रमाणें व शास्त्र रीतीप्रमाणें जाति भेद संपला पाहिजे. आतां मी तुमचा पत्र लिहिणारा एक मनुष्य याचा निरोप घेतों. त्याचे मनांत या विषयीं अधिक जाणायाचें असेल तर त्याणें या पत्राचा पुढील भाग पाहावा.

एथे कोणी असा प्रश्न करील कीं जसा स्वभाव गुण, देश सबई यांचे भेदानें पशूंस जातिभेद होतो, तसा मनुष्यांत होण्यास कारण कोणतें ? याचें उत्तर कीं धर्म म्हणजे पापापासून मुक्त होण्याचा जा रीति ते आचरण करितात त्यांचे भेदामुळें मनुष्यांत जातिभेद होतो. संसारांतील या मुख्य गोष्टीविषयीं मनुष्यांची मतें मुळापासून वेग वेगळीं आहेत. कोणते एके समयीं सर्व लोक एके तारणारास शरण गेले असें बखरांत नाहीं. या कारणामुळें लोकाचीं नावें अनेक पडलीं आहेत; जसें क्रिस्तियन हिंदु, पार्शी, मुसलमान बौद्ध इत्यादिक; यांस जाति म्हणतात. जंव पर्यंत धर्म वेगवेगळे आहेत तव पर्यंत हा भेद सर्वांस मानिला पाहिजे.

आतां हिंदुस्थानचे लोकांस एक जातीचे लोक असें समजतात, व त्यांचें हिंदु असें एक सामान्य नाव घेतात खरें; परंतु त्यांचा ही भिन्न भिन्न आतल्या जाति आहेत, आणि त्या जाति परस्परांपासून वेगळ्या आहेत. ब्राह्मणाचा एक धर्म आहे, क्षत्रियाचा दुसरा, वैश्याचा तिसरा, असेंच पुढें ही सर्वांचे आहे. त्या सर्वांनीं करायाचीं अशी कांहीं धर्म संबंधि कर्मे आहेत; तीं यथास्थित केलीं असतां एकच फळ प्राप्त होतें; तें हें कीं पातकापासून मुक्तता. जो शूद्र आपला धर्म चांगले रीतीनें आचरण करील, त्यास मोठी श्रम साध्य षट् कर्मे प्रायश्चित्तें इत्यादिक करणारे ब्राह्मणाचे बरोबरीनें फळ प्राप्त होतें. जे आपले जातीचे धर्मांत वागतात, त्या सर्वांस हिंदुशास्त्रा प्रमाणें पातकापासून सारिखी मुक्तता होत्ये. या रीतीनें मी दाखविलें कीं धर्माचे भेदावरून मनुष्यांचा जाति अवश्य होतात, आणि जोंपर्यंत वेगवेगळे धर्म आहेत तवं पर्यंत त्या असल्याच पाहिजेत.

आतां तुमचा दुसरा पत्र लिहिणारा "आविदीस" याचे पत्राविषयीं लिहितों. त्याची मुख्य युक्ति ही कीं पशूंचा अनेक जाति परस्परांशीं व्यवहार ठेवतात, त्यांस कित्येक अक्षरें म्हणतां येत नाहीं व ते कित्येक कर्मे करीत नाहींत. परंतु वर लिहिलें आहे त्या वरून त्यांस कळेल कीं पशूंचा जाति स्वभाव व गुण यांचे भेदामुळें झाल्या आहेत, आणि मनुष्यांचा जाति वेगवेगळे धर्मामुळें झाल्या आहेत. घोड्यास बोलतां येत नाहीं, कांहीं कर्मे करितां येत नाहीं, आणि त्याचे आचरणाचा नियम करणारा त्यास धर्म नाहीं या गोष्टींची त्यास खचीत विसर पडली नसेल. जात या अर्थाचा शब्द बहुत भाषांत आहे म्हणोन जात चांगली असें म्हणतां येत नाहीं, हें दाखवायास त्याणें नरकाची उपमा दिली. त्यास अनेक भाषांत तो शब्द आहे हें लिहिण्याचा माझा भाव हा कीं स्वभाव, गुण, धर्म, वर्तणुक किंवा अभ्यास यांवरून प्राण्याचा जाति अवश्य होतात. पशूंत जाति आहेत हें दाखविण्याचें प्रयोजन हेंच होतें. या जातीस साधक हिंदूंची युक्ति ही कीं ईश्वरानें मनुष्यांस वेग-वेगळे धर्म सांगीतले आहेत; त्या धर्मांतून जे ईश्वराचा स्वभाव व गुण यांचें वास्तवीक वर्णन करितात, व जांत सांगीतलेलीं सर्वमतें पातकापासून मुक्तता व पुण्य प्राप्ती या दोन जन्मांतील मुख्य गोष्टींस साक्षात् किंवा परंपरेनें उपयोगी पडतात, ते सर्व खरे आहेत. या विषयीं मी पुढें लिहीन.

तुमचा शेवटचा पत्र लिहिणारा, रेसू पांडेन्स याचें म्हणणें कीं "जनावरांचे भेद, व मनुष्यांचा जाति, यांत असा सारिखेपणा नाहीं; कारण कीं जर सारिखे-पणा असता, तर त्या पशूंचे जातीसारिख्या शाश्वत असत्या, व त्यांस कोणत्या गोष्टीमुळें बदल न होता." रेसूपांडेन्स यास सारिखेपणा व एकपणा या दोहोंचे भेदाची बहूत करून विसर पडली असेल; कारण पशूंचा जाती व मनुष्याचा जाति या दोनही सारिख्या, म्हणजे एके जातीचे कारणांनीं झालेल्या आहेत, असें मानिलें, आणि पशूंचा जाति शाश्वत आहेत, व मनुष्याच्या नाशवंत आहेत असें मानिलें म्हणोन त्यांचे सारिखे पणास कांहीं अंतर येत नाहीं, दुसरें त्याणें स्मरणांत ठेवावें कीं मनुष्याचा जाती, रीति व स्वभाव यांपासून जा पशूंमध्यें जाति होतात त्यांसारिख्या, असें माझें म्हणणें; जा स्वभावें करूनच

वेगळ्या त्यांचे बरोबर असें माझें म्हणणें नव्हें. रीति व स्वभाव यांपासून झालेल्या जाति; कांहीं सृष्टि स्थितींत भेद झाल्यामुळें बदलतात ही गोष्ट उघड आहे.

आतां धर्मांचे भेदा पर्यंत मी येउन पोंचलों. याविषयीं कांहीं विरुद्ध युक्ति रेस्पांडेन्स याचे पत्राचे शेवटचे भागांत आहेत. या विषयीं मी हिंदु धर्म स्थापनाकाराचें मत लिहितो. " आम्ही म्हणोन कोणाचे मत खंडित नाहीं; कारण कीं या पृथ्वीवर ईश्वरानें जशी लोकांची अन्नाछादनाची सोय केली आहे, तसे त्या त्या लोकांचे मुक्तते करितां त्याणें अनेक मार्ग सांगीतले आहेत. म्हणोन जांत ईश्वरास मानितात असें जितकें मत आहे तितकें त्या त्या लोकांस खरेंच आहे. त्यांचे आचरणांप्रमाणें ते ईश्वरापासून फळ पावतात."

हिंदूंची शास्त्रें कोठें कोठे परस्परांचें खंडण करितात अशीं कित्येक उदाहरणें रेस्पांडेन्स याणें दाखविलीं: परंतु हिंदु त्याचे निवारण चांगले रीतीनें करितात. तें असें कीं पृथ्वी पासून सूर्यचंद्राचें जें अंतर पुराणांत सांगीतलें आहे तें आणि ज्योतिषांत सांगीतलेलें हीं दोन ही मिळत नाहीं, म्हणोन लिहिलें; त्यास पुराणांतील चंद्रसूर्य व ज्योतिषातील चंद्रसूर्य हे वेगळे असें पुराणांत आहे, त्या वरून ही गोष्ट उडविली जात्ये. हिंदु शास्त्रांत कोठें तरी लक्षश: परमेश्वर आहेत असें असेल, असें मला वाटत नाहीं. पुराणांत जांचा कथा सांगीतल्या आहेत, आणि जांचा स्थिति मनुष्या सारिख्याच बदलतात, त्यांस ईश्वर असें म्हटलें तरच हें संभवेल; परंतु असें म्हणणें हें पुराणाशीं विरुद्ध आहे; कारण कीं त्यांत बहुत ठिकाणीं लिहिलें आहें कीं हे देव जगाची सृष्टि स्थिति व संहार करणारा परमेश्वर नव्हे; दुसरे विरोधांचा परिहार चांगला या रीतीनेंच होतो; परंतु आतां मी तुमचा निरोप घेतों. जर तुमचे पत्र लिहिणारांतून कोणाचे मनांत हा विचार पुढें चालवायाचा असेल, तर मी त्यांस विनंती करितों कीं ईश्वरानें मनुष्यास अनेक धर्म सांगीतले आहेत, आणि चांगलें आचरण घडलें असतां त्या सर्वांपासून सर्व लोक जें फळ चिंतितात तें होतें, ही हिंदु शास्त्रांतील मुख्य गोष्ट आहे. ही विषयीं त्याणीं कांहीं युक्ति लिहाव्या. या गोष्टीचे आधारानें

ज्ञाति विभाग व दुसऱ्या जा हिंदूमध्यें मुळापासून रीति पडल्या आहेत व सांप्रत ही आहेत त्या चालतात.

तारीख ११ माहे एप्रिल<br>सन १८३२ मुंबई. } ई. न र.

**ताजा क़लम.**

माझी आलीकडे प्रकृति स्वस्थ नव्हती, म्हणोन माझानें हें पत्र तुम्हास लवकर पाठवायास घडलें नाहीं.

ई. न. र.

आमचे गेले कागदांत लिहिलें होतें कीं ई. न. र. यांचें प्रत्युत्तर या कागदांत लिहिलें जाईल. तो गेला कागद छापल्या नंतर लवकरच आम्हास रेसपांडेन्स याची एक चिटी आली कीं त्या पत्राची एक नकल आपणास पाठवावी म्हणजे मी उत्तर पाठवीन, आणि तुम्हास चिंता नाहीं असें वाटत असल्यास तें उत्तर ई. न. र. यांचें पत्रा बरोबरच छापावें. आम्हासही वाटलें कीं या विषयींचा भवति न भवति एकदांच लोकांचे दृष्टीस आल्या असतां चांगलें, म्हणोन आम्ही रेसपांडेन्स याचें म्हणणें कबूल केलें आणि आम्ही खातर बाळगतों कीं असें केलें म्हणोन ई. न. र. ह्यास राग येणार नाहीं.

---

## हिंदु धर्म व ईश्वर

[ तारीख २७ माहे आप्रिल सन १८३२ ]

**दर्पणाचे कर्ते** यास.

तुमचा पत्र लिहिणारा ई. न. र. याणें आतां दुसरी युक्ति काढली असें माझे दृष्टीस पडलें. आतां तो म्हणतो कीं जाति विभागास मुख्य आधार हिंदु

धर्मांतील मुख्य गोष्टीचा आहे. ती गोष्ट ही कीं ईश्वरानें मनुष्यांस अनेक धर्म सांगीतले आहेत. जर जातीचे सांप्रदायास साधक युक्ति ही आहे, तर मग जाति हा पदार्थ अनेक भाषांमध्यें जा अनेक नावांनीं प्रसिद्ध आहे, त्या नावांचा गोष्टी बोलून अगदीं उपयोग नाहीं. कारण, मी पूर्वींचे पत्रांत लिहिलें होतें कीं पदार्थास नाव असलें किंवा पन्नास नावें असलीं तरी ती वाईट किंवा बरा असायाचा तसाच असतो. तसीच जाति विभागाची आणि पशूंचे सामान्य विभागांची किंवा विशेष विभागांची बरोबरी करून फळ नाहीं; कारण कीं पशूंचे शरीराचे स्थितींत कांहीं गोष्टी असल्या म्हणोन तशाच मनुष्याचे बुद्धि स्थितींत असाव्या हें सिद्ध होत नाहीं.

म्हणोन ईश्वरानें मनुष्यांस अनेक भिन्न भिन्न धर्म सांगीतले आहेत असें ई. न. र. याचें म्हणणें आहे त्या विषयीं मात्र मी उत्तर देतों. या मोठ्या गोष्टी पासून कांहीं सिद्ध करायास लागण्याचे पूर्वी ई. न. र. याणें त्या मोठ्या गोष्टीचा खरेपणा स्थापायाचा होता. मी म्हणतों कीं ही हिंदु धर्मांतील मोठी गोष्टच खोटी; कारण जर ईश्वरानें मनुष्यास अनेक धर्मांचे मार्ग सांगीतले, तर ते सर्व खरेच होतील. म्हणोन त्यांमध्यें परस्परास खंडणारे असे दोन धर्म असणार नाहीं; कारण जेव्हां दोन गोष्टी परस्परांचें खंडण करितात तेव्हां उघड आहे, कीं त्या दोहोंतून एक खोटी असत्ये. आतां असे दोन धर्म ठाऊक नाहींत कीं जे परस्परांचें खंडण करीत नाहीं; म्हणजे असे दोन धर्म नाहींत कीं जांतील मतें परस्परांशीं विरुद्ध व एक वाक्यता न व्हाया जोगीं नाहींत. म्हणोन ईश्वरानें अनेक धर्म सांगीतले आहेत हें मत खोटें; आणि तें ई. न. र. यांचे म्हणण्याप्रमाणें जर हिंदु धर्मांत मुख्य असलें, तर हिंदु धर्म ईश्वरानें सांगीतला असें सिद्ध होणार नाहीं. कारण ईश्वरानें सांगीतलेले शास्त्रांत खोटें मत असणार नाहीं. आणि जर या रीतीनें हिंदु धर्म ईश्वरानें सांगीतला नाहीं असें सिद्ध होऊं लागलें, तर मग जातीची वाट काय ?

मुंबई तारीख १७ माहे एप्रिल सन १८३२ **रेसपांडेन्स.**

---

# * स्त्रियांस विद्याभ्यास

[ तारीख २१ माहे सपतेंबर सन १८३२ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस.

मला ठाऊक आहे कीं, जो कांहीं नवा बेत सांगतो, त्याचा तो बेत लोक विपरीत समजतील, आणि त्याचीं लक्ष्यें विपरीत बोलतील, या गोष्टीस त्याणें तयार असलें पाहिजे. जे आपण त्या योजिलेले बेतास अनुकूल आहों असें बाहेरून दाखवितात, तेही आळसानें अनमान करितात, ही गोष्ट साहणें पूर्वीचे पेक्षें फार कठीण आहे, इजविषयीं त्याणें आपण तयार झालें पाहिजे. असे पुरुष त्याचे बेतांतील अपूर्णपणा त्यास दाखवितात, जसी मनुष्यकृत कोणती गोष्ट पूर्ण आहेच काय ! तो अपूर्णपणा कदाचित ते हा सांगतात कीं तो बेत शाश्वत नाहीं; जसी कोणती एक मनुष्यकृति शाश्वत आहेच काय ! असे चांगल्या गोष्टीची वृद्धी इछिणारे आहेत, त्यांचा दोष हा कीं खर्चाचे प्रमाणानें चांगली गोष्ट घडून आली, आणि कांहीं वेळ पर्यंत राहिली तितक्यानें त्यांचा संतोष होत नाहीं. परंतु इतकेच नाहीं; असे ही लोक आहेत कीं, ते कोणती एक वाईट गोष्ट फार दिवस आहे, म्हणोनच ती चालवितात; आणि जर कोणता एक दोष कबूल कराया सारिखा त्यांमध्यें प्रामाणिकपणा असला, तर ते केवळ श्रमाला कंटाळून तो दूर करायाचा चुकवितात. अशा लोकांस काय करावें ? एक तर, त्यांची इछा नसतां ही त्या कडून तसें करवावें, किंवा या चांगलेपणा धरण्याचे प्रवाहांत त्यांस मागें हळूहळू येऊं द्यावें.

पलटणींतील बायकांस विद्याभ्यास होण्यासाठीं पैक्याची पुंजी जमवावी, असा एक एक बेत माझे पलटणींतील सुभेदारनें मला करून दिला आहे, त्यास तुमचे कागदांत जागा मिळावी ही माझी सांप्रत विनंती आहे. तशीच हिंदुस्थानामध्यें सर्वत्र स्त्रियांचा विद्याभ्यास वाढत जावा अशीही माझी इच्छा आहे; तर असे प्रोढविषयाकडे तुम्ही आपले गुण लावून स्वदेशीय लोकांपासून शाश्वत प्रतिष्ठेस योग्य झालां, हें पाहून मला संतोष होईल तुमचे देशाचे

लोकांचे बुद्धीमध्यें मोठा भेद पडण्याचे दिवस लवकर येत आहेत; म्हणोन जा बायका केवळ घरांतील काम मात्र करणाऱ्या, आणि जास पतीचे मनाचे सुखाचा विभाग घेण्याचे सामर्थ्य नाहीं, त्या बायकांस ते लवकर कंटाळतील. इतकेंच नाहीं, विद्याभ्यासा विषयीं आईची थोडथोडी परंतु सफल मदत घेतल्यावांचून तुमचानें अर्धें काम मात्र होईल. परंतु बायकांची सांप्रत दुर्दशा झाली आहे, त्याला प्रतिबंध फार दिवस करितां येणार नाहीं; सर्व देशांतील लोकांचे हृदयांत तिच्या पक्षाकडची ममता असत्ये. इतके दिवस तिणें दुःख भोगिलें आहे या कारणामुळें तिणें पुढेंही भोगावें असें अभिमानी लोक म्हणोत; परंतु सर्व लोक अभिमानी नाहींत ! ती स्त्री आपले निराश्रय अवस्थेंत ही बळकट आहे म्हणोन तिचें दुःख निवारण होईल; आपले पतिचा सहवास हा तिचा स्वाभाविक हक्क तिला पुनः प्राप्त होईल; तिला ईश्वरानें परतंत्रता दिली आहे तींत सुखी राहून, या देशांत विजय होऊन एकांतवास तिला प्राप्त होण्याचे पूर्वीं जशी ती होती तशी होऊन ती पेक्षें अधिक ही होईल.

परंतु मी माझा विषय पुढें चालवितों.

कलम १—हो गोष्ट म्हणतात ती खरी कीं, काळे लोकांचे पलटणींत जे कर्जे होतात, ते सर्व दोन कारणें मिळोन उत्पन्न होतात. तीं कारणें हीं कीं, बायको आणि पैका. शिपाई लग्न होण्यासाठीं कर्ज करितो; आणि शेवटीं त्यास बहूत करून पैका देऊन एक तऱ्हेची बायको मिळत्ये. मग पैक्याचे अडचणीं-मुळें त्यांस दुःख होऊं लागते; आणि तें दुःख कमी करण्याचें सामर्थ्य असाया जोगी विद्या त्याचे बायकोमध्यें असत नाहीं. म्हणोन अशी ही वाईट गोष्ट बंद होण्यासाठीं किंवा कमी होण्यासाठीं, असें योजिलें आहे कीं, पलटणींतील पैक्याच्या पुंज्या जमवाव्या; आणि त्या पैक्यानें लाहान मुली व जांची इच्छा असेल त्या मोठ्या बायका यांस विद्या शिकवावी. याकरितां त्या पैक्यातून एक पंतोजी, एक मुनशी व एक शिंपी इतके ठेवावे, आणि पुढें रेशिमाचें काम व कशीदा हें शिकविण्यास एक माणूस ही ठेवावा.

कलम २—बायकांची बुद्धी चांगले मार्गास लागावी म्हणोन त्यांची

अबरू वाढविण्याकरितां, त्या पुंजीस पैका देणारांच्या मागें त्यांचा विधवा बायका व मुलें यांचा चरितार्थ त्या पैक्यांतून चालवावा.

कलम ३—या पुंजीचा उपयोग लग्न झालेल्या बायकांस आणि पाट केलेल्या जा असतील त्यांसही होईल. तशीच जा बायकांची वर्तणुक चांगली असेल, त्या लग्न झालेल्या नाहींत, किंवा पाट झालेल्याही नाहींत ( म्हणजे राखलेल्या ) अशा असल्या, तरी त्यांचे धन्यानें त्यांचेसाठीं पैका दिला असें त्यांचें नांव लिहिले असल्यास, त्यांसही या पुंजीपासून उपयोग होईल.

कलम ४—कोणी विधवेनें पुनः लग्न केल्यास तिला बैठे पगारांतून अर्धा मिळेल.

कलम ५—जर कोणी विधवा पलटणींत राहायास न इच्छून आपले देशांत जाईल, तर तिकडे तिचा खर्चवेच चांगले रीतीनें चालायासाठीं पुंजीतून सामर्थ्याप्रमाणें सरकारी नेमणुकी खेरीज पैका दिला जाईल, आणि तिचें पेनशन तिला नीट पोंचण्याविषयीं ही बंदोबस्त होईल.

कलम ६—जे पैका देणारे एकटे असतील त्यांचे वादिसदारांस दिलेल्ये सर्व पैक्यांतून अर्धा पैका परत मिळेल.

कलम ७—कोणी पैका देणारास जरी पेनशन मिळालें, किंवा चाकरी करण्याचें सामर्थ्य नाहीं असें झालें, तरी त्याणें मर्जीस आल्यास दरमहा पैका पाठवीत जावा; परंतु जर पैका बंद करावा अशी त्याची इच्छा असेल, तर त्याणें दिलेल्ये एकंदर पैक्यांतून निमे त्यास परत मिळेल. तो मेला असतां त्यांतून अर्धा त्याचे बायकोस किंवा मुलास मिळेल. अथवा पुंजीतून त्यांस पेनशन मिळे असा बंदोबस्त होईल.

कलम ८—शाळेंतून जा मुलीचें लग्न होईल, त्यांचे बरोबर पुंजीचा अदमासानें आणि त्यांणीं शिवण्याचें काम चांगलें करून जसा पैका वाढविला असेल त्या प्रमाणें नवऱ्यांस आंदण मिळेल.

कलम ९—सर्व पैका देणारे यांस आपले पदवी पेक्षें वरचे पदवीप्रमाणें पैका देण्यास अखत्यार मिळेल, आणि त्या प्रमाणें त्यांचा स्वार्थ होईल.

कलम १०—दर कंपनीनें, नेहेमी पदवीचा अंदेशा न धरितां, दोन कामगार नेमावे; एकंदर मिळोन सोळा. त्यागी आपल्यांतून चार नेमावे; व पलटणीचे सरदार साहेब याकडून मुख्यांचें काम चालवाया साठीं एके साहेबास मागून घेऊन तो साहेब व ते चवघे मिळोन कोणते एके सर्वांनीं जाया जोग्ये उघड ठिकाणीं, दर कंपनीचा दरमहा पैका व पैका देणारांची याद मुख्य शिपाया पासून घेंतील; आणि त्या यादीवर मुख्य साहेब व त्या चवघांतून एकानें सही केल्यावर, त्या सर्व यादी दप्तराप्रमाणें ठेविल्या जातील; व त्यांचे बरोबर महिन्यात आलेल्या पैक्याची एक याद केली जाईल, ती व पुंजीचें एकंदर हीं पलटणीचा तीन परेडींचे वेळेस उघड जाहीर केली जातील.

कलम ११ कोणी बायकांचे नवरे लढाईत मेले, किंवा चाकरीमध्यें जखमी होऊन मेले, तर त्यांस त्याणीं दिलेल्यांतून निमे पैका परत मिळेल. पेनशन मिळणें तें मुलांस मात्र मिळेल.

माझें सुभेदाराचा बेत वर लिहिला, हा जरी केवळ चांगलाच नाहीं, तथापि यावरून कळेल कीं कांहीं तरी करितां येईल; हा या पेक्षें चांगला करितां येईल म्हणोन चांगला करावा. परंतु या कारणामुळें यत्न करायास सोडूं नये. आपल्या पासून इछिलेलें सर्व होत नाहीं, म्हणोन आपल्ये हातोन जें होईल तें केल्यावाचून राहूं नये.

**म. म. स.**

---

## पारशी समाजांतील सामाजिक आंदोलन

[ शुक्रवार ता. २४ जान्युआरी १८३४ ]

गेल्या शनिवारीं संध्याकाळीं नौरोजी दोराबजी, हलकारू आणि वर्तमान या पत्राचा कर्ता याणें जाहीर केल्याप्रमाणें टौन् हालामध्यें पारशी लोकांच्या

चालीवर व रिवाजांवर उपपादन केलें. तेथें सुमारें ५०० मनुष्यें जमलीं होतीं, त्यांत बहुत करून सारे पारशी होते, व कांहीं कांहीं हिंदु होते, व थोडके इंग्रज लोक होते. त्याणे ७ वाजल्याचें कांहीं अगोदर उपपादन करावयास आरंभ केला, आणि तें एक अवरानंतर संपविलें हा उपपादन करणारा याचें त्याच्या बहुत करून सर्व लोकांशीं चांगले नाहीं म्हणून भय वाटत होतें कीं, त्याचें दोष व व्यसनें या विषयांवर उपपादन करीत असतां त्यास अडथळा करतील, परंतु त्या प्रमाणे कांहीं झालें नाहीं. तेथें जे लोक जमले होते ते मोठ्या भलेपणानें वागले, ते, तें उपपादन चित्त देऊन ऐकत होते असें दिसलें. पारशी लोक आपल्या मुलांचे शिकण्याविषयीं हयगई करतात ती हयगई; व पारशांचें धर्म पुस्तकांत सांगितलें आहे कीं त्याणीं आपल्या प्रेतांचे पाय वाळून ठेवावे, असें असतां ते आपल्या प्रेतांचे पाय, आपले धर्मोपदेशक सांगतात त्या प्रमाणे लांब करून ठेवतात ही चाल; आणि दाशीपुत्रास आपल्या धर्मांत घेऊं नये म्हणून त्यांचे पंचायतीनें जाहीर नामा लाविल्यावरून त्या लोकांत दाशीपुत्र जातींत न घेण्याची चाल वाढत चालली आहे ती चाल; या विषयांवर त्याणे उपपादन केलें. या शेवटच्या विषयावर बोलत असतां नौरोजी याणे सांगितलें कीं ती दुष्ट चाल आहे, आणि झरतोष्त म्हणून पारशी लोकांचा पेगंबर होता त्याचे आज्ञांचे विरुद्ध ती चाल आहे, असें दाखवावयाकरितां त्याणे आपल्या धर्म शास्त्रांतील वाक्यें म्हटलीं. या विषयावरून तो आपल्या लोकांचे व्यभिचाराविषयीं बोलूं लागला, त्यांत तो “**छिनाळी**” हा शब्द वारंवार बोलत असे, तो तेथें जे इंग्रज लोक गेले होते, त्यांस बेमर्याद असा वाटला; परंतु या प्रकरणाचा, व त्याणें जे विषय निवडून त्यांवर बोलत होता त्यांचा, व ते सांगण्याचे त्याचे पद्धतीचा वाईट बरेपणा आपण इंग्रेजी रीतीप्रमाणें पाहावा, हें योग्य असें आम्हांस वाटत नाहीं, आणि नौरोजनें इंग्रजाप्रमाणें उत्तम रीतीचें भाषण केलें नाहीं म्हणून आपण त्यास दोष द्यावा हे योग्य, असें आम्हास वाटत नाहीं. हा उपपादन करणारा काळा मनुष्य होता, व ज्यांपाशीं बोलत होता ते ही काळे मनुष्य होते, व तो गुजराथी भाषेंत बोलत होता, यास्तव त्याचे स्वदेशी लोकांचे विचारास, व त्यांस जें ज्ञान आहे त्यास,

योग्य अशा रीतीनें त्याचें भाषण व त्याचे बोलण्याचे विषय असावे हें योग्य दिसतें. याप्रमाणें विचार केला असतां नौरोजीचे उपपादनांत कंपेश झाला असें दिसणार नाहीं, आणि त्याचें ज्या दुषणांवरून युरोपीयन लोकांस आश्चर्य वाटेल असेल, त्यांवरूनच असें दिसते कीं, त्याणी चांगल्या चांगल्या मसलती व सूचना त्यास द्याव्या, त्या दिल्या असतां नौरोजी उपकार मानील असें आम्हांस वाटतें. हें उपपादन करीत असतां इराणचे प्राचीन बखरेमध्यें जीं चमत्कारिक वर्तमानें लिहिलीं आहेत त्यांविषयीं नौरोजी भाषण करूं लागेल, किंवा पारशी हिंदुस्थानांत ज्या कारणांवरून पळून आले त्यांचा विस्तार करील, किंवा आपल्या चाली व रिवाच कशे पडले त्यांविषयीं तो तपशील करील, असें आम्हां सारिखें ज्यांस वाटत होतें ते निराश झाले. परंतु जरी तो या विषयांवर बोलला नाहीं तरी तो ज्या विषयांवर बोलला त्यांहीं वरून तेथे मिळालेले पारशी लोकास फार चमत्कार वाटला असें आम्हास वाटते. नौरोजीनें जें उपपादन केलें त्याविषयीं त्याचे लोकांस जे संवाद झाले ते आमच्या ऐकण्यांत आले; त्यांवरून कळून येतें कीं, पाय लांबकरून निजविलीं असतां स्वर्गाप्रत पावतात असें त्याचे धर्मोपदेशक सांगतात त्या चालीचे विरूद्ध तो नौरोजी बोलला म्हणून त्याच्यावर त्यांस फार क्रोध झाला. परंतु पंचायत हट्टानें वागत असते व आपले कामांकडे लक्ष देत नाहींत, या विषयीं जें बोलला तें त्यांच्या पसंतीस आले आणि या धर्मोपदेशकांचे विरुद्ध असें जे नौरोजी बोलला तें पंचायतीनें पसंत केले, परंतु त्यांच्या अधिकाराविषयीं व चातुर्याविषयीं तो जें बोलला त्याज करितां ते त्यांस दांडगा व मूर्ख असें म्हणतात. आणि इतर लोक असें म्हणतात कीं पंचायतीचे व धर्मोपदेशकांचे मूर्खत्वाविषयीं व दुराचरणांविषयीं जें बोलला तें सारें सत्य आहे. हें उपपादन जेव्हां समाप्त झालें तेव्हां तेथें जे मिळाले होते त्याणीं हासून व मोठ्यानें ओरडून व टाळ्या वाजवून, कित्येकांनीं स्तुति केली आणि कित्येकांनीं नालस केली. हें उपपादन समाप्त होत आहे इतक्यांत कांहीं प्रतिष्ठित व श्रीमान पारशी लोक आले, त्यांत खरसेटजी जमशेटजी आला होता. त्याच वेळीं मेस्तर बेबर साहेब व दुसरे कांहीं साहेब लोक आले, तेव्हां जे

लोक तेथून फाटा फूट होऊन जात होते ते मागत्यान टौनहालांत गेले, कां कीं नौरोजी पुनः उपपादन करूं लागेल, असें त्यांस वाटलें, परंतु त्या प्रमाणें कांहीं झालें नाहीं. नौरोजी हा येत्या महिन्याचे पहिले तारिखेस त्याच ठिकाणी दुसरें उपपादन करील, असें आम्ही ऐकतो.

---

## हिंदूलोकांस पत्र

[ **असल पत्रे.** तारीख २८ माहे मार्च सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस

विनंती विशेष खाली जे म्या हिंदुलोकांस पत्र लिहिलें आहे, तें आपण आपल्या पत्रांत छापलें असतां मजवर आपला मोठा उपकार होईल.

हिंदुलोक हो.

ज्याविषयावर मी हें पत्र लिहितों त्यावर यद्यपि मला स्मरण आहे कीं, काहीं दिवसामागें दर्पणाचे पत्र लिहिणारांतून कोणी एकानें एक पत्र लिहिले होतें, तथापि तुम्ही म्हणतां कीं त्याविषयीं आपल्या शास्त्राची आज्ञा नाहीं, व तद्विषय संबंधी जो उपयोग व अवश्यक्ता तीं, तुम्ही तुच्छ करितां यास्तव, त्याच विषयीं पुनः तुम्हास श्रम देऊन तुमच्या लक्ष्याची अपेक्षा केलि असतां त्यांत मजकडे काहीं दोष येणार नाहीं. नाहीं, नुसत्य। मजकडेस नाहीं असें हीं नाहीं, परंतु जावत्काळ पर्यंत आपण तद्विषय संमंधी जी सत्यता, व तसें करणें मनुष्याचा म्होटा धर्म होय असें जाणलें नाहीं तों काळपर्यंत दुसरे कोणी ही या विषयांवर पत्रें लिहिलीं तरीं त्यांजकडेस ही दोष येणार नाहीं–मी जो विषय सांगतों तो हा कीं स्त्रियांस शिकविणें. या गोष्टीचा उपयोग व अवश्यता, मला वाटते आपल्या मनांत अगदीं बाणली नाहीं, इतकेंच केवळ नाहीं, आपल्यातून कित्येकांस ही गोष्ट इतकी वाईट दिसत्ये व तीज विषयीं त्यांस इतकें वाईट

वाटतें कीं तें पाहून मला माझा निश्चय सांगता येत नाहीं कीं तुम्हा सर्वांचे मनांत खरेपणा भरविण्याचें जे काम म्या पत्कारलें आहे. त्यांत माझा शेवट नीट होईल कीं नाहीं. आपणातून कित्येकांस स्त्रियांस शिक्षण देणे हे कुमार्गी लावणें असें वाटतें; ती जर शिक्षा न केली तर ते त्या मार्गी त्यांचा दुष्ट वासना बहुधा जाणार नाहींत असें वाटतें. ही गोष्ट खरी करावी म्हणून तें म्हणतात कीं आपल्या शास्त्र कर्त्या ऋषीने स्त्रियांस शिकविणें मना केलें आहे, हें निमित्य ठेऊन ते म्हणतात कीं स्त्रीयांस शिक्षा दिल्या असतां त्यांची मने चांगली व्हावयाचीं, व त्यांचा स्वभाव दयाळू व्हावयाचा तो एकेकडे राहून उरफऱ्या हरामी आणि दुष्ट होतील. मला जर पुसाल तर मला म्होटे आश्चर्य वाटतें, कीं ते शिक्षा किंवा शिकविणे म्हणजे काय समजतात; मला भय वाटतें कीं त्यांना शिकविणे म्हणजे लावण्या किंवा दुसऱ्या काहीं श्रृंगारी रसाची पुस्तकें पढविणे असें वाटत असेल, परंतु नाहीं. अशी कांहीं गोष्ट नाहीं, जे मन पूर्वी दुष्ट व पापी होतें तें चांगले करण्याचें नांव शिक्षा तर मग आतां ती तुम्ही आपल्या स्त्रियास देण्याविषयीं कोणता संशय धरता ? अद्यापि तुमचें मनांत संदेह आहे कीं, आपल्या ऋषीने ती गोष्ट करायास सांगितली नाहीं· मी तुम्हास वास्तविक सांगतों कीं तुम्ही ऋषिवाक्य नीट न समजतां आपणाहीच आपल्यांस फशिवतेंल, त्या वाक्यात अशी आज्ञा आहे कीं, स्त्रियांस वेद शिकवू नयत, याचे कारण काय या विषयीं शोध करणे मला निर्थक वाटतें. आणखी दुसरें स्त्रियांस वेदा सारिखें थोर पुस्तक अर्थ समजल्यावाचून श्रमपूर्वक मुख पाठ करून बोलावें हे ही मला आवडत नाहीं.

कृष्णाची पत्नि रूक्मिणी, तीणें आपल्या बाककांसाठीं एक चांगला दाखला ठेविला आहे. कांकीं, जेव्हां तिचा भाऊ आपल्या बापाचा तिला कृष्णास देण्याचा निश्चय, मोडू लागला, त्या काळीं तीणे स्वतः आपण एक पत्र लिहून कृष्णास पाठीवलें व ती आपणांस भ्रतार असावा. हा जो मनोरथ तो पूर्ण केला यावरून असें दिसतें कीं ऋषिने स्त्रियांस पढीवण्याविषयीं, जो प्रतिबंध केला तो नुसत्या वेदाविषयीं तर मग आतां त्यांस शिकविण्याविषयीं

कांहीं ती आशंका उरली नाहीं. येथें मी आपलें पत्र संपवितों व तुम्हांस कबूल करतों कीं पुढल्या वेळीं स्त्रियांस शिक्षा केल्याचा उपयोग कोणता, व त्यांस शिक्षा होणे अवश्य आहे या विषयांवर एक पत्र पाठवीन हे विनंती.

तुमचा परमस्नेहंकित

**कित्येक हिंदु चाली बऱ्या व्हाव्या याविषयीं एक उत्कंठित.**

---

## मुंज-मुलींची कां नाहीं ?

[ तारीख २ री माहे मे सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस,

मी कित्येक ब्राह्मणांस त्यांचे व त्यांचे मुलांचे योग्यतेविषयीं पुसलें त्यास त्याणीं मला असें सांगितलें कीं, ब्राह्मण स्वतः देव आहे, तो ब्रह्मदेवाचा अवतार आहे; परंतु त्याचे मुलाचें व्रतबंध होई तवपर्यंत तो या योग्यतेस पावत नाहीं, व्रतबंधन झालें म्हणजे तो आपले बापासारिखा देव होतो. मुंजीचेंपूर्वी मुलग. कोण आहे मी पुसलें तेव्हां मला बहुतकांनीं संकोच न करितां असें उत्तर दिलें कीं, तो शूद्र असतो. मी ज्यांस हें पुसलें त्यांतून थोडके मनुष्यांनीं असें सांगावयास संकोच केला, परंतु पुढें कांहीं विचारल्यानंतर त्याणी मान्य केलें कीं मुंजीचे पूर्वी मुलगा शूद्र असतो. मला आणखी असें सांगीतलें कीं मुलाचें व्रतबंधन झाल्याशिवाय त्याचे लग्न होत नाहीं. या प्रमाणें बायकोचें लग्नापूर्वी व्रतबंधन करतात कीं नाहीं असें मी पुसलें, तेव्हां सर्वांपासून एकच उत्तर मिळालें कीं, लेकीची मुंज होत नाहीं. यावरून एक संशय उत्पन्न होतो. त्याची निवृत्ती करणारा असा कोणी मला अजून भेटला नाहीं. लग्न झाल्याचें पूर्वी मुलास देव करतात, परंतु कन्येस देवी करीत नाहींत. ती शूद्रिण असतां

नीचे ब्राह्मणाशीं लग्न करितात. तर मग कलियुगांत अनाचार होऊन शेवटीं वर्णसंकर होईल असें जें भविष्य कथिलें आहे त्याप्रमाणें ब्राह्मणामध्यें वर्णसंकर झाला आहे.

या अनाचारास प्रतिबंध व्हावा म्हणून ब्राह्मणास बहुत सांगितलें कीं व्रतबंधन करून मुलांस जसें पवित्र करितात त्यासारिखी कांहीं एक वीधी करून आपल्या बायकांस व कन्यांस पवित्र करा. परंतु ते सांगतात कीं असें केलें असतां आमच्या शास्त्रांचे व प्राचीन चालीचे विरुद्ध होईल, व असें करितां येणार नाहीं काकीं आपल्या पती बरोबर बसून जेवावयास बायको योग्य व पवित्र नाहीं. लग्न होतें त्यावेळेस व बायको आपल्या पती जवळ राहावयास येते त्यावेळेस नवरा व बायको एकत्र बसून भोजन करतात हें खरें, परंतु कांहीं एक संस्कार करून तीस त्यावेळेस पवित्र करितात, परंतु त्या संस्काराचा गुण फारवेळ राहात नाहीं कारण यापूर्वीं किंवा यानंतर तिच्याने आपल्या पती बरोबर...करवत नाहीं, किंवा आपले मुलाची मुंज झाल्यानंतर...करवत नाहीं, ब्राह्मण जो देवीस नेवेद्य करतो तो भक्षण करण्यास योग्य व्हावया करितां तीस पवित्र होण्याचा कांहीं संस्कार करावा लागत तर नाहीं. परंतु तो नैवेद्य तीज बरोबर खाण्यास ब्राह्मणास स्नान इत्यादि करून पवित्र व्हावें लागतें; आणि देवीने त्यास आपले बरोबर भोजन करावयास घेतल्यानें त्याचा मान होतो. याचें कारण उघड आहे. ती स्वतः देवी आहे आणि जर ब्राह्मणाची स्त्री देवी असती तर नवऱ्याने आपल्या देवीरूप स्त्री बरोबर भोजन केल्याने त्याच्या मान होतो तसाच तिचाही आपल्या देवरूप पती बरोबर भोजन केल्याने होता यांत संशय नाहीं. जोंपर्यंत ब्राह्मण आपल्या स्त्रियां बरोबर जेवणार नाहींत तवपर्यंत असें स्पष्ट दिसतें कीं त्या नीच वर्णाच्या आहेत आणि त्याशीं लग्न केल्यावरून ब्राह्मणाकडे वर्णसंकर करण्याचा दोष येतो.

मु॥ देश ता॥ १५ एप्रिल १८३४ रानवासी

# स्त्रीपुरुषांना समान हक्क (१)

[ **असल पत्रें** तारीख २३ वी माहे मे सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस.

महाराज कांहीं दिवसा मागें मी आपल्यास पत्र लिहिलें होतें त्यांत सांगितलें होतें कीं, या देशांतील लोकांच्या स्त्रिया सांप्रत नीच अवस्थेंत आहेत त्यावरून जीं वाईट फळें होतात तीं व इंग्रेज लोकांमध्यें स्त्रिया ज्या स्थितींत आहेत त्यांत त्या असल्या म्हणजे जे लाभ होतील तें मी पुढें कांहीं वेळांनीं दाखवून देईन. हीं दुष्ट फळें व हे लाभ कसकसे आहेत ते मी आतां दाखवितो, आणि स्त्री पुरुषांत सारिखे रीतीने व्यवहार चालल्यानें इंग्रेज लोकांत व बहुतकरून सारे सुधारलेले लोकांत वजन कसें राहिलें आहे ते हि मी दाखवितो.

परंतु प्रथमारंभी मी असें लिहितों कीं, या देशांतील स्त्रियांचे अवस्थेमध्यें जो फेरफार व्हावा म्हणून, इछितात त्यास फार दिवस लागतील, व तो फेरफार या देशांतील लोकांची मने सुधारलीं म्हणजे होईल. स्त्रियांस जी बंदी ठेवली आहे व त्यांची जी ताबेदारी ठेवली आहे ते विषय एवढे दिवस जी वाईट नीत चालत आली आहे त्यांतलें आहेत. आणि या देशाचे व येथील लोकाचे भाग्यामुळें जो अधर्म व मताभिमान आतां कमी होत चालला आहे त्यांशी ते विषय अनुसरून आहेत विद्येचे योगानें ही वाईट गोष्ट दूर होईल, आणि खरें जें संसार सूख तें भोगण्याचीं द्वारें या देशांतील लोकांस मळतील, त्यांचा अनुभव घेतला म्हणजे तेणे करून नेहमी सुख होईल कीं नाहीं हें कळून येईल. याविषयीं एतद्देशीय लोकांचे मनांत आतां ज्या गोष्टी येऊं लागल्या आहेत त्या व त्यामध्यें विद्येचा प्रसार व्हावा म्हणून जे बेत होत आहेत ते पाहून आनंद होतो. असा जो या देशांत मुख्य अधिकारी असा जो लॉर्ड बेंटिंक साहेब त्याणें म्हटलें आहे कीं या मुलखी कमी अशी जी गोष्ट ती विद्या आहे, आणि ती विद्या प्रसृत होण्या-

करितां जे आतां यत्न करीत आहेत ते आपण पाहातों तेव्हां पुढें ज्या गोष्टि घडतील त्यांचा तर्ककरून आम्हास अशी आशा वाटते कीं हिंदुस्थानांचे पुढें कल्याण होईल.

विलायतेमध्यें स्त्रियांचा पुरुष जो मोठा मान राखीत असत त्यांतील जितक्या गोष्टी चालविण्यास वाईट होत्या तितक्या टाकून दिल्या, आणि चांगल्या चांगल्या ज्या रीति त्या आज पावेतों तशाच चालत आहेत, व लोकामध्यें सुधारणा होण्यास त्यांचे जोर अधिक पडलें, ज्या स्त्रियेची नेट पद्धीचा माणुस प्रीति करीत असे, त्यास ती अशी दिसे कीं ती मध्यें सर्व सभ्य गुण आहेत. त्यास हें जसें वाटत असे त्याप्रमाणें तो वागुत असे, आणि या मानाच्या रीतींत कंपेश झाला असतां त्याची फार फजिती होई.

सांप्रतच्या काळाप्रमाणें पाहिलें असतां या मानाच्या चालींत बहूत विपर्यास होते असे दिसतात. परंतु मानराखण्याची त्यांचे मनात जी मोठी बुद्धि वागत असें ती वरून साऱ्या दुष्ट वासना अधिन होऊन राहात, व तेणें करून लोकांची अबरू वाढली. पूर्वेकडील लोकांमध्यें अशी बुद्धि कधींच नव्हती, आणि हिंदुस्थानांतील लोकांची मन दुर्व्यसनांकडे लागतात, व ते सत्याकडे व मानाकडे लक्ष्य देत नाहींत असा त्यांवर बहुत वेळ जो दोष दिला त्याचें कांहीं कारण मला असे दिसतें कीं ती बुद्धि त्यांमध्यें नाहीं.

माझ्या बेताप्रमाणें माता, भार्या, व जन या तीन निरानिराळे नात्यानीं स्त्रिया जें करतात त्याचा मी विचार करतों आईमध्यें माया कशी आहे व मुलास पुढें सुख आई पासून किती होतें हा चमत्कारिक दाखला आहे कीं युद्ध, विद्या व राज्यमसलत यांत गुणी असे जे पुरुष विलायतेचे बखरेमध्यें किंवा दुसरे कशामध्यें लिहिले आहेत त्या साऱ्यानीं कबूल केलें आहेत कीं, त्यांच्या आईच्या योगाने ते लवकर शाहाणे झाले, आणि आईचे गूण त्यांणीं बहुतकरून घेतले. आई प्रथम बुद्धिचें मूळ पहाते, आणि ती बुद्धि दिवसान दिवस अधिक प्रसिद्ध होत जावी म्हणून ती चवकस असते. विद्या अमोलिक वस्तु आहे व लहा - पणी मन जेथें लावलें तेथें लागते असें जाणून ती मुलाचे जे गुण दृष्टीस पडतात

त्याकडे आपली नजर चवकशीने ठेवते, आणि जे नवे नवे गुण बाहेर दिसूं लागतात ते ती वाढविते. जसजशी बुद्धि वाढत जाते. तसतशी ती मुलास... दाखले करून दाखविते कीं त्याणे त्याप्रमाणें वागावें, आणि शूर, गुणी, हुंनरी व उद्योगी अशा पुरुषास जय व मान प्राप्त झाले त्यांची वर्णनें बखरेंतून काढून मुलास दाखवितें. या शिक्षेवरून लहान मुलांचे मनांत योग्य रीतीची प्रेरणा होते, व लोकांचे सुख करण्याचा दृढ पाया घातला जातो. मुलांचे शरीरास सुख होण्याकरितां एतद्देशीय लोकांच्या स्त्रिया इंग्रेज लोकांसारख्या मेहनत घेतात असें मी कबूल करितों, तरी मी वर सांगितलेले जे लाभ ते त्यांपासून मुलांस प्राप्त होणार नाहींत. कांकीं त्या मूर्ख आहेत. एकेक माणसाचे अबरू प्रमाणें लोकांत सुधराई होईल. एतद्देशीय लोकांच्या स्त्रिया सांप्रतच्या मूर्खावस्थे पासून सुटतील, व इंग्रेज लोकांच्या स्त्रियांसारिख्या आपले मुलांची विद्याभ्यास वाढविण्यास त्यांस प्रसंग पडेल असें व्हावयास कोणती उमेद केली आहे. जोपर्यंत त्या सांप्रतच्या स्थितींत आहेत तोपर्यंत लहान मुले ज्यांस नुकताच समज येत आहे त्यास योग्य अशा वस्तु दाखविण्यास त्यास सामर्थ्य होणार नाहींत.

---

## स्त्री-पुरुषांना समान हक्क (२)

[गेल्या पत्रावरून पुढें चालवून समाप्त केलें. तारीख ६ वी माहे जून सन १८३४]

बायको या नात्यानें स्त्रियाचा मी विचार करतों ज्यांत आपलें व दुसरे बहुतेकांचें सुख आहे असें जें कोणेकास संसारांत करणे तें बायको निवडणे हें आहे. परंतु असें सुख प्राप्त होण्याचे विरुद्ध या देशांतील चाल कशी आहे ? या देशांतिल लहान मुलांचे लग्न नवानवरीचा समज न पाहातां किंवा त्यांच्या आवडी व छंद व स्वभाव न पाहातां करतात. यापासून इतका

परिणाम होतो कीं, सृष्टी धर्माविरुद्ध अशीं स्थिति त्यांतल्या स्त्रिया राहातात. आणि इंग्रेज लोकांचे स्त्रियाशीं त्यांची बरोबरी करून पाहिली म्हणजे त्यांचा जो सोईर भाव दादले राखतात त्यावरून त्यांची बेअबरू आहे. त्यांचा साराजन्म मूर्खत्वांत व मेहनत करितां जातो. ही चाल आहे ती उलट करावी, आणि आपले मनात चांगलें वाटेल त्याप्रमाणें बायाको किंवा दादला पसंत करावा. बायाको दादला या परस्परांची एकमेकावर सारिखी प्रीति असली व ती सारखींच विद्वान असलीं म्हणजे हर एक प्रकरणांत त्या उभयतांस सारखेंच अगत्य असतें. त्या उभयतांस सुख दुःख समान होतें, आणि तीं सुखाचा अनांद वाढवितात व दुःख कमी करितात. सृष्टींतील सुंदर वस्तु जाणल्याने, व बुद्धि विवेक केल्याने किंवा कलाकौशल्यांत गति करून घेतल्यानें जो आनंद होतो तो कबूल करून त्याची मनुष्ये जशी किंमत मानितात त्या प्रमाणे ते इच्छितात कीं आपल्या बायकोची बुद्धि व छंद आपल्या सारखे असावे. सांप्रत एतद्देशीय लोकांमध्यें बायकोची मोठी माया करितात तरी तीस त्याचे अवघ्या सुखाचा उपभोग नाहीं, आणि त्याचे चातुर्याचे थोडके दाखले जरी दाखवितां येतील तरी त्याच दाखल्यांत दिसून येईल कीं सांप्रतचे जे मताभिमान ते सोडून दिले; व यां देशांत जी अप्रयोजक चाल चालत आहे ती विरुद्ध बुद्धि उत्पन्न झाली आहे.

जन या शेवटच्या नाऱ्यात स्त्रियाचें वजन किती आहे तें वर्णन करावयास अशक्य आहे. हर कोणते कामांत मनुष्यें ज्यावरून लागतात ती बुद्धि त्यांत स्वाभाविक आहे. कोणी मंडळींत थोड कीं जरीं माणसें असलीं तरीं तेथें एक गुणी व शहाणी स्त्री गेली म्हणजे तेथें सर्व लोक भीडेने वागतात, व फटकळ व दुष्टस्वभावी माणसांस दहशत बसते. स्त्रियांविषयीं या देशांत जी सांप्रत चाल चालत आहे. त्या वरून या देशास जे लाभ होत नाहींत ते उत्तम प्रकारे करून दाखवावयाकरितां मी इंग्रेजी बखरेचा मात्र दाखला देतों. स्त्रियांची प्रीति मिळवावी म्हणून पुरुष ज्यावरून उद्योग करितात त्या उत्तेजनाचे दाखले त्या बखरेंत बहुत सांपडतील. हिंदुस्थानांत हा उद्योग किती कमी

आहे, आणि यांत फेरफार झाला असतां त्या पासून आपणास कोणता लाभ व्हावयाचा नाहीं; दुसरें, कविता, शिल्प, चितारकाम व चांगलीं चांगलीं कलाकौशल्यें यांत विलायतेमध्यें जी कुशळता झाली आहे त्यांचा जर मी विचार करूं लागलों तर त्यांतले बहुतेकांचें कारण सुंदर व उत्तम स्त्रियांचे मंडळींचा संग आहे. हिंदुस्थानांत ही गोष्ट अगदींच नाहीं, आणि लोकांची जी सांप्रत स्थिति आहे ती अगदीं पालटल्यावांचून या देशांतील लोकांस सांप्रतच्या साहित्यां करून उत्तमपणा साध्य होणार नाहीं. जे विचार इंग्रेज लोकांचे मनांत उत्पन्न होतात ते एतद्देशीय लोकांचे मनांत स्वाभाविक उत्पन्न होणार नाहींत, कारण कीं ज्यावरून इंग्रेज लोकांचे मनांत ते विचार उत्पन्न होतात त्या गोष्टी एतद्देशीय लोकांमध्यें नाहींत, आणि त्या एतद्देशीय लोकांत असत्यातर ते जें करते त्याची चिन्हें ते लोक समयाने दाखिवितात, व इंग्रेज लोकांची बोलण्याची पद्धति व उद्योग ही साध्य करावयास एतद्देशीय लोकांच्या आंगी स्वाभावीक कुशलता आहे असें दिसतें तरी त्यामध्यें कांहीं गोष्ट कमी आहे त्यावरून ते अंधेरांत आहेत, याज करितां जाति संप्रदाय व दुसऱ्या गोष्टी यावरून दुष्टफळें होतात, त्यांच्या योगे करून स्वाभाविक जी प्रीति तीस अवरोध होतो, व ईश्वराने दिलेले जे गुण त्यांपसून चांगलें होत नाहीं व या देशांत सुधारणा व्हावयास व लोक शहाणे व्हावयास प्रतिबंध होतो. फारकरून सारे एतद्देशीय लोक म्हणतात कीं स्त्रियांची मोकळीक केल्यास अनाचार चालेल, आणि ज्या बंधेकरून त्या पवित्र राहातात ते बंध सुटतील. ही मोकळीक अविचाराने दिली असतां चांगलें होणार नाहीं यांत संशय नाहीं, परंतु त्यांना विद्या शिकवा व त्यांस धर्म नीति सांगा म्हणजे कुमार्गी न जाण्यास तें साधन होईल. कोणतें चगले व कोणतें वाईट याचा विचार सांप्रत त्या चांगल्या रीतीवरून करीत नाहींत, व त्या कुमार्गी लागतात असा जो अनुभव आहे त्या वरून मोठा दाखला मिळतो कीं, त्या मध्यें योग्य रीति व विचार नाहींत. त्यांस विद्या शिकविली म्हणजे खरें कोणतें व खोटें कोणतें हें त्यांस चांगलें समजू लागलें म्हणजे धर्म मार्गापासून त्या चुकल्या तर त्या बरोबरच त्यांस त्याची शिक्षा प्राप्त होईल त्या शिक्षेसारिखी मनुष्याच्याने दुसरी मोठी व चांगली शिक्षा करवणार नाहीं.

मी इछितों कीं हिंदुस्थानांत आतां चांगला काळ येत आहे, परंतु आत्म्यास थोरपणास पावावेंणें हें एतद्देशीय लोकांचे स्वाधीन आहे. जर दृढ जी विद्या ती नाहीं व जीं आपल्या सभोंन्नतीं साधनें आहेत त्यांस त्याणी आपल्या मूर्खपणामुळें हात लावला नाहीं, तर इंग्रजी भाषेचें नुसतें ज्ञान झालें असतां काय होईल ? त्यांचा अभ्यास वाढणार नाहीं, व हिंदुस्थानांत जें उत्पन्न होतें त्याची समृधिकरण्याकरितां येथील लोकांनीं दुसऱ्याकडे पहावें. हें पत्र एवढें मोठें होईल असें मला वाटत नव्हतें, आणि आपले स्वदेशीय लोकांची स्थिति चांगल्या करण्या करितां तुम्ही आपले यत्न कमी करणार नाहींत असें इछून मी हें पत्र समाप्त करितों. मी धर्मविषयीं चांगले जे विचार ते त्या पासून उत्पन्न होतील असें मला वाटतें, परंतु प्रथम हा मार्ग नीट केला पाहिजे.

तुमचा आज्ञाधारक सेवक.

**एक युरोपीयन.**

---

## स्त्री-शिक्षणाची दिशा

[ ता. ३० मे सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस.

महाराज, तुमच्या उपयोगी दर्पणांत एतद्देशीय लोकांच्या स्त्रियांचें शिकण्याविषयीं पुनः संवाद चालूं लागले हें पाहून मला आनंद झाला. मी म्हणतो कीं मला आनंद झाला, कां कीं या देशांतील लोकांच्या स्त्रियांचे व तुम्हा लोकांचे अवरूंत मोठें, चांगलें, व बुद्धिदायक असें जें त्या सर्वांचा पाय घालणें हें व त्यास अवश्य जे तें त्या स्त्रियांस शिकविणें होय असें मला वाटतें. जोंपर्यंत झरा अस्वच्छ राहूं दिला तोंपर्यंत नदीचें पाणी स्वच्छ होईल, असें कोणी शहाणे माणसास कधी वाटणार नाहीं, आणि ज्याची प्रक्रिया नदीच्या

प्रवाहावर मात्र होत आहे त्या युक्तीनें झऱ्याचें पाणी स्वच्छ होईल असें त्यास कधींच वाटणार नाहीं. झरा स्वच्छ केला म्हणजे प्रवाहाचें पाणी स्वर्गीच्या पाण्यासारखें निर्मळ व स्वच्छ होईल. जर तुम्ही सर्व लोक आपल्या धर्म नीतीची व चालीची व कळा कौशल्यें व विद्या इत्यादिकांची सुधारणा कराल तर आपल्या कुटुंबांत व मुलांत ही सुधारणा चालू द्या. परंतु मुलांवर चवकशी ठेवावी व नुकतें समजू लागतें असें जें मन त्यांत विद्येचा संचार कसा करावा हें मुलांस शिकवावें हें जिचें काम आहे तीच मूर्ख व अज्ञान आहे तेव्हां मुलांमध्यें सुधारणा कशी होईल ? मला असें खचित वाटत होतें कीं ज्ञानी असे जे या देशांतील तरुण ग्रहस्त याणी त्या विषयाची इतकी छान करावयाची होती, व आपला निश्चय असा दृढ धरावयाचा होता कीं त्या वरून या पूर्वींच बायकांसाठीं एका चांगले शाळेची स्थापना होती. ज्या मध्यें तुमच्या मनाची सर्व शक्ति लागेल, व ज्या विषयीं तुम्ही नेटानें सिद्दीत जावें असा जो विषय त्या विषयीं तुम्ही इतके मंद कां अहां ? सुधारणेचें काम चालू झालें म्हणजे तुमच्या स्त्रियांचे शिकण्यास ज्या हरकती त्या अशा दूर होतील की सूर्योदय होऊं लागला म्हणजे जसा अंधार जातो त्या प्रमाणें त्या नंतर म्हणू नका कीं मुलींस शिकवावें ही आमची चाल नाहीं. ज्या विख्यात एतद्देशीय ग्रहस्तास अलि-कडेस जस्तिस आफ पीसचीं कामें मिळालीं व " इस्कायर " हें पद ज्यांस मिळालें त्याणी तरीं ही आमची चाल नाहीं असेंच म्हणून तें प्रतिष्ट काम पत्तकरिलें नसतें. थोडक्या दिवसापूर्वी जगन्नाथ शंकर शेट इस्कायर, जम-शेटजी जीजी भाई इस्कायर, इब्राहिम महंमद मकबा इस्कायर इत्यादिकांस युरोपीयन म्याजिस्त्रेटांबरोबर म्याजिस्त्रेटाचें काम चालवितां कोणी कधीं ऐकिलें किंवा पाहिलें काय ? आपल्या बायकांस व मुलींस व इतर एतद्देशीय स्त्रिया यांस शिकवावें अशी आपली चाल नाहीं म्हणून ते जी हरकत करतात त्या प्रमाणें ते म्याजिस्त्रेटांची कामें पत्कारावयास हरकत करते तर त्यांत ींहीं वाकडें न दिसतें. या समयीं मताभिमान जाऊन विचार प्रबल झाला, व मूर्खत्व जाऊन चातुर्य प्रबळ झालें. आणि हा मला संतोष वाटतो. आणि एतद्देशीय लोकाचे सुधारणेचे कामात मताभिमान व मूर्खत्व जाऊन विचार व

चतुराई प्रबल झाली असे पुढें मोठे मोठे दाखले येतील याचा सूचक असा मी हा दाखला मानतों. हे एतद्देशीय म्याजिस्त्रेट लोक व दुसरे एतद्देशीय ग्रहस्त हे इंग्रेज लोकां बरोबर म्याजिस्त्रेटाचे कामावर, व ज्युरींत व शिकविण्याचे व दुसऱ्या परोपकारी खात्यांचे मंडळींत बसतात, त्यांच्या बायका व मुली इंग्रेजांच्या बायका व मुलीं यांबरोबर स्त्रियांचे शिकण्याचे व दुसऱ्या धार्मिक खात्यांचेमंडळींत बसतांनाजेव्हां आपण पाहू तो दिवस फार दूर नाहीं असें मी इच्छितों. मी हे स्वप्न पहात आहे व उगीच कल्पना करीत आहे असें म्हणूनका. असें कां होईल. या देशांतील स्त्रियानी या प्रमाणें मानाप्रत्त पावावें व तारा सारिखें प्रकाशावें यास कोणती अनिवार विघ्ने आहेत? त्या ज्या वरून प्रतिष्ठा पावतील व उपयोगी होतील अशी त्यांची बुद्धि व धर्मनीति सुधारणार नाहीं असें तुम्ही म्हणतां काय? हा त्यांचे बुद्धिवर व धर्मनीती वर अपवाद आहे, तो स्त्रियांनी मूर्खत्वांत बटकी सारिखें राहावे म्हणून जे इच्छितात त्याणी बनावन प्रसिद्ध केला आहे. त्यांस मूर्खत्वाची व दास्यत्वाची आवड आहे विद्येची व बुद्धिची इच्छानाहीं असें तुम्ही म्हणता काय? हें कांहीं खरें असेल कांकीं त्या सुखाचा त्यांस स्वाद नाहीं, व त्यांची शक्ति त्यागी जागली नाहीं. त्यांना बंदींतून काढा, त्याना विचार व विद्या करूं द्या, व त्याचे सुखाचा त्यांस स्वाद घेऊं द्या, मग तुम्हास लौवकरच दिसून येईल कीं त्यांस आपण अमर असें वाटू लागलें, आणि इंग्रेज लोकांचे स्त्रिया सारिख्या त्या हिमतानें चालतील व दुसऱ्यांचे दर्द जाणतील व त्यांचे सुखा करीतां चतुराईनें युक्ति योजतोल. याचे विरुद्ध तुमची चाल व लोकमत आहे असें तुम्ही म्हणतां काय? हें कांहीं खरें आहे; परंतु या विषयीं सुधारणा व्हावी म्हणून लोकांत बुद्धि उत्पन्न झाली आहे, आणि हें लोकमत व चाल लवकर पालटेल. तुमचे लोकांतील जों शाहणी तरूण मनुष्यें आपल्या बायकांस शिकवावयास उत्कंठित झाले आहेत त्यांस एतद्देशीय म्याजिस्त्रेट लोक व वर्तमान पत्रवाले इत्यादिकांनीं मिळून ही चाल व हें लोकमत पालटावयास एक भगीरथ प्रयत्न करावा म्हणजे कार्य झालें. एतद्देशीय ग्रहस्तांचे मुलींस शिकवावयाकरितां योग्य शाळा नाहीं असें तुम्ही म्हणतां काय? तर तुम्हां लोकांतील श्रीमान

लोकांनी एक इमारत बांधावी, व आपल्या मुली व बायका हि तेथें पाठवावयाचा निश्चय करावा, आणि एक शहाणी बायको लवकरच मिळेल. परंतु अशी शाळा घालावयास फार दिवस पाहिजेत असें तुम्ही म्हणतां ? याचें कारण काय ? जेणें करून मोठे लाभ होतील अशा कार्यांत एतद्देशीय लोक एकदां प्रवृत्त झाले म्हणजे तें कार्य सिद्धीस न्यावयास तें त्वरा करतात अशी त्यांची कीर्ति आहे. आपल्या मुलींस शिकविल्यानें जे लाभ होतील त्या पेक्षां अधिक असें कशापासून त्यांस लाभ होतील ? वाफयंत्राने गलबतें चालविण्याकरतां त्यांणी हजारो रुपये दिले आहेत त्या पासून त्यांस जे लाभ होतील त्यांहून शतगुणें यापासून होतील. एक सभा करून हा विषय कसा आहे त्याची छान करावी व टीप-चालवावी, व घर घेण्याकरितां एक मंडळी नेमावी म्हणजे शाळेची एका महिन्यांत स्थापना होईल, आणि असें झालें तर लेडी आद्री व मिस्त्रेस बेली, व मिस्त्रेस ग्रे इत्यादि आणि जगन्नाथ जी शंकरशेट व जमशेटजी जी जी भाई व महंमद इब्राहिम मकबा इत्यादीकांचा स्त्रिया मुलींस शिकविण्याचे व दुसऱ्या परोपकारी खात्यांचे मंडळांत बसल्या म्हणजे माझे मनोरथ पूर्ण होतील. आणि जगन्नाथजीं शंकरशेट यांची स्त्री व घागजी यांची स्त्री इत्यादि जगन्नाथजी व बागजी यांच्या बरोबर बसून ईश्वराचे घरचे चमत्कारांवर विचार करीत करीत व एका चांगल्या कवीच्या गुणांची चवकशी करीत करीत व उपयोगी बेत करीत करीत एका उघड्या गाडींत हवेवर फिरावयास जातां पाहिल्यावर माझे चित्तास थोडेच कांहीं समाधान होणार नाहीं ? त्यांच्या घरीं गेल्यावर त्यांच्या घरांत सुंदर व चांगल्या चांगल्या वस्तू आहेत इतकेच नाहीं, परंतु चांगल्या व्यवस्थेनें व जिकडच्या तिकडे ठेवल्या आहेत असें पाहिल्यावर मला कांहीं कमी आनंद व्हावयाचा नाहीं. आणि कांहीं वेळ वाद्ये वाजविल्यानें सांप्रतच्या काळचें उपयोगी गोष्टीवर कांहीं भाषण केल्याने व घरांतील मुलींची नाकारो काढण्याची व शिवण्याची व वाक्ये रचण्याची परिक्षा घेतल्यानें बोलतां बोलतां आनंदानें एक तास जाईल.

ता. २ वी मे १८३४

तुमचा मित्र,

**अशाकरणारा**

# रुक्मीणी व स्त्रीशिक्षण

[ **असल पत्रें.** तारीख २८ माहे मार्च सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांसः—

विनंती विशेष खालीं जे म्या हिंदुलोकास पत्र लिहिलें आहे, तें आपण आपल्या पत्रांत छापलें असतां मजवर आपला मोठा उपकार होईल.

हिंदुलोक हो.

ज्या विषयावर मी हें पत्र लिहितों त्यावर यद्यपि मला स्मरण आहे कीं, कांहीं दिवसामागें दर्पणाचे पत्र लिहिणारांतून कोणीं एकानें एकपत्र लिहिलें होतें. तथापि तुम्ही म्हणता कीं त्याविषयीं आपल्या शास्त्राची आज्ञा नाहीं, व तद्विषय संबंधी जो उपयोग व अवश्यकता ती, तुम्हीं तुच्छ करितां यास्तव, त्याच विषयीं पुनः तुम्हांस श्रम देऊन तुमच्या लक्ष्याची अपेक्षा केली असतां त्यांत मजकडे कांहीं दोष येणार नाहीं. नुसत्या मजकडेस नाहीं असेंही नाहीं, परंतु जावत्काळ पर्यंत आपण तद्विषय संमंधी जी सत्यता, व तसें करणें मनुष्याचा म्होटा धर्म होय असें जाणलें नाहीं तो काळ पर्यंत दुसरे कोणीही या विषयावर पत्रें लिहीली तरी त्यांज कडेसही दोष येणार नाहीं. मी जो विषय सांगतों तो हा कीं स्त्रियांस शिकवणें या गोष्टीचा उपयोग व अवश्यकता मला वाटते. आपल्या मनांत अगदीं बाणली नाहीं, इतकेंच केवळ नाहीं, त्यातल्यातून कित्येकांस ही गोष्ट इतकी वाईट दिसतें व तीज विषयीं त्यांस इतकें वाईट वाटतें कीं, तें पाहून मला माझा निश्चय सांगतां येत नाहीं कीं तुम्हा सर्वांचे मनांत खरेपणा भरविण्याचें जें काम म्या पत्करलें आहे त्यांत माझा शेवट नीट होईल कीं, नाहीं. आपल्यातून कित्येकांस स्त्रियांस शिक्षा देणे हें कुमार्गीं लावणें असें वाटतें; ती जर शिक्षा न केली तर ते त्या मार्गीं त्याच्या दुष्ट वासना बहुधा जाणार नाहींत असें वाटतें. ही गोष्ट खरी करावी म्हणून ते म्हणतात कीं आपल्या शास्त्र कर्त्या ऋषीनें स्त्रियांस शिकविणें मना केलें आहे, हें निमित्त ठेवून ते म्हणताण कीं स्त्रीयांस शिक्षा दिली

असतां त्याची मनें चांगली व्हावयाचीं व त्यांचा स्वभाव दयाळू व्हावयाचा तो एकीकडे राहून उरफऱ्या त्या हरामी आणि दुष्ट होतील. मला जर पुसाल तर मला म्होटें आश्चर्य वाटतें कीं ते शिक्षा किंवा शिकवणें म्हणजे काय समजतात; मला भय वाटतें कीं त्यांना शिकाविणें म्हणजे लावण्य किंवा दुसऱ्या कांहीं शृंगारी रसाचीं पुस्तकें पढविणें असें वाटत असेल, परंतु नाहीं अशी कांहीं गोष्ट नाहीं, जे मन पूर्वी दुष्ट व पापी होतें ते चांगलें करण्याचें नांव शिक्षा तर मग आतां ती तुम्ही आपल्या स्त्रियास देण्या विषयीं कोणता संशय धरतां? अद्यापि तुमचें मनांत संदेह आहे कीं, आपल्या ऋषीने ती गोष्ट करावयास सांगितली नाहीं. मी तुम्हांस वास्तविक सांगतों की तुम्ही ऋषिवाक्य नीट न समजतां आपणाहीच आपल्यांस फाशिवलेत, त्या वाक्यात अशी आज्ञा आहे कीं, स्त्रियांस वेद शिकवू नयेत, याचे कारण काय याविषयीं शोध करणे मला निरर्थक वाटतें. आणखी दुसरे स्त्रियांस वेदा सारिखें थोर पुस्तक अर्थ समजल्या वाचून श्रम पूर्वक मुख पाठ करुन बोलावे हे ही मला आवडत नाहीं.

कृष्णाची पत्नि रूक्मिणी, तीणें आपल्या बायकासाठीं एक चांगला दाखला ठेवला आहे. कांकीं जेव्हा तिचा भाऊ आपल्या बापाचा तिला कृष्णास देण्याचा निश्चय मोडूं लागला, त्याकाळीं तीणे स्वतः आपण एक पत्र लिहून कृष्णास पाठविलें व तो आपणास भ्रतार असावा हा जो मनोरथ तो पूर्ण केला यावरून असें दिसतें कीं ऋषिने स्त्रियांस पठविण्या विषयी, जो प्रतिबंध केला तो नुसत्या वेदाविषयीं तर मग आतां त्यांस शिकविण्याविषयी, कांहीं ती आशंका उरली नाहीं येथें मी आपलें पत्र संपीवतों व तुम्हास कबूल करतों कीं पुढल्या वेळीं स्त्रियास शिक्षा केल्याचा उपयोग कोंणता व त्यांस शिक्षा होणे अवश्य आहे या विषयावर हाक पत्र पाठवीन हे विनंती.

**तुमचा परमस्नेहांकित**
**कित्येक हिंदु चाली बऱ्या व्हाव्या**
**या विषयीं एक उत्कंठित.**

# 'दुराग्रही चालींवर' झोड

[ तारीख ६ जून सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांसः—

महाराज, तुमच्चें गेल्या कागदांत स्त्रियांचे शिकण्या विषयीं एक पत्र मी वाचलें त्यावरून माझें मनांत आलें आहे कीं याविषयीं विचार लिहावें. ते जर तुम्हीं आपल्या उपयोगी कागदांत छापाल तर पाठवितो. स्त्रियांस शिकविणें हें हिंदुस्थानातील लोकांत दुर्लभ आहे, असें सर्वांस माहीत आहे. परंतु कांहीं स्त्रिया गुप्तपणें शिकल्या आहेत असें खचित वाटतें. याविषयीं मी खचित बोलतो कीं, ब्राम्हण जातीच्या दोवां बायकांस बालबद मोडीचीं कागद चांगलीं व शुद्ध वाचतां मी ऐकलें. त्यांतून एकीस एका उत्तम प्रतिचे कारकुना सारिखें लिहितां येत असे. स्त्रियांस शिकविल्यानें काय लाभ होतील ते तुमचे लोकांतून बहुतेकांस माहीत आहेत असें मला वाटतें, परंतु त्यांच्या दुराग्रही ज्या चाली आजपर्यंत चालत आहेत त्यावरून त्यांस आपल्या स्त्रियास ही अमोलिक वस्तु देववत नाहीं परंतु त्यापासून जे लाभ होतात त्यांचा ते विचार करतील तर याचालीचा त्याग करण्यास त्यांस चांगलें कारण दिसेल, व आपल्यास जेणें करून अधिक सुख होईल असा जो मार्ग तो धरतील असें मनांत आणा कीं कांहीं नाइलाज गोष्ट होऊन कोणे एक माणूस आपली अविज्ञान स्त्री घरीं ठेवून दूरदेशीं जावे लागले तेथून तीस नेहमी पत्रें पाठवितो आणि ती पत्रें पोहचलेवर ती वाचावयास तिला दुसऱ्या मनुष्या जवळ जावें लागतें व त्यांची उत्तरे पाठवावयास तिला पुनः तसेंच करावें लागतें. आतां मी पुसतो कीं तिला जर आपलें विचार लिहितां येते व तें करावयास तिला दुसऱ्याचें अगत्य न पडतें तर उभयतां स्त्री पुरूषांस आनंद न होता काय ? जर ती आपल्या नवऱ्यास स्वतः लिहिती तर दुसऱ्यास सांगतां येत नाहींत अशा गोष्टी व मनांतील विचार ती किती लिहीती बायकोच्या तर्फेनें कोणी कारकून जी पत्रें लिहितो त्यांत कांहीं प्रीतिचे

भाषण नसतें अशी नवऱ्यांस आतां आपल्या बायको कडून पत्रें येतात, परंतु जर तीच स्वतः लिहि तीतर त्या पत्रांत सारीं प्रीतिचीं व लोभाचीं भाषणें असतीं, ती लोभ व प्रीति दूरदेशीं बहुत दिवस राहिलें असतां हि तिळप्राय कमी होत नाहीं.

ता. २३ वी एप्रिल १८३४

दएदक्षणी.

---

## स्त्रीशिक्षणा बद्दल दृष्टांत

[ तारीख ४ जुलै सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांसः—

विनंती विशेष स्त्रियांनी विद्या कला शिकाव्या या विषयीं दृष्टांत व्योम संहितेंत सांगितले आहेत. उत्तम स्त्रियांस वेदाधिकार हि आहे, तो कसा, यज्ञाचे मयीं अग्नीस आहुति देते समयीं स्त्रियेनें वेद मंत्र म्हणून आहुति द्यावी लागती. या प्रमाणें पूर्वींपासून चालत आले आहे. मुख्य देवाच्या त्यांची नांवें शशी म्हणजे इंद्राची स्त्री, यमी म्हणजे यमाची स्त्री, ऊर्व्वशी म्हणजे देवांगना, यां शिवाय कित्येक अन्य स्त्रिया त्याच्या अधिकारी आहेत. दुसरा प्रकार कर्म मिमांसा या शास्त्रांत निषादस्थ पत्याधिकरण आहे तो पहावा. निषद म्हणून भिल्लाचा राजा होता. त्याने यज्ञ केला तेव्हां स्त्रिया सहवर्तमान वेदमंत्र म्हणून अग्नीस आहुति देऊन यज्ञ शेवटास नेला. या प्रमाणें पूर्व वृतांत आहे. तर या आधारा वरून स्त्रियांनी विद्या शिकून सुबुध्ध आणि चतूर व्हावें म्हणजे परंपरा विद्या विशेष होऊन सर्व लाभ होतील. आणि मुलांस विद्येविषयीं फार श्रम पडणार नाहींत. लवकर विद्या शीकून सिद्ध होतील.

" अदूरपयुत्तम स्त्रीणामधिकारस्तु ॥

यथोर्व सीयमीचैव शच्चाद्याश्च तथापरा ॥

बा. व.

---

# पार्लमेंटांत सुधारणा कायदा

[ तारीख २ माहे मार्च सन १८३२ ]

आम्ही पहिले कागदांत लिहिले होतें कीं विलायतेंतील लोक त्या देशाचे राज्य रीतीत फेरफार करण्याचा उद्योग करीत आहेत: तो असा कीं जेणें करून पार्लमेंटमध्यें लोकांकडचें बोलणें बोलणारे प्रांतो प्रांतांतून पाठवितात त्या रीतींत जे दोष शिरले आहेत ते जावे; साधारण स्थितीचे लोकांस राज्य कारभारांत अधिक सत्ता मिळावी, आणि प्रजांचा अस्वार्थ करून मोठे स्थितीचे लोक ज्या सत्तेचे योगानें आपलेंच हित साधतात, ती कमी व्हावी. असें आम्ही लिहिलें होतें याची वाचणारांस विस्मृति पडली नसेलच. ही गोष्ट सिद्धीस नेण्याचा कायदा, ज्यास बहुत करून रिफार्म बिल असें म्हणतात तो लॉर्डांचे सभेंत ४६ अधिक संमति पडून रद्द झाला ही आम्हांस फार वाईट गोष्ट वाटली. तो कामन्स यांचे सभेंत बहुत अधिक संमति पडून मुकरर झाला होता, आणि त्यास राजा अनुकूल आहे हें ठाऊकच आहे. तो कायदा रद्द झाल्यास काय गोष्टी घडून येतील हें पूर्वी भविष्य केलें होतेंच त्या प्रमाणें मोठे स्थितीचे लोकांतून जे त्या कायद्यास विरुद्ध झाले त्या विषयींची लोकांची द्वेषबुद्धि फारच वाढली; आणि त्या लोकांतून कित्येकांवर लोकांनीं हल्ला करून त्यांचे शरीरास दुखापत केली. कंबर्लंडाचा डयुक राजाचा भाई त्या कायद्यास विरूद्ध झाला म्हणोन त्यास घोड्यावरून पाडून धक्काबुक्की केली; वेलिंगटनाचा डयुक, जो या देशांत जनराल वेलसली या नांवानें प्रसिद्ध आहे, त्याचे रथावर लोकांनीं दगड व चिखल मारून रथ फार खराब केला; एके लार्डावर हल्ला करून त्याचे शरीरास दुखापत केली; एकाचा वाडा जाळून टाकिला; आणि दुसऱ्यानें तसें होईल या भयानें तोफांचा बंदोबस्त केला. एके शहरांत लोकांस हटवायाकरितां लढाऊ लोक बोलाविले होते. लोकांतून सात तेथेच मेले. देशांत सगळे ठिकाणीं मिळोन सुमार २०० घरें जाळली; आणि दुसरा मोठा अनर्थ केला. शेवटी बातमी आली त्या तारिखेस ही गडबड पुष्कळ कमी झाली होती असें दिसतें कीं

जा कायद्याची लोकांस इतकी इच्छा आहे, तो ठरवून खचित घेऊं असा राजाचे प्रधानांनीं आपला निश्चय जाहीर केला आहे; आणि त्यांचे मनांत आहे कीं तो आपला निश्चय सिद्धीस जाईल. जापेक्षें सर्व लोकांस त्याचें अगत्य आहे, ते निर्भय पणानें तो असावा असें म्हणतात, आणि तो होण्याचा त्याणीं निश्चय केला आहे त्यापेक्षें तो काही वेळ पर्यंत तकूब मात्र राहील; कारण कीं जेव्हां सर्व राज्य एक मतानें आपले सत्ते विषयीं उद्योग करितें, तेव्हां थोडे स्वार्थी लोकांचा विरुद्ध पणापासून काय व्हायाचें आहे ?

---

## गायकवाडांचा बंदोबस्त

[ तारीख २ माहे मार्च सन १८३२ ]

ज्यानेवारी महिन्याचे २६ तारिखेचे हर्कारूंत गवर्नरसाहेब अजमीरास जातेवेळेस बडोद्यास होते, तेव्हां त्यांची आणि गायकवाडाची भेट झाली तें वर्तमान छापले आहे. त्यावरुन असें वाटतें कीं गेले नवंबर महिन्याचे २६ तारिखेस सयाजीराव याणी मोठा समारंभ करून गवर्नर साहेबांस संतुष्ट केलें. आणि २८ वे तारीखेस माहाराज परत गवर्नर साहेबांचे भेटीस आले. त्या प्रसंगीं त्या दोघांचा आपापले मरातबा प्रमाणें एकमेका पासून सत्कार झाला, नजरा देण्याचा बहुमान चालीं प्रमाणें झाला, व गवर्नर साहेब आणि महाराज यांचें स्वच्छमनानें आणि स्नेहाचे रीतीनें भाषण झाले. हें वर्तमान लिहिणारानें असें लिहिलें आहे; "जेव्हां सन १८२० त मौन्स्तुआर्ट एलफिस्तन साहेब मुंबईचे गवर्नर हे बडोद्यास गेले होते, तेव्हा त्याणी मोठे आदरानें व प्रीतीनें महाराज सयाजीराव गायकवाड बहादुर यांची भेट घेतली; आणि त्यावेळेस कंपनी सरकार व गायकवाड सरकार या दोहोंची दोसती वाढली." याच रीतीनें चालते तद्वाप्रमाणें महाराजाशीं स्नेहानें व्यवहार

करावा अशी आपली इच्छा लॉर्ड क्लेयर साहेबांनींही प्रगट केली, आणि असें करून कंपनी सरकारची व आपली किर्ती सर्वत्र वाढविली.

पूर्वीं कितेक अविश्वासु पुरुष महाराजाचे शत्रू यांणी मुंबईचे पूर्वींचे गवरनर सर जान मालकम यांचे कान फुंकले. ाणि त्यांणीही महाराजा विषयीं असंभाव्य खोट्या गोष्टीवर विश्वास ठेविला. संवत १८८६ म्हणजे सन १८२९-३० त जेव्हां सर जान मालकम साहेब बडोद्यास आले, तेव्हां त्याणी या लबाड बातमीचा तपास न करितां महाराजानें बोलावणें पाठिवलें तें मान्य केलें नाहीं किंवा तहाचा करार कंपनी सरकारनें मोडला असें त्यांचें म्हणणें आहे तें कांहीं मनास आणिलें नाहीं. हें सर्व पाहून माहाराजास फार दुःख आणि चिंता झाली होती. ती लार्ड क्लेयर साहबांनीं बडोद्यास आल्यावर लागलीच दूर केली. त्यांणी बडोद्यास असताना स्वतः महाराजाचे तोंडून सर्व त्याचा फिर्यादी ऐकून घेतल्या, आणि त्याचे मनांत असें आणून दिलें. कीं शेवटीं या गोष्टीचा पक्षपातावांचून विचार होऊन न्यायाप्रमाणें व तहाचे करारा प्रमाणें वहिवाट होईल; आणि आपला सरळ स्वभाव; उत्तम गुण, चांगली बुद्धि आणि बेत निष्कपट हें त्यास समजाविलें. नवंबर महिन्याचे ३० वे तारिखेस लार्ड क्लेयर साहेब लॉर्ड विलियम बेंटिंक साहेबास भेटाया करितां पुढें अजमीरास निघोन गेले. त्यांची भेट झाल्यानंतर लार्ड क्लेयर साहेब पुनः बडोद्यास येतील; तेव्हां एलफिन्स्तन साहेबांचे वेळेस जसा गायकवाडांचा बंदोबस्त होता, तसा पुनः होईल अशी महाराजास अशा आहे.

---

## सुप्रीम कोडताचा निकाल

[ तारीख २ माहे मार्च सन १८३२ ]

गेले महिन्याचे ८ वे तारिखेस मद्रासचे सुप्रीम कोर्टांत एक मोठे कजाचा निवाडा झाला. त्याची हकीकत गेले शनिवारचे कुरियरांतून काढून खाली लिहिली आहे.

" कृष्णनामा चिती म्हणोन कोणी विभक्त झालेले कुटुंबाचा पुरुष होता. त्या जवळ पुष्कळ द्रव्य होतें. त्यांतून बहुत करुन त्याणे स्वत: मिळवलेले होतें. त्याचे पाठीमागें बायको आणि मुलगा हीं दोघें होतीं. त्याणें आपले मृत्यू पत्रांत असी व्यवस्था केली होती कीं आपले द्रव्यांतून बहुत करून सारें द्रव्य आपले भावांस मिळावे, आणि मुलास फार थोडें मिळावें. त्यानें आपले बायकोचे चरितार्थास कांहींच तोड केली नव्हती. म्हणोन बायको आणि मुलगा याणीं त्याचे भावांवर फिर्याद केली, ती अशी कीं, तें मृत्युपत्र हिंदुशास्त्राचे मताप्रमाणें झालें नाहीं. सबब रद्द करावें. ते भाऊ ही त्यानें आपल्या मागें कारभार करायास नेमिले होते. हा मुकदमा सर्व ऐकून घेऊन कोर्टानें मृत्युपत्र कायम आहे असा हुकूम केला."

तो मुकदमा कोडतानें फिरुन ऐकून घेतला; आणि वादीकडचे वकील म्हणो लागलें कीं मृत्युपत्रें हिंदुशास्त्रांत प्रसिद्ध नाहीं आणि आपले वारिसदारा वांचून आपला वित्त विषय दुसऱ्यास देण्याचा अधिकार हिंदूस नाहीं. या मुकद्दम्याचा निवाडा सांगते वेळेस मुख्य न्यायाधीश सर आर. पामर साहेब याणीं हिंदूस आपण मिळविलेले आणि विभक्त संपत्तीचा विनियोग मृत्युपत्रेंकरुन करण्याचा अधिकार आहे असें कोंडतास पूर्वीं ठरलें होतें, असें न्यायाचे बहुत दाखल सांगितले मग अशे संपत्तीचा केवढे भागाचा विनियोग करायास शास्त्रांत अधिकार आहे हा विचार करुं लागलें. आणि स्वेछेनें आपली संपत्ति दुसऱ्यास देण्याविषयी जो शास्त्रार्थ आहे, तोच आधार एथे कल्पून त्याणीं सांगितलें की मृत्युपत्र मुकरर आहे असें माझे बुधीस येतें. मग पूर्वींचा हुकुम मुकरर केला.

# सरकारी नोकऱ्यांचें 'हिंदीकरण'

[ तारीख १३ माहे आप्रील सन १८३२ ]

राज्य कारभारांतील कित्येक खात्यांत, विश्वासाचे अबरूचे, आणि जोखिमाचे जागांवर या देशचे लोकांस नेमले असतां चांगले राज नीतीस योग्य आहे आहे किंवा नाहीं, या गोष्टीचा विचार एथील सरकार आणि कोर्ट, आफ डरेक्टर यांणीं बहुत वेळ केला आहे; आणि सरकार कारभाराची वहिवाट जांचे स्वाधीन केली असतां चिंता नाहीं आणि स्वार्थ आहे, असे योग्य आणि उद्योगी पुरूष या देशचे लोकांत नेहमी आढळतात; असें मोठे, सत्यवादी, आणि फार पहिलेले कंपनीचे चाकरातून बहुतांनीं सांगितले आहे, तथापि आजून या देशांतील लोकांतून कोणाची नेमणूक मोठ्या जागेवर झाली नाहीं.

इकडे इतबाराचे अबरूचे आणि लाभाचे सर्व जागा पासून सारे लोक दूर ठेवणें, आणि आयोग्यतेचा डाग त्यांस लावणें (जो त्यांस योग्य नव्हे असें अनुभवावरून कळूं येतें ) या गोष्टींचा क्रूरपणा आणि अयोग्यता अशी उघडी आहे, कीं उदारपणा, शाहाणपणा आणि ईश्वरानें अपले अमलाखालीं जे लाखों लोक आणिले आहेत त्यांचे कल्याणाची इच्छा यांचे जें स्वरूप या मोठे राज्याचे कारभारांत राखण्याचा अभिमान सांप्रतचे आमचे प्रभु ठेवितात, तें स्वरूप अशे रीतीचे वहिवाटीनें किती नाहीं असें होतें हें उघड ध्यानांत येतें. या रीतीनें फार दिवस एथील लोकांचा अधिकार सरकारानें लक्ष्यांत आणिला नाहीं म्हणोन वाईट वाटावें खरें; परतु गेलें त्याचा शोक करणें हें सोडून देऊन सांप्रत आमचे राजांचे लक्ष्यांत जो चांगला फेर पडत चालला आहे त्याचा गोष्टी बोलाव्या हें आम्हास चांगलें वाटतें. बंगाल आणि मुंबई एथील सरकारांनीं नेटिव जड्ज व कमिशनर यांस मोठा अधिकार आणि मोठी प्राप्ति करून देण्याकरितां जे कायदे केले आहेत त्यांवरून सरकारचे लक्ष्यांत फेर पडला असें ध्यानास येतें.

ही आनंदाची गोष्ट पाहून उपकारी व्हावें हें आम्हास योग्य आहे,

तसेंच या रीतीनें जोखिम आणि विश्वास आमचे लोकांवर सरकारानें ठेविला, तो चांगले रीतीनें पार पाडावा हा त्यांचा धर्म आणि त्यांत त्यांचे हितही आहे. आतां त्यांस कामें सांगितली आहेत. त्यामध्यें त्यांचे वर्तणुकीवरून असें लक्ष्यांत यावें कीं या देशचे सर्व लोकांत बुद्धि, प्रमाणिकपणा, आणि मोठमोठे जोखिमाचे व आबरूचे जागांवर जे गुण पाहिजेत ते नाहींत असें जे कित्येक म्हणतात, तें अज्ञानामुळें, हलकेपणामुळें, आणि द्वेषामुळें, असें जर त्यांचें वर्तन दिसलें नाहीं तर त्यांस यापेक्षां मोठे उद्योग मिळतील अशी जी आशा आहे ती धरून फळ नाहीं असें होईल. या हिंदुस्थानांतील राहणारे नाना प्रकारचे लोकांत कित्येक असे असतील खरे कीं जे बाहेरून योग्य दिसतात; आणि वास्तविक पाहिले असतां मोठीं विश्वासाचीं कामें करायास योग्य नव्हत; परंतु ही गोष्ट जा लोकांत नाहीं असे लोक कोठें आहेत? इकडे देशचा बखरा, आणि लोकांची स्थिति पाहिली असतां या देशचे लोकांत बुद्धी, आणि नीति यांचे दाखले बहुत आढळतात; कीं नेटिव लोकांमध्यें मोठीं कामें व जस्तिस अफ दि पीस याचें सोपें काम कराया जोगे, बुद्धिवान, बहुश्रुत, आणि प्रमाणिक लोक सांपडणार नाहींत असा जो कित्येकांचा सिद्धांत आहे तो जा दाखल्यांवरून खोटा करितां येतो. अशे लोकांस आम्ही विचारूं कीं जा जड्जाचे जागेवर सांप्रत या देशचे लोकांस ठेवितात, आणि खालचे अंमलदारांनीं केलेले न्यायाची पुनः चौकशी करण्याचा अखत्यार देतात त्या जागेवर किंवा तालुक्याचे जमाबंदीचे किंवा दुसरें कोणतें कारभार खात्यांतील काम चालवायास जे गुण पाहिजेत, त्यापेक्षें जस्तिस आफ दि पीस याचें काम चालवायास अधिक पाहिजेत कीं काय? असे लोकांचे मनांत काय असेल तें असो; परंतु इतकें एक समजून मनास संतोष वाटतो कीं आमचे राजांचें आम्हाविषयीं चांगलें लक्ष्य आहे, आणि आम्हास एकवेळ तपासून पाहावें असें त्यांचे मनांत आहे. आणि जर त्यांमध्यें आमचे देशचे लोक प्रतिष्ठेनें आणि योग्यतेनें निभावले, तर लवकरच त्यांस योग्य असे यापेक्षें मोठे रोजगार त्यांस सांगून त्यांचें कल्याण करायाची आपली इच्छा सरकार प्रगट करील असी त्यांणीं आशा धरावी. अशी ही उत्साहाची मोठी गोष्ट मनांत

आल्यानें जे कित्येक लोक मुलांस विद्या शिकविण्यामध्यें आपला मोठा स्वार्थ असतां त्या विषयीं उदासीनपणा धरितात. तो त्यांचा उदासीनपणा जाईल. विद्येचीं फळें कित्येकांचे इतकीं ध्यानांत येत नाहीं कीं, ते आपणास जितकें सामर्थ्य आहे तितकाही विद्याभ्यास मुलांकडून करवीत नाहीं. त्यांस वाटतें कीं सांप्रतचे वहिवाटीचे रीती मार्गे जा हलक्या आणि पराधीन जागांची मुलास अशा असल्ये, त्यांत जितकी विद्या पाहिजे तीपेक्षें अधिक, शिकविणें हा व्यर्थ श्रम, आणि यांत फुकट पैसा खर्च होतो. आतां सांप्रतची आमचे देशचे लोकांस मोठ्या जागा न देण्याची रीति जाऊन तीपेक्षें उदार पद्धति पडत आहे.

असा उदासीनपणा सांगितला खरा; परंतु आलीकडे थोडे वर्षांत या देशचे लोकांत विद्येचा प्रसार त्वरेनें होत चालला आहे; आणि आतां नवे तरणे लोक बहुत तयार होत चालिले आहेत, असें पाहून आम्हांस गर्व आणि संतोष होतो. कीं ज्यांची इंग्रेजी भाषेत प्रवीणता, युरोपियन विद्यांची माहीत-गारी, आणि बहुश्रुतपणा पाहून वाटतें कीं त्यांस जितका योग्य तितका राज्य-कारभार प्रतिष्ठा आणि अबरू ही मिळायाचा दिवस लवकरच येईल.

हिंदुस्थानचे पूर्वील राजांचे अंमलांत गोष्टी अशा होत्या; आणि जे ज्ञानापासून आपल्या बुद्धि चांगल्या झाल्या आहेत आणि मनें उदारपणानें भरली आहेत, असा गर्व ठेवितात, त्या सांप्रतचे आमचे प्रभूंनीं आमचे लोकावर क्रूर आणि अभिमानी मुसलमानां पेक्षें दया कमी करावी काय? सर टामस मन्रो साहेबानी लिहिलें आहे कीं सर्व मुसलमान राजांचे अंमलांत हिंदुस्थानचे लोकांस राज्यांतले मोठे मोठे अंमल मिळत असत. इंग्रेज सरकारांत मात्र त्यांचा हा स्वार्थ बुडाला; आणि त्यांस सरकारी कामें सांगितली तरी हलक्ये चाकरांपेक्षें त्यांची अबरू फारशी अधिक असत नाहीं असें झालें. ही त्यांची अप्रतिष्ठा फार दिवस राहणार नाहीं अशी आम्हांस खातर आहे. एल्फिन्स्तन साहेब, कीं जांपेक्षें राजमसलतीविषयीं किंवा उदार मनाविषयीं मोठा पुरुष हिंदुस्थानात कधीं दिसला नाहीं, त्यांचें मत होतें कीं विद्या वाढूं लागली म्हणजे राज्यांतली मोठमोठी कामें या देशचे लोकांस द्यावी असें

आपाप जरूर होईल. आणि अंतस्थ राजमसलती आणि लढाईतील मोठे अंमल यावांचून इतर सर्व ठिकाणें त्यांस सोई पाहून मिळाया जोगीं करावीं, आणि शेवटी तीं सर्वें त्यांसच मात्र मिळावीं, असें करणें हें राजनीतीस योग्य आहे

अशी वहिवाट झाली असतां आमचा लोकांचें ही कल्याण होईल, आणि राज्य करणारांस ही बरें होईल. दुसऱ्या एके कंपनीचे मोठे चाकरानें म्हटलें आहे. "अबरूचा आणि लाभाचा जागांवर या देशचे लोक नेमिले तरच त्यांची प्रीति सरकारावर बसेल. लोकांची मालमत्ता निर्भय राहिली आणि जर प्रतिष्ठा इत्यादि मिळवायाची वाट त्यांस नाहीं तर तितक्यानेच ते संतुष्ट होतील असें मानणे हें व्यर्थ. असें यांस दूर ठेवण्यानें गुण उदासीन होतात, कुळाचा गर्व कमी होतो, आणि हलके लोकांवाचून सर्वांची निराशा होत्ये. जा रोमन लोकांचें काम राज्य घेणें हें होतें, आणि जांचा अंमल सज्ञान देशांत बहुत करून सर्व ठिकाणीं होता त्यांचें आचरण लक्ष्यात धरून या देशांतील लोकास स्वाधीन करून घ्यावे. ते चतुर लोक घेतलेले राज्यांतील कारभार बहुत करून तेथील लोकांजवळ ठेवीत असत."

## राममोहन राय (१)

[ तारीख १३ माहे आप्रील सन १८३२ ]

सिवर्न गलबतांतून एक पत्र आलें त्यावरून आम्हास कळलें कीं पार्लमेंटानें राम मोहनरायास हिंदुस्थानचे, जमाबंदी प्रकरणीं, न्याय प्रकरणीं आणि व्यापार प्रकरणीं कितेक प्रश्न लिहून पाठविले, त्यांचीं उत्तरें राम मोहनराय याणीं लिहून केलीं. जमाबंदी प्रकरणीचे जबाब पार्लमेंटांत दिले, आणि त्यांपासून सर्व पक्षांचे लोकांस बहुत संतोष झाला म्हणोन सांगतात. न्याय प्रकरणींचे त्याचे जबाब सपतंबर महिन्याचे प्रारंभीं तयार झाले होते. आणि असें म्हणतात कीं सगळे जबाब जेव्हां छापून प्रसिद्ध होतील तेव्हां या देशचीं

दिवाणी फौजदारी व जमाबंदी यांचे वहिवाटीची रीति, त्यांवरून ध्यानांत येईल; व ती मध्यें जे दोष आहेत ते दूर होण्याचा युक्ती, जुरीकडून चौकशी करविणें, न्याय प्रकरणीं या देशचे लोकांस जड्जांचे बरोबर अखत्यार देऊन नेमणें, सरकारी रेजिष्टरें वेतानें ठेवणें, दिवाणी व फौजदारीचे कायदे करणें, आदालतीमध्यें फारसी भाषेचे ठिकाणीं इंग्रेजीनें काम चालविणें, आदालतींतील वर्तमान प्रसिद्ध करणें वगैरे दोष दूर होण्यास युक्ति कळतील.

इंडिया ग्याझेट.

---

## राममोहन राय (२)

[ तारीख २० माहे जुलै सन १८३२ ]

या कागदांत " वोक्स " याचें पत्र छापिलें आहे, त्यांत एथील सरकारनें राममोहन रायाचें मत बहुत वेळ विचारिलें म्हणोन लिहिलें आहे, हें जर खरें असलें तर त्याचा आम्हावर उपकार झाला; आणि या त्याचे लिहिण्यापासून सांप्रत गवर्नर जनरालाचे जागेवर जे शाहाणे प्रतिष्ठित साहेब आहेत, त्यांस अबरू आहे. आजपर्यंत जी अविचारी आणि कृपण राज्य नीति चालली होती ती सोडून, जा एथील लोकांचे मताचा तिरस्कार करावा अशी आजपर्यंत चाल पडली आहे, त्यांस गवर्नर जनरल साहेबांनीं मसलत विचारिली, या त्यांचे वर्तणुकी वरून त्यांस जितकी प्रतिष्ठा आहे, तितकीच त्याणी जा पुरुषास मसलत विचारिली त्यास, व तो पुरुष जा लोकांचे मतांचें द्वार म्हणोन त्यास मसलत विचारिली त्या लोकांस ही प्रतिष्ठा आहे. त्या प्रसंगीं लार्ड साहेबानीं जो चांगला स्वभाव आणि विचार प्रगट केला, तो आमचे लोकांनीं त्यांचा उपकार मानायास योग्य आहे. परंतु या गोष्टीनेंच स्वदेशाचा गर्व फार वाढूं देऊं नये; कारण कीं राममोहन रायास बहुत वेळ मसलत विचारिली होती (हें आम्हास खचित वाटत नाहीं) असें असलें; किंवा सती बंद होण्यापूर्वी

दुसरे तेथील लोकांसही मसलत पुसली असें असलें, (आणि असेल असें वाटतें) तर हें एक गर्व होण्यास अधिक कारण खरें; परंतु हें सगळें मिळून झालें इतकें कीं, गवर्नर जनराल साहेबांनीं जुनी रीति एक वेळ मोडली.

एथील राहाणारे लोकांतून राममोहन रायावांचून दुसरे कित्येक, देशाचे राज्यकारासंबंधि विषयांवर उपयोगी बातमी, आणि चांगली मसलत सांगाया जोगे आहेत असें जेव्हां आम्ही लिहिलें, तेव्हां ही गोष्ट आम्ही या देशचे सर्व जातींचे लोकांची साधारण म्हणोन सांगीतली, केवळ हिंदूंचीच म्हणोन सांगीतली नाहीं; परंतु आमचे पत्र लिहिणाराचे म्हणण्यावरून असा भास होतो. त्याणें लिहिलें आहे कीं, "राममोहन रायासारिखी जामध्यें बुद्धि आणि विद्या आहे असा एक दुसरा कोणी पुरुष जेव्हां तुम्ही दाखवाल, तेव्हां त्याची अनास्था झाली असें तुमचे दृष्टीस पडणार नाहीं." अशे गुणाचा कोणी हिंदु हिंदु आहे किंवा नाहीं याचा विचार आम्ही करीत नाहीं; कारण कीं या प्रश्नाचें वजन त्याचे मताचे सयुक्तिकपणावर आहे, आणि तें मत सयुक्तिक नाहीं असें आमचे मनांत दाखवायाचें आहे. या लक्ष्यानें आम्ही "वोक्स" यास विचारतों कीं राममोहन राया सारिखे बुद्धिवान आणि विद्वान लोकांवांचून दुसरे कोणास मसलत विचारूं नये कीं काय? या देशचे व एथील लोकांचे मोठमोठे स्वार्थ जा गोष्टींत असतात त्या विषयीं, किंवा योजलेले कायद्यांविषयीं मसलत सांगण्याविषयीं सरकार साहेब लोकांस लिहून पाठवितात, हें "वोक्स" यास ठाऊक असेलच. बरें तर, त्या साहेब लोकांतून सर्व "युरोप व एशिया खंडांतील प्राचीन आणि नवीन भाषांत प्रवीण सयुक्तिक शास्त्रांत अभ्यास केलेले, आणि विद्वान् लोकांशीं फार परिचयानें सज्ञान झाले आहेत," असें तो स्थापील? तथापि ते केव्हां शहाणपणाची मसलत सांगतील, आणि सांगतात, या विषयीं तो वाद करणार नाहीं. तेव्हां राममोहन रायाची विद्या आणि गुण हे जर इंग्रेज लोकांत नसले तर चालतात, तर या देशचे कोणी पुरुषाचे सांगण्यास किंमत येण्यास किंवा त्याचे मतास वजन येण्यास कितकी विद्या आणि गुण अवश्य कशाकरितां पाहिजेत हें आम्हांस कळत नाहीं.

# राममोहन राय ( ३ )

[ तारीख ३ माहे ऑगस्ट सन १८३२ ]

" जेव्हां या देशचे राहाणारांचें मसलतीची गरज पडेल, आणि जेव्हां ती सांगावयास योग्य असे नेटिव लोक असतील, तेव्हां ती विचारावी" असें आमचा पत्र लिहिणारा " वोक्स " याणें कबूल केलें, यांत आम्ही जा गोष्टी-साठीं वाद करीत आलों ती तर सिद्ध झाली; परंतु त्याचा भाव असा दिसतो कीं हिंदुस्थानांतील सरकारांची वर्तणूक केव्हां केव्हां मात्र या रीती .माणें असल्ये, याचें कारण हें कीं, उपयोगी मसलत सांगण्याची योग्यता नेटिव लोकांत नाहीं. आतां या देशचे लोक योग्य आहेत किंवा नाहींत या विषयीं आम्ही आपलें मत लिहोन चुकलों; आणि हा वाद पुढें लांबविण्याचा आम्हांस उपयोग दिसत नाहीं; कारण ही गोष्ट व हिंदुस्थानांसारिखे मोठे देशांत राममोहन रायापेक्षे कमी नव्हत असे लोक आहेत किंवा नाहींत ( ही गोष्ट आम्ही लिहिलेली सांप्रतचे वादाविषयीं अशी समजलें पाहिजे, म्हणजे हिंदुस्थानांतील जमाबंदी व न्याय प्रकरण यामध्यें जे दोष आहेत ते जाण्याचे उपाय सांगण्या-विषयीं माहीतगारी व सामर्थ्य, याविषयीं मात्र इतर लोकांची आणि राममोहन रायाची बरोबरी ) ही गोष्ट " वोक्स " याणें नाहीं म्हटली आणि आम्ही होय म्हटली म्हणोन ठरत नाहीं. आमची खातर आहे कीं आम्ही जें लिहिलें त्यांतून कोणत्या एकाचा असा अर्थ कोणी समजणार नाहीं कीं, या देशचे लोकांमध्यें चांगलेपणा पावण्यास स्थळ नाहीं, किंवा जेव्हां विद्या आणि ज्ञान ह्यांचा त्यांमध्यें विशेष प्रसार होईल, तेव्हां त्या लोकांचा राज्यकर्त्यांनीं विशेष विचार करावा असा त्यांचा आतां पेक्षें विशेष अधिकार होणार नाहीं.

आमचे पत्र लिहिणाराचे दुसरे उत्तरांमध्यें त्याणें या गोष्टीचा विचार केला नाहीं कीं, कामगारांशिवाय दुसरे युरोपियन लोक यांसही कामगार यांस त्यांचे वरचे साहेब लोक यांणी त्यांचे कामासंबंधि मसलत विचारणें आणि साधारण बहुश्रुत नेटिव लोकांस सरकारानें उघड आणि कोणास मध्यें द्वार न

करितां मसलत विचारणें यांत फेर आहे, या शेवटचे रीतीपासून त्यांचे वर्तणुकीत जो उपयोग होईल तो पहिलीपासून कधीं होणार नाहीं.

राममोहन राय याचा विलायेतमध्यें जा रीतीनें मान ठेविला आहे ती रीति व एथील सरकारें या देशाचे लोकांचा मान जा रीतीनें ठेवितात ती रीति, या दोहोंची बरोबरी करतां वेळेस जें आम्ही लिहिलें, त्यामुळें कुरियर वर्तमान पत्रांतील एके लिहिणारानें आमची निंदा केली. त्याणें आम्हावर दोष ठेविला कीं कांहीं आधार नसतां आम्ही सरकारास विरुद्ध लिहिलें; आणि आम्ही लिहिलेलें खोटें करण्यासाठीं त्याणें तारीख २३ फेब्रुवारी सन १८२९ चा बंगालचे गवर्नर जनरल साहेबांचा हुकुम लिहिला. तो असा कीं या राज्यांतील कोणताही उद्योग वाढण्या विषयीं किंवा सांप्रतचे कारखान्यांतले कांहीं दोष असतील ते दूर होण्याविषयीं वगैरे उपाय सर्व या देशाचे ग्रहस्त जमीनदार व्यापारी, व दुसरे, अ णि तसेच बहुत करून युरोपियन लोक, यांणी कृपाकरून लिहोन पाठवावें. आम्ही पूर्वीं कबूल झालों आहों कीं, लार्ड बेंटिंक साहेबांची कित्येक ठिकाणीं वर्तणूक साधारण रीतीशीं विरुद्ध आहे हें लिहिलें नाहीं, ही आमची दृष्टी चुकली; आणि आतां जे त्या विषयीं प्रमाण आणिलें आहे त्यापासून यापेक्षें अधिक कांहीं सिद्ध होत नाहीं "वोक्स" याचे पत्रावर जें आम्ही लिहिलें, त्यामुळें कुरियर यांतील पत्राचा बाकीचा अंशावर विस्तारानें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. कारण, आम्हास जरी ठाऊक आहे कीं, गवर्नर साहेबांचे स्वारीबरोबर जे एथील लोक असतात, त्यांचे मसलती प्रमाणें ते गवर्नर साहेब केव्हां केव्हां चालतात. तरी आम्ही जें लिहिलें कीं, लोकांचे परम स्वार्थ जा गोष्टींत असतात त्यांची तजवीज करण्यामध्यें एथील लोकांस मसलत विचारावी अशी एथील सरकाराची साधारण रीति नाहीं ही गोष्ट खोटी झाली नाहीं.

या विषयावर आमचें लिहिणें फार लांबलें म्हणोन "नेटिव अबसर्वर" या वर्तमान पत्राचे करणाराचा कल्पनावर आमचे मनांत जितकें लिहावयाचें होतें तितकें लिहितां येत नाहीं. एमेंडी आनरबल् (क्षमा या अर्थाचा फ्रेंच

शब्द ) जो आम्ही दुर्लक्ष्यानें गवर्नर जनराल साहेबांविषयी लिहिला, तो अयोग्य, याविषयी आम्ही भांडत नाहीं; परंतु आमचा‍ लिहिल्यांवाचून राहवत नाहीं कीं, जाणें आपले पहिलेच कागदांत मारिशियस बेट यासंबंधि विषय लिहून आपले वाचणारांस नजर केली, त्याणें केलेलें असें शब्दांचें कृत्रिम चांगलें शोभत नाहीं. हें आम्हीं त्याची उलट निंदा करण्याचे अर्थानें म्हणत नाहीं.

आमचें सांप्रत लक्ष्य इतकेंच कीं, त्याणें आपण आमची स्पर्धा करीत नाहीं, परंतु आमचे साहाय्यकारी असें आम्ही समजावें म्हणोन लिहिलें, हा आम्हावर त्याचा उपकार झाला तो बोलून दाखवावा. परंतु इतकेंच कीं त्याकडे व आपल्याकडे पाहून आमचे मनांत आशा वाटत्ये कीं, पुढें स्नेह भावानें मदतगारी करित्येवेळेस त्याणें ती अशे रीतिनें करावी कीं, त्याचे निष्कृत्रिम पणाचा संशय येऊं नये; आणि समजावें कीं, "जा लोकांचे घरास फार कांचा आहेत त्याणीं आपले शेजाऱ्याचे घरावर दगड मारूं नयेत" या इंग्रेजींचे चांगले म्हणीची त्यास केवळ विसर पडली नाहीं. आतां घरावर दगड मारण्याचें चाली पासून गणेश चतुर्थीचे दिवशीं अशुभें दूर होतात, हा काय उपयोग असेल तो असो, परंतु दुसऱ्ये कोणत्ये वेळेस तसें केलें असतां त्यापासून बऱ्या पेक्षें वाईट फार होतें.

---

## धंदेवाईक पत्र लेखक

[ **असल पत्रें**. तारीख ७ माहे फेब्रेवारी सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस.

कोणेका मनुष्यास दोष लावणे हें सुलभ आहे, परंतु त्याची शाबुदी करून देणें ही कांहीं निराळी गोष्ट आहे. कांहीं थोड्या दिवसांवर बाळाजीपंत

नातुऱ्या विरुद्ध कांहीं बिन सह्याचीं पत्रें ग्याझेट वर्तमान पत्रांत छापलीं होतीं, परंतु त्यांत जे लिहिलें होतें त्याची शाबुदी झाली नाहीं. लोकांच्या विरुद्ध लिहिलेलीं अशीं बिन सहीचीं पत्रें तुम्ही आपल्या कागदांत छापायाचा आलिकडेस आरंभ केला आहे, परंतु त्यांत जें लिहिलें आहे त्याचा पुरवार करावयास तुम्हा जवळ चांगला दस्ताऐवज आहे असें मी इछितों. तुम्ही जें आपल्या कडून लिहितां तें अपक्षपातानें व शांत रीतीने लिहितां त्यावरून वाटतें कीं, असलीं बिनसहीची पत्रें तुम्ही आपल्या खुशीनें छापीत नसाल. असली गाऱ्हाणी करणारे काळे लोक व इंग्रज लोक या उभयतां विषयीं मी लिहितो कीं, ते जर सत्य लिहिणार नाहींत तर ते फसले जातील व दुसऱ्यास ही फसवितील. अन्याय व जुलूम यांविषयीं जे काळे लोक गाऱ्हाणी करतात त्यांतले दाहामध्यें नऊ कोणी बडतर्फ झालेले सरकार कारकून असतात. आणि अस जे इंग्रज लोक लिहीत असतात त्यामध्यें दाहांत नऊ असे असतात कीं, त्यांजकडून वर सांगितले प्रकारचे नाराजी काळे माणूस हे ठकवून तसें लिहवीत असतात. हीं मनुष्य जें लिहितात त्याचे अगोदर असें लिहितात कीं "मी याप्रमाणें ऐकिलें" "मी ऐकितों" "मला सांगितलें आहे". तुम्ही कोणत्या प्रकारचीं पत्रें छापीत जावीं हें दाखवावयास मी तुम्हाला एक गोष्ट कळवितो. दक्षिणेंत एका उमेदवारानें चाकरीकरितां अर्जी केली, त्या अर्जींत त्याणें लिहिलें होतें कीं, मुंबईस जीं वर्तमानपत्रें छापतात त्या पत्रांचे कर्त्यांस निरनिराळ्या सह्या घालून पत्रें पाठवून मात्र मी आपली उपजीविका चालवितों. "दक्षिणेंतील गाऱ्हाणी" "य य" व अशा प्रकारच्या दुसऱ्या सह्या घालून पत्रें पाठविलीं होतीं तो हाच मनुष्य असेल यांत कांहीं संशय नाहीं. ही गोष्ट जेव्हां मला समजली तेव्हां मी तुम्हास सुचना करणार होतों. परंतु या प्रमाणें सुचवून द्यावयास मला आतां चांगला समय सांपडला आहे. सदरीं मी ज्या पत्रांविषयीं लिहिलें आहे तीं धारवाडाविषयीं दर्पणांत जीं दोन तीन पत्रें छापलीं तीं. "सरकारचे व रयतेचे कल्याण इच्छिणारा" हा कदाचित मी जो वर सांगितला मनुष्य तोच असेल. हा म्हणतो कीं धारवाडांत अन्याय चालतो हें बहूत वास्तविक आहे, कशावरून तर गेल्या तीन वर्षांत सरकारांत ज्या अर्ज्या दिल्या

त्यांस जबाब एकच आला आहे. तो हा कीं सरकार या कामांत पडत नाहींत. याचें मला आश्चर्य वाटत नाहीं, व तुम्हास व तुमच्या वाचणारांस ही वाटणार नाहीं, कां कीं ज्या तंट्याचा निवाडा झाला असतो किंवा ज्यांचा निवाडा अदालतीमध्यें व्हावयाचा असतो, त्यांविषयीं ज्या अर्ज्या सरकारांत जातात त्यांस हाच जाब देत असतात. जर या खटल्यांत सरकार पडूं लागलें तर मग आपलें चांगले झालें, आणि यास्तव सरकार अशा फिर्यादींचा विचार करण्यापासून दूर असतें. परंतु हें गरीब काळे लोकांस समजत नाहीं, आणि कोणेकानें फिर्याद केल्यावर त्याचा दावा रद्द झाला म्हणजे तो सरकारास बहुत वर्षांपर्यंत अर्ज्या देऊं लागतो. ज्या अर्जींची चवकशी सरकारांतच झाली पाहिजे त्या अर्जांवर तसा जाब होत नाहीं. दर्पण वाचणारे काळे लोक व विशेषें करून "य य" आणि "कल्याण इच्छिणारा" यांस सरकारची रीति कशी आहे ती समजावी म्हणून तुम्ही त्या रीतीवर लिहीत गेला असतां कांहीं वाईट होणार नाहीं.

पूर्ण भरवसा ठेवावा असे फार करुन एतद्देशीय चाकरलोक नाहींत असें निस्संशय वाटतें; परंतु या देशातील कांहीं लोक उमेदवार म्हणून कांहीं गरीब मनुष्यांच्या चाकऱ्या काढवून त्यांचे ठिकाणी आपण राहावयास मोठे प्रयत्न करितात, असें आपणास ठाऊक आहे तेव्हां अशा माणसांचे बोलण्याकडे लक्ष्य दिल्याचे पूर्वीं आपण कांहीं चवकस असावें. सरकार चाकरींत जे काळे माणूस आहेत त्या सर्वांवर "य य" मोठा क्रूर आहे. तर तो हिंदुस्थानाचा राज्यकारभार कसा चालवील ? एतद्देशीय लोकांच्या साहाय्यावांचून तो हा राज्यकारभार चालवील काय ? तर मग तो कोणतीं माणसें लावील ? कदाचित् तो आपल्या चाकरांस लावील असें वाटतें. तो आपल्या मसालास शिरस्तेदार करील, आणि भंग्यास मुनशी करील. हे सरकार चाकर कोण आहेत ? ज्या तालुक्यांत ते चाकरीस आहेत त्या तालुक्यांतले राहाणारे आहेत, ते कुलीन व अबरूदार आहेत. चिनी लोक जे राज्य कारभार चालविण्यात दमाबाजी करीत नाहींत ते कांहीं अगवावयास आपण पत्र पाठवावें काय ? किंवा दक्षिणेंत "य य" सारिखे जितके आहेत त्यांस व सारे "कल्याण इच्छिणारे":

यांस बोलवावें काय ? हें तर आम्हापासून कदापी होऊं नये. सोलापुराविषयीं जें काय म्हणतील तें मी मान्य करीन, कांकीं गेल्या दहावर्षांत त्या ठिकाणी कोणी सबकलेक्टर किंवा कलेक्टर एक वर्षपर्यंत राहिला आहे असें नाहीं. त्याची नेहमी बदली होत असते यास्तव रयतेस समजत नाहीं कीं उद्या आमचा धणी कोण होईल. सबकलेक्टर ठे:ण्याचे चालीवरून असें होतें, आणि सरकार एकारीतीने वर्षास कांहीं रुपयाचा खर्च वाचवावयास पाहातें, तो तों दुसरेकडून हजारो रुपये जातात या खेरीज नित्य नवे नवे कलेक्टर होतात त्यांपासून रयतेस उपद्रव होतो आणि......चाकर लोकांची चवकशी होते त्यांतून ते पार पडतील असें वाटत नाहीं, कांकीं लोकांत म्हण आहे कीं नव्या झाडूने चांगला केर निघतो; आणि तरूण असे जे सबकलेक्टर होतात, त्यांस वाटतें कीं आम्ही फार दिवसांस आलों, आणि सर्व "कल्याण इच्छिणारे" व "य य" चा राहिलेला जो कर तो साफ करावयास व दक्षिणेंतील उमेदवार यांची मदत घेऊन ते सबकलेक्टर अन्याय शोधून काढावयास लागतात.

धारवाडास एका माणसानें गळेफांस घेतला त्याची गोष्ट सहज समजुतींत येईल असें मला वाटतें. त्या जिल्ह्यांतल्या प्रिंसिपाल कलेक्टराविषयीं मी म्हणतों कीं त्यासारिखे दहाबारा असते तर बरे होतें. तो असा मनुष्य आहे कीं, तो आपली चाकरी करण्यांत वेळेची कींवा मेहनतेची कमकसर करीत नाहीं, आणि तो प्रातःकाळापासून तों रात्रपर्यंत त्या कामांत उद्युक्त झाला असतो. या खेरीज त्यास आपल्या चाकरीची व एतद्देशीय लोकांचे रीतिरिवाजांची पुरती माहीतगारी आहे, त्याप्रमाणे माहीतगारी मुंबई खात्यांतील दुसरे कामगारास थोडके असेल किंवा कोणासही नसेलसें वाटतें. आपल्या हाताखालचे एतद्देशीय चाकर लोक यांजविषयीं त्या सारिखा कोणी चवकस नाहीं. व तो जशा फिर्यादी ऐकून घेतो तसा दुसरा कोणी ऐकत नाहीं. तरूण व म्हातारे साहेब लोक सरकार चाकर आहेत त्यांत यासारिखा कोणी नाहीं हें वाईट वाटतें. आणखी जो जिल्हा त्याचे स्वाधीन आहे त्या जिल्हात गडबड व जुलम फार दिवस चालत होता, आणि तेथें सुमारें शंभर लहान लहान सरदार आहेत ते नेहमी भांडत असतात व त्यांची कधीं ही समजूत होत नाही.

"य य" यांनी वतनदाराची जी गोष्ट लिहिली आहे ती प्रसिद्ध व्हावी असें मी इच्छितो.

सु॥ दश ता॥ १३ वी जानुआरी १८३४. तुमचा मित्र. **ओ. ओ.**

---

# खर्च चालविण्याच्या रीतीवर टीका

[ **असल पत्र** तारीख २८ फेब्रेवारी सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस.

तुमचा पत्र लिहिणारा "एक भली रयत" यास वाटतें त्या प्रमाणें फौजे विषयीं व पोलीस विषयीं व विद्यालयांविषयीं व रस्त्याविषयीं लिहावयास मी कांहीं चुकलों नाहीं, लोकांपासून जबरीनें घेतलेला जो पैका त्याणे या कारखान्यांचा खर्च चालवितात तेव्हां हें असें दिसतें कीं, चोरी करून चांगल्या कार्यांचा खर्च चालवावा त्याप्रमाणें त्याणे आपले दृष्टीपुढें असें असूं द्यावें कीं, मी जो दोष देतों तो वस्तुवर नाहीं, परंतु त्या वस्तुचा खर्च चालविण्याचे रीतीवर देतों.

सदरीं सांगितल्या प्रकरणांत हुकूम करावा हा अधिकार लढाई करून राज्य घेऊन मिळविला, हें तुमचे पत्र लिहिणारास दिसत नाहीं. आतां लढाई करून राज्य घेणें हें राज्य बळकावून बसणें होय, हा कांहीं अधिकार नाहीं. लढाई करून राज्य घेणे या शब्दाचे पोटीं त्यावर लिहिलेल्या गोष्टी जाणल्या, त्या तुमचे पत्र लिहिणारास समजल्या नसतील, परंतु तो खेरीज करून बाकीचे तुमचे सर्व पत्रे वाचणारे समजले असतील कीं त्याचे पोटीं त्या गोष्टी आहेत. हा विषय रस्त्यांविषयीं आहे म्हणून वाटत होतें कीं "एक भली रयत" या सारिखे मनुष्यांनी ही तो बाहेर काढावयाचा नव्हता, त्याणी तो दडवून

ठेवावयाचा होता. इंग्रेज लोक आपआपले स्वार्थ पाहूं लागले त्याचे जे अलिकडेस दाखले आले त्या वरून योग्य दिसते कीं, या विषयावर कांहीं बोलू नये हें चांगलें. ही गोष्ट अशी आहे. या बेटाचे ज्या भागांत इंग्रेज लोक राहतात त्या भागांत चांगले रस्ते केले आहेत, आणि ज्या भागांत एतद्देशीय लोक राहतात तेथचे रस्ते वाईट आहेत; परंतु ही वस्तूची स्थिति पुरती कंटाळ-वाणी झाली नाहीं असें दिसावें म्हणून इंग्रेज लोक ज्या रस्त्यांवर राहतात त्या रस्त्यावर मनुष्यांपासून जबरीनें घेतलेला पैका त्याणे दिवे लावावे असा त्याणी यत्न केला होता. मनुष्यांपासून जो जबरीनें पैका घेतला त्याणे फौज व पोलीस व विद्यालयें यांचा खर्च चालवावा असा अधिकार आहे त्या प्रमाणे क्रिस्ति धर्म देवळाचा ही खर्च चालवावा असा अधिकार आहे. असें तुमचा पत्र लिहिणारा म्हणतो. हें त्याचें मत मी मोठ्या उत्साहाने मान्य करितों. मनुष्यांचे अधिकार बळकावून या खटल्यांचा खर्च चालवावा असा जो अधिकार तो त्याणे स्थापित करावा, मग क्रिस्ति धर्म देवळाचा याच रीतीने खर्च चालवावा असा पुरावा करतां येईल. परंतु तो तर असें करीत नाहीं, तर तो काय करितो ? त्यास वाटतें कीं मी कंपनी सरकारचा चाकर आहें. हें त्यास वाटतें तें माझे पत्राचे कोणत्या भागावरून वाटतें तें मला कळत नाहीं. व त्यास ही ठाऊक नाहीं. बरें, मी जर कंपनी सरकारचा चाकर असलों तर काय होईल ? तेव्हां 'खोटें करूं नये म्हणून इछिणारा" व तुमचे दर्पणांत वाकडें तिकडें लिहिणारा असा जो मी आपलें उपजीवन ज्या रीतीने मिळवितों त्यावरून क्रिस्ति धर्मांचे देवळाइतकाच दोषांत आहें. हें देऊळ चाललें असतां मज सारिख्याचा निभाव आहे व त्याचा नाश झाला असतां माझा ही नाश आहे असें "एक भली रयत" या पासून ऐकून त्या देवळास (म्हणजे देऊळवाल्यांस) किती आनंद व्हावा ! मी खोटा झाल्यावर ते देऊळ खरें होईल काय ? तुमचा पत्र लिहिणारा हा याखेरीज मजविषयी दुसऱ्या कित्येक गोष्टी लिहितो. जर सरकारने जबरदस्ती केली नाहीं तर मला भीक मागत फिरावें लागेल, असें तो म्हणतो तें कोणत्या कारणावरून म्हणतो तें आम्हास कळत नाहीं, हीं त्यासच माहीत आहेत. हे "भली रयत" तूं म्हणतोस तसें नाहीं, क्रिस्तिधर्म देऊळ किंवा

मी आळशी नाहीं, परंतु तुला वाटतें तसे कोणी कंपनी सरकारचे चाकरींत असतील. हे प्रीया, मजविषयीं व क्रिस्ताचे देवळाविषयीं तुला जें भय वाटतें तें विन सबबेने वाटतें. जर आम्हास सरकारचा आश्रय नसला म्हणजे जबरीनें जो पैका मिळवितात त्याचा आम्हांस आश्रय नसला तर आम्हांतून कोणी भीक मागत फिरेल असें कांहीं दिसत नाहीं. ज्याणे क्रिस्तिधर्म देवळाचे कायदे केले तो त्या देवळाचें कोठें तरी रक्षण करील आणि जो अरण्यांतील पशु इत्यादिकांचे पोट भरतो तो माझेंही रक्षण करील.

माझे मताप्रमाणे चालले असतां त्यापासून मला दरिद्रावस्था प्राप्त होईल त्यावर तुमचे पत्र लिहिणारानें जें लिहिलें आहे तें चांगलें आहे. या संकटांत तो मला सावध करितो असें दिसतें, कांकीं मी यांत पडलों असतां मी आपला व दुसऱ्यांचाही नाश करीन. चांगल्या विचारांपासून जे सिद्धांत होतात त्यांपासून जी अडचण पडते ती दूर व्हावी म्हणून मनुष्यें खोटीं मतें धरूं लागतात, ही कांहीं नूतन गोष्ट नाहीं. तुमच्या पत्र लिहिणाऱ्याची याप्रमाणे गोष्ट आहे. तो मोठ्या पेचांत आला आहे. त्याचा नाश असा जो माझ्या मतावरून असे स्वाभाविक परिणाम होईल तो तो पाहतो. परंतु सांप्रत असे दिवस आले आहेत कीं, हिंदुस्थानांत सामान्य लोकांची सभा स्थापित होईल, हें न जाणून त्यास हिंदुस्थानाचे सामान्य लोकांचें नांव ऐकुनच हसें आलें तेव्हां असें योग्य दिसतें कीं, त्याणे आपल्या मता सारिखा व वर्षांतला असा पुरुष कल्पून त्याकडे जावें, आणि तेव्हां व तेथें त्याणे पुष्कळ हासावें कीं, इंग्लंडांतील सामान्य लोक हे माग्ना चार्टा हा कायदा कसा करतील. कां कीं त्यांतून कित्येकांस वाचतां किंवा लिहितां येत नव्हतें, परंतु त्या कायद्यावर खुणा मात्र करितां येत होत्या. तुमच्या पत्र लिहिणारांस ठाऊक आहे किंवा त्यास ठाऊक असले पाहिजे कीं हिंदुस्थानांतील सामान्य लोकांस फार करून वाचतां व लिहितां येतें.

तुमचे पत्र लिहिणाराचे पत्राचे पहिले भागाचे शेवटीं पहा म्हणजे त्याचे लिहिणें किती निर्बळ आहे ते दिसेल. गवर्नर जनरल साहेबास हिंदुस्थानांतील

लोकांपासून आपल्या खर्चास पैका सांपडायाचा नाहीं, आणि यास्तव तो घेतो. हें मत "एक भली रयत" याचें स्वताचें आहे. जर हिंदुस्थानांत सामान्य लोकांची सभा असली तर असा पैका मिळावयाचा नाहीं. असे म्हणावयास त्यास कोणता अधिकार आहे ? यांपासून जो पैका मिळेल तो कमी सापडेल. हे खरें, परंतु पैका मिळावयाचा मुळींच नाहीं हें उगीच म्हणणें होय. परंतु तुमचे पत्र लिहिणाराचे लिहिण्यावरून निष्पन काय होतें ? त्या पासून इतकेंच होतें कीं, माझे गेल्या पत्रांत त्याजवर व मताभिमानी यांवर व जुलमी साधू पुरुष यांवर व मनुष्यांपासून जो पैका बलात्काराने घेतात त्याणे धर्माचा व सरकारचा खर्च करावा असें जे इछितात त्यांवर मी दोष दिला कीं ते चोरी करितात, तो त्याणे मान्य केला. बळापासून अधिकार असें तुमच्या पत्र लिहिणाराने मत धरिल्यावरून तो दोषी असा ठरला असें मी म्हणतो. तो म्हणतो कीं, गवर्नर जनरल साहेबास हिंदुस्थानांतील लोकांपासून आपला खर्चाचा पैका सांपडायाचा नाहीं, यास्तव तो घेतो. देवळाचे खर्चास हिंदुस्थानांतील लोकांपासून पैका मिळावयाचा नाहीं, म्हणून ते पैका घेतात. याच कारणावरून घालेकरी लुटतो व सारें लुटणारा असा जो राज्य जिंकणारा तो लुटतो. हे कारण रीतीस व धर्मास योग्य असें तुमचे पत्र लिहिणाराचें सामर्थ्य असल्यास त्याणें स्थापित करावें.

जेव्हां कोणेके तऱ्हेची वस्तुची स्थिति नसल्यास फार गडबड होईल तेव्हां त्या स्थितीचें प्रतिपादन करण्यांत कांहीं अयोग्य विचार येतात. मी म्हणतो कीं, इंग्रेजानी जें चांगलें केलें आहे त्याचा जेव्हां आपण विचार करितों तेव्हां त्याचे अधिकाराविषयींचा जो विचार तो एकीकडेस ठेवावयास आपण उद्युक्त होतों. सरकाराचे कांहीं चांगले गुणामुळें आपणास त्याणे जे अधिकार बळकाविले त्यांचा विसर पडतो. देश व्यवस्थापक असें सरकार पृथ्वीमध्यें कोठें अजून पुरतें झालें नाहीं, त्याचा अजून आरंभ आहे. मनुष्य या अशाश्वत देहांत असतां त्याचें कल्याण व्हावें असा जिचा उद्देश आहे त्या गोष्टीने मात्र जी पूर्णता प्राप्त होईल त्या पूर्णते प्रत हें सरकार हळुहळु

पावत जाईल, अशी आम्ही आशा करतों. परंतु हें कारण जर धर्माविषयीं सांगितलें तर तें मजबूद असें आपण मानू काय ? चोरी करून क्रिस्ती धर्म देवालयाचा खर्च चालवावा हा अधिकार योग्य आहे असें मनुष्यें सांगतात म्हणजे जबरदस्तीनें क्रिस्ति धर्म चालवावा असें मनुष्य सांगतात तेव्हां आपण काय म्हणावें ? यांत कांहीं वास्तविक विपर्यास आहे. या प्रमाणें आपले धर्मांचे देवळाचा खर्च चालवावा अशी येशू क्रिस्ताची आज्ञा आहे काय ? या प्रमाणे त्याचे आपासल्ज् म्हणजे शिष्ये याणी चालविलें काय ?

मी तुमच्या पत्र लिहिणाराचा त्याचेच मत घेऊन त्याचा पराजय केला आहे, तो जसजसा वाद करीत जाईल तसतसा त्याचा वाद लोकांच्या दृष्टीस पडेल, आणि सत्य जें आहे तें त्यांतून बाहेर निघून येईल.

तुमचा मित्र,

**खोटें करूं नये म्हणून इच्छिणारा**

---

## सरकारी नोकरींत जातीयता

[ तारीख ९ माहे मे सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस,

महाराज, एतद्देशीय लोकांस प्रतिष्ठित व विश्वासाचीं, व जोखमाचीं कामें दिलीं हें पाहून खरे क्रिस्तियन लोकांस, व जगशुभचिंतक लोकांस आनंद होईल. जेथें मनुष्यांची बुद्धि प्रगल्भ झाली असेल तेथें शरीराचे कउपपणाकडे लक्ष्य ठेवूं नये, आणि धर्म याचा जलूम चालू देण्याविषयीं क्रिस्तियन लोकांचें जसें वर आहे त्याप्रमाणें राज्याकारणासंबंधीं जितके अधिकार तितके क्रिस्तियनांनी चालवावे, यास क्रिस्ति धर्मनीतीचा प्रतिबंध नाहीं. मनुष्यांस

ज्या वाईट गोष्टींपासून स्वाभाविक दूर राहावत नाहींत त्याच करण्याविषयीं हिंदु धर्माचे नीतीचा आश्रय आहे, तो एतद्देशीय माजिस्ट्रेट लोक यांस शाहाणे लोकांचे व वर्तमान पत्रकारांचे दखलगीरीखालीं वागूं लागल्यावरून हळुहळु मोडावा लागेल, आणि (पाछायी कोडतांतले) वकीलांची कामें या देशांतील गुणी उमेदवार लोक याणीहि पाहिजे तर करावी असें जेव्हां होईल, तेव्हां एशियाखंडोद्भव लोक अधर्मांतून व मूर्खत्वांतून बाहेर निघतील, आणि ते इंग्रजासारिखें वकीलाचें काम चालवावयास ईर्षा वाळगितील. हिंदुस्थानांतील कोडतांतले वकीलांचें काम लंडन शहरांतील न्यायशास्त्र पढविणारे शाळांतील मुलांनीच करावें असें वाटणें, हे सांप्रत जी सुधारणा झाली आहे तीस योग्य नाहीं. हिंदु लोक शाहाणे व प्रामाणिक होऊन व चांगली विद्या शिकून कोडतांमध्यें वकीलांचें काम थोडक्याच दिवसांनी चालवूं लागतील अशी आशा आहे. इटन व लिंकन येथील शाळेंतील विद्यार्थ्यां सारिखीं मुलें मेस्तर मेनवारिंग् साहेबाचे शाळेंत तयार होतील, आणि पुढें जीं शाहाणी मुलें होतील त्यांस मनुच्या नीतीवरुन दिसून दिसून येईल कीं त्यांचे पूर्वजाचें मन बांधले गेलें होते. जें मुलें आपले देशाचे नवी सृष्टी करणारे होणार आहेत, व मूर्ख करागिराने केलेली जी मूर्ति तिच्या पुढें नमस्कार करावयास व ज्या माणसांचे अनीतिप्रमाणें चालणे व त्याचा अभिमान धरणें ही बेअबरु आहे त्यांस जा मतावरून देवरूप मानलें पाहिजें त्या मताप्रमाणें चालवायास ज्यांस लाज वाटेल, त्या मुलांचा कित्येक वडील हिंदु लोक आतां ही अंगीकार करतील. सत्य धर्मांत असें आहे कीं ईश्वरास सर्व मनुष्यें सारखीं दिसतात; मनुष्यांस परस्परांविषयींचे धर्म चालविण्याकरितां मनुष्यांमध्यें उच्चनीच पणाचा भेद ठेवण्यास अवश्य पडलें, परंतु ईश्वरापुढें जेव्हां आपण सर्व झाडा द्यावयास उभे राहूं, तेव्हां आपण पृथ्वीवर कोण होतों हा कांहीं प्रश्न करणार नाहींत, परंतु ज्या स्थितींत ईश्वराने आपणास ठेवले त्यांत आपण आपला धर्म कसा चालविला तो आपणास पुसतील. मोठमोठे राजे, व गर्विष्ठ असे रोमन लोकांचे मुख्य धर्मोपदेशक, व ब्राम्हण व शेक यांस तेव्हां समजूं लागेल कीं, अपंक्त असे जे गरीब लोक ते व आपण

स्वभाविक बरोबर आहों, व आपले स्वजनांचे कल्याणाकरितां आपणास थोर केलें होतें.

एतद्देशीय लोकांस आतां जे पद प्राप्त झालें आहे त्या पासून जो लाभ होईल तो दाखवावयाकरितां पण असें मनांत समजावें कीं, ब्राम्हण जे पृथ्वीवर मोठे चोर व लबाड लोक आहेत असें तुमचे पत्र वाचणारांस चांगलें माहीत आहे, त्यांचे एका टोळीने रिमंगटन आणि मंडळी या साहुकारांचे किंवा पारशी लोकांत जे मोठे साहुकार आहेत त्यांतून कोणे एकाचे वखारींतून माल चोरला. आणि ही गोष्ट सत्य आहे असें माना. आतां ब्राह्मणांनी म्लेंछ लोकांस लुटावें असें मनु सांगतो म्हणून या देशांतील माजिस्त्रेट लोक त्या चोरांस सोडील असें कोणास तरी वाटेल काय? आलिकडेस ज्या सुज्ञ ग्रहस्तांस प्रतिष्ठित पद प्राप्त झालें आहे त्यांतून कोणेकास बंदिवानाने पुढें येऊन चोरी करण्यास त्यांचा मयत बाप किंवा आजा, जो पूर्वी मनुष्य होता व आतां देव झाला आहे, त्याची आज्ञा आहे असें सांगितलें तर त्या माजिस्त्रेटास राग येऊन वाईट वाटणार नाहीं काय? खोट्या धर्माच्या ज्या दुष्ट आज्ञा त्या काळेंकरून या मार्गें मोडल्या जातील. हिंदु शास्त्रांत ब्राह्मणांस सांगितलें आहे कीं तुम्ही आपल्या शझारी पाझारी लोकांस लुटावें. क्रिस्ति धर्मांत सर्व माणसास सांगितलें आहे कीं तुम्ही चोरी करूं नका. हिंदु न्यायाधिशावर सरकारनें जो विश्वास टेवला, त्याप्रमाणें तो चालतो, तो चोरास कैदेत टाकतो, खोटे धर्मांतून आपलें मन निघालें त्याचा स्वतंत्रपणा दाखवितो, व क्रिस्ति धर्म श्रेष्ठ आहे असें कबूल करतो असा दिसतो, व जो खोटा धर्म आहे त्यांस खोटा असें म्हणतो. जो माणूस या प्रमाणें चालणार नाहीं त्याकडे त्याचें काम राहाणार नाहीं, व गतकाळी ज्याप्रमाणें मनुष्यें अंधारांत होतीं व त्यांची मनें चांगलीं नव्हतीं तसा तो होईल.

अलिफ

# ‘संकरजाति इंग्रेजां’स

[ तारीख ९ री माहे मे सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस,

महाराज, मुंबईंतील डाकेच्या आफिसांतून हिंदूस काढून त्यांचे ठिकाणीं संकरजाति इंग्रेज लोक लावले याचें कारण हिंदु लोकांचा अप्रमाणिकपणा मात्र आहे असें मी लिहिलें नव्हतें. मला पक्के वर्तमान लागलें कीं, हिंदु पेक्षां संकर जाति इंग्रज लोक अधिक प्रमाणिक व चपल आहेत असें वाटलें म्हणून हिंदूस काढून त्यांचे जागेवर ते लोक लावावे असें सरकारांत लिहिलें, आणि तें सरकारानें कबूल केलें, आणि प्रमाणिकपणा व चपलाई या दोहो गुणांतून प्रमाणिकपणावर लक्ष्य विशेष दिलें पाहिजे हे खरें कीं खोटें आहे तें सत्य वक्त्यानें सांगावें. परंतु जे आलिकडेस हिंदु काढले त्यांतून कोणावर दगल बाजीचा गुन्हा शाबूत झाला नाहीं, आणि त्यांचे मागें जे होऊन गेले त्याची बेअबरूचें फळ त्यास झालें.

जी माणसें आपणास क्रिस्तियन म्हणवून अप्रमाणिकपणा करतात त्यांवर जो दोष दिला तो मी कबूल करतों. परंतु ते क्रिस्ति धर्मावरून अ .माणिक होतात असें नाहीं, परंतु त्या मध्यें तो धर्म न्यून म्हणून ते तसे होतात. जे खरे क्रिस्तियन आहेत ते सर्व प्रमाणिक असावे, आणि जे खरे हिंदु आहेत ते सर्व अप्रमाणिक असावे. खऱ्या हिंदूस आपल्या देवांची भक्ति केली पाहिजे, आणि त्या सारिखें बोलावयास व चालावयास त्यांस इच्छिलें पाहिजे, भृगुऋषि असें म्हणतो कीं कित्येक प्रकरणांत खोटी साक्ष देणें हें देवासारिखें बोलणें आहे.

**तद्वदन् धर्मतो ऽर्थेषु जानन्नप्यन्यथा नरः**
**न स्वर्गाच्च्यवते लोकाद्दैवी वाचं वदंति तां ॥**

मनु संहिता अध्याय ८ श्लोक १०३

कित्येक प्रकरणांत जो मनुष्य धर्मबुद्धिकरून जें खोटें माहीत असतां तें खरें असें बोलतो तो स्वर्गपदास मुकत नाहीं. या वाणीस देव वाणी म्हणतात.

अशा प्रकरणांत सत्यापेक्षां अनृत्य विशेष असें म्हणतात. (मनु संहिता अध्याय ८ श्लोक १०४) आणि तो देवऋषि जें चांगलें सांगतो तें खऱ्या हिंदूस केलें पाहिजे, आणि तो जें वाईट सांगतो तें टाकलें पाहिजे, यास्तव हिंदूस असत्य बोलल्यावाचून परिणाम नाहीं. दुसऱ्या पांच गोष्टी आहेत त्यांत त्याणें अनृत्य भाषण करावें अशी त्यास स्पष्ट आज्ञा आहे (मनु संहिता अध्याय ८ श्लोक ११२) आणि त्यास जें प्रकरण पडेल त्यांत तो जर शास्त्रांत जशा गोष्टी लिहिल्या आहेत त्याप्रमाणें वागणार नाहीं तर त्याची बुद्धि फार थोडी असेल. तो सकाळीं लबाडी बोलतो ती कशाकरितां, तर ब्राह्मणाचें हित व्हावें. पुनः दोन प्रहरीं दुसरी लबाडी बोलतो ती कशाकरितां तर मुलाचा किंवा मुलीचा विवाह होण्याकरितां. तो संध्याकाळीं मातक्यान लबाडी बोलतो ती कशाकरितां, तर बायकोची मर्जी संपादन करण्याकरितां, किंवा मुलास उगें करण्याकरितां, किंवा आपला जीव किंवा सुख रक्षण करण्याकरितां, किंवा धर्मबुद्धि धरून धर्मविधींत मदत करण्याकरितां किंवा दुसऱ्यास शासनापासून रक्षावयाकरितां तो अनृत्य बोलतो. इतक्या लबाड्या करून त्याचे चित्तास तरी वाईट वाटतें काय? त्याणे सरस्वतीस आहुती द्यावी, किंवा मंत्र म्हणून अग्नीस तुपाच्या आहुति द्याव्या. मग त्याचें पाप तात्काळ जातें (मनु संहिता अध्याय ८ श्लोक १०५ व १०६) त्याचें पातक दूर होण्यास इतका ही आयास नको, दर लबाडीस विष्णुचें नांव एकदां घेतलें म्हणजे त्याचे पातकाचा परिहार होतो.

या सारिखे धर्मनीतिचा हिंदु लोक जोपर्यंत त्याग करणार नाहींत तव-पर्यंत ते इह लोकीं हि सुख किंवा जय पावणार नाहींत.

तुमचा परम मित्र

**नर.**

# इंग्रज सरकारचा सावकार

[ तारीख २३ वी माहे मे सन १८३४ ]

गेल्या आठवड्यांत इंडिया ग्याझेट या वर्तमान पत्राचे जे कागद निघाले त्यांतील एकामध्यें हिंदुस्थानांतील लोकांस जाहीर केलें आहे कीं ग्वालेरीच्या राज्यस्थानी जो मुलगा आहे त्याण मणिराम शेट यांस उपद्रव दिला. काशमिरचे डोंगरांपासून तों कामरू देशापर्यंत मणिराम शेट हा हिंदुस्थानांत सांप्रत मोठा मातबर साहुकार आहे. जेथें त्याचें दुकान नाहीं असें हिंदुस्थानांत मोठें शहर कोणतेंहि नाहीं. त्याजवळ सरकार पैका एक कोटी पर्यंत असतो. हिंदुस्थानांतील सर्व लोकांस माहीत आहे कीं तो इंग्रज सरकारचें कल्याण नेहमी इछितो, त्या सरकारास त्याणे बहुत वेळ पैक्याने मदत केली. सन १८२५ सालीं ब्रम्ही लोकांशीं लढाई होत होती म्हणून सरकारास फार संकट पडलें होतें. त्या वेळेस त्याणे सरकारास पुष्कळ पैका कर्जाऊ दिला. आणि त्यावेळानंतर त्याजवळून सरकारने जेव्हां पैका मागितला तेव्हां तो नाकबूल केला नाहीं, आणि तो इंग्रज सरकारचा असा प्यार करतो म्हणून त्याजवर कित्येक या देशांतील दुसमान झाले आहेत असें म्हणतात; परंतु इंग्रेज सरकारचा न्याय व अदल इनसाफ व अंमल यावर विश्वास ठेवून तो नेहमी ही द्वेषाचीं चिन्हें पाहून हासत असे.

बाईजा बाईच्यावेळीं शिंद्यांचे मुलुखाचे वसुलाचें सारें काम मणीरामशेट याजकडे होतें; जेव्हां त्या बाईचे हातून राज्यकारभार गेला तेव्हां त्याचे मनातून ग्वालेरी सोडून मथुरेस जाऊन राहावें असें होतें. ग्वालेरीस क्यावेंडिश करून इंग्रज सरकारचा रेसिडेंट आहे त्याणे विनंती केल्यावरून त्यास तेथें राहून त्या राजाचे वसुलाचें काम चालविण्यास जरूर पडलें. परंतु असें दिसूं लागलें कीं, त्याजवर महाराजांची कृपा व लोभ नाहींत, आणि त्याकरितां तो लवकर राजीनामा द्यावयास तयार झाला, परंतु महाराजानी त्याचा आग्रह केला कीं हकुमावर सह्या करीत जाव्या व वसुलाचें

काम पाहात जावें. यास मणीराम नाकबूल गेला. यास्तव महाराजानी हजार हत्यारबंद लोकांस त्याचे घरास घेरा घालावयास व तो दर दिवशीं १०००० रुपये देई किंवा तो आपलें काम चालू लागावयास कबूल होई तंवपर्यंत त्यास जेवूं न द्यावयास हुकूम केला. प्रथमच्या दोन दिवशीं भोजनास परवानगी मिळवयाकरितां त्याणे २०००० रुपये दिले. नंतर कित्येक दिवसपर्यंत त्यास अन्नपाण्यावांचून ठेवलें. आणि त्यास तसाच महाराजांपाशीं नेला, तेव्हां त्याणें कांहीं ऐवज खाल्ला असें ते महाराज म्हणतात तो व त्या खेरीज आणखी तीन कोटी रुपये मागितले. त्याणे हा पैका द्यावा म्हणून त्यास फार उपद्रव दिला, आणि त्याचीं माणसें त्याजवळ येऊं देत नसत व त्यांस त्यांजवळ जाऊं देत नसत. जनकोजीराव हा लाहान जुलमी राजा याणे हुकूम केला कीं मणीरामाचे गुमास्त्याचे बोटांस तेलांत भिजविलेला कापूस गुंढाळून त्यास आग लावून द्यावी. शिंद्यांची गादी ज्या मुलग्यास दत्तक घेतल्यानें आतां प्राप्त झाली आहे त्याणे मणीरामशेट जो हिंदुस्थानांत मोठा द्रव्यवान व विख्यात सावकार आहे त्यास जो उपद्रव केला त्याची संक्षिप्त हकीकत आहे.

आपल्या हिशोबाची बारीक चवकशी होऊं नये असें मणीरामशेट इच्छित नाहीं आपली चवकशी व्हावी असें तो पाहात आहे. त्याणे आपले दाखविले, आणि त्यास कांहीं विचारावयाचें असल्यास तो सांगावयास तयार आहे. त्याणें सरकार पैका खालला असें इंग्रेज सरकाराचे कोणे कामगाराचे खातरीनें त्यावर साबीत झालें तर तो पैका परत द्यावयास व फजीत व्हावयास तयार आहे. जो माणूस त्याचें द्रव्य हरण करावयास इच्छित आहे त्याचे पक्षपाती इन्साफेंकरून नाहीं, परंतु जे अपक्ष पातानें इनसाफ करतील त्यांचे मतें त्यावर गुन्हा साबीत होई तवपर्यंत इंग्रेज सरकाराने व विशेषें करून क्यावेंडिश साहेबाने त्याचें संरक्षण करावें. कांकीं ज्या मुलास बाईजाबाईनें नावारूपास आणला त्या मुलाने तीस पदभ्रष्ठ केलें तेव्हां त्या साहेबानें मणीरामास ग्वालेरीस राहावयास सांगितलें. आम्हास फार दुख वाटतें कीं या खटल्यात क्यावेंडिश साहेब पडत नाहीं, आणि त्याचे नजरेसमोर

मणीरामशेट याजवर सर्व प्रकारचा जुलूम होत आहे व त्यास मारून टाकण्याचें भय घातलें आहे. त्याणे कौंसलातील धायब प्रसिडेंन हनरावल सर क. ट. मेटकाफ साहेबास अर्ज केला, परंतु त्यास असें दिलें उत्तर कीं, शेट मणीराम ग्वालेरीच्यासरकारचे अमलाखालीं राहात आहे म्हणून त्याची कांहीं चवकशी करवत नाहीं.

मणीरामशेट याचा प्राण संकटांत पडला आहे; आणि हिंदुस्थानांत त्याचीं जीं दुकाने आहेत तीं मोडावयाचें भय जनकोजीरावाने घातलें आहे. इंग्रेजी वर्तमानपत्रवाल्यांचे अनुमतास आम्हीं संमत देतों कीं, या खटल्यांत इंग्रज सरकाराचें तात्काळ पडावें असा तो खटला आहे. त्याचें इंग्रजाचे फार दिवसांचें सख्यत्व आहे, व इंग्रेज सरकारास पैक्याचें अगत्य पडलें असतां त्यांस पैका पुरवावयास त्यानें बहुत प्रयत्न केले, व ग्वालेरीस रहावें म्हणून इंग्रेजांचे रेसिडटांनी त्यास आग्रह केला, इतक्या साऱ्यावरून असें दिसतें कीं, त्याचा पक्ष इंग्रेजानी धरावा. गवर्नर जनरल साहेबास लिहिल्यानंतर या खटल्यांत पडूं नये असें जर सरकारने केलें तर इंग्रेज सरकाराची हिंदुस्थानभर बेअबरू होईल असें आम्हास भय वाटतें.

---

## सृष्टीची शोभा (१)

[तारीख २ माहे नवेंबर सन १८३२]

या मोठ्या ईश्वरी बंदोबस्तांत परमेश्वराने, आपण राहातों त्या पृथ्वीवर जसें केलें आहे, त्याचप्रमाणें सर्व ग्रहांचे सामग्री करीता केलें आहे. तर आपण म्हणावें काय कीं इतकाच सारिखेपणा आहे, कांकिं आपण आणखी पाहावयास समर्थ नाहीं ? आपण असें म्हणावें काय कीं ही तैजस शोभा नुसतें थोडक्या जोतीशांचे कर्मणुकेकरितां झाली आहे ? मानवाचे आल्प बुद्धिने

परमेश्वराचे मसलतीचा पार आपण काढावा काय ? अथवा असें समजावें काय किं स्थैर आणि एकाती सर्व होट होष्या ईश्वरी कृत्यांत आहेत; आणि सर्व जें उत्पन्न केलें आहे तें उगीच शोभा, आणि ही होठी विस्तीर्ण दृश्य मान जगें आहेत त्यांत एक हि ईश्वराचा भक्त नसेल ?

जेव्हां आपले यंत्रादि साहित्यांची तयारी करून एक नवा या पृथ्वीशीं आणि इतर ग्रहमंडळाशीं सारखेपणा आमच्या पाहाण्यांत येतो, तेव्हां या गोष्टीवर एक चमत्कारीक स्थापना होत्ये. आतां असें ठरतें, कीं, त्या सर्वांस त्यांच्या त्यांच्या दिवस रात्री आहेत, त्यांत्रे सारखे ऋतु, आणि त्यांतून कित्येकांस रात्रीं अंधार नाहींसा करायास चंद्र आहेत; परंतु इतकेंच नाहीं, व त्यान्त्रावर डोंगर आणि अधो प्रदेश आहेत; दुसऱ्याचें असें किं त्याचा सभींवतां वातवावर आहे जें जिवांचे श्वासोश्वासें करून पालन करतें; तिसऱ्याचें असें किं त्यांचेवर गढे जमून असतात तेणें करून शाखा पल्लवीस टवटवी आणि शोभा येत असेल; आणि चवथ्याचें असें किं त्याचे उत्तर प्रदेशीं हिंवाळ्यांत एक शूभ्रवर्ण प्रस्तार्ण होतो, आणि उन्हाळा येतां कमी होत जातो. यावरून असें वाटतें किं त्यांत पाणी असते आणि वात वावरणांत वाफे सारीखें चढ़ून हीम लागतांच थिजतें, आणि बर्फाचे आकारांत त्याचा संचय होऊन लोंकरी प्रमाणें जमीनीस आच्छादीत होतें, आणि शरत्काळींचे सूर्याचे उन्हानें विरघळून जातें; याचप्रमाणें आपले वार्षीक गमनांत जे उपकारीक आणि हीत कारक फेरफार होतात, तसे ईतर सर्व पृथ्वींवर होतात.

---

## * सृष्टीची शोभा ( २ )

[ तारीख १६ माहे नव्हेंबर सन १८३२ ]

आतां विद्यांचा शोध काय संपला ? तर आपण ईश्वराचे गूणानुवाद वर्णणारे कवीचें भाषण स्थापितां येतें, "परमेश्वरा, मनूष्य काय आहे कीं

तूं त्याजवर त्याजवर भेटावयाची कृपा करावीस" विद्येचा शोधे करून सृष्टी विचार पूर्वीचे मर्यादेचे पार विस्तीर्ण झाला आहे तेणेंकरून आपण पाहातों कीं सूर्य जो इतका दूर आहे तो आपल्या ग्रहमंडळांचा मध्यस्थानीं स्थीर असून, आपण ज्या पृथ्वीवर आहों तिचापेक्षा शेकडो गुणे विस्तीर्ण जे दुसरे ग्रह, त्यांच्यावर प्रकाश आणि उष्णता देतो आणि ऋतूंचा एकसारिखा क्रम करतो. तेणेंकरून या प्रचंड तेजासभोंवती जो जगांचा समूदाय आपआपल्या वर्तुळ मार्गानी फिरतो तो आपणास उघड झाला आहे. आणि स्थापितां येतें किं ज्या गोळयावर (पृथ्वीवर) आपण फिरतों, तो आपल्यावरील सर्व मोठ्या समुद्रासहीत आणि द्विपासहीत, इतर गोळयापासून निवडला जावयाजोगा कांही मोटा असावा, तसा नसतां सर्वांत कनिष्ट आहे; आणि कित्येक दुरचे ग्रहांपासून पाहूं लागलों तर आकाशांत एक बिंदू सारखाहि दिसणार नाहीं. त्यावरून हें कळतें कीं यद्यापि ही मोठी पृथ्वी आपल्यावरील कोट्यावधी जीवांसहीत नाशाप्रत पावली तथापि अंतरिक्षांत दुसरीं अशीं जगें आहेत, कीं, तेथें आपल्या महद् प्रलयाची बातमी लागणार नाहीं; आणि ही गोष्ट समजणारही नाहीं; व दुसरीं अशीं जगें आहेत कीं त्यांतून पाहिलें असतां एक लाहान चांदणी चमकतां राहिली, इतकें मात्र दिसेल. या गर्व छेदक परंतु सत्य विचारावरून आपल्या मनांत लज्ज्या प्राप्त व्हावी. आपण केवळ या आपले पृथ्वीसच इश्वराचें जग असें मानू नये, परंतु जगांतील एक केवळ सूक्ष्म अंश आहे आसें समजावें; आणि ईश्वरानें आपले भक्तांस राहावयाकरितां जी पुष्कळ घरें निर्माण केलीं आहेत, त्यांतील हें पण घर होय; आणि सुर्याचा तेजांत जीं जगें फिरतात त्यांतील हें एक जग आहे, असें समजावें.

परंतु काय या मर्यादेचे पलीकडे काहीं नाहीं ? ग्रहमंडळास मर्यादा आहे, परंतु आवकाशास मर्यादा नाहीं; आणि जर आपण पुढें विचार चालविला तर आपणांस अंधारी आणि रिकाम्या जाग्यातून जावें लागेल काय ? सगळे पांच कींवा पराकाष्टा साहा ग्रह नुसत्या डोळ्यानें दिसतात. तर मग दुसरे तेजाचे समुदाय, जे आकाशांत लखलखतात आणि सर्व आकाशाचे

पोकळींत तेजें करून प्रकाशतात ते काय ? सर्व ग्रह सूर्याचे स्वाधीन, आणि ते त्या भोवती फिरते समयीं, जा शक्ती करून त्या माहा तेजाचे बरोबर आसायास बांधले गेले आहेत, त्या शक्तीस ते मान देतात, परंतु दुसऱ्या तारा त्याचें राज्य मानत नाहींत. त्या त्याचे भोवतीं फिरत नाहींत. सामान्य दृष्टीस त्या स्थीर दिसतात; आणि त्यांतून प्रत्येक आपआपल्या मुलखाचे भूपती होत, आणि अनंत अवकाशांत आपआपला मुलूख धरून आहेत अशा दिसतात. त्यांचा विचार आपण काय करूं सकतो ? हा अंधरी आणि अगमनीय मुलूख शोधास आपण एक सहास उड्डाण घ्यावें काय ? हे अगणनीय अग्नीविश्वांत दूर दूर ठिकाणी काय म्हणून चमकतात ? काय ते जगांतील या लहान तुकड्यावर अंधुक झळझळावे म्हणून मात्र केले आहेत ? किंवा दुसरीं जगें प्रकाशमान करावीं आणि दुसऱ्या मंडळास प्राणशक्ति द्यावी या आधीक योग्य कारणास्तव ते केले आहेत असें समजावें ?

---

## नाटक शाळेस प्रोत्साहन

[ तारीख १७ माहे फेब्रवारी सन १८३२ ]

आलीकडे हिंदुस्थानामध्यें जा नव्या गोष्टींचा प्रसार झाला आहे, त्यांत कलकत्यामध्यें हिंदुनाटक शाळा चालू झाली, जिचे वर्तमान मागेल कागदांत लिहिलें, ही गोष्ट मोजाया जोगी होय. डाक्तर विलसन साहेबांनीं आपला हिंदु नाटक संग्रह म्हणोन ग्रंथ आहे त्यांत म्हटलें आहे कीं "युरोप खंडांतील लोकांत चवदाशें वर्षांचे पूर्वी नाटक विद्या नव्हती. त्या वेळेस हिंदु नाटकें अस्तास चाललीं होतीं. मुसलमानी ग्रंथांत नाटकांचे जातींचे लेख नाहींत, म्हणोन मुसलमानांतच जें कधीं नव्हतें तें त्याणीं या देशांत प्रवृत्त केले अशी गोष्ट संभवत नाहीं." या लिहिण्यावरून असें दिसतें कीं हिंदूंचीं नाटकें, या

देशात उत्तरे कडचे व पश्चिमेकडचे मुसलमान लोकांचा अंमल व्हायाचे पूर्वी केलीं होतीं जा समयीं कदाचित् हिंदु राजे संस्कृत नाटकांचा रस घ्यायास समर्थ होते असतील असा तर्क होतो. परंतु हें लिहिणें भोजराजा व त्याचे कित्येक वंशज यांचे दरबारांत जे कवी होते त्याणीं केलेलीं शाकुंतल इत्यादि नाटकांविषयीं मात्र संभवतें. कारण पुष्कळ नाटकें आलीकडे केलेलीं आहेत असें सिद्ध करितां येतें, आणि त्यांनून कित्येक धर्मविजय इत्यादिकांस तर दोनशें वर्षांवर वर्षें झालीं नाहींत. या आलीकडील नाटकांचा अभिनय कधीं झाला असेल असें आम्हास वाटत नाहीं. तीं संस्कृत भाषेंत लिहिलीं आहेत; जी भाषा मुसलमानाचे राज्यांत फार थोडे लोकांला समजत होती असेल. तशींच त्यांत मध्यें मध्यें विचित्र भाषांचीं भाषणें आहेत, जा भाषा जाणीं अभ्यास केला आहे त्यांस आणि कवींस मात्र समजतात. हीं नाटकें जा राजांचे नावानें केली आहेत त्या राजांचें कांहीं वर्तमान बखरांत आढळत नाहीं; आणि जर कोणत्यातरी एके दरबारांत नाटकांचे द्वारें मनोरंजन करायाची पद्धती असती तर मुसलमान व युरोपिअन बखर लिहिणारांनीं ती गोष्ट लिहायाची टांकलीं नसती. यावरून सिद्ध होतें कीं अर्वाचीन नाटके जा राजांचे नावानें केलीं आहेत आणि जा संगीं त्यांचा प्रथम सभेंत अभिनय केला म्हणोन प्रस्तावनांत असतें हें सर्व कल्पित आहे. कदाचित् यापेक्षें थोडासा अधिक धीर धरून असा प्रयत्न केला तरीहो होईल कीं प्राचीन व नवीन सर्व नाटकें विद्वान लोकांचे मनोरंजनार्थ इतर काव्यांसारिखीं केलीं आहेत. असें नव्हे कशावरून ? परंतु प्राचीन काळचे वर्तमानाचा शोध आम्हास पुरा लागत नाही म्हणोन या प्रश्नाचा चांगला निश्चय करितां येणार नाहीं.

हें कसें असेल तें असो. एक गोष्ट अनिर्वाद आहे कीं जरी या नाटकांचा कोठे अभिनय झाला असला तरी त्यापासून आईकणारांमध्यें थोडक्यांचेच मनोरंजन झालें असेल. डाक्तर विलसन साहेबांचे मत आहे कीं या नाटकांचा अभिनय प्राचीन राजांचे दरबारांत होत असे; त्याणींही याविषयीं म्हटलें आहे. "तीं ऐकणारांनून बहुतास समजत नव्हतीं असतील; आणि

त्यांपासून साधारण लोकांचे मनांत विकार किंवा अभिरूचि उत्पन्न झाली नसेल. ”

याकरिसां इतके काळानें आतां हिंदुचा नाटकांचा परकीय भाषेंत अभिनय होतो; आणि त्यांपासून या देशचे लोक व एथे राहाणारे इंग्रेज या दोघांचेंही मनोरंजन होते ही गोष्ट पाहून हर्ष होतो. अशा गोष्टी होतील हें कालिदाचा किंवा भवभूतीचाही मनांत कधीं आलें नसेल, आमचा भरवंसा आहे कीं कलकत्यांतील हिंदु नाटक शाळेस तद्देशीय लोक व सर्व इंग्रेज लोक मदत करितील, आणि रिफार्मर वर्तमान पत्राचे लिहिणारा सारिखेंच आम्ही इछितो कीं या नाटकांपासून जें मनरंजन होईल तेणेंकरून देशांतील अभद्र जात्रा इत्यादि समारंभ बंद होतील.

---

## ग्रंथ परीक्षणाचा नमुना

[ तारीख ४ माहे मे सन १८३२ ]

या देशातील सरकारी कारभाराचा अनुक्रम, व राज्यांतील सर्व प्रकरणांत राज्य कारभाराचा जा रीती उत्तरोत्तर नव्या होत आल्या, त्या जाणें लक्ष्यांत धरिल्या असतील, त्याचें ध्यानांत असेल कीं राज्याचा कारभार जांकडे होता, त्यांचें मतांप्रमाणें, व आग्रहाप्रमाणें आजपर्यंत सरकारच रीतींत किती फेरफार पडत गेला आहे. या रीतीनें त्या पुरूषांचे मतलबापासून लाखों लोकांचे बरें वाईट व्हावे इतकी त्यांमध्यें शक्ति आहे; म्हणोन त्यांतून एक एकांची मतें किती चांगलीं, व त्यांस कोणता चांगला आधार आहे, आणि त्या मतांचे आधारानें चालविलेल्या कारभाराचे रीतीपासून कोणतें बरेंवाईट होतें, या विचाराकडे, चांगले राज्याचा स्वार्थ जाणणारे जितके आहेत, त्यां सर्वांचें लक्ष्य लागायास राहाणार नाहीं. या जातीचा विचार करण्याचे लक्ष्यानें केलेला

एक लहान इंग्रेजी ग्रंथ एथें आलिकडे प्रसिद्ध झाला आहे; त्यांचें नाव "नामदार मौन्स्तुआर्ट एल्फिन्स्तन साहेबांचे हिंदुस्थानचे कारभारांतील कांहीं मुख्य गोष्टीविषयींचें मताचा विचार, व सर जान मालकूम साहेब यांचे मतांची बरोबरी." या देशांत इंग्रेज लोकांची वस्ती करणें, छापायास स्वतंत्रता देणें, एथील राहाणारे लोकांस विद्या शिकविणें, व जुन्या चाली न सोडण्या-विषयींचा त्याचा आग्रह, या विषयांवर त्या तीन पुरूषांचे मतांचा विचार लिहोन, त्या ग्रंथांत एथील राहाणारे लोकांचे कल्याण करण्याकरितां एल्फिन्स्तन साहेबानें जो बेत सांगीतला आहे त्याचाही विचार केला आहे. एथील राहणारे लोकांचें कल्याण करण्याकरितां एल्फिन्स्तन साहेबांचे मतें चार गोष्टी पाहिजेत त्या त्या जमिनीचा दस्त हलका असावा, कीं कायदे उघड असावे, विद्या शिकवावी, आणि रोजगार द्यावे. ग्रंथाचा लिहिणारा (जो आम्हास वाटतें कीं एथील राज्यकारभार खात्यांतला कंपनीचा चाकर आहे,) याणें लिहिलें आहे कीं "जसा क्रिस्तियनाचे तीन धर्मांतून दान हा मोठा असें म्हणणे आहे; तसी या चार गोष्टींत जमिनीचा दस्त हलका करावा ही गोष्ट मोटी." त्याचें म्हणणे कीं हा दस्त फार वाढविला आहे. म्हणोन लोकांस भीक लागली, लोकांकडे भांडवल व पैका जमेना असें झालें; आणि त्यामुळें या देशांत विद्या व कळा या कमी होत जाउन त्यांची अनास्था होऊं लागलीं तसीच जमाबंदीचे जा रीतीस रयतवाड असें म्हणतात, ती किंवा जा रीतींस प्रतिवर्षीं दस्ताचा ठराव केला पाहिजे, अशा सर्व रीतीपासून फार अस्वार्थ होतात असें त्याणें दाखविलें आहे; व लिहिलें आहे कीं जमाबंदीचा ठराव नेहमी एक सारिखा चाले असे कोणत्ये तरी पद्धतीने वहिवाट चालवावी.

या ग्रंथ करणारास एल्फिन्स्तन साहेबांची राजरीती व बेत यांचा पक्षपात आहे असें उघड दिसते, व त्याणें दाखविलें आहे कीं एल्फिन्स्तन साहेबाचे बेत उदारमन, व या देशचे लोकांचे कल्याण करावें या इछेनें झालेले आहेत. ग्रंथकारानें त्या तीनही पुरुषांचे स्वभावगुण तशेच खरेपणानें लिहिले आहेत. त्याणें केलेलें वर्णन बनल्यास आम्ही पुढील एकादे कागदांत

छापूं; परंतु सांप्रत एल्फिनस्तन साहेबाचे वर्णनांत हें पुढील वाक्य आहे एवढें आम्ही लिहितों. "मला वाटतें कीं एल्फिन्स्तन साहेबांनी लार्डांचे सभेमध्यें हिंदुस्थानचे कारभारा विषयीं जे मत सांगीतलें आहे, त्याचे कांहीं अंश एथे लिहिले आहेत, ते पाहिल्यावरून, त्यांस झाले गोष्टीचा अनुभव व होणारे गोष्टींचें भविष्य करण्याजोगें राजनीती मध्यें शाहाणपण आहे असें कळेल." हें लक्षण फार उत्कृष्ट मनाचे आहे, असें हिंदुस्थानचा बखर लिहिणारा मिल्स साहेब यानें लिहिलें आहे; आणि हें लक्षण सर टामस मन्रो साहेब व सर जान माल्कमसाहेब यांमध्यें नव्हतें.

---

## विद्येविषयी आस्था

[तारीख ३१ माहे आगष्ट सन १८३२]

लार्ड बेकनसाहेबानें म्हटलें आहे कीं "विद्या बळ आहे." या वाक्याचा खरेपणा या काळांत केवळ स्पष्ट आहे खरा. तथापि यापासून वेगवगळे लोकांचीं आचरणे एके रीतीनें झालीं नाहींत, किंवा विद्ये विषयींची आस्था त्यांमध्यें एके रीतीची उत्पन्न झाली नाहीं. ही गोष्ट निर्विवाद आहे कीं विद्येचा मूळ प्रकाश पूर्व देशांतून पश्चिम देशावर पडला आणि असेंच निःसंशय प्रमाणावरून सिद्ध झालें आहे कीं पृथ्वीचे या भागांतील लोकांमध्यें विद्येची मूळ स्वरूपें हजारों वर्षांपूर्वी ठाऊक होतीं. म्हणोन युरोप खंडांत सांप्रत कळा कौशल्यें पूर्णतेस आलीं आहेत, आणि या देशांत इतका काळ गेला तरी त्यांची फार वृद्धि झाली नाहीं असें पाहून चमत्कार वाटतो.

या दोन पृथ्वीचे भागांत विद्येची वृद्धि बरावरीनें झाली नाहीं यांची दुसरी कारणें काय असतील तीं असोत, परंतु आम्हास वाटतें कीं, साधारण विद्येचे मुख्य उपयोग या देशांतील लोकांस चांगले समजले नाहींत हें त्यांतून

एक कारण आहे. याविषयीं प्रमाण इतकेंच लिहिलें पाहिजे कीं, या देशांतील विद्वान लोकांनीं न्याय व वेदांत या शास्त्रांकडे जितकें लक्ष दिलें तितकें उपयोगी कळा कौशल्यांकडे दिलें असतें, तर त्यांचे श्रमापासून बहुत चांगल्या गोष्टी घडल्या असत्या. परंतु सर्व विद्या धर्मांचे उपयोगी, किंवा वादांमध्यें जय मिळविण्याचें साधन, तीचा मनुष्याचे संसारांतील कामांशीं कांहीं उपयोग नाहीं असें त्या प्राचीन विद्वान लोकांचें मत होतें असें वाटतें. हिंदु व मुसलमान या लोकांत शिल्प भूगोलाचें ज्ञान, इतिहास यांमध्यें परिश्रम कमी यांचें कारण हें आहे.

परंतु ही गोष्ट सर्वांस संमत आहे कीं, काळ व पदार्थांची स्थिति ही बदलली म्हणजे जुन्या रीती सोडून नव्या घेण्याचे प्रयोजन पडतें. या देशाचे स्थितीमध्यें गेले वीस वर्षांत मोठा फेर झाला; जा पासून प्राचीन संप्रदाय बहुत मोडले. आणि तो फेरफार झाला म्हणोन ही गोष्ट दिवसानुदिवस अधिक अधिक अवश्य होत आहे कीं, या देशचे लोकांनीं आपलें लक्ष संसारोपयोगी कळा कौशल्यांकडे द्यावें, त्यांचे व्यवहारांत उपयोग कसे होतात शिकावें, आणि सारांश, जा गोष्टींनीं युरोपियन लोक या देशचे लोकांपेक्षें श्रेष्ठता पावले आहेत, आणि जा गोष्टी नाहींत म्हणोन या देशाची इतकी दुर्दशा झाली त्या सर्व त्यागीं साध्य कराव्या. एथील विद्येपासून मागल्ये काळांत काय स्वार्थ झाले असतील ते असोत, परंतु संसारांत ज्या गोष्टी लागतात, त्यांमध्यें त्यांचा उपयोग उत्तरोत्तर कमी होत चालला आहे. लार्ड ब्रहम साहेबानें म्हटलें आहे कीं, “ विद्येचे व्यवहारांतील उपयोग मोठे कामाचे आहेत. आणि आपलें ज्ञान वाढविल्यानें द्रव्य मिळविण्यांत किंवा सुखांत कांहीं स्वार्थ होणार नाहीं असा मनुष्य कोणी नाहीं. ”

या रीतीची विद्या एथील लोकांस शिकवावी या लक्ष्यानें या शहरांत लोकांना एकत्र जमून कित्येक परोपकारांसाठीं मंडळ्या केल्या आहेत. त्या सर्वांचे श्रमापासून जे स्वार्थ आतापर्यंत झाले, आणि जें पुढें होतील ते सर्व लिहिण्याचे एथे प्रयोजन नाहीं. परंतु त्यांतून जा एके मंडळीस एथील

# महाराष्ट्र भाषेचें व्याकरण

[ **असल पत्रें** तारीख १६ वी मे सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस.

महाराज, मेस्तर स्तिवन्सन् साहेब याणे महाराष्ट्र भाषेचें व्याकरण केलें आहे त्यावर तुम्ही कांहीं लिहिलें नाहीं हें पाहून मला आश्चर्य वाटलें. ते व्याकरण आपली भाषा शिकविणारे इंग्रेज लोक यांस जसे उपयोगी आहे तसें आपले लोकांस नाहीं, तरी तशी जीं व्याकरणे प्रसिद्ध झालीं त्यांत तें फार उत्तम आहे असें छापून सर्वांत प्रसिद्ध करावें असें तें योग्य आहे. जो पाद्री याणे हा ग्रंथ केला आहे त्याणे दोहो वर्षांमागें या प्रमाणेंच एक इंग्रेजी भाषेचें व्याकरण केलें, आणि मुंबईची शिक्षा मंडळी याणी १५०० रुपये खर्च करून त्यास आश्रय दिला, ते रूपये मेस्तर स्तिवन्सन् यास इनाम दिले. त्याणे सांप्रत जो ग्रंथ केला तो फारच उत्तम झाला, कां कीं एक दोन ग्रहस्तांनी मराठी भाषेचें व्याकरण केलें त्यावरून त्या साहेबास कांहींच साहाय्य झालें नसेल.

मराठी व्याकरण करावें असें आपलें देशांतील विद्वज्जनांचे मनांत कधी आलें नव्हतें असें आपणास सर्वांस माहीत आहे, परंतु संस्कृत भाषेचे व्याकरणावर त्याणी मोठमोठे ग्रंथ लिहिले. त्यांतील कोणतीहि रीति प्राचीन किंवा सांप्रतच्या कोणते एके भाषेशीं मिळत नाहीं. मराठी भाषेचें व्याकरण असा जो निरूपयोगी ग्रंथ तो मोठे परिश्रम करून केला त्याचें कारण काय ते सांप्रतच्या काळचे बहुतेक शास्त्री यांस समजत नाहीं. ते म्हणतात कीं " मराठी भाषेच्या रीति जाणल्या वांचून आम्हांस ती भाषा बोलतां व लिहितां येते."

मराठी भाषेचें व्याकरण करावें हें काम प्रथम दाक्तर केरी पाद्री याणे आरंभिलें. जेथें शुद्ध मराठी भाषा बोलतात तेथून तो फार दूर राहत असे, व मराठी लोकांशीं त्याचा व्यवहारहि थोडा पडत असे, व त्यास त्यांचे भाषेचे नियमित वाक्याचें अगदीं ज्ञान नव्हतें, यास्तव त्याणे जें त्यावेळीं काम आरंभिलें होतें त्यास तो योग्य नव्हता, त्या करितां त्याचा ग्रंथ शुद्ध

नाहीं. व त्याची रचनाहि चांगली नाहीं. त्यांत हेंगाड्या मराठी भाषा मिसळल्या आहेत व त्यामध्यें सर्व प्रकारच्या चुक्या आहेत.

या नंतर महंमद इब्राहिम मकबा याणे मराठी भाषेचे व्याकरण केलें. हा कोडतांतील माजी दुभाषा यास " कवार जाते " अशीं वाक्यें कोडतात व एरवी बोलतांना ज्याणी ऐकिलें असेल त्यांना त्याचे ग्रंथांत चांगली भाषा व शोध पाहतां आश्चर्य वाटेल, परंतु कर्नल केनडी साहेबानी तो ग्रंथ शोधला आहे. म्हणून असें वाटत होते कीं त्यांत काहीं कांहीं चुक्या नसाव्या, परंतु त्याचा कोणता एक भाग व विशेषें करून नामाची व क्रियापदांची रूपें पाहिलीं असतां तात्काळ समजून येईल कीं तो ग्रंथ फार चांगला झाला नाहीं.

मेस्तर स्तिवन्सन् याचे ग्रंथात कांहीं चुक्या नाहींत असें मी म्हणत नाहीं. त्यांत ज्या नाईलाज होऊन चुक्या पडल्या आहेत त्या तुम्ही आपल्या कागदांत छापला तर मी आनंदानें दाखवून देईन. मला इतकेंच लिहावयाचें आहे कीं सदरहू सांगितलेल्या दोहो ग्रंथांत जे बहुत विषय संदिग्ध ठेवले होते, किंवा ज्यांत चुक्या केल्या होत्या, व शिक्षा मंडळीचे कारखान्यांत ज्या पंडीतांनी मराठी भाषेचा कोश केला त्यांची व महाराष्ट्र व इंग्रेजी कोश ज्या प्रसिद्ध साहेबाने केला त्या साहेबाचीं ज्या विषयांवर भिन्न भिन्न मतें होतीं ते विषय स्तिवन्सन् पाद्री याणे फार चमत्करिक रीतीने उघड करून दाखविले आहेत.

तुमचा परम मित्र

**एक एतद्देशीय ग्रहस्त**

६५९३.

# महाराष्ट्र भाषेचें व्याकरण

[ **असल पत्रें** तारीख १६ वी मे सन १८३४ ]

**दर्पणाचे कर्ते** यांस.

महाराज, मेस्तर स्तिवन्सन् साहेब याणे महाराष्ट्र भाषेचें व्याकरण केलें आहे त्यावर तुम्ही कांहीं लिहिलें नाहीं हें पाहून मला आश्चर्य वाटलें. ते व्याकरण आपली भाषा शिकविणारे इंग्रेज लोक यांस जसे उपयोगी आहे तसें आपले लोकांस नाहीं, तरी तशी जीं व्याकरणे प्रसिद्ध झालीं त्यांत तें फार उत्तम आहे असें छापून सर्वांत प्रसिद्ध करावें असें तें योग्य आहे. जो पाद्री याणे हा ग्रंथ केला आहे त्याणे दोहो वर्षांमागें या प्रमाणेंच एक इंग्रेजी भाषेचें व्याकरण केलें, आणि मुंबईची शिक्षा मंडळी याणी १५०० रुपये खर्च करून त्यास आश्रय दिला, ते रूपये मेस्तर स्तिवन्सन् यास इनाम दिले. त्याणे सांप्रत जो ग्रंथ केला तो फारच उत्तम झाला, कां कीं एक दोन ग्रहस्तांनी मराठी भाषेचें व्याकरण केलें त्यावरून त्या साहेबास कांहींच साहाय्य झालें नसेल.

मराठी व्याकरण करावें असें आपलें देशांतील विद्वज्जनांचे मनांत कधी आलें नव्हतें असें आपणास सर्वांस माहीत आहे, परंतु संस्कृत भाषेचे व्याकरणावर त्याणी मोठमोठे ग्रंथ लिहिले. त्यांतील कोणतीहि रीति प्राचीन किंवा सांप्रतच्या कोणते एके भाषेशीं मिळत नाहीं. मराठी भाषेचें व्याकरण असा जो निरूपयोगी ग्रंथ तो मोठे परिश्रम करून केला त्याचें कारण काय ते सांप्रतच्या काळचे बहुतेक शास्त्री यांस समजत नाहीं. ते म्हणतात कीं " मराठी भाषेच्या रीति जाणल्या वांचून आम्हांस ती भाषा बोलतां व लिहितां येते. "

मराठी भाषेचें व्याकरण करावें हें काम प्रथम दाक्तर केरी पाद्री याणे आरंभिले. जेथे शुद्ध मराठी भाषा बोलतात तेथून तो फार दूर राहत असे, व मराठी लोकांशीं त्याचा व्यवहारहि थोडा पडत असे, व त्यास त्यांचे भाषेचे नियमित वाक्याचें अगदीं ज्ञान नव्हतें, यास्तव त्याणे जें त्यावेळीं काम आरंभिलें होतें त्यास तो योग्य नव्हता, त्या करितां त्याचा ग्रंथ शुद्ध

नाहीं. व त्याची रचनाहि चांगली नाहीं. त्यांत हिंगाड्या मराठी भाषा मिसळल्या आहेत व त्यामध्यें सर्व प्रकारच्या चुक्या आहेत.

या नंतर महंमद इब्राहिम मकबा याणे मराठी भाषेचे व्याकरण केलें. हा कोडतांतील माजी दुभाषा यास " कवार जाते " अशीं वाक्यें कोडतांत व एरवी बोलतांना ज्याणी ऐकिलें असेल त्यांना त्याचे ग्रंथांत चांगली भाषा व शोध पाहतां आश्चर्य वाटेल, परंतु कर्नल केनडी साहेबानी तो ग्रंथ शोधला आहे. म्हणून असें वाटत होते कीं त्यांत काहीं कांहीं चुक्या नसाव्या, परंतु त्याचा कोणता एक भाग व विशेषें करून नामाची व क्रियापदांची रूपें पाहिलीं असतां तात्काळ समजून येईल कीं तो ग्रंथ फार चांगला झाला नाहीं.

मेस्तर स्तिवन्सन् याचे ग्रंथात कांहीं चुक्या नाहींत असें मी म्हणत नाहीं. त्यांत ज्या नाईलाज होऊन चुक्या पडल्या आहेत त्या तुम्ही आपल्या कागदांत छापला तर मी आनंदानें दाखवून देईन. मला इतकेंच लिहावयाचें आहे कीं सदरहू सांगितलेल्या दोहो ग्रंथांत जे बहुत विषय संदिग्ध ठेवले होते, किंवा ज्यांत चुक्या केल्या होत्या, व शिक्षा मंडळीचे कारखान्यांत ज्या पंडीतांनी मराठी भाषेचा कोश केला त्यांची व महाराष्ट्र व इंग्रेजी कोश ज्या प्रसिद्ध साहेबाने केला त्या साहेबाचीं ज्या विषयांवर भिन्न भिन्न मतें होतीं ते विषय स्तिवन्सन् पाद्री याणे फार चमत्करिक रीतीने उघड करून दाखाविले आहेत.

तुमचा परम मित्र

**एक एतद्देशीय ग्रहस्त**

६५१३.

# चिमाजीरावाचा मृत्यु

[ तारीख २० माहे जुलै सन १८३२ ]

आम्ही ऐकतों कीं चिमाजीराव आपासाहेब बाजिरावाचे कनिष्ट बंधु हे मेल्याची बातमी मुंबईंत आली आहे. ते काशींत वैशाख वद्य ३० स म्हणजे मे महिन्याचे २९ वे तारिखेस वारले. आपा साहेबांचा जन्म सन १७८४ चे एप्रिल महिन्यांत गोदावरीचे काठीं कोपरगांवांत झाला होता. त्यांचा बाप रघुनाथराव वारला तेव्हां त्याची आई आनंदीबाई गरोदर होती, आणि पुढें कांहीं महिन्यानंतर आपासाहेबांचा जन्म झाला. त्या वेळेस नाना फडणवीस यांचे साशंक मसलती प्रमाणे राज्य चाललें होतें, म्हणोन चिमाजीराव, त्यांची आई आनंदीबाई, त्यांचा भाऊ बाजीराव, व त्यांचे बापाचा दत्तकपुत्र अमृतराव हीं सर्व सन १७९३ पर्यंत कोपरगांवीं कैदेंत होतीं. नंतर त्यांस नाशिकाजवळ अनंदवेलीस नेलीं, व पुढले वर्षाचे एप्रिल महिन्यांत त्यांस तेथून शिवनेरीचे किल्यावर बंदींत ठेविलीं. जेव्हां सन १७९५ त माधवराव पेशवे हे जुन्ये वाड्यावरून उडी घेऊन मेले व तेव्हाच नाना फडणविसानें काम सोडलें, त्या संधीस बाजिरावाचे पक्षाचे लोकांनीं त्यास राज्यावर स्थापिला. पुढें लवकरच नवा प्रधान बाळोबा तात्या याणे बाजिरावापासून कित्येक मंडळी फोडून शिंदे व परशुरामभाऊ पटवर्धन यांचे मदतीनें बाजिरावास अधिकारावरून काढिला; आणि माधवरावाची बायको यशोदाबाई इला चिमाजी आपा दत्तक देऊन चिमाजी माधवराव या नांवानें त्यास गादीवर बसविला. परंतु सर्व संस्थानी व इंग्लिश सरकार याणीं बाजिरावाचा अधिकार कबूल केला, म्हणोन त्यास पुढील डिसेंबराचे ४ थ्ये तारिखेस अधिकारावर आणिला, आणि चिमाजी आपास तेथून काढून आपले भावाचे राज्याचा अपहार केला म्हणोन त्या कडून प्रायश्चित्ते करविलीं. तेव्हांपासून त्याणे राज्य कारभारांत अगदीं मन घातलें नाहीं, आणि बाजीरावाचे दरबारांतील वर्तमानाची कांहीं काळजी केली नाहीं. इंग्रेजांनीं पेशव्यांचें राज्य घेतलें त्या वेळेस आपासाहेब त्यांचे स्वाधीन झाला, आणि त्यांचे अनुमतानें काशीस जाऊन विलायती सरकारनें वर्षास २०००० ची नेमणूक केली ती घेऊन तेथें राहिला. त्याची मागें कांहीं संतति नाहीं.

REFBK-0006713